# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१०/२०२०** **दिनांक २८.०८.२०२०**

**स्थळ- साईनिवासअतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी ०१.०० वाजता**

मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.१२०/२०१९ यावर दिनांक ०९/१०/२०१९ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नियुक्त केलेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा गुरुवार दिनांक २०/०८/२०२० रोजी दुपारी ०१.०० वाजता साई सभागृह, शिर्डी येथे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/१०५२/२०२०, दि.१२.०७.२०२० अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते.

सदर बैठक काही अपरिहार्य कारणास्तव तहकुब करण्यात येत असुन मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सदर सभा शुक्रवार दिनांक २८/०८/२०२० रोजी दुपारी ०१.०० वाजता साईनिवास अतिथीगृह, शिर्डी येथे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/१०९९/२०२०, दि.१९.०८.२०२० अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते.

त्यानुसार सदरहु सभा शुक्रवार दिनांक २८/०८/२०२० रोजी दुपारी ०१.४० वाजता साईनिवास अतिथीगृह, शिर्डी येथे सुरु करण्यात आली.

तदर्थ समितीच्या सदस्या मा.श्रीमती गीता प्रविण बनकर, सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर सदरहु सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहु शकत नसलेबाबत त्यांनी दुरध्वनीव्दारे कळविले होते, त्याची समितीने नोंद घेऊन, त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

या सभेस खालील प्रमाणे मा.अध्यक्ष व मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.न्या.श्रीकांत आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर.
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.

२. मा.श्री.कान्हूराज बगाटे, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.
तथा सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती.

३. मा.श्री.दिलीप स्वामी, अपर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक. तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती.

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

त्यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

**विषय नं.०१** **दि.१३.०७.२०२० रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.४२१** **दिनांक १३.०७.२०२० रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करतांना खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या व त्यास मान्यता देण्यात आली.**

**१. निर्णय क्र.३६०- सदस्य सचिव श्री. बगाटे साहेब यांनी दि. 13.07.2020 चे विषय क्र.6 निर्णय क्र.360 बाबत सदरचा निर्णय कायम करण्यापूर्वी मुद्दा उपस्थित केला व त्याकामी त्यांचे मत लिहून घेण्याची विनंती केली. पूर्वी तो निर्णय होतांना पूर्वीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.डोंगरे साहेब यांनी रेकॉर्डवर जे मुद्दे मांडले होते तेच मुद्दे पुन्हा मांडतांना समिती सदस्य सचिव /मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत खालील प्रमाणे मत मांडले.**

**सन १९ नोव्हेंबर,२०११ रोजी तत्कालीन व्यवस्थापन समितीने कंत्राटदारामार्फत संस्थान सेवेत कार्यरत असलेल्या ९१६ कंत्राटी कर्मचा-यांना नियमीत नेमणूका देण्यास मान्यता देण्यात आली होती. व तो प्रस्ताव शासनास सादर केलेला होता. सदर ९१६ कंत्राटी कामगारांपैकी २२ ऑगस्ट,२००४ पुर्वी कंत्राटदारामार्फत संस्थान सेवेत असलेल्या ६३५ कंत्राटी कामगारांना पात्र ठरविण्यात आले. व त्यानुसार शासनाने दि.१७.०९.२०१९ रोजी शासन निर्णय पारित करुन त्यास मान्यता दिलेली आहे. सदर शासन निर्णयाची संस्थान प्रशासनाने अंमलबजावणी करुन ५९८ कायम कंत्राटी स्वरुपात नेमणूक**

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

दि.०२ जानेवारी,२०२० रोजी दिली आहे. सदर कार्यवाही ही, तत्कालीन व्यवस्थापन समितीच्या व शासन मान्यतेने केलेली आहे, असे मत मांडले.

598 कर्मचा-यांना राज्य शासनाचे विधी व न्याय विभागाचे शासन निर्णय दि.17.09.2019 अन्वये ठेकेदारांचे आस्थापनेवरील एकूण 635 कर्मचा-यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी म्हणून नेमणुकीस मान्यता दिलेली आहे व या शासन निर्णयान्वये तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या 598 कर्मचा-यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी स्वरुपात दि. 02.01.2020 रोजी नेमणूक दिलेली असल्याने त्यास कार्योत्तर मान्यता द्यावी असे प्रतिपादन केले.

त्यावर तदर्थ समितीचे अध्यक्ष श्री.आणेकर साहेब व सदस्य श्री.स्वामी साहेब यांनी असे प्रतिपादन केले की, सदरचा निर्णय हा संपूर्ण विषयाचा अभ्यास करुन 3X1 अशा मताधिक्याने मंजूर करण्यात आलेला असल्याने त्यात बदल करण्याचा प्रश्न येत नाही. सबब सदरचा निर्णय मताधिक्याने कायम करण्यात आला.

---

२. **निर्णय क्र.३६४-** यावर सविस्तर चर्चा होऊन, ॲड संदीप देशमुख यांचा अर्ज नस्तीबंद करण्यात येत आहे. मा.सर्वोच्च न्यायालय तसेच मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे संस्थानचे वतीने न्यायालयीन कामकाज पाहणेसाठी संस्थानचे ॲडव्होकेट पॅनल तयार करण्यासाठी इच्छुक ॲडव्होकेट यांचेकडून संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात यावेत. सदरच्या जाहिरातीमध्ये खालील अटी व शर्ती नमुद करण्यात याव्यात.

१. मा. सर्वोच्च न्यायालयातील संस्थानचे कामकाज पाहण्यासाठी इच्छुक अर्जदारांचा मा.सर्वोच्च न्यायालयातील कामकाजाचा २० वर्षाचा नियमित सराव असावा, तर मा.उच्च न्यायालयातील कामकाज पाहण्यासाठी इच्छुक अर्जदारांचा मा.सर्वोच्च न्यायालयातील कामकाजाचा १५ वर्षाचा नियमित सराव असावा

२. अर्जदार किंवा फर्म यांची मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली/ मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे नोंदणी झालेली असावी.

३. अर्जदारावर कोणत्याही स्वरुपाचा फौजदारी गुन्हा कुठल्याही न्यायालयात दाखल झालेला नसावा किंवा प्रलंबीत नसावा. तसेच कुठल्याही पोलीस स्टेशनला त्यांचेविरुध्द फौजदारी तक्रार दाखल झालेली नसावी किंवा प्रलंबीत नसावी. व याबाबत त्यांनी सक्षम प्राधिकाऱ्यांसमोर केलेले शपथपत्र दाखल करणे आवश्यक आहे.

४. विनामुल्य सेवा देणा-या अर्जदारांना प्राधान्य देण्यात येईल. तथापी जे विधिज्ञ फी स्विकारु इच्छितात त्यांनी मा.सर्वोच्च न्यायालयातील/मा.उच्च न्यायालयातील संस्थानच्या प्रत्येक विधायक तारखेस किती फी आकारणार अथवा प्रकरणाची एकुण फी किती आकारणार, संस्थानने एखाद्या विषयाचे बाबतीत आपले कायदेशीर मत मागवल्यास अशा प्रकरणात किती फी आकारणार व इतर तत्सम गोष्टींसाठी किती फी आकारणार, अशा रितीने आपणास संस्थानकडून किती मानधनाची/फी ची अपेक्षा आहे. याबाबतचा स्पष्ट उल्लेख अर्जामध्ये करावा.

५. अर्जदार यांनी यापुर्वी मा.न्यायालयात संस्थानचे विरोधात काम केलेले नसावे. तसेच सद्याही अर्जदार संस्थानचे विरोधात काम करीत नसावा व संस्थानचे पॅनलवर नेमणूक झाल्यास संस्थानचे हिताचे विरोधात काम करणार नाही अशी लेखी हमी अर्जदारास द्यावी लागेल.

६. संस्थानचे पॅनलवर नेमणूक केलेल्या ॲडव्होकेटची/कायदा सल्लागाराची नेमणूक ही तात्पुरत्या स्वरुपाची असून सर्व ॲडव्होकेट्स चा कालावधी नेमणूक तारखेपासून ते पुढील आदेश होईपर्यंत राहील. तसेच संस्थान पॅनलवर नेमलेल्या ॲडव्होकेटला संस्थानचे सेवेत नोकरीवर हक्क सांगता येणार नाही.

७. पॅनलवरील ॲडव्होकेट्सच्या संख्येचे बंधन राहणार नाही.

८. संस्थानचे पॅनलवर नियुक्ती झाल्यांनतर अर्जदाराने दिलेली माहिती चुकीची आढळून आल्यास किंवा पॅनलवरील नियुक्तीनंतर अर्जदाराच्या काही आक्षेपार्ह गोष्टी संस्थानचे हिताचे विरोधात आढळून आल्यास त्यांना विना नोटीस संस्थानचे पॅनलवरुन कमी केले जाईल. व सदर अर्जदार विधिज्ञा विरुध्द त्यांचेशी संबधीत बार कौन्सीलकडे/बार कौन्सील ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांचेकडे तक्रार करण्याचा अधिकार संस्थानकडे राखून ठेवत आहे.

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील** PIL/120 **अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

९. मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालयात काम पहाणा-या ॲडव्होकेटने सामान्यपणे आकलन होईल अशी सर्व माहिती व सल्ला संस्थानला द्यावा लागेल.

१०. संस्थान पॅनलवर नेमणूक होण्यासाठी अर्जदार-ॲडव्होकेट श्री साईबाबांचा भक्त असावा.

११. संस्थान पॅनलवर नेमणूक केलेल्या ॲडव्होकेटची नेमणूक कोणतेही कारण न देता रद्द करण्यांचा अधिकार संस्थानला राहील व तशी नेमणूक रद्द केल्यावर संबंधीत वकीलाने काम न पहाणे व सुपूर्त केलेले कागदपत्र संस्थानला परत देणे बंधनकारक राहील.

(कार्यवाही-विधी विभाग)

याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, ॲड संदीप देशमुख यांचा अर्ज नस्तीबंद करण्यात येत आहे. मा.सर्वोच्च न्यायालय तसेच मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे संस्थानचे वतीने न्यायालयीन कामकाज पाहणेसाठी संस्थानचे ॲडव्होकेट पॅनल तयार करण्यासाठी इच्छुक ॲडव्होकेट यांचेकडून संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात यावेत. सदरच्या जाहिरातीमध्ये खालील अटी व शर्ती नमुद करण्यात याव्यात.**

**१. मा. सर्वोच्च न्यायालयातील संस्थानचे कामकाज पाहण्यासाठी इच्छुक अर्जदारांचा मा.सर्वोच्च न्यायालयातील कामकाजाचा २० वर्षाचा नियमित सराव असावा, तर मा.उच्च न्यायालयातील कामकाज पाहण्यासाठी इच्छुक अर्जदारांचा मा.उच्च न्यायालयातील कामकाजाचा १५ वर्षाचा नियमित सराव असावा**

**२. अर्जदार किंवा फर्म यांची मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली/मा.उच्च न्यायालय मुंबई,खंडपीठ औरंगाबाद येथे नोंदणी झालेली असावी.**

**३. अर्जदारावर कोणत्याही स्वरुपाचा फौजदारी गुन्हा कुठल्याही न्यायालयात दाखल झालेला नसावा किंवा प्रलंबीत नसावा. तसेच कुठल्याही पोलीस स्टेशनला त्यांचेविरुध्द फौजदारी तक्रार दाखल झालेली नसावी किंवा प्रलंबीत नसावी. व याबाबत त्यांनी सक्षम प्राधिकाऱ्यांसमोर केलेले शपथपत्र दाखल करणे आवश्यक आहे.**

**४. विनामुल्य सेवा देणा-या अर्जदारांना प्राधान्य देण्यात येईल. तथापी जे विधिज्ञ फी स्विकारु इच्छितात त्यांनी मा.सर्वोच्च न्यायालयातील/मा.उच्च न्यायालयातील संस्थानच्या प्रत्येक विधायक तारखेस किती फी आकारणार अथवा प्रकरणाची एकुण फी किती आकारणार, संस्थानने एखाद्या विषयाचे बाबतीत आपले कायदेशीर मत मागवल्यास अशा प्रकरणात किती फी आकारणार व इतर तत्सम गोष्टींसाठी किती फी आकारणार, अशा रितीने आपणास संस्थानकडून किती मानधनाची/फी ची अपेक्षा आहे. याबाबतचा स्पष्ट उल्लेख अर्जामध्ये करावा.**

**५. अर्जदार यांनी यापुर्वी मा.न्यायालयात संस्थानचे विरोधात काम केलेले नसावे. तसचे सद्याही अर्जदार संस्थानचे विरोधात काम करीत नसावा व संस्थानचे पॅनलवर नेमणूक झाल्यास संस्थानचे हिताचे विरोधात काम करणार नाही अशी लेखी हमी अर्जदारास द्यावी लागेल.**

**६. संस्थानचे पॅनलवर नेमणूक केलेल्या ॲडव्होकेटची/कायदा सल्लागाराची नेमणूक ही तात्पुरत्या स्वरुपाची असून सर्व ॲडव्होकेट्स चा कालावधी नेमणूक तारखेपासून ते पुढील आदेश होईपर्यंत राहील. तसेच संस्थान पॅनलवर नेमलेल्या ॲडव्होकेटला संस्थानचे सेवेत नोकरीवर हक्क सांगता येणार नाही.**

**७. पॅनलवरील ॲडव्होकेट्सच्या संख्येचे बंधन राहणार नाही.**

**८. संस्थानचे पॅनलवर नियुक्ती झाल्यांनतर अर्जदाराने दिलेली माहिती चुकीची आढळून आल्यास किंवा पॅनलवरील नियुक्तीनंतर अर्जदाराच्या काही आक्षेपार्ह गोष्टी संस्थानचे हिताचे विरोधात आढळून आल्यास त्यांना विना नोटीस संस्थानचे पॅनलवरुन कमी केले जाईल. व सदर अर्जदार विधिज्ञा विरुध्द त्यांचेशी संबधीत बार कौन्सीलकडे/बार कौन्सील ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांचेकडे तक्रार करण्याचा अधिकार संस्थानकडे राखून ठेवत आहे.**

**९. मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालयात काम पहाणा-या ॲडव्होकेटने सामान्यपणे आकलन होईल अशी सर्व माहिती व सल्ला संस्थानला द्यावा लागेल.**

**१०. संस्थान पॅनलवर नेमणूक होण्यासाठी अर्जदार-ॲडव्होकेट श्री साईबाबांचा भक्त असावा.**

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

११. संस्थान पॅनलवर नेमणूक केलेल्या ॲडव्होकेटची नेमणूक कोणतेही कारण न देता रद्द करण्यांचा अधिकार संस्थानला राहील व तशी नेमणूक रद्द केल्यावर संबंधीत वकीलाने काम न पहाणे व सुपूर्त केलेले कागदपत्र संस्थानला परत देणे बंधनकारक राहील.

यासंदर्भात सदस्य सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, सदर ठराव कायम करणेपुर्वी सदर ठरावात जादा अनुभव असलेले वकील यांची फी जादा राहणे स्वाभाविक आहे. आणि स्पर्धात्मक दर वाढून कमी विधी व्यावसायीक मिळतील, याचा विचार करता अनुभवाची अट शिथील करणे उचित राहील. मा.उच्च न्यायालयात न्यायाधिश पात्रतेसाठी १० वर्षाची वकीली त्या-त्या न्यायालयात करणेची संविधानिक तरतुद असल्याचे प्रतिपादन केले. तथापी उर्वरित समिती सदस्यांनी जादा अनुभव असणे योग्य आहे असे म्हणून अनुभवाचे बाबतीतील निर्णयासह वरील प्रमाणे सर्वोच्च न्यायालय ऐवजी उच्च न्यायालय असा बदल करण्यास मान्यता देऊन पुर्वीचा दि.१३/०७/२०२० रोजी घेतलेला निर्णय कायम केला.

(कार्यवाही-विधी विभाग)

---

**३. निर्णय क्र.३६६-** मा.सदस्य सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि.13.07.2020 च्या विषय क्र.12 चे निर्णय क्र.366 बाबत असे प्रतिपादन केले की, सदरचा निर्णय घेताना पूर्वीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.डोंगरे यांनी असे मत मांडलेले होते की, मे.लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांचे समवेत arbitratation करणेकामी arbitratator यांची नेमणूक करणेसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रकरणात कामकाज केलेले निवृत्त मा.उच्च न्यायालयाचे न्यायाधीश व विधिज्ञ यांचे आवश्यक फी व इतर अनुषंगीक खर्च इत्यादि बाबत वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहीरात देऊन अर्ज मागविण्यात यावेत व तदनंतर त्याची नेमणूक करावी, याची पुर्नरावृत्ती करत त्याकामी आग्रह धरला होता. पुढे चर्चे दरम्यान त्यांनी पूर्वीच्या निर्णयात मा.न्यायमूर्ति श्री.ए.एम.ढवळे यांची arbitratator म्हणून केलेली निवड यावर मत मांडले की, अशा एकाच व्यक्तिचे नांव सुचवण्याऐवजी आणखी काही व्यक्तिंची नांवे सुचवावीत. पुढील चर्चे दरम्यान विद्यमान सदस्य सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मा.उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायमूर्ति मा.श्री.धर्माधिकारी साहेब अशी दोन नावे निवृत्त न्यायाधीशांचे यादीत असल्याने निदर्शनास आणले. यावर मा.तदर्थ समिती अध्यक्ष यांनी तुम्हाला श्री.ढवळे यांचे नावाबाबत काही Problem आहे का? अशी शंका उपस्थित केली. तथापी यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी न्यायतत्वशास्त्राचा विचार करता विशिष्ट नावाचा ठराव रास्त नसल्याचे नमुद केले. तसेच याबाबत मा.उच्च न्यायालयात संपर्क करुन arbitratator नियुक्तीबाबतची प्राप्त माहिती समितीसमोर मांडली. ती खालील प्रमाणे.

Arbitratator नेमणेकरीता उभय पक्षकारांच्या संमतीची आवश्यकता असुन एखादे पक्षकाराने त्यास संमती दिली नाही तर उपयोग होणार नाही, असे विदीत केले. त्यावर तदर्थ समिती अध्यंक्ष यांनी सदर माहिती अर्धवट असुन Sec.11 of Arbitration and Concilliation Act प्रमाणे हे International Arbitration असल्याने संस्थानने nominsyr केलेले Arbitrator सदर कंपनीस मंजूर नसतील तर Arbitrator appoint करण्याचे अधिकार मा.सर्वोच्च न्यायालयाला आहे, असे अध्यक्षांनी नमुद केले. व मा.उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायमुर्ती मा.श्री.धर्माधिकारी साहेब यांचे मोबाईलवर संपर्क करण्याची तयारी दर्शविली.व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचेशी बोलावे असे सुचवले. त्यावर सदस्य सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अध्यक्ष यांनीच बोलावे असे सुचविल्यावरुन अध्यक्ष श्री.आणेकर यांनी मा.उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायमूर्ति मा.श्री.बी.पी.धर्माधिकारी साहेब यांचे मोबाईलवर मिटींग दरम्यान लगेच संपर्क साधून त्यांना प्रस्तूतच्या प्रकरणात संस्थानचे वतीने arbitratator म्हणून काम करण्याची विनंती केली असता त्यांनी त्यास सहमती दर्शविली. या निर्णयास समितीचे सदस्य सचिव श्री.बगाटे यांनी सहमती दिल्यामुळे मा.न्यायमुर्ती (निवृत्त) श्री.एम.एम.ढवळे साहेब यांचे ऐवजी मा. मुख्य न्यायमुर्ती (निवृत्त) श्री.बी.पी.धर्माधिकारी साहेब यांची या प्रकरणात संस्थानचे arbitratator म्हणून सर्वानुमते नियुक्ती केली. संस्थानने पुढील कार्यवाही करावी.

**(कार्यवाही-बांधकाम विभाग/विधी विभाग)**

---

After taking unanimous decision in respect of confirmation of decision No.366 of subject No.12, dt. 13.07.2020 (in respect of being appointing Hon'ble Shri Justice (retired) B.P. Dharmadhikari as Arbitrator) it revealed to the Chairman of the Committee that video camara has been installed behind the door which opens inside the meeting hall. Heap of

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्यांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

plastic chairs is also kept adjacent to it. Uupon noticing the same, the Chairman enquired Chief Executive Officer Shri Bagate and Deputy Chief Executive Officer Shri Thakre, whether the recording is going on. To that Chief Executive Officer Shri Bagate did not respond. He claimed by saying "बघा जरा" "करत असतील". He laughed by looking at Shri Thakre. However, did not confirm for quite some time that the recording is in progress. Initially, Shri Lokhande, P.A. attached to the Chairman and thereafter Chairman went towards camara and got it confirmed that recording is going on. Shri Bagate, Chief Executive Officer said "ठिक आहे" "मिटींगच आहे". Thereupon Chairman questioned Shri Bagate as to why his consent was not obtained and facts were not disclosed. At the end, Shri Bagate admitted that "recording is being made as per his directions and that it is skipped from his mind to disclose."

It is also noticed by the Chairman that when he himself offered to videograph the meeting at earlier point of time to Shri Bagate, he did not disclose that such recording is being arranged today and the recording is in progress.

The Chairman thereafter took out the memory card from the said camera. The said memory card is of Sandisk Company and is of 32GB value. The Chairman and Shri Swami, Member, thereafter prepared a letter disclosing the above referred facts and asked Shri Lokhande (P.A. attached to Chairman) to immediately send its e-mail to the Hon'ble Registrar, High Court, Bench at Aurangabad. Accordingly, the said e-mail was sent. The memory card was kept in possession of the Chairman to be sent to Hon'ble High Court on Judicial side in PIL No. 120 of 2019.

---

**४. निर्णय क्र.३७३- सदस्य सचिव श्री. बगाटे साहेब यांनी दि.13.07.2020 चे विषय क्र.19 निर्णय क्र.373 बाबत सदरचा निर्णय कायम करण्यापूर्वी त्यांचे मत लिहून घेण्याची विनंती केली. पूर्वी तो निर्णय होतांना पूर्वीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.डोंगरे साहेब यांचे मताप्रमाणेच त्यांचे मत त्यांनी मांडले व दिवाणी दावा दाखल करण्याबाबत पुर्नविचार करावा अशी विनंती केली.**

**सदर विषयाबाबत मा.समिती सदस्य सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खालील मुद्दे मांडले.**

**१. सदर जमिन रितसर शासन निर्णयान्वये नगरपंचायतीचे आरक्षण पाण्याचे टाकीकरीता असल्याने देण्यात आलेली आहे.**

**२. सदर जमीन मोजून मापुन (Metes & bound) मध्ये त्रुटी राहिल्याने संस्थानचे जादा क्षेत्र नगरपंचायतीकडे गेलेले आहे.**

**३. सदर ठिकाणी पाण्याची टाकी बांधुन तयार आहे. त्याचा वापर १५ वर्षापासुन चालु आहे.**

**४. नगरपंचायत सदर जमिनीचे रेडीरेकनर नुसार ५० टक्के मुल्य देण्यास तयार आहे.**

**५. अतिक्रमण काढणे रास्त नाही. ते खर्चिक व व्यवहारिक दृष्टया हिताचे नाही. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ नुसार अशी अतिक्रमणे नियमीत करण्याची तरतुद देखील आहे.**

**६. सदर नगरपंचायत ही स्थानिक स्वराज्य संस्था आहे व त्यांचेकडून जाणीवपुर्वक अतिक्रमण झालेले नाही.**

**७. मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णयाप्रमाणे जर दावा दाखल केला तर त्याचे खालील प्रमाणे परिणाम होतील.**

**अ) कोर्ट दावा प्रदिर्घ काळ चालेल. व संस्थान Litigation मध्ये खर्च व वेळ जाईल.**

**ब) Limitation Act section 27 प्रमाणे नगरपंचायत Adverse Possession क्लेम करु शकते.**

**क) सदर जागेवर पाण्याची टाकी आरक्षण असल्याने जरी जागा परत मिळाली तर त्याचा संस्थानला उपयोग नाही. त्यामुळे संस्थानला Litigation मध्ये वेळ लागुन खर्च**

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

होणार आहे. यास्तव सदर प्रकरणी दिवाणी दावा दाखल करणेची बाब अप्रस्तुत असुन ती आवश्यक नाही. असे आग्रही मत मांडले.

त्यावर तदर्थ समितीचे सदस्य श्री. स्वामी साहेब, अपर महसूल आयुक्त, नाशिक यांनी असे प्रतिपादन केले की, सदरचा निर्णय हा संपूर्ण विषयाचा अभ्यास करुन 3x1 अशा मताधिक्याने मंजूर करण्यात आलेला असल्याने त्यात बदल करण्याचा प्रश्न येत नाही. सबब सदरचा निर्णय मताधिक्याने कायम करण्यात आला.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग/विधी विभाग)

---

५. निर्णय क्र.३७४- याबाबत समिती सदस्य सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना शहर स्वच्छतेसाठी शासनाकडून शासन निर्णयाव्दारे खर्चासाठी रक्कम निर्धारित करुन दिलेली आहे. हे करतांना विश्वस्त व्यवस्थापनाकडून विहीत पध्दतीने याबाबत कार्यवाही करुनच शासन निर्णय झालेला असल्याने याबाबत तदर्थ समिती पुर्वीच्या निर्णयाचे तसेच शासन आदेशाचे पुनर्विलोकन करु शकते काय? असा मुद्दा उपस्थित केला.

त्यावर तदर्थ समितीचे अध्यक्ष व सदस्य श्री.स्वामी साहेब,अपर महसुल आयुक्त, नाशिक यांनी असे प्रतिपादन केले की, पुर्वी सदरचा निर्णय हा संपूर्ण विषयाचा अभ्यास करुन 3x1 अशा मताधिक्याने मंजूर करण्यात आलेला असल्याने त्यात बदल करण्याचा प्रश्न येत नाही. सबब सदरचा निर्णय मताधिक्याने कायम करण्यात आला. (कार्यवाही- मालमत्ता विभाग)

---

६. निर्णय क्र.४०५- यावर सविस्तर चर्चा झाली, संबधीत विभाग, TCS चे तंत्रज्ञ व संस्थेचे अधिकारी दोन नग Firewall खरेदी करण्याच्या प्रस्तावाची गरज/आवश्यकता कुठल्याही तर्काने पटवू शकले नाहीत. तसेच जुनी Firewall प्रणाली तातडीच्या काळात उपयोगात येऊ शकते असे समितीच्या लक्षात आणून देण्यात आले म्हणून माहिती तंत्रज्ञान विभागातील डेटा सेंटर येथे कार्यान्वीत सर्व्हरवरील माहिती व प्रणालीचे सुरक्षीततेच्या दृष्टीने कार्यान्वीत असलेला Firewall कालबाहय झाल्याने नविन एक नग Firewall खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३५,००,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)

या निर्णयामध्ये कराचा उल्लेख करावयाचे राहुन गेल्यामुळे त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु. ३५,००,०००/-+कर मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली, अशी दुरुस्ती सुचविण्यात आल्यावरुन खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यास मान्यता देण्यात आली.

पुर्वीच्या निर्णयाऐवजी खालील प्रमाणे निर्णय वाचण्यात यावा.

यावर सविस्तर चर्चा झाली, संबधीत विभाग, TCS चे तंत्रज्ञ व संस्थेचे अधिकारी दोन नग Firewall खरेदी करण्याच्या प्रस्तावाची गरज/आवश्यकता कुठल्याही तर्काने पटवू शकले नाहीत. तसेच जुनी Firewall प्रणाली तातडीच्या काळात उपयोगात येऊ शकते असे समितीच्या लक्षात आणून देण्यात आले म्हणून माहिती तंत्रज्ञान विभागातील डेटा सेंटर येथे कार्यान्वीत सर्व्हरवरील माहिती व प्रणालीचे सुरक्षीततेच्या दृष्टीने कार्यान्वीत असलेला Firewall कालबाहय झाल्याने नविन एक नग Firewall खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३५,००,०००/-+कर मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

संस्थानकरीता एक नग Firewall खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३५,००,०००/-+कर या दुरुस्तीस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)

---

७. निर्णय क्र.४११- यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा करणेकामी नियमावली तयार करण्यात यावी, असे ठरले. तसेच उपरोक्त प्रस्ताव 'अ' मधील अ.नं.१२ भाऊसाहेब गंगाधर काळे व अ.नं.१४ पोपट गणपत महाले तसेच प्रस्ताव 'ब' मधील अ.नं.७ भाऊसाहेब गंगाधर काळे यांचे बिलाची फेर तपासणी करण्यात यावी,असे ठरले.

इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.

तसेच उपरोक्त प्रस्ताव 'अ' मधील अ.नं.१२ भाऊसाहेब गंगाधर काळे व अ.नं.१४ पोपट गणपत महाले तसेच प्रस्ताव 'ब' मधील अ.नं.७ भाऊसाहेब गंगाधर काळे यांचे वैद्यकीय बिलांची फेर तपासणीच्या अधिन राहुन प्रस्ताव 'अ' मधील १५ कर्मचाऱ्यांना देय असणारी वैद्यकीय बिलाची रक्कम रु.९,८४,७२५/-मात्र तसेच प्रस्ताव 'ब' मधील ११ कर्मचाऱ्यांना देय असणारी वैद्यकीय बिलाची रक्कम रु.३,५१,३८६/-मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा करणेकामी नियमावली तयार करण्यात यावी, असे ठरले. तसेच उपरोक्त प्रस्ताव 'अ' मधील अ.नं.१२ भाऊसाहेब गंगाधर काळे व अ.नं.१४ पोपट गणपत ढमाले तसेच प्रस्ताव 'ब' मधील अ.नं.७ भाऊसाहेब गंगाधर काळे यांचे बिलाची फेर तपासणी करण्यात यावी,असे ठरले.**

**तसेच उपरोक्त प्रस्ताव 'अ' मधील अ.नं.१२ भाऊसाहेब गंगाधर काळे व अ.नं.१४ पोपट गणपत ढमाले तसेच प्रस्ताव 'ब' मधील अ.नं.७ भाऊसाहेब गंगाधर काळे यांचे वैद्यकीय बिलांची फेर तपासणीच्या अधिन राहुन प्रस्ताव 'अ' मधील १५ कर्मचाऱ्यांना देय असणारी वैद्यकीय बिलाची रक्कम रु.९,८४,७२५/-मात्र तसेच प्रस्ताव 'ब' मधील ११ कर्मचाऱ्यांना देय असणारी वैद्यकीय बिलाची रक्कम रु.३,५१,३८६/-मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**महाले ऐवजी ढमाले असा बदल संमत झाला.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**उपरोक्त पैकी निर्णय क्र.३६०, ३६६, ३७३, व ३७४ व्यतिरिक्त इतर कुठल्याही विषयांवरील निर्णयाबाबत सदस्य समितीत सदरचे निर्णय कायम करण्याबाबत कुठलाही हरकतीचा मुद्दा कोणीही उपस्थित केला नसल्याने ते सर्व निर्णय सर्वानुमते कायम करण्यात आले.**

---

**विषय नं.०२** **चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.**

**अ) श्री साईबाबा संस्थानने भोयरे पठार (सुपा) येथे उभारणेत आलेल्या २.५ मेगावॅट (१.२५ वॅटx२) क्षमतेचा पवनचक्की यंत्रणेचा विज विक्रीचा (पीपीए) करारनामा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेशी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानने भोयरे पठार (सुपा) याठिकाणी सन २००७ मध्ये अपारंपारिक ऊर्जा श्रोतातून विद्युत निर्मिती करणेकरीता मे.सुझलॉन एनर्जी लि., पुणे यांचेमार्फत २.५ मेगावॅट (१.२५ वॅटx२) क्षमतेचा पवनचक्की प्रकल्प उभारलेला आहे. सदर प्रकल्प उभारणी करीता एकुण रक्कम रुपये १५,३९,६४,८००/- इतका खर्च आला आहे. दिनांक १४ ऑगस्ट-२००७ रोजी दुपारी १६.०० वाजता प्रकल्प चालू करुन कार्यान्वित केलेला आहे. या प्रकल्पातून निर्माण होणारी वीज महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला पुरविली जाते. विद्युत नियामक आयोगाने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून संस्थानला RTGS व्दारे वीज उत्पन्नाचे पेमेंट मिळते.

पवनचक्की प्रकल्प सुरु झाल्यापासून (दिनांक १४ ऑगस्ट-२००७) म्हणजे ऑगस्ट-२००७ पासून ते माहे मे-२०२०अखेर रक्कम रुपये २५,८१,००,२४७/- इतकी वीज निर्मितीची रक्कम होते. त्यापैकी ऑगस्ट-२००७ ते माहे डिसेंबर-२०१९ अखेर पर्यंत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून संस्थानला RTGS व्दारे रक्कम रुपये २४,९८,३१,७८२/- (रुपये चोवीस कोटी अठ्यान्नव लाख एकतीस हजार सातशे ब्याऐंशी) मात्र इतकी प्राप्त झाली आहे. माहे जानेवारी-२०२० ते मे-२०२० अखेर अशी ०५ (पाच) महिन्याची रक्कम रु.८२,६८,४६४/- मात्र आजपर्यंत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून संस्थानला वीज विक्रीची रक्कम येणे बाकी आहे.

आपणास करारनाम्यातील अटीनुसार आपण महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे संस्थानचे पवनचक्कीमधून निर्माण झालेल्या दरमाह वीज निर्मितीचे बील सादर केलेनंतर साधारणत ४५ दिवसाचे कालावधीनंतर वीज निर्मितीची रक्कम संस्थानला प्राप्त होणे अपेक्षित आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने संस्थानला CE/RE/MSEDCL/26286/ दि.०८-०९-२०१९ अन्वये पत्र पाठवून कळविले आहे की, विंडमिलमधून निर्माण होणारी ३०% वीज ही महाराष्ट्र राज्य विद्युत

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

वितरण कंपनी ही कृषी ग्राहकासाठी वापरते. परंतू कृषी ग्राहकांकडून कमी प्रमाणात (७%) वसूली होत असल्याने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे फंड उपलब्ध होत नाही. तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीची फायनान्शियल कंडिशन खराब असल्याने संस्थानने DPC बाबत क्लेम करु नये अशी विनंती केलेली आहे.

तसेच विंड मीलचे थकीत पेमेंटची रक्कम मिळणेबाबत श्रीमती शैलेजा सावंत मॅडम, जनरल मॅनेजर, पीपीए विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, प्रकाशगड, मुंबई यांचेशी (मोबाईल क्रमांक ९९२०३३९५५६) कायम संपर्कात असून त्यांचेशी चर्चा केली असता त्यांनी सांगितले की, सध्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला आर्थिक तुट असून महाराष्ट्रातील सर्व विंड मील धारकांचे जवळपास ३६०० कोटी देणे बाकी आहे. जसे जसे फंड उपलब्ध होतात तसे तसे विंड मीलचे पेमेंट केले जाते. सध्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे फंड उपलब्ध नाही. फंड उपलब्ध होताच आपणास विंड मीलचे पेमेंट टप्याटप्याने आदा करणेत येईल असे सांगितले.

तसेच दि.०३-०७-२०२० रोजीचे दैनिक सकाळ या वृत्तापत्रामध्ये महावितरण सापडले आर्थिक संकटात असे आशयाचे वृत्त प्रसिध्द झाले आहे.

श्री साईबाबा संस्थानने भोयरे पठार (सुपा) याठिकाणी सन २००७ मध्ये अपारंपारिक ऊर्जा श्रोतातून विद्युत निर्मिती करणेकरीता मे.सुझलॉन एनर्जी लि., पुणे यांचेमार्फत २.५ मेगावॅट (१.२५ वॅट x २) क्षमतेचा चा पवनचक्की प्रकल्प उभारलेला आहे. सदर प्रकल्प उभारणी करीता एकुण रक्कम रुपये १५,३९,६४,८००/- इतका खर्च आला आहे. दिनांक १४ ऑगस्ट-२००७ रोजी दुपारी १६.०० वाजता प्रकल्प चालू करुन कार्यान्वित केलेला आहे. या प्रकल्पातून निर्माण होणारी वीज महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला पुरविली जाते. याकामी श्री साईबाबा संस्थान व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेमध्ये वीज विक्रीबाबत दि.१९-०४-२००८ रोजी करारनामा करणेत आलेला आहे. सदर करारनाम्याची मुदत ही प्रकल्प कार्यान्वित झालेपासूनचे म्हणजे दि.१४-०८-२००७ या तारखेपासून पुढे १३ वर्ष आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचा वीज खरेदी करणेचा दर १३ वर्षाकरीता करारनाम्यात नमूद केलेले दर खालीलप्रमाणे.

| Sr.No | Year of Commercial Operation | Tariff Period | Tariff RS |
|---|---|---|---|
| 1 | 1st year | dt.14.08.2007 to dt.13.08.2008 | 3.50 |
| 2 | 2nd year | dt.14.08.2008 to dt.13.08.2009 | 3.65 |
| 3 | 3rd year | dt.14.08.2009 to dt.13.08.2010 | 3.80 |
| 4 | 4th year | dt.14.08.2010 to dt.13.08.2011 | 3.95 |
| 5 | 5th year | dt.14.08.2011 to dt.13.08.2012 | 4.10 |
| 6 | 6th year | dt.14.08.2012 to dt.13.08.2013 | 4.25 |
| 7 | 7th year | dt.14.08.2013 to dt.13.08.2014 | 4.40 |
| 8 | 8th year | dt.14.08.2014 to dt.13.08.2015 | 4.55 |
| 9 | 9th year | dt.14.08.2015 to dt.13.08.2016 | 4.70 |
| 10 | 10th year | dt.14.08.2016 to dt.13.08.2017 | 4.85 |
| 11 | 11th year | dt.14.08.2017 to dt.13.08.2018 | 5.00 |
| 12 | 12th year | dt.14.08.2018 to dt.13.08.2019 | 5.15 |
| 13 | 13th year | dt.14.08.2019 to dt.13.08.2020 | 5.30 |

हा प्रकल्प चालू झाल्यानंतर ( दि.१४-०८-२००७ पासून) विद्युत नियामक आयोगाने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे व करारनाम्यातील वीज महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून आतापर्यंत खालीलप्रमाणे वीज उत्पन्न झाले आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे. (खालीलप्रमाणे रक्कम ही आर्थिक वर्षानुसार धरली आहे)

| अ.क्र. | कालावधी | दर वर्षी मिळालेली रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१) | दि. १४-०८-२००७ ते दि.३१-०३-२००८ | रु. ०,६८,०४,६००/- |
| ०२) | दि. ०१-०४-२००८ ते दि.३१-०३-२००९ | रु. १,८४,६६,५०८/- |
| ०३) | दि. ०१-०४-२००९ ते दि.३१-०३-२०१० | रु. १,८१,४३,०६८/- |

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्द्यांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

| | | |
|---|---|---|
| ०४) | दि. ०१-०४-२०१० ते दि.३१-०३-२०११ | रु. १,७०,०६,१६९/- |
| ०५) | दि. ०१-०४-२०११ ते दि.३१-०३-२०१२ | रु. १,९४,४९,०७७/- |
| ०६) | दि. ०१-०४-२०१२ ते दि.३१-०३-२०१३ | रु. २,०५,२७,३७२/- |
| ०७) | दि. ०१-०४-२०१३ ते दि.३१-०३-२०१४ | रु. २,१८,०५,३१५/- |
| ०८) | दि. ०१-०४-२०१४ ते दि.३१-०३-२०१५ | रु. २,००,१४,४९२/- |
| ०९) | दि. ०१-०४-२०१५ ते दि.३१-०३-२०१६ | रु. २,०१,१२,०३१/- |
| १०) | दि. ०१-०४-२०१६ ते दि.३१-०३-२०१७ | रु. २,२१,०९,७८२/- |
| ११) | दि. ०१-०४-२०१७ ते दि.३१-०३-२०१८ | रु. २,०८,५७,४८२/- |
| १२) | दि. ०१-०४-२०१८ ते दि.३१-०३-२०१९ | रु. २,३९,९८,१६४/- |
| १३) | दि. ०१-०४-२०१९ ते दि.३१-०३-२०२० | रु. २,४१,३६,३८९/- |
| १४) | दि. ०१-०४-२०२० ते दि.३१-०५-२०२० | रु. ०,४६,६९,७९८/- |
| | **एकुण :-** | **रु. २५,८१,००,२४७/-** |

श्री साईबाबा संस्थान व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेमध्ये वीज विक्रीबाबत दि.१९-०४-२००८ रोजी करारनामा करणेत आलेला आहे. सदर करारनाम्याची मुदत ही प्रकल्प कार्यान्वित झालेपासूनचे म्हणजे दि.१४-०८-२००७ या तारखेपासून पुढे १३ वर्ष आहे. त्यानुसार सदर करारनाम्याची मुदत ही दि.१३-०८-२०२० रोजी संपत असलेबाबत मे.सुझलॉन एनर्जी लि.यांनी दि.०४-०५-२०२० रोजी ई-मेलव्दारे कळविले आहे. तसेच त्यांनी पुढील पर्याय उपलब्ध असल्याचे कळविले आहे.

Your Wind Mill project coming out of **13 years PPA with MSEDCL by Aug 20.** We would like to mention various options available with you post expiry of the PPA. These are mentioned below for your ready reference.

1. **3rd Party:** With this option the generator can sell the power to the consumer having contract demand of 1MW & above.
2. **Captive:** It is highly recommended that generator having power consumption requirements with contract demand of 1MW and above should consider switching to self-use of the generated power.
3. **Sale to MSEDCL**: You can sale Power to MSEDCL for short term i .e period from 3 months to 12 Months

उपरोक्तप्रमाणे मे.सुझलॉन एनर्जी लि.यांनी तीन पर्याय असल्याचे कळविले आहे.

०१). पर्याय क्र.०१ **3rd party** हा स्विकारण्याचे झाल्यास त्याकरीता कोणत्याही एक कनेक्शनचा (ग्राहकाचा) contract demand हा १ मेगावॅट किंवा त्यापेक्षा जास्त असणे गरजेचे आहे. परंतु संस्थानचे एकही कनेक्शनचा contract demand हा १ मेगावॅट किंवा त्यापेक्षा जास्त नाही. त्यामुळे हा पर्याय आपणांस लागू होत नाही.

०२). पर्याय क्र.०२ **Captive** हा स्विकारण्याचे झाल्यास त्याकरीता कोणत्याही एक कनेक्शचा (ग्राहकाचा) contract demand हा १ मेगावॅट किंवा त्यापेक्षा जास्त असणे गरजेचे आहे. तेव्हा आपण ती वीज स्वतःसाठी वापरु शकू परंतु संस्थानचे एकही कनेक्शन contract demand हा १ मेगावॅट किंवा त्यापेक्षा जास्त नाही. त्यामुळे हा पर्याय आपणांस लागू होत नाही.

०३). पर्याय क्र.०३ **Sale to MSEDCL** ०३ महिने ते १२ महिनेकरीता वीज विक्री करणे हा एकच पर्याय आपणासाठी उपलब्ध आहे.

त्यामुळे पर्याय क्र.०३ च्या करावयाच्या करारनाम्यासाठी काय काय पुर्तता करावी लागेल तसेच वीज विक्रीचा दर काय असेल याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, प्रकाशगड, मुंबई मा.मुख्य अभियंता, पॉवर परचेस सेक्शन यांचेकडे संस्थान जा.क्र.एसएसएसटी/विद्युत/४६१/२०२० दि.२९/०६/२०२० अन्वये पत्र रजिस्टर्ड ए.डी.ने पाठविणेत आलेले होते तसेच सदर पत्र हे स्कॅन करुन ई-मेलव्दारे देखील त्यांना पाठविणेत आलेले होते. त्यानुसार त्यांनी दुरध्वनीव्दारे संपर्क साधून सांगितले की, जर तुम्हाला **Sale to MSEDCL** ०३ महिने ते १२ महिने करीता वीज विक्री करणेचा पर्याय स्विकारायचा असेल तर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला वीज विक्री करणेसाठी प्रथम महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

ॲप्लीकेशन करावे लागेल व सध्याचा दर हा रु.२.५२ इतका आहे. त्यानुसार आपणास ऑनलाईन ॲप्लीकेशन करावे लागणार आहे. तसेच सध्याचा दर हा रु.२.५२ इतका स्विकारावा लागणार आहे. कारण पर्याय क्र.०२ **Captive** किंवा पर्याय क्र.०१ **3rd party** हा स्विकारणेचे झाल्यास त्याकरीता कोणत्याही एक कनेक्शनचा (ग्राहकाचा) contract demand हा १ मेगावॅट किंवा त्यापेक्षा जास्त असणे गरजेचे आहे. तेव्हा आपण ती वीज स्वत:साठी वापरु शकतो. परंतू संस्थानचे एकही कनेक्शनचा contract demand हा १ मेगावॅट किंवा त्यापेक्षा जास्त नाही. पर्याय क्र.०३ **Sale to MSEDCL** ०३ महिने ते १२ महिनेकरीता स्विकारलेस सध्याचे रु. २.५२ दराप्रमाणे पवनऊर्जा प्रकल्पातून १२ महिन्यात निर्मिती होणा-या सरासरी ४३,००,००० युनिट गृहीत धरल्यास ४३,००,००० युनिटxसध्याचा दर रु.२.५२ नुसार १२ महिन्यात संस्थानला सरासरी रक्कम रु.१,०८,३६,०००/- इतके उत्पन्न मिळू शकते.

त्यामुळे आपणास पर्याय क्र.०३ **Sale to MSEDCL** ०३ महिने ते १२ महिनेकरीता वीज विक्री करणेचा पर्याय स्विकारावा लागणार आहे. जुना करारनामा हा दि.१४-०८-२००७ या तारखेपासून पुढे १३ वर्ष आहे. त्यानुसार सदर करारनाम्याची मुदत ही दि.१३-०८-२०२० रोजी संपत आहे. त्यापुर्वी नव्याने करारनामा करणे गरजेचे आहे नाहीतर संस्थानचे आर्थिक नुकसान होऊ शकते.

**मागणी:-** श्री साईबाबा संस्थानने भोयरे पठार (सुपा) याठिकाणी सन २००७ मध्ये अपारंपारिक ऊर्जा श्रोतातून विद्युत निर्मिती करणेकरीता मे.सुझलॉन एनर्जी लि., पुणे यांचेमार्फत २.५ मेगावॅट (१.२५ वॅटx२) क्षमतेचा पवनचक्की प्रकल्प उभारलेला आहे. या प्रकल्पातून निर्माण होणारी वीज महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला पुरविली जाते. याकामी श्री साईबाबा संस्थान व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेमध्ये वीज विक्रीबाबत दि.१९-०४-२००८ रोजी करारनामा करण्यात आलेला आहे. सदर करारनाम्याची मुदत ही प्रकल्प कार्यान्वित झालेपासून म्हणजे दि.१४-०८-२००७ या तारखेपासून पुढे १३ वर्ष आहे. त्यानुसार सदर करारनाम्याची मुदत ही दि.१३-०८-२०२० रोजी संपत असल्याने त्यापुर्वी नव्याने करारनामा करणे गरजेचे आहे. या करारनाम्यास संपण्यास फक्त १७ दिवस राहिले आहेत. तसेच पर्याय क्र.०३ Sale to MSEDCL ०३ महिने ते १२ महिनेकरीता वीज विक्री करणेचा पर्याय स्विकारणेस व त्याकामी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन ॲप्लीकेशन करणेस व सध्याचा दर हा रु.२.५२ इतका असून तो स्विकारणेस तसेच २.५ मेगावॅट=१.२५ वॅटx२ पवनचक्की यंत्रणेचा वीज विक्रीचा (पीपीए) करारनामा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेशी करणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळावी, ही विनंती.

निर्णय क्र.४२२/अ **सदरील चक्रिय पध्दतीने घेतलेल्या निर्णयास मान्यता देण्यासाठी हा विषय घेतला असता तदर्थ समितीचे अध्यक्ष यांनी अशी सुचना केली की, संस्थानने ज्या इमारती, परिसर किंवा संकुल यांचा वीज वापर 2.5 मेगा वॅट किंवा त्यापेक्षा जास्त आहे अशा इमारती, परिसर किंवा संकुल यांना एकत्र करुन त्यासाठी एका मिटरची मागणी MSEDCL कडे करावी. अशी वीज सदरचे पवन चक्कीवरुन Captive mode ने देण्यात यावी अशी मागणी महावितरणकडे करावी. वीज निर्मीती करुन काही फायदा मिळावा यासाठी सदरची पवनचक्की बसवली नव्हती. संस्थान सद्या दरमहा करोडो रुपयांची वीज वापरते. अशा परिस्थितीत सदर पवनचक्कीवरुन Captive mode ने वीज मिळण्याची मागणी MSEDCL कडे करणे उचित दिसते.**

**यावर तदर्थ समितीचे सदस्य सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे मत मांडले की, सदर बाबतची मुलभूत वस्तुस्थिती प्रथमत: विचारात घेणे आवश्यक आहे. सुमारे १३-१४ वर्षापुर्वी भोयरे पठार ता.पारनेर येथे पवनचक्की प्रकल्प उभा करण्यात आला असुन संस्थानने तेथे २.५ मेगावॅट इतक्या क्षमतेच्या उर्जा प्रकल्पात सुमारे रक्कम रु.१५,३९,००,०००/- गुंतविले होते. त्यातुन १३ वर्षाचा करार महावितरण सोबत करुन प्रति युनिट रु.५.३० दराने परतावा मिळत होता. तो सुमारे रक्कम रु.२५,८१,००,०००/- इतका मिळाला आहे. सदर करारनामा दि.१३.०८.२०२० रोजी संपुष्टात आलेला असुन याबाबत आज रोजी सध्याचा परतावा दर रु.२.५२ पै. म्हणजे फारच नाममात्र असुन त्यामुळे संस्थानला २.५ मेगावॅट विज निर्मितीतुन मिळणारा परतावा अत्यल्प आहे. तसेच दरवर्षी संस्थान विजबिलापोटी सुमारे रु.१५ कोटी खर्च करीत आहे. सबब सदरची विज निर्मिती संस्थानला आर्थिक दृष्टया किफायतशीर (economically afforadable) होण्यासाठी आणखी काय पर्याय आहेत? याबाबत महावितरणाचे अधिक्षक अभियंता श्री.मेश्राम यांचेशी चर्चा केली असता त्यांनी सांगितले की, Captive mode पेक्षा इतर स्पर्धात्मक mode उपलब्ध असुन त्याबाबत अभ्यासपुर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे.**

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील** PIL/120 **अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

तसेच २.५ मेगावॅट वीज आज रोजी संस्थान एकाच मिटरवरुन घेऊ शकत नाही. संस्थानची वीज वापराची ठिकाणे ही विखुरलेली आहेत. त्यामुळे तेही व्यवहार्य नाही. यास्तव याकामी एखाद्या सल्लागाराची नेमणूक करावी, असे सुचविले.

यावर समितीचे दुसरे सदस्य श्री.स्वामी साहेब यांनी असे मत मांडले की, एखादी व्यक्ति सल्लागार म्हणून नेमणे ही बाब खर्चिक आहे त्याचप्रमाणे प्रत्येक वेळी वीज दर बदलल्यानंतर त्याचा कागदोपत्री पाठपुरावा करणे संस्थानला शक्य नाही किंवा संस्थानचा तसा उद्देश नाही किंवा व्यवसाय नाही. तसेच एका मिटरवर सदर पुरवठा घेता येत नाही, असे MSEDCLचे पत्र नाही, तसा अभिलेख नाही. त्यामुळे एका मिटरची मागणी MSEDCL कडे करुन सदरचे पवन चक्कीवरुन Captive mode ने वीज देण्यात यावी अशी मागणी करावी. तसेच एका मिटरवरुन विज घेण्यास अडचण येत असल्यास मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन MSEDCL यांना तसे आदेश करण्याबाबत विनंती करावी असे मा.अध्यक्ष यांनी सुचविले.

तदर्थ समितीचे सदस्य सचिव यांचे मताशी तदर्थ समितीचे अध्यक्ष तसेच दुसरे सदस्य श्री. स्वामी साहेब, अपर महसूल आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक हे सहमत नसल्याने व एक मिटर घेवून Captive mode ने वीज घेणे संस्थानचे हिताचे व आर्थिक फायद्याचे असल्यामुळे 2x1 अशा मताधिक्याने तसा निर्णय घेण्यात आला.

(कार्यवाही-विद्युत विभाग/विधी विभाग)

---

ब) श्री साईबाबा महाविद्यालयाकरीता शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता आवश्यक प्राध्यापक भरतीबाबत. (दि.०७.०८.२०२० रोजीचा निर्णय)

प्रस्ताव- अधिनियमः- २००४ मधील तरतुद क्र.१७ (१) व १७ (२) (ढ) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील. तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक –

०१. मा.व्य.समितीचे दि.०४.०४.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.२५७
०२. मा.व्य.समितीचे दि.३०.०६.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.४५०
०३. मा.व्य.समितीचे दि.०५.१०.२०१८चे सभेतील निर्णय क्र.६१३ (२१)
०४. मा.व्य.समितीचे दि.०४.०७.२०१९ चे सभेतील निर्णय क्र.३१३
०५. मा.व्य.समितीचे दि.०६.०६.२०१९ चे सभेतील निर्णय क्र.२४३
०६. मा.व्य.समितीचे दि.११.०५.२०२० चे सभेतील निर्णय क्र.३०२

प्रस्ताविकः- (अ) श्री साईबाबा संस्थानचे नवीन वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेकामी महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन आदेश क्रमांक–मान्यता–२०१८/(३०/१८)/माशि-४,दि.२८ फेब्रुवारी, २०१८ चे आदेशान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मिळाले तसेच शासन आदेश क्रमांक एनजीसी २०१८/(१००/१८)/मशि-४, दि.१५ जून,२०१८ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये नवीन महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता देण्यात आली. उपरोक्त संदर्भ क्र.०४ चे आदेशान्वये श्री साईबाबा महाविद्यालय हा स्वतंत्र विभाग सुरु करण्यात आलेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०४.२०१८ चे सभेतील निर्णयानुसार वरिष्ठ महाविद्यालयाकरिता शासन स्तरावरुन स्वतंत्र आकृतीबंध निश्चित न करता सह संचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग यांचेकडील प्रतिवर्षी संच मान्यतेनुसार आकृतीबंध कायम ठेवणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार इकडील जा.क्र. एसएसएस/साप्रशा/आस्था/७३/२०१८ दि.०५ एप्रिल, २०१८ अन्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडे वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेबाबत व त्यासाठी आवश्यक आकृतीबंधाबाबत मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. त्यास विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सासंवि-१०१८/६५६/प्र.क्र.५६/का.१६ दि.१२ जुलै, २०१८ अन्वये प्रथम वर्ष प्रवेश क्षमता १२० ग्राह्य धरुन मान्यता दिलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

**शिक्षक पदे (तक्ता क्र.०१)**

| अ.क्र. | विद्याशाखा | विषय | कार्यभार | अनुज्ञेय पदे | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | पुर्णवेळ | तासिका तत्वावर |
| ०१. | कला | इंग्रजी | ०४ + ०४ | ०० | ०१ |
| ०२. | | भूगोल | ०४ | ०० | ०१ |
| ०३. | | हिंदी | ०४ | ०० | ०१ |
| ०४. | | इतिहास | ०४ | ०० | ०१ |
| ०५. | | मराठी | ०४ | ०० | ०१ |
| ०६. | | राज्यशास्त्र | ०४ | ०० | ०१ |
| ०७. | | मानसशास्त्र | ०४ | ०० | ०१ |
| ०८. | | अर्थशास्त्र | ०४+०४ | ०० | ०१ |
| ०९. | | तत्वज्ञान | ०० | ०० | ०१ |
| १०. | | समाजशास्त्र | ०४ | ०० | ०१ |
| ११. | वाणिज्य | वाणिज्य | २० | ०१ | ०० |
| १२. | विज्ञान | वनस्पतीशास्त्र | २६ | ०१ | ०० |
| १३. | | रसायनशास्त्र | ३८ | ०२ | ०० |
| १४. | | इलेक्ट्रॉनिक्स | २२ | ०१ | ०० |
| १५. | | गणित | ०९ | ०० | ०१ |
| १६. | | पदार्थविज्ञान | ३८ | ०२ | ०० |
| १७. | | प्राणिशास्त्र | ३८ | ०२ | ०० |
| १८. | | सुक्ष्मजिवशास्त्र | ३८ | ०२ | ०० |
| १९. | | प्राचार्य | ०६ | ०१ | ०० |
| २०. | | ग्रंथपाल | ०० | ०१ | ०० |
| २१. | | शा.शि.संचालक | ०० | ०१ | ०० |
| | | एकुण | २८३ | १४ | ११ |

**शिक्षकेतर पदे**

| अ.क्र. | पदाचे नांव | अनुज्ञेय पदे |
|---|---|---|
| ०१. | मुख्य लिपीक | ०१ |
| ०२. | वरिष्ठ लिपीक | ०१ |
| ०३. | कनिष्ठ लिपीक | ०१ |
| ०४. | प्रयोगशाळा सहाय्यक | ०२ |
| ०५. | प्रयोगशाळा परिचर | ०२ |
| ०६. | ग्रंथालय परिचर | ०१ |
| ०७. | शिपाई | ०३ |
| | **एकुण** | **११** |

**(ब)** श्री साईबाबा महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० करिता नैसर्गिक तुकडीवाढीचे वर्ग, द्वितीय वर्षाचे वर्ग व विशेषस्तर विषयांचे अध्यापनासाठी कार्यभारानुसार अनुज्ञेय होणारे पदांचा सुधारीत आकृतीबंधामध्ये समावेश करणेस, तसेच आवश्यक प्राध्यापकांची सामान्य प्रशासन विभागामार्फत विहित पद्धतीने भरतीप्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात आलेला होता. सदर विषयाबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०७.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३१३ अन्वये श्री साईबाबा महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० करिता नैसर्गिक तुकडीवाढीचे वर्ग, द्वितीय वर्षाचे वर्ग व विशेषस्तर विषयांचे अध्यापनासाठी कार्यभारानुसार अनुज्ञेय होणा-या पदांचा सुधारीत आकृतीबंधामध्ये समावेश करणेस मान्यता देण्यात आली. तसेच आवश्यक प्राध्यापकांची भरती ही **सामान्य प्रशासन विभागामार्फत जाहिरात**

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

देऊन विहित पद्धतीने करण्यात यावी. भरती प्रक्रियेकामी आवश्यकतेनुसार विषय तज्ञांना आमंत्रित करण्यास व याकामी येणा-या अनुषंगिक खर्चास मान्यता देण्यात आली.

त्यानुसार सामान्य प्रशासन विभागामार्फत दि.१७.०७.२०१९ रोजी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्राध्यापक भरतीकामी दि.२५.०७.२०१९ रोजी Walk in Interview ची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली होती. सदर जाहिरातीनुसार दि.२५.०७.२०१९ रोजी उपस्थित पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येऊन, त्यांचे निवड तक्ते बनविण्यात येऊन निवड करण्यात आलेल्या प्राध्यापकांना दि.३१.०५.२०२० अखेर एकत्रित मानधनावर नेमणूक आदेश देण्यात आलेले होते. त्यानुसार सन २०१९-२० मध्ये महाविद्यालयाकडे खालीलपमाणे प्राध्यापक कार्यरत होते.

**(तक्ता क्र.०२)**

| अ.क्र. | नेमणूक करण्यात आलेल्या सहा.प्राध्यापकांचे नांव | विषय | एकत्रित मानधन | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री.शिवाजी गोरक्षनाथ ढोकणे | राज्यशास्त्र | रु.२०,०००/- | दि.०३.०८.२०१९ रोजी हजर |
| ०२. | श्रीमती योगिता अरुण कोपटे | वाणिज्य | रु.२०,०००/- | दि.०३.०८.२०१९ रोजी हजर |
| ०३. | श्री.अमोल झुंबर कचरे | भूगोल | रु.२०,०००/- | दि.०३.०८.२०१९ रोजी हजर |
| ०४. | श्री.गणेश रामचंद्र भांड | भौतिकशास्त्र | रु.२१,०००/- | दि.०३.०८.२०१९ रोजी हजर |
| ०५. | श्रीमती सोनाली रामचंद्र हरदास | हिंदी | रु.२०,०००/- | दि.०३.०८.२०१९ रोजी हजर |
| ०६. | श्री.किशोर रामदास शेळके | इंग्रजी | रु.२०,०००/- | दि.०३.०८.२०१९ रोजी हजर **दि.२५.११.२०१९ राजीनामा** |
| ०७. | श्रीमती शितल अरविंद धरम | इतिहास | रु.२०,०००/- | दि.०३.०८.२०१९ रोजी हजर |
| ०८. | श्रीमती स्वप्नाली रमेश खांडरे | अर्थशास्त्र | रु.२०,०००/- | दि.०३.०८.२०१९ रोजी हजर |
| ०९. | श्रीमती सुनिता सकाहरी वडितके | मराठी | रु.२०,०००/- | दि.०३.०८.२०१९ रोजी हजर |
| १०. | श्री.दिपक बाबासाहेब पटारे | वनस्पतीशास्त्र | रु.२१,०००/- | दि.०३.०८.२०१९ रोजी हजर |
| ११. | श्री.संतोष भिमराज औताडे | वाणिज्य | रु.२०,०००/- | दि.०३.०८.२०१९ रोजी हजर |
| १२. | श्री.गणेश भानुदास मगर | गणित | रु.२१,०००/- | दि.०३.०८.२०१९ रोजी हजर |
| १३. | श्री.विकास सुर्यभान भांड | प्राणीशास्त्र | रु.२१,०००/- | दि.०६.०८.२०१९ रोजी हजर |
| १४. | श्री.नितिन रावसाहेब पावसे | रसायानशास्त्र | रु.२१,०००/- | दि.०७.०८.२०१९ रोजी हजर |
| १५. | श्री.प्रशांत ज्ञानेश्वर हासे | गणित | रु.२१,०००/- | दि.०८.०८.२०१९ रोजी हजर |
| १६. | श्री.नानासाहेब त्रिंबक गुंजाळ | वनस्पतीशास्त्र | रु.२१,०००/- | दि.२०.०८.२०१९ रोजी हजर |
| १७. | श्री.प्रदीप सोमनाथ शेलार | रसायनशास्त्र | रु.२१,०००/- | दि.२६.०८.२०१९ रोजी हजर |
| १८. | श्री.सुनिल रामनाथ पठारे | इलेक्ट्रॉनिक्स | रु.२१,०००/- | दि.०७.०९.२०१९ रोजी हजर |
| १९. | श्री.नानासाहेब भानुदास सदाफळ | संगणकशास्त्र | रु.२२,०००/- | दि.१३.०९.२०१९ रोजी हजर |
| २०. | श्री.सुनिल गंगाधर गायकवाड | इंग्रजी | रु.२०,०००/- | दि.२६.११.२०१९ रोजी हजर |

सहा.प्राध्यापक भरतीमध्ये प्राणीशास्त्र विषयाच्या ०३ पदांची जाहिरात देण्यात आलेली होती मात्र मुलाखतीस एकच उमेदवार हजर असल्याने त्यांची निवड करण्यात आलेली होती, तसेच भौतिकशास्त्र विषयाच्या ०३ पदांची जाहिरात देण्यात आलेली होती, मुलाखतीस ०२ उमेदवार हजर असल्याने त्यांची निवड करण्यात आलेली होती, मात्र एकच उमदेवार हजर झाले असून, दुसरे उमेदवार हजर झालेले नाही. त्यामुळे प्राणीशास्त्र व भौतिकशास्त्र या विषयांकरिता व्हिजीटींग पद्धतीने प्राध्यापकांना आमंत्रित करुन, अभ्यासक्रम पुर्ण करुन घेण्यात आलेले आहे. तसेच इंग्रजी विषयाच्या प्राध्यपकाने त्यांच्या वैयक्तिक कारणाने राजीनामा दिल्याने त्यांचा राजीनामा दि.२५.११.२०१९ रोजी मंजुर करण्यात येऊन, मुलाखती प्रक्रियेमध्ये प्रतिक्षायादीवर असलेल्या प्रथम उमेदवारास सामान्य प्रशासन विभागामार्फत नेमणूक आदेश देण्यात आलेला होता. त्यानुसार ते दि.२६.११.२०१९ रोजी कामावर हजर झालेले आहेत. उपरोक्त अ.क्र.१ ते १० चे सहा.प्राध्यापक यांची सन २०१८-१९ व सन २०१९-२० या दोन्ही शैक्षणिक वर्षात मुलाखतीद्वारे निवड करण्यात आलेली आहे. त्यापैकी अ.क्र.०६ यांनी राजीनामा दिलेला आहे. तर अ.क्र.११ ते २० चे सहा.प्राध्यापक यांची सन २०१९-२० या वर्षात मुलाखतीद्वारे निवड करण्यात आलेली आहे. तसेच कनिष्ठ महविद्यालयाकडील ग्रंथपाल यांचेकडे श्री साईबाबा महाविद्यालयाच्या ग्रंथपाल पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे तर श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

स्कुल विभागाकडील क्रिडा शिक्षक यांचेकडे शारिरीक शिक्षण संचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे.

श्री साईबाबा महाविद्यालयाकडे मंजुर आकृतीबंधानुसार सन २०१९-२० मध्ये असलेले सद्यस्थिती खालीलप्रमाणे

**(तक्ता क्र.०३)**

| अ.क्र. | विषय | आकृतीबधामध्ये मंजुर पदे | | सध्या कार्यरत प्राध्यापक पदसंख्या | |
|---|---|---|---|---|---|
| | | तासिका तत्व | पुर्णवेळ | तासिका तत्व | पुर्णवेळ |
| ०१. | इंग्रजी | ०१ | ०० | ०१ | ०० |
| ०२. | मराठी | ०१ | ०० | ०१ | ०० |
| ०३. | हिंदी | ०१ | ०० | ०१ | ०० |
| ०४. | भूगोल | ०१ | ०० | ०१ | ०० |
| ०५. | राज्यशास्त्र | ०१ | ०० | ०१ | ०० |
| ०६. | इतिहास | ०१ | ०० | ०१ | ०० |
| ०७. | अर्थशास्त्र | ०१ | ०० | ०१ | ०० |
| ०८. | मानसशास्त्र | ०१ | ०० | ०० | ०० |
| ०९. | तत्वज्ञान | ०१ | ०० | ०० | ०० |
| १०. | समाजशास्त्र | ०१ | ०० | ०० | ०० |
| ११. | वाणिज्य | ०० | ०१ | ०२ | ०० |
| १२. | पदार्थ विज्ञान/भौतिकशास्त्र | ०० | ०२ | ०१ | ०० |
| १३. | रसायनशास्त्र | ०० | ०२ | ०२ | ०० |
| १४. | वनस्पतीशास्त्र | ०० | ०१ | ०२ | ०० |
| १५. | प्राणीशास्त्र | ०० | ०२ | ०१ | ०० |
| १६. | सुक्षमजीवशास्त्र | ०० | ०२ | ०० | ०० |
| १७. | गणित (B.Sc. Computer Science) सह | ०१ | ०० | ०२ | ०० |
| १८. | Electronics | ०० | ०१ | ०१ | ०० |
| १९. | Computer Science | ०० | ०० | ०१ | ०० |
| २०. | प्राचार्य | ०० | ०१ | ०० | ०० |
| २१. | ग्रंथपाल | ०० | ०१ | ०० | ०० |
| २२. | शा.शि.संचालक | ०० | ०१ | ०० | ०० |
| | एकुण | ११ | १४ | १९ | ०० |

**शिक्षकेतर पदे**

| अ.क्र. | पदाचे नांव | आकृतीबंधामध्ये मंजुर पदे | सध्या कार्यरत पदसंख्या | |
|---|---|---|---|---|
| | | | कायम | कंत्राटी |
| ०१. | मुख्य लिपीक | ०१ | ०० | ०० |
| ०२. | वरिष्ठ लिपीक | ०१ | ०० | ०० |
| ०३. | कनिष्ठ लिपीक | ०१ | ०२ | ०१ |
| ०४. | प्रयोगशाळा सहाय्यक | ०२ | ०० | ०० |
| ०५. | प्रयोगशाळा परिचर | ०२ | ०० | ०० |
| ०६. | ग्रंथालय परिचर | ०१ | ०० | ०० |
| ०७. | शिपाई | ०३ | ०२ | ०० |
| | एकुण | ११ | ०४ | ०१ |

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालयं, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

श्री साईबाबा महाविद्यालयाचे प्रथम व द्वितीय वर्ष (कला, वाणिज्य व विज्ञान शाखा) तसेच प्रथम वर्ष संगणकशास्त्र शाखेच्या एकूण कार्यभारानुसार पदसंख्या निश्चित करणेकामी मा.उपसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग यांचेकडे इकडील जा.क्र.एसएसएस/साईबाबा महाविद्यालय/१४६/२०१९ दि.०७.१२.२०१९ तसेच जा.क्र.१७७/२०२० दि.१६.०१.२०२० अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. त्यास जा.क्र.ससं/उशि/कायम विना.अनु.कार्यभार/महावि/2020/1428 दि.30.07.2020 अन्वये अनुज्ञेय पदांना मान्यता मिळालेली आहे. सदर मान्यतेनुसार प्रथम व द्वितीय वर्षासाठी १९ पुर्णवेळ, ०३ तासिका तत्व सहा.प्राध्यापक तसेच प्राचार्य, ग्रंथपाल, शारीरीक शिक्षण संचालक प्रत्येकी ०१ असे एकुण २५ पदांना मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त शासन निर्णयान्वये तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सद्यस्थितीत पात्र ५९८ कर्मचाऱ्यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी स्वरुपात दि.०२.०१.२०२० रोजी नेमणूक दिलेली आहे. सदर नेमणूक ही शासन निर्णयाचे निर्देशानुसार करण्यात आली आहे. तरी सदर आदेशांना कार्योत्तर मान्यता देणे योग्य राहील."

मा. तदर्थ समितीचे उपरोक्त निर्णयास अनुसरुन, उपविषय अ बाबत खालीलप्रमाणे सविस्तर व तपशीलवार विवेचन-तथा-प्रस्ताव सादर करीत आहोत –

उपविषय अ बाबत पूर्वपीठीका –

(अ-१) मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ रोजीचे शासन निर्णयानुसार, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरील पदांचे आकृतीबंधास, म्हणजेच एकूण ४८२६ पदांना (स्थायी २९०८ पदे + अस्थायी १९१८ पदे) खालील अटी-शर्तींस अधिन राहुन मान्यता दिलेली आहे. या अटी-शर्तींचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे –

(०१) समितीने पदनिहाय सेवाप्रवेश नियम तयार करावेत व त्यास शासन मान्यता घ्यावी. तसेच सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना सेवाप्रवेश नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.

(०२) सेवाप्रवेश नियमांमध्ये प्रत्येक पदांची शैक्षणिक पात्रता, जबाबदारी व कर्तव्ये ढोबळ मानाने निश्चित करण्यात यावे. सेवाप्रवेश नियमांमध्ये पदोन्नतीची साखळी याबाबत स्पष्टपणे उल्लेख असावा.

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

(०३) सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी.

(०४) सेवा प्रवेश नियमांमध्ये वेतनश्रेणीचा उल्लेख असावा.

(०५) आकृतीबंधातील मंजुर पदांवर काम करणा-या कर्मचा-यांना शासनाप्रमाणे निवृत्तीवेतन लागू असणार नाही.

(०६) समितीला आकृतीबंधाबाहेर जाऊन पद भरती करता येणार नाही.

(०७) समितीला कोणत्याही पदाचे पदनाम अथवा वेतनश्रेणी शासनाच्या पुर्व मान्यतेशिवाय बदलता येणार नाही.

(०८) समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी. जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही.

(०९) आस्थापनेवरील खर्च सिमीत करण्यासाठी राज्य शासनाच्या अधिका-यांची आकृतीबंधामध्ये निश्चित पदांवर प्रतीनियुक्तीने नियुक्ती करण्याची तरतूद ठेवावी.

(१०) तांत्रिक पदे नव्याने भरतांना त्याच क्षेत्रातील तज्ज्ञांचा निवड प्रक्रियेत समावेश असेल याची दक्षता घ्यावी.

(११) आकृतीबंधातील पदांवर नविन कर्मचा-यांची नियमित पदावर नियुक्ती झाल्यानंतर सदर कर्मचा-यांचा परिविक्षाधीन कालावधी एक वर्षाचा असावा व त्याचे वेतन वेतनश्रेणीतील सुरूवातीच्या टप्प्यावर निश्चित करावे.

(अ-२) तसेच मा. शासनाने दिनांक २५ सप्टेंबर, २०१४ रोजीचे शासन निर्णयानुसार, संस्थान संचलित श्री साईबाबा इंग्लिश मिडियम स्कूल या शाळेच्या प्राथमिक विभागासाठी मुख्याध्यापक (एक पद) व श्री साईबाबा हॉस्पीटलकरीता परफ्यूजनिस्ट (०१ पद) नव्याने समाविष्ट करणेस मान्यता दिली.

(अ-३) त्यानंतर मा. शासनाने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१७ चे पत्रानुसार, संस्थानकडील विविध पत्रव्यवहारास अनुसरुन असे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या सर्व विभागातील कामकाजाचा आढावा घेऊन वाढीव पदे मंजूर करण्याचां सुधारित व एकत्रित आकृतीबंधाचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

(अ-४) याच कालावधीत, श्री साईबाबा इंग्लिश मिडियम स्कूल, शिर्डी कडील विद्यार्थी संख्येत झालेली वाढ व त्यामुळे तुकडयांच्या संख्येत झालेली वाढ लक्षात घेऊन १० वाढीव सहाय्यक शिक्षक पदांना मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करणेत आलेला होता. त्यास अनुसरुन, मा. शासनाने दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजीचे शासन निर्णयानुसार, सहायक शिक्षक संवर्गातील १० पदे निर्माण करणेस मान्यता दिलेली आहे.

(अ-५) दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ चे शासन निर्णयानुसार मंजूर आकृतीबंधात, उपरोक्त परिच्छेद अ-२ व अ-४ मध्ये नमूद केलेल्या वाढीव पदांची मान्यता विचारात घेतां, सध्या एकूण ४८३८ (४८२६+०२+१०) पदांचा आकृतीबंध मंजूर असून, यामध्ये स्थायी पदे २९२० (२९०८+१२) + कंत्राटी पदे १९१८ यांचा समावेश आहे.

(अ-७) मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ नोव्हेंबर, २०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७६५ (२३) अन्वये, संस्थान आस्थापनेवर स्वतंत्ररित्या कार्यरत असणारे कामगार विभागामार्फत दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजीचे प्रस्तावाव्दारे, संस्थानमध्ये माहे डिसेंबर, २००० पूर्वीचे तसेच सन २००१ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर पर्यन्त या कालावधीत कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या काम करत असलेल्या अकुशल-८११ व कुशल-१०५ अशा एकूण ९१६ कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा. शासनाकडे सादर करणेत आला. सदरहू मूळ प्रस्तावावर मा. शासनाकडून विचारणा करणेत आलेल्या बाबींवर वेळोवेळी अलाहिदा पत्रव्यवहार करणेत आलेला आहे.

(अ-८) संस्थानमध्ये कर्मचारी कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने काम करत असलेले माहे डिसेंबर, २००० पुर्वीचे व सन २००१ ते २००५ अखेर पर्यन्त ढोबळमानाने ९१६ अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत नियमित नेमणुका देणेबाबत प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. या ९१६ कंत्राटी कर्मचा-यांची माहिती खालील प्रमाणे आहे–

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

**तक्ता अ**

| अ. नं. | तपशील | माहे डिसेंबर, २००० पुर्वीचे परंतु दि. २२ ऑगष्ट, २००४ अखेर संख्या | दि.२३ ऑगष्ट, २००४ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर संख्या | दि.३१ डिसेंबर, २००५ अखेर एकूण संख्या (३+४=५) |
|---|---|---|---|---|
| ०१ | तांत्रिक कुशल कर्मचारी | ०५२ | ०१६ | ०६८ |
| ०२ | कुशल कर्मचारी | ०३९ | ०१७ | ०५६ |
| ०३ | अकुशल कर्मचारी | ३५६ | ११२ | ४६८ |
| ०४ | कुशल सुरक्षा कर्मचारी | ००४ | ००१ | ००५ |
| ०५ | अकुशल सुरक्षा कर्मचारी | १८४ | ०६१ | २४५ |
| | एकुण (१) | ६३५ | २०७ | ८४२ |

उपरोक्त **तक्ता अ** व मूळ दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजी सादर केलेल्या प्रस्तावातील कर्मचा-यांच्या संख्येत खाली नमूद केलेल्या कारणांमुळे काही कंत्राटी कर्मचारी कमी झालेने फरक पडलेला आहे-

**तक्ता ब**

| अ. नं. | तपशील | माहे डिसेंबर, २००० पुर्वीचे परंतु दि. २२ ऑगष्ट, २००४ अखेर कमी झालेली संख्या | दि.२३ ऑगष्ट, २००४ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर कमी झालेली संख्या | दि.३१ डिसेंबर, २००५ अखेर एकूण कमी झालेली संख्या (३+४=५) |
|---|---|---|---|---|
| ०१ | काम सोडून गेलेले | ४२ | १२ | ५४ |
| ०२ | मयत झालेले | १० | ०१ | ११ |
| ०३ | वयोमर्यादा ओलांडल्याने | ०७ | ०१ | ०८ |
| ०४ | अभिलेख सापडत नसलेले | ०४ | ०१ | ०५ |
| ०५ | कमी केलेले | ०३ | ०४ | ०७ |
| | एकुण (२) | ६६ | १९ | ८५ |
| | एकुण (तक्ता क्र.०१+०२) | ७०१ | २२६ | ९२७ |

थोडक्यात, मूळ प्रस्तावात नमूद केलेले ९१६ कर्मचारी अधिक नजरचुकीने राहून गेलेले माहे डिसेंबर, २००५ पूर्वीचे ११ कर्मचारी असे मिळून एकूण ९२७ कंत्राटी कर्मचारी आहेत / होते.

उप विषय अ बाबतची सद्यःस्थिती–

(ब) दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजीचे प्रस्तावाव्दारे, संस्थानमध्ये माहे डिसेंबर, २००० पूर्वीचे तसेच सन २००१ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर पर्यन्त या कालावधीत कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या काम करत असलेल्या अकुशल-८११ व कुशल-१०५ अशा एकूण ९१६ कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

या प्रस्तावाचे अनुषंगाने, उपरोक्त परिच्छेद अ मध्ये नमुद केलेल्या विवेचनास तसेच या संदर्भाने करणेत आलेल्या पत्रव्यवहारास अनुसरुन, मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०१३/२२/प्र.क्र.७०/ का.१६, दिनांक १७ सप्टेंबर,२०१९ अन्वये शासन निर्णय पारित केलेला आहे.

मा. शासनाने दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजी "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचा-यांना एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्याबाबत" या शीर्षाखाली पारित केलेल्या शासन निर्णयात खालीलप्रमाणे नमूद करणेत आलेले आहे -

"....श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे सन २००१ ते २००४ या कालावधीत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या ६३५ कर्मचा-यांपैकी कुशल कर्मचा-यांना दरमहा रु.५,९१३/- (रु.पाच हजार नऊशे तेरा फक्त) व अकुशल कर्मचा-यांना दरमहा रु.५,११३/- (रु.पाच हजार एकशे तेरा फक्त) इतके मासिक एकत्रित वेतन किंवा किमान वेतन कायद्यानुसार अनुज्ञेय वेतन यापैकी जे जास्त असेल ते वेतन देणेस मंजुरी देऊन शासनाच्या दि.०७.०८.२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या आकृतीबंधातील कंत्राटी पदावर नियुक्ती देण्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम,

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्द्यांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

२००४ मधील कलम १३ (४) व त्याखालील परंतुकास अनुसरुन तसेच पुढील अटीस अधीन राहून श्री साईबाबा संस्थानच्या व्यवस्थापन निधीतून अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

उपरोक्तप्रमाणे एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्यात येत असले तरी, संबंधित कर्मचा-याचा संस्थानच्या नोकरीत दर्जा (Status) हा कंत्राटी कर्मचारी म्हणून राहील. त्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडे कायमस्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क असणार नाही. "

(क) मा.शासनाने विषयांकित दिनांक १७ सप्टेंबर,२०१९ रोजी पारित केलेल्या शासन निर्णयातील बाबींबाबत सविस्तर विवेचन असे की,

**तक्ता क्रमांक ०१**

| अ.नं. | दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजीचे मा. शासन निर्णयात नमूद बाब | विवेचन |
|---|---|---|
| ०१ | सन २००१ ते २००४ या कालावधीत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या कार्यरत असलेले ६३५ कर्मचारी. | १. सोबत, कंत्राटी कर्मचारी ठेकेदारामार्फत सध्या कार्यरत असलेल्या सन २००१ ते २००४ या कालावधीत ६३५ पैकी ५९८ कर्मचा-यांची नांवे, जन्मतारीख, शैक्षणिक अर्हता, प्रथम नियुक्ती दिनांक व इतर माहिती असलेली यादी अवलोकनार्थ सादर केली आहे.<br>२. या ५९८ कर्मचा-यांची विगतवारी खालीलप्रमाणे आहे<br>i. तांत्रिक कुशल–०५० /<br>ii. लिपीक कुशल-०३६<br>iii. अकुशल मदतनीस–३३४/<br>iv. कुशल सुरक्षा-००२<br>v. अकुशल सुरक्षा गार्ड-१७६. |
| ०२ | कुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५,९१३/- (रु. पाच हजार नऊशे तेरा फक्त) व अकुशल कर्मचा-यांना दरमहा रु.५,११३/- (रु.पाच हजार एकशे तेरा फक्त) इतके मासिक एकत्रित वेतन किंवा किमान वेतन कायद्यानुसार अनुज्ञेय वेतन यापैकी जे जास्त असेल ते वेतन देणेस मंजुरी देऊन | सध्या, दिनांक ०१ जानेवारी, २०२० रोजी पासून कुशल व अकुशल कंत्राटी कर्मचा-यांचे मा. शासनाच्या किमान वेतन कायद्यानुसार वेतन खालीलप्रमाणे आहे–<br>०१. अकुशल कर्मचारी-रुपये ३६८.५४ प्रति दिन<br>०२. कुशल कर्मचारी-रुपये ४३०.५४ प्रति दिन<br>म्हणजेच, अकुशल कंत्राटी कर्मचारी यांस मासिक (३० दिवसासाठी) रुपये ११,०५६.२० मात्र आणि कुशल कंत्राटी कर्मचारी यांस मासिक रुपये १२,९१६.२० मात्र एकत्रित वेतन अनुज्ञेय होत आहे. |
| ०३ | शासनाच्या दि. ०७.०८.२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या आकृतीबंधातील कंत्राटी पदावर नियुक्ती देण्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम, २००४ मधील कलम १३ (४) व त्याखालील परंतुकास अनुसरुन तसेच पुढील अटीस अधीन राहून श्री साईबाबा संस्थानच्या व्यवस्थापन निधीतून अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. | ०१. दिनांक ०७ ऑगष्ट, २००९रोजीचे आकृतीबंधात एकूण १९१८ पदे ही कायमस्वरुपी कंत्राटी मंजूर करणेत आलेली आहेत.<br>०२. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम, २००४ मधील कलम १३–समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी या शीर्षाखाली अशी तरतूद नमूद करणेत आलेली आहे की –<br>.. .. (४) समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविण्यासाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (मुख्य कार्यकारीअधिका-यांव्यतिरिक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.<br>परंतु, ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतिबंधानुसार मंजूर करण्यात येईल |

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

| | | |
|---|---|---|
| | | पर्यन्त, केली जाणार नाही. ”<br>०३. मा.शासनाने दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ रोजी संस्थान आस्थापनेवरील विभाग व पदनिहाय ४८२६ पदांचा आकृतीबंध मंजूर केलेला असून, त्यामध्ये “ .. .. १९१८ पदांना सदर पदे कायम स्वरुपी कंत्राटी पध्दतीने भरण्यात येतील, कंत्राटी पध्दतीने भरावयाची पदे ११ महिन्यांच्या कराराने भरावी व कराराचे दरवर्षी नुतनीकरण करावे, या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.” असे नमुद करणेत आलेले आहे. |
| ०४ | उपरोक्तप्रमाणे एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्यात येत असले तरी, संबंधित कर्मचा-याचा संस्थानच्या नोकरीतील दर्जा (Status) हा कंत्राटी कर्मचारी म्हणून राहील. त्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडे कायमस्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क असणार नाही. | कंत्राटी पध्दतीने सामावून घेणेत येणा-या ६३५ पैकी ५९८ कर्मचा-यांचा संस्थानच्या नोकरीतील दर्जा (Status) हा कंत्राटी कर्मचारी म्हणून राहील.<br>दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ रोजीचे शासन निर्णयातील तरतुदीनुसार, सदरची पदे ही आकृतीबंधातील कंत्राटी १९१८ पदांमध्ये मंजूर आहेत. |

**(ड) दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजीचे शासन निर्णयातील संदर्भात नमूद केलेल्या, दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ रोजीचे** आकृतीबंध मंजूरीचे शासन निर्णयातील बाबींबाबत विवेचन असे की –

**<u>तक्ता क्रमांक ०२</u>**

| **अ.नं.** | **दि.१७/०८/२००९ रोजीचे शासन निर्णयातील बाब / मुद्दा** | **विभागाचा अभिप्राय** |
|---|---|---|
| ०१ | *समितीने पदनिहाय सेवाप्रवेश नियम तयार करावेत व त्यास शासन मान्यता घ्यावी. तसेच सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना सेवाप्रवेश नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.* | मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १६५ अन्वये, ०४ सेवानिवृत्त शासकीय अधिका-यांचा कार्यगट दिनांक १९ ऑगष्ट, २०१९ रोजी आस्थापनाविषयक कामकाजा करीता, विशेषतः सुधारित आकृतीबंध, सेवाप्रवेश नियम, बिंदूनामावली व इतर अनुषंगिक कामकाजासाठी नेमणेत आलेला आहे. या कार्यगटाने आपले कामकाज सुरु केलेले असून, त्यांनी विभागनिहाय सुधारित आकृतीबंधाचा प्रारुप मसुदे सादर केलेले आहेत. तसेच सेवा प्रवेश नियमाचा मसुदा तयार करणेचे कामकाज सुरु केलेले आहे.<br>विषयांकित कंत्राटी कर्मचा-यांचे शैक्षणिक अर्हतेबाबत स्वतंत्ररित्या खाली नमूद केले आहे. |
| ०२ | *सेवाप्रवेश नियमांमध्ये प्रत्येक पदांची शैक्षणिक पात्रता, जबाबदारी व कर्तव्ये ढोबळ मानाने निश्चित करण्यात यावे. सेवाप्रवेश नियमांमध्ये पदोन्नतीची साखळी याबाबत स्पष्टपणे उल्लेख असावा.* | |
| ०३ | *सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी.* | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम, २००४ मधील **<u>कलम १६ – सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे कर्मचारी संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडे नेमून देणे</u>** या शीर्षाखाली अशी तरतूद नमूद करणेत आलेली आहे की –<br>“ **.. कलम १६** - *नियत दिवसाच्या लगतपूर्वी,* ***<u>जी व्यक्ती</u>*** *पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेच्या सेवेत असेल आणि त्याच्या कामकाजासंबंधात काम करीत असेल अशी कोणतीही व्यक्ती ही, नियत दिवसाच्या लगतपूर्वी तिला जे वेतन लागू होते त्याच वेतनावर व सेवेच्या त्याच इतर अटी व शर्तीवर, नियत दिवसापासून, समितीच्या नियंत्रणाखाली, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या कामकाजाशी संबंधित अशा सेवेसाठी नेमून देण्यात आल्याचे व नियुक्त केल्याचे मानण्यात येईल; आणि सेवेच्या अशा शर्तींमध्ये राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेखेरीज त्या व्यक्तीचे अहित होईल अशा रीतीने समितीकडून कोणताही बदल करण्यात येणार नाही किंवा अशा व्यक्तीला सेवेतून काढून टाकण्यात येणार नाही.*<br>*परंतु, या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या* |

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

| | | |
|---|---|---|
| | | *तरतुदींनुसार अशा कोणत्याही व्यक्तीची सेवा समाप्त करण्याच्या समितीच्या अधिकारावर, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे परिणाम होणार नाही."*<br>उपरोक्त **कलम १६** मधील तरतुदीनुसार, दिनांक २३ ऑगष्ट, २००४ रोजी व अखेर संस्थान आस्थापनेवर असलेले सर्व कर्मचारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे आस्थापनेवर सेवेत आहेत. सदर अधिनियमाच्या नियत दिवसापूर्वी आणि लगतपूर्वी त्यांना जे वेतन होते त्याच वेतनावर व सेवेच्या त्याच अटी व शर्तीवर समितीच्या नियंत्रणाखाली व संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या कामकाजाशी संबंधित सेवेसाठी नियुक्त केले आहे. |
| ०४ | *सेवा प्रवेश नियमांमध्ये वेतनश्रेणीचा उल्लेख असावा.* | सदर पदे ही कायमस्वरुपी कंत्राटी असल्याने त्यांना वेतनश्रेणी लागू असणार नाही. |
| ०५ | *आकृतीबंधातील मंजुर पदांवर काम करणा-या कर्मचा-यांना शासनाप्रमाणे निवृत्तीवेतन लागू असणार नाही.* | विषयांकित कर्मचा-यांची नियुक्ती ही कंत्राटी पध्दतीने असल्याने निवृत्तीवेतन लागू करणेचा प्रश्न उदभवत नाही. |
| ०६ | *समितीला आकृतीबंधाबाहेर जाऊन पद भरती करता येणार नाही.* | मा. शासनाचे दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ रोजीचे आकृतीबंधाचे संबंधातील शासन निर्णयानुसार, सध्या एकूण **४८३८** (४८२६+०२+१०) पदांचा आकृतीबंध मंजूर असून, यामध्ये स्थायी पदे २९२० (२९०८+१२) + कंत्राटी पदे १९१८ यांचा समावेश आहे. या रिक्त व मंजूर १९१८ कंत्राटी पदांवरच ५९८ कंत्राटी कर्मचारी सामावून घेणेत येणार आहेत. त्यामुळे आकृतीबंधाबाहेर जाऊन पद भरती करणेचा प्रश्नच उद्भवत नाही. |
| ०७ | *समितीला कोणत्याही पदाचे पदनाम अथवा वेतनश्रेणी शासनाच्या पुर्व मान्यतेशिवाय बदलता येणार नाही.* | विषयांकित कर्मचारी हे अकुशल / कुशल या पदावर कंत्राटी कर्मचारी म्हणून किमान वेतन दरावर नियुक्त करणेत आलेले असल्याने पदनाम अथवा वेतनश्रेणी बदलणेचा प्रश्नच उद्भवत नाही. |
| ०८ | *समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी. जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही.* | मा. शासनाचे दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजीचे शासन निर्णयानुसार, सदरची पदे ही कायम कंत्राटी म्हणून मंजूर झालेली आहेत. |
| ०९ | *आस्थापनेवरील खर्च सिमीत करण्यासाठी राज्य शासनाच्या अधिका-यांची आकृतीबंधामध्ये निश्चित पदांवर प्रतीनियुक्तीने नियुक्ती करण्याची तरतूद ठेवावी.* | आवश्यकतेनुसार मा.शासनाकडून आकृतीबंधातील निश्चित पदांवर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेत येत आहे. |
| १० | *तांत्रिक पदे नव्याने भरतांना त्याच क्षेत्रातील तज्ज्ञांचा निवड प्रक्रियेत समावेश असेल याची दक्षता घ्यावी.* | सद्य:स्थितीत विषयांकित कर्मचारी हे सन २००४ पूर्वीपासून संस्थान सेवेत कंत्राटी म्हणून असल्याने, त्यांना कुशल / अकुशल कंत्राटी पदावर सामावून घेणेत येणार आहे. |
| ११ | *आकृतीबंधातील पदांवर नविन कर्मचा-यांची नियमित पदावर नियुक्ती झाल्यानंतर सदर कर्मचा-यांचा परिविक्षाधीन कालावधी एक वर्षाचा असावा व त्याचे वेतन वेतनश्रेणीतील सुरूवातीच्या टप्प्यावर निश्चित करावे.* | सदर पदे ही नियमित वेतनश्रेणीतील नाही. या कायम कंत्राटी कर्मचा-यांना ११ महिन्याचे कालावधीकरीता मा. शासनाच्या किमान वेतन दरानुसार नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले आहेत. |

**(इ)** मा.शासनाकडील मंजूर आकृतीबंधाचे दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ चे शासन निर्णयानुसार तसेच कंत्राटी पध्दतीने सेवेत सामावून घेणेचे दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ चे शासन निर्णयानुसार या कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान आस्थापनेवरील कंत्राटी पदावर सामावून घेणेबाबत कार्यवाही करता येईल.

याकामी मा. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२१५/प्र. क्र. ४०४/कार्या.१२, दिनांक २५ एप्रिल,२०१६ मधील खालील तरतुदी विचार करावा लागेल -

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

"‥ ‥ महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि विविध मंत्रालयीन विभागांनी/विभागप्रमुखांनी नियुक्त केलेल्या राज्यस्तरीय निवडसमित्या, विभागीय स्तरावरील निवड समित्या व जिल्हा निवड समित्या यांचेमार्फत घेणेत येणारे निरनिराळया पदांसाठीच्या स्पर्धा परिक्षांन्वये शासन सेवेतील प्रवेशासाठी, खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी सध्या कमाल वयोमर्यादा ३३ वर्षे आहे. त्यामध्ये ०५ वर्षांनी वाढ करुन त्यांची कमाल वयोमर्यादा ३८ वर्ष व मागासवर्गीय उमेदवारांसाठी सध्या कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे आहे, त्यामध्ये ०५ वर्षांनी वाढ करुन त्यांची कमाल वयोमर्यादा ४३ वर्ष करणेत येत आहे."

उपरोक्त तरतुदीनुसार, मां. शासन निर्णय दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ नुसार, कंत्राटी पदांवर सामावून घेणेचे ५९८ कर्मचा-यांची मा. शासन निर्णयाच्या तारखेस वयोमर्यादा निश्चित करुन त्यामध्ये शिथीलता द्यावी लागणार आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे –

<u>तक्ता क्रमांक ०३</u>

| अ. नं. | तपशील | कर्मचारी संख्या | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | खुला प्रवर्ग वय ३८ वर्षे व त्यापेक्षा कमी | खुला प्रवर्ग वय ३८ वर्षे पेक्षा जास्त | मागासवर्ग प्रवर्ग वय ४३ वर्षे व त्यापेक्षा कमी | मागासवर्ग प्रवर्ग वय ४३ वर्षे पेक्षा जास्त | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ०१ | अकुशल कंत्राटी कर्मचारी | ०९६ | १२८ | २१२ | ०७५ | ५११ |
| ०२ | कुशल कंत्राटी कर्मचारी | ०२० | ०३४ | ०१९ | ०१४ | ०८७ |
| | एकूण - | ११६ | १६२ | २३१ | ०८९ | ५९८ |

उपरोक्त तक्ता क्रमांक ०३ मधील रकाना क्रमांक ०४ मध्ये नमुद केलेल्या खुल्या प्रवर्गातील १६२ कंत्राटी कर्मचारी यांचे वय ३८ वर्षे पेक्षा जास्त असल्याने आणि अधिनियमातील तरतुदीनुसार कलम १६ अन्वये माहे ऑगष्ट, २००४ पूर्वी कार्यरत असणारे कर्मचा-यांची सेवा संरक्षित केलेली असल्याने विशेष बाब म्हणून सवलत देऊन त्यांना कंत्राटी पदावर सामावून घेणेत आलेले आहे.

उपरोक्त तक्ता क्रमांक ०३ मधील रकाना क्रमांक ०६ मध्ये नमुद केलेल्या मागासवर्ग प्रवर्गातील ८९ कंत्राटी कर्मचारी यांचे वय ४३ वर्षे पेक्षा जास्त असल्याने आणि अधिनियमातील तरतुदीनुसार कलम १६ अन्वये माहे ऑगष्ट, २००४ पूर्वी कार्यरत असणारे कर्मचा-यांची सेवा संरक्षित केलेली असल्याने विशेष बाब म्हणून सवलत देऊन त्यांना कंत्राटी पदावर सामावून घेणेत आलेले आहे.

**(ई)** सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक ०६ जून, २०१७ रोजीचे अधिनियमानुसार, गट ड चे पदासाठी (शिपाई, मदतनीस आदि) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण तसेच सफाई कामगारासाठी इयत्ता ०७ वी शैक्षणिक अर्हता नमूद केलेली आहे.

तसेच लिपीक व इतर पदांसाठी सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक ०६ जून, २०१७ रोजीचे अधिनियमानुसार, संवैधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी किंवा शासनाने त्याचेशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता तसेच मराठी टंकलेखन–३० शप्रमि व इंग्रजी टंकलेखन–४० शप्रमि वेगमर्यादा, एमएस-आयटी ही शैक्षणिक अर्हता नमूद केलेली आहे.

विषयांकित ५९८ कंत्राटी कर्मचारी हे गेल्या १५-२० वर्षापासून कर्मचारी कंत्राटदारामार्फत कुशल व अकुशल कंत्राटी कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत. दि.१७ सप्टेंबर,२०१९ चे शासन निर्णयानुसार, अधिनियमातील कलम १६ अन्वये त्यांची सेवा संरक्षित केलेली असल्याने त्यांना शैक्षणिक अर्हतेतून विशेष बाब म्हणून सवलत द्यावी लागणार आहे. तसेच या कंत्राटी कर्मचारी यांना ते पूर्वी ज्या विभागात कुशल/अकुशल पदावर काम करत होते, त्याच पदावर जसे काही कर्मचारी हे गवंडी, सुतार, टेलिफोन ऑपरेटर, सीटी स्कॅन टेक्नीशियन, फोटोग्राफर, प्लंबर, वाहनचालक, ओटी सहाय्यक, बंदुकधारी आदि तांत्रिक पदावर कुशल कंत्राटी कर्मचारी म्हणून किमान वेतनदरानुसार सामावून घेणेत आलेले आहेत. त्याचा गोषवारा खालीलप्रमाणे –

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

| अ.नं. | तपशील | शैक्षणिक अर्हता | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अशिक्षित | इ. ०१ ली ते इ.७वी | इ.०८ वी ते इ.१० वी | इ.११ वी व त्यापुढील | |
| ०१ | अकुशल कंत्राटी कर्मचारी | ०१२ | १३५ | २६२ | १०२ | ५११ |
| ०२ | कुशल कंत्राटी कर्मचारी | ००० | ००७ | ०२० | ०६० | ०८७ |
| एकूण | | ०१२ | १४२ | २८२ | १६२ | ५९८ |

**उपविषय (अ) बाबत विभागाचा अभिप्राय -**

**(फ-०१)** मा. शासनाचे दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजीचे शासन निर्णयानुसार, खालील तक्त्यात नमुद केलेप्रमाणे ५९८ कंत्राटी कर्मचारी हे किमान वेतनदरानुसार विविध विभागात कुशल / अकुशल कायम कंत्राटी पदांवर सामावून घेणेत आलेले आहेत. त्याचा गोषवारा खालीलप्रमाणे –

**तक्ता क्रमांक ०४ (०१)**

| अ.नं. | तपशील | संख्या | शेरा / कारण |
|---|---|---|---|
| **(अ)** | **दिनांक २३ मे, २०१९ रोजी कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील कंत्राटी कर्मचा-यांची संख्या** | ६३५ | -- |
| ०१ | यादीत एक नांव दोन वेळेस आलेले कंत्राटी कर्मचारी | ००१ | श्री. रविंद्र भडांगे यांचे नांव यादीतील अ.नं.५० आणि अ.नं. ५४ वर ही आलेले आहे, त्यापैकी यादीतील अ. नं. ५० नुसार नियुक्ती आदेश पारित करणेत आलेला आहे. |
| ०२ | यादीतील ६० वर्षे वयोमान पूर्ण केलेले कंत्राटी कर्मचारी | ००१ | श्रीमती पंचफुला राठोड (यादीतील अ.नं.०२) वयोमान ६० वर्षे पूर्ण झाल्याने नियुक्ती आदेश पारित करणेत आलेला नाही. |
| ०३ | यादीतील मयत झालेले कंत्राटी कर्मचारी | ००२ | श्री. दिवेकर (यादीतील अ.नं.६०) व श्री. कसबे (यादीतील अ.नं.५६४) हे मयत असल्या कारणाने नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले नाहीत. |
| ०४ | यादीतील दिनांक २३ ऑगष्ट, २००४ नंतरचे कंत्राटी कर्मचारी | ००८ | सदरचे कंत्राटी कर्मचारी हे दिनांक २३ ऑगष्ट, २००४ नंतर कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कामावर हजर झालेले आहेत, त्यामुळे त्यांना नियुक्ती आदेश देणेत आलेले नाहीत. (यादीतील अ.नं. ५७२, ५७४, ५७६, ५७७, ६३२, ६३३, ६३४ व ६३५ ) |
| ०५ | यादीतील सतत गैरहजर असणारे कर्मचारी | ००७ | कामगार विभागामार्फत ०१ वर्षापेक्षा जास्त तसेच ०१ वर्षाचे आतिल कालावधीत सतत गैरहजर असणारे एकूण २५ कंत्राटी कर्मचा-यांचे बाबतीत अलाहिदा कार्यवाही सुरु आहे. या २५ कंत्राटी कर्मचा-यापैकी तसेच ज्या कंत्राटी कर्मचा-यांची नांवे ६३५ कंत्राटी कर्मचा-यांचे यादीत आहेत, परंतु सध्या कामावर हजर नाहीत अशा कंत्राटी कर्मचा-यांना नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले नाहीत (यादीतील अ.नं.८९,१७२,२४०,४९१, ५०४, ६०० व ६११) |
| ०६ | यादीतील सन २००१ ते सन २००४ (दि.२२/०८/२००४) या कालावधीत कामावर नसणारे कर्मचारी | ०१५ | कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील सन २००१ ते सन २००४ या कालावधीत हजर नसणारे / कामावर नसणारे परंतु माहे डिसेंबर, २००० पुर्वी कामावर हजर असणारे कर्मचारी. (यादीतील अ.नं.३, ४, ९, २७, ४८, ८२, ८४, १०५, ११४, ११६, १२२, १२९, १४९ व १६९) |
| **(ब)** | **एकूण (अ.नं.०१ ते ०६)** | ०३४ | |
| **(क)** | **पारित करणेत आलेले आदेश ((अ) –(ब))** | ६०१ | **दिनांक २३ मे, २०१९ रोजी कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील ६०१ पात्र कर्मचा-यांना आदेश पारित** |

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्द्यांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

| | | | |
|---|---|---|---|
| | | | करणेत आले. |
| (ड) | यादीत समाविष्ट आहेत परंतु नियुक्ती आदेश स्वीकारले नाही असे कर्मचारी | ००३ | कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीनुसार हजर दिवस व कागदपत्रांची पडताळणी करुन नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले होते परंतु काही कारणास्तव नियुक्ती आदेश स्वीकारले नाहीत असे कर्मचारी (यादीतील अ.नं. ७६, ९० व ५३३ ) |
| (इ) | नियुक्ती आदेश स्वीकारुन सेवेत रुजू झालेले एकूण कंत्राटी कर्मचारी<br>**एकूण (क-ड)** | ५९८ | कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील कंत्राटी कर्मचा-यांचे सन २००१ ते सन २००४ (दिनांक २२ ऑगष्ट, २००४ अखेर कामावर असलेले) या कालावधीतील हजर दिवस आणि कागदपत्रांची पडताळणी करुन नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले असून, सदर कर्मचारी सेवेत रुजू झाले आहेत. |

उपरोक्त **<u>तक्ता क्रमांक ०४ (०१)</u>** मधील (इ) मध्ये नमुद केलेप्रमाणे, कंत्राटी कर्मचा-यांना पारित करणेत आलेल्या नियुक्ती आदेशातील कर्मचा-यांचा विभागाप्रमाणे व प्रकारानुसार (कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी) यानुसार थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे -

**<u>तक्ता क्रमांक ०४ (०२)</u>**

| अ. नं. | नियुक्ती आदेश स्वीकारुन सेवेत रुजू झालेले कंत्राटी कर्मचारी | कंत्राटी कर्मचारी | | | कंत्राटी कर्मचारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कुशल | अकुशल | एकुण | पुरुष | स्त्री | एकुण |
| ०१ | ५९८ | ०८७ | ५११ | ५९८ | ५६३ | ०३५ | ५९८ |

**<u>तक्ता क्रमांक ०४ (०३)</u>**

| अ.नं. | विभागाचे नांव | कंत्राटी कर्मचारी | | | कंत्राटी कर्मचारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कुशल | अकुशल | एकुण | पुरुष | स्त्री | एकुण |
| 1 | 2 | 3 | 4 | (3+4)=5 | 6 | 7 | (6+7)=8 |
| ०१ | सामान्य प्रशासन विभाग | ०१ | ०६ | ०७ | ०७ | ०० | ०७ |
| ०२ | जनसंपर्क विभाग | ०१ | ०४ | ०५ | ०५ | ०० | ०५ |
| ०३ | लेखाशाखा | १० | ०२ | १२ | १२ | ०० | १२ |
| ०४ | माहिती तंत्रज्ञान विभाग | ०२ | ०२ | ०४ | ०३ | ०१ | ०४ |
| ०५ | मंदिर विभाग | ०१ | २५ | २६ | २६ | ०० | २६ |
| ०६ | प्रकाशने विभाग | ०१ | ०२ | ०३ | ०३ | ०० | ०३ |
| ०७ | आरोग्य विभाग | ०२ | ९० | ९२ | ८५ | ०७ | ९२ |
| ०८ | संरक्षण विभाग | ०२ | १४३ | १४५ | १३५ | १० | १४५ |
| ०९ | फायर अॅण्ड सेफ्टी विभाग | ०० | ०४ | ०४ | ०४ | ०० | ०४ |
| १० | बांधकाम विभाग | ०४ | ०० | ०४ | ०४ | ०० | ०४ |
| ११ | पाणीपुरवठा विभाग | ०५ | ०२ | ०७ | ०७ | ०० | ०७ |
| १२ | बगीचा विभाग | ०० | ०३ | ०३ | ०२ | ०१ | ०३ |
| १३ | विद्युत विभाग | १४ | ०२ | १६ | १६ | ०० | १६ |
| १४ | मेकॅनिकल विभाग | ०३ | ०२ | ०५ | ०५ | ०० | ०५ |
| १५ | ध्वनिक्षेपण विभाग | ०३ | ०० | ०३ | ०३ | ०० | ०३ |
| १६ | सीसीटीव्ही कंट्रोल सेल | ०१ | ०४ | ०५ | ०५ | ०० | ०५ |
| १७ | साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग | ०० | १४ | १४ | १४ | ०० | १४ |
| १८ | साईप्रसाद निवासस्थान विभाग | ०१ | १० | ११ | ११ | ०० | ११ |
| १९ | व्दारावती भक्तनिवासस्थान विभाग | ०२ | ०१ | ०३ | ०३ | ०० | ०३ |
| २० | श्री साई आश्रम विभाग | ०० | ०४ | ०४ | ०४ | ०० | ०४ |

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | श्री साई धर्मशाळा | ०१ | ०१ | ०२ | ०२ | ०० | ०२ |
| २२ | श्री साई प्रसादालय | ०२ | ७७ | ७९ | ७६ | ०३ | ७९ |
| २३ | कॅन्टिन विभाग | ०२ | ३६ | ३८ | ३८ | ०० | ३८ |
| २४ | लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग | ०१ | ०७ | ०८ | ०८ | ०० | ०८ |
| २५ | भांडार विभाग | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०१ |
| २७ | वाहन विभाग | १३ | ०३ | १६ | १६ | ०० | १६ |
| २८ | मुंबई कार्यालय | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०१ |
| २९ | श्री साईबाबा इंग्लिश मिडियम स्कूल | ०४ | ०३ | ०७ | ०२ | ०५ | ०७ |
| ३० | श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय | ०१ | ०२ | ०३ | ०३ | ०० | ०३ |
| ३१ | श्री साईनाथ रुग्णालय | ०६ | २३ | २९ | २४ | ०५ | २९ |
| ३२ | श्री साईबाबा हॉस्पीटल | ०४ | ३७ | ४१ | ३८ | ०३ | ४१ |
| | एकूण | ८७ | ५११ | ५९८ | ५६३ | ३५ | ५९८ |

उपरोक्त विभागाचा अभिप्राय या शीर्षाखालील परिच्छेद (फ-०१) मध्ये नमुद केलेप्रमाणे माहे जानेवारी, २०२० मध्ये एकूण ५९८ कुशल / कुशल कंत्राटी कर्मचारी म्हणून संस्थानचे मंजूर कंत्राटी पदांवर नियुक्त्या देणेत आलेल्या आहेत, त्यास मान्यता असावी.

(फ-०२) अधिनियमातील कलम १६ अन्वये, माहे ऑगष्ट, २००४ पूर्वी जे कायम / कंत्राटी कर्मचारी कार्यरत होते, त्यांच्या सेवा संरक्षित करणेत आलेल्या असल्याने, अशा ६३५ पैकी ५९८ कंत्राटी कर्मचा-यांना वर नमुद केलेप्रमाणे वयोमर्यादा व शैक्षणिक अर्हतेबाबत विशेष बाब म्हणून सवलत देऊन त्यांना माहे जानेवारी, २०२० मध्ये देणेत आलेले नियुक्ती आदेश कायम होणेस मान्यता असावी.

(फ-०३) मा. तदर्थ समितीचे दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३६० मध्ये सदरहू उपविषय अ चे अनुषंगाने विशेषतः खालीलप्रमाणे नमूद आहे –

" .. .. Consequently, the Ad-hoc Committee has unanimously resolved to cancel and setaside all the appointment orders issued to 598 employees with effect from 31st July, 2020. This is in the light of the fact that due to Covid-19 situation the Committee has resolved to pay exgratia amount i.e. 50% of the salary to those 598 employees who were earlier working through the contractor. Therefore, the said employees are not likely to be financially affected.

The Committee has also resolved to extend liberty to the Sansthan to submit proposal in this regard as per their choice after due study of various Government Resolutions issued by the Government. "

याबाबत विवेचन असे की, उपरोक्त निर्णयाचे अनुषंगाने सभा कामकाज विभागाकडील पत्र क्रमांक एसएसएस/वशी४/७१६/२०२०,दिनांक १६ जुलै,२०२० अन्वये मा. तदर्थ समितीचे सदस्यांना विषयसूची पाठवून, समितीची सभा दिनांक २४ जुलै,२०२० रोजी अहमदनगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत कळविणेत आलेले होते. या सभेच्या विषयसूचीमध्ये विषयांकित प्रस्तावाचा समावेश करणेत आलेला होता.

तथापि, मा. तदर्थ समितीचे सदस्य श्री. दिलीप स्वामी, अपर आयुक्त नाशिक यांनी त्यांचेकडील दिनांक २३ जुलै,२०२० रोजीचे पत्राने, उपरोक्त बैठकीस (सभेस) हजर राहणेपासून सवलत मिळणेबाबत विनंती पत्र दिलेले होते. तसेच मा.तदर्थ समितीचे अन्य ०३ सदस्यांपैकी, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या पदावर प्रतिनियुक्तीने कार्यरत असणारे श्री.अरुण डोंगरे (भाप्रसे) यांची बदली मा.शासनाने दिनांक २३ जुलै,२०२० रोजी मुंबई येथे केल्याने आणि त्यांना बदलीचे जागी दिनांक २४ जुलै, २०२० त्वरीत हजर व्हावे लागले. या कारणास्तव मा. तदर्थ समितीची नियोजित दिनांक २४ जुलै, २०२० रोजीची सभा तहकूब करणेत आली असलेबाबत सभाकामकाज विभागामार्फत संबंधितांना कळविणेत आले.

तसेच, मा.तदर्थ समितीचे दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे सभेतील उपरोक्त निर्णयाची प्रत सामान्य प्रशासन विभागास दिनांक ०७ ऑगष्ट, २०२० रोजी प्राप्त झाली. मा. तदर्थ समितीने विषयांकित प्रस्तावातील ५९८ कंत्राटी कर्मचा-यांना देणेत आलेली नियुक्ती आदेश दिनांक ३१ जुलै, २०२० अखेरपासून रद्द करण्याची

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

कार्यवाही करता आली नाही. तसेच मा. तदर्थ समितीने प्रशासनास विषयांकित प्रस्तावाबाबत पुनःश्च सविस्तर प्रस्ताव सादर करणेबाबत स्वातंत्र्य दिलेले असल्याने, विषयांकित प्रस्ताव दिनांक २४ जुलै, २०२० रोजीचे सभेत सादर करणेत आलेला होता, परंतु सभा तहकूब झाल्याने या प्रस्तावावर चर्चा होऊ शकली नाही.

तसेच, विषयांकित नियुक्ती दिलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचा-यांपैकी श्री. भाऊसाहेब आनंदराव थोरात व इतर ०८ यांनी, सर्व कायम कंत्राटी कर्मचारी यांचेवतीने दिनांक २८ जुलै, २०२० रोजी मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा मा. अध्यक्ष, तदर्थ समिती यांना अग्रेषित केलेल्या अर्जाव्दारे, संस्थान प्रशासनाने दिलेल्या नेमणूक आदेशास सहानुभूतीपूर्वक व मानवतेच्या दृष्टीकोनातून संरक्षण देऊन, संस्थान सेवेत नियमित/कायम नेमणूक आदेश मिळणेबाबत विनंती केली आहे.

उपरोक्त सर्व बाबींस अनुसरुन आणि नमूद केलेल्या कारणांस्तव, मा. तदर्थ समितीचे दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३६० अन्वये विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने दिनांक ३१ जुलै, २०२० अखेर करावयाचे कार्यवाहीचे अंमलबजावणीसाठी सदर विषयात अंतिम निर्णय होईपर्यन्त मुदतवाढ मिळणेस विनंती.

---

**(ब) कंत्राटी कर्मचारी यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी म्हणून नेमणूकीस मान्यता मिळाल्यानंतर सदर कर्मचारी संख्या कंत्राटदाराच्या मंजूर कर्मचारी संख्येतून कमी करणेबाबत.**

उपविषय ब बाबत विषयाची पूर्वपीठीका –

अ-१) तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ नोव्हेंबर, २०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७६५ (२३) अन्वये, संस्थान प्रशासनाकडील दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजीचे पत्राव्दारे, संस्थानमध्ये माहे डिसेंबर, २००० पूर्वीचे तसेच सन २००१ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर पर्यन्त या कालावधीत कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या काम करत असलेल्या अकुशल-८११ व कुशल-१०५ अशा एकूण ९१६ कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा. शासनाकडे सादर करणेत आलेला होता.

या प्रस्तावाचे अनुषंगाने केलेल्या पत्रव्यवहारास अनुसरुन, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०१३ / २२ / प्र.क्र.७० / का.१६, दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ अन्वये " श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचा-यांना एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्याबाबत " या शीर्षाखाली पारित केलेल्या शासन निर्णयात खालीलप्रमाणे नमूद करणेत आलेले आहे -

" .. .. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे सन २००१ ते २००४ या कालावधीत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या ६३५ कर्मचा-यांपैकी कुशल कर्मचा-यांना दरमहा रु.५,९१३/- (रु. पाच हजार नऊशे तेरा फक्त) व अकुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५,११३/- (रु. पाच हजार एकशे तेरा फक्त) इतके मासिक एकत्रित वेतन किंवा किमान वेतन कायद्यानुसार अनुज्ञेय वेतन यापैकी जे जास्त असेल ते वेतन देणेस मंजुरी देऊन शासनाच्या दि. ०७.०८.२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या आकृतीबंधातील कंत्राटी पदावर नियुक्ती देण्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम, २००४ मधील कलम १३ (४) व त्याखालील परंतुकास अनुसरुन तसेच पुढील अटीस अधीन राहून श्री साईबाबा संस्थानच्या व्यवस्थापन निधीतून अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

उपरोक्तप्रमाणे एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्यात येत असले तरी, संबंधित कर्मचा-याचा संस्थानच्या नोकरीत दर्जा (Status) हा कंत्राटी कर्मचारी म्हणून राहील. त्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडे कायमस्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क असणार नाही. "

**अ-२)** उपरोक्त विवेचनानुसार व सामान्य प्रशासन विभागाकडील वेळोवेळी सादर करणेत आलेल्या कार्यालयीन टिपणीवरील आदेशानुसार, दिनांक २३ मे, २०१९ रोजीचे कामगार विभागाकडील टिपणी-वजा-पत्रासोबत प्राप्त झालेल्या ६३५ कंत्राटी कर्मचा-यांचे यादीनुसार, त्यामध्ये समाविष्ट असणारे कंत्राटी कर्मचा-यांचे सन २००१ ते सन २००४ (दिनांक २२ ऑगष्ट, २००४ अखेर हजर असलेले) मधील हजर दिवसांची तसेच त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन खाली नमूद केलेप्रमाणे नियुक्ती आदेश दिनांक ०२ जानेवारी, २०२० अखेर पारित करणेत आलेले आहेत. त्याचा तपशील याच प्रस्तावातील **उपविषय अ मधील तक्ता क्रमांक ०१ मध्ये सविस्तररित्या सादर केलेला आहे.**

**ब-१) कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी यांचेबाबत -**

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

विषयांकित प्रस्तावास अनुसरुन विवेचन असे की, सन २०१९-२० मध्ये कुशल/अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणेबाबत कंत्राटी कर्मचारी कंत्राटदार यांना खालीलप्रमाणे कार्यादेश पारित करणेत आलेले आहेत –

**तक्ता क्रमांक ०२ (अ)**

| अ. नं. | कर्मचारी कंत्राटदाराचे नाव | आदेश क्रमांक व दिनांक | कालावधी | कार्यादेशात नमूद केलेली कंत्राटी कर्मचारी मंजूरी संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अकुशल | कुशल | एकूण |
| ०१ | मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. पुणे | जा.नं.एसएसएस/वशी -७ए/२३०४/२०१९, दि.१३.०९.२०१९ | दि.०१.१०.२०१९ ते दि.३०.०९.२०२० | ६६९ | २२३ | ८९२ |
| ०२ | मे.मॉडर्न फॅसिलिटी मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे | जा.नं.एसएसएस/वशी -७ए/२३०५/२०१९, दि.१३.०९.२०१९ | दि.०१.१०.२०१९ ते दि.३०.०९.२०२० | ४०४ | ४८८ | ८९२ |
| | | | **एकूण -** | **१०७३** | **७११** | **१७८४** |

**तक्ता क्रमांक ०२ (ब)**

| अ. नं. | कर्मचारी कंत्राटदाराचे नाव | आदेश क्रमांक व दिनांक | कालावधी (मुदतवाढीसह) | कार्यादेशात नमुद केलेली मंजूर कंत्राटी सुरक्षाक्षक संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अकुशल | कुशल | एकूण |
| ०१ | मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन सिस्टीम अ‍ॅण्ड सर्व्हिसेस, मुंबई | जा.नं.एसएसएस/वशी-७ए/६५०/ २०१८, दि.०८.०६.२०१८ | दि.१०.०६.२०१८ ते दि.२९.०२.२०२० | ७४८ | ६७ | ८१५ |

**तक्ता क्रमांक ०२ (क)**

**गोषवारा**

| अ.नं. | तपशील | अकुशल | कुशल | एकूण |
|---|---|---|---|---|
| ०१ | तक्ता क्रमांक ०२ (अ) | १०७३ | ७११ | १७८४ |
| ०२ | तक्ता क्रमांक ०२ (ब) | ०७४८ | ०६७ | ०८१५ |
| **तक्ता क्र.०२ (अ + ब) एकूण -** | | **१८२१** | **७७८** | **२५९९** |

उपरोक्त तक्ता क्र.०२ (अ व ब) मध्ये दर्शविलेलेप्रमाणे दिनांक ०२ जानेवारी, २०२० अखेर संबंधित कुशल/अकुशल कंत्राटी कर्मचारी कंत्राटदार यांनी त्यांचेकडेस विभागून देणेत आलेल्या विभागांना कार्यादेशानुसार कंत्राटी कर्मचारी पुरविलेले आहेत.

मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे व मे. मॉडर्न फॅसिलिटी मॅनेजमेंट लि., पुणे यांना दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजी देणेत आलेल्या कार्यादेशातील नमूद मंजूर कंत्राटी कर्मचारी संख्येनुसार करारनामा करणेत आलेला आहे.

तसेच उपरोक्त तक्ता क्र.०२ (ब) मध्ये दर्शविलेलेप्रमाणे मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन सिस्टीम अ‍ॅण्ड सर्व्हिसेस, मुंबई यांनी दिनांक २९ फेब्रुवारी, २०२० अखेर कंत्राटी सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कंत्राटी कर्मचारी संरक्षण विभागास पुरविलेले आहेत.

**ब-२)** उपरोक्त **परिच्छेद अ** मध्ये सविस्तर विवेचन केलेनुसार, कंत्राटी कर्मचारी कंत्राटदाराकडे कार्यरत असणा-या कंत्राटी कर्मचा-यांपैकीच ५९८ कुशल / अकुशल कर्मचा-यांना संस्थानचे आस्थापनेवरील रिक्त असणारे कंत्राटी कर्मचारी पदांवर विभागनिहाय नेमणूका देणेत आलेल्या आहेत. त्यामुळे कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारांना पारित करणेत आलेल्या कार्यादेशातील कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी यांचे मंजूर संख्येमध्ये कपात करावी लागणार आहे.

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

त्यास अनुसरुन, संबंधीत कंत्राटी कर्मचारी कंत्राटदार यांचे मूळ कार्यादेशातील नमूद केलेल्या मंजूर कंत्राटी कर्मचारी संख्येतून कमी करावयाची कंत्राटी कर्मचारी संख्या दर्शविणारा सुधारित मंजुरीबाबतचा सविस्तर तक्ता "परिशिष्ट – अ " म्हणून सादर केला आहे.

**परिशिष्ट – अ**

| अ.नं. | कंत्राटदाराचे नाव | पुर्वी देण्यात आलेली मंजूरी | | | द्यावयाची सुधारित मंजूरी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अकुशल | कुशल | एकुण | अकुशल | कुशल | एकुण |
| ०१ | मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. पुणे **(लेबर कॉन्ट्रॅक्टर)** | ६६९ | २२३ | ८९२ | ४१५ | १६९ | ५८४ |
| ०२ | मे.मॉडर्न फॅसिलिटी मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे **(लेबर कॉन्ट्रॅक्टर)** | ४०४ | ४८८ | ८९२ | २०९ | ४५७ | ७४७ |
| | **एकूण -** | **१०७३** | **७११** | **१७८४** | **६२४** | **६२६** | **१३३१** |

परिशिष्ट– अ नुसार, सुधारित कुशल/अकुशल कंत्राटी कर्मचारी मंजुरीबाबत उपरोक्त मधील संबंधित कंत्राटी कर्मचारी कंत्राटदार यांना लेखी पत्राव्दारे कळविता येईल, असे मत आहे.

विषयाची सद्यस्थिती -

(क-०१) सदरचा विषय मा. तदर्थ समितीचे दिनांक ११ मे, २०२० रोजीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करणेत आला होता, त्यावर निर्णय क्र.२७७ मध्ये, " .. .. आजचे सभेच्या अजेंडयांवरील विषय न.०१,०२,४३ व ६३ या विषयांवरील एकत्रित निर्णय क्र.२३५ सदर इतिवृत्ताचे शेवटी परिशिष्ट 'अ' म्हणून जोडलेला आहे ." असे नमूद करणेत आलेले आहे. या निर्णय क्रमांक २३५ मधील अ.नं. ३८ मध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे

" .. .. So far as 598 employees to whom appointment order was issued by the then Chief Executive Officer is concerned, the concerned department of the Trust has not come up with a clear picture before this Committee. The fate of the Agreement, which the Trust had with the Contractors, is in limbo. The concerned department now want that this Committee to take up decision on Subject No. 43 listed on the Agenda of today's meeting. Unless comprehensive decision is taken as to regularisation/appointment of 598 employees on contract basis directly by the Trust or otherwise, as well as decision on the agreement, which Trust had with the Contractors, such request in subject No. 43 cannot be considered. The Trust is at liberty to submit detailed proposal in this regard before this Committee along with entire correspondence with the State Government and decisions taken by erstwhile committee. "

**तक्ता क्र. ०३**

| अ.नं. | कंत्राटदाराचे नाव | दि. ०१ जानेवारी, २०२० अखेर कर्मचारी मंजूरी | कायम कंत्राटीकडे वर्ग | प्रत्यक्ष कामावर / द्यावयाची सुधारीत मंजूरी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. पुणे | ८९२ | ३०८ | ५८४ | -- |
| ०२ | मे.मॉडर्न फॅसिलिटी मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे | ८९२ | १४५ | ७४७ | -- |
| ०३ | मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी, पुणे (मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन सिक्युरिटी सर्व्हि. मुंबई) | ८१५ | १४५ | ३५३ | संरक्षण विभागाकडील कायम कंत्राटीकडे १४५ कर्मचारी वर्ग केल्यामुळे ६७० कर्मचारी मंजूरी ऐवजी ६९४ (३५३+३४१) म्हणजे २४ जादा कर्मचारी कार्यादेश दिलेला आहे. |
| ०४ | मे.ईगल हंटर सोल्युशन लि. दिल्ली (मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन सिक्युरिटी सर्व्हि. मुंबई) | | | ३४१ | |
| | **एकूण -** | २५९९ | ५९८ | २०२५ | |

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

उपरोक्त नमूद (तक्ता क्र. ०३) मध्ये शेरा या रकान्यात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० रोजी मे. मॉडर्न विर रेज सिक्युरिटी, पुणे आणि मे. ईगल हंटर सोल्युशन लि., दिल्ली यांना अनुक्रमे ३५३ आणि ३४१ असे एकूण ६९४ कंत्राटी सुरक्षारक्षक व इतर कर्मचारी पुरविणेबाबत कार्यादेश देणेत आलेले आहेत. या कार्यादेशानुसार, संबंधित कंत्राटदार दिनांक ०१ मार्च,२०२० पासून कंत्राटी सुरक्षा रक्षक संरक्षण विभागास पुरवित आहेत. तसेच या मंजूर संख्येनुसारच त्यांचेशी करारनामा करणेत आलेला आहे.

**(क-०२)** सामान्य प्रशासन विभागामार्फत दिनांक ०२ जानेवारी,२०२० अन्वये,संस्थानकडील कर्मचारी कंत्राटदारामार्फत कामावर असलेल्या ५९८ कर्मचा-यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी पध्दतीने नेमणूका देण्यात आलेल्या आहेत, त्यामध्ये संरक्षण विभागाकडील १४५ कर्मचा-यांचा समावेश आहे.

संरक्षण विभागाकडील प्रत्यक्षात १४५ कंत्राटी कर्मचारी यांना संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून नेमणूका देणेत आलेल्या आहेत. तथापि, संरक्षण विभागाने दिनांक १७ फेब्रुवारी, २०२० रोजीचे पत्रानुसार, प्रस्तावित दर्शन रांग व इतर कामाचे पॉईट वाढणार असल्याने १४५ पॉईट कमी करणेऐवजी १२१ कर्मचा-यांचे पॉईट कमी करणेबाबत पत्र दिलेले आहे. त्यामुळे दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० रोजी देणेत आलेल्या नवीन कार्यादेशात २४ पॉईटची मंजूर जादा दिसून येत आहे. तसेच कंत्राटी कर्मचारी मंजूरी देतांना, त्यामध्ये कामाचे पॉईट, आठवडा सुट्टी सोडविणेकामी द्यावयाचे कर्मचारी, शिफ्ट या सर्व बाबींचा विचार करुन मंजूरी देणेत येत असते. सध्या नविन दर्शन रांग प्रकल्प व नविन शैक्षणिक संकुल प्रकल्प इत्यादी ठिकाणी सुरक्षेकामी बरेच पॉईट वाढणार असल्याने सध्या २४ अतिरिक्त पॉईटची मान्यता घेण्यात आलेली आहे, प्रत्यक्षात कुठल्याही प्रकारचे नविन कर्मचारी लावणेत आलेले नाहीत आणि प्रत्यक्षात प्रतिदिनी कामावर हजर असलेल्या सुरक्षा रक्षकांची पटसंख्या मंजूरीपेक्षा कमी आहे.

संस्थान आस्थापनेमार्फत दिनांक ०२ जानेवारी, २०२० रोजी, शासन निर्णयानुसार आजमितीस कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे ५९८ कंत्राटी कर्मचा-यांना कंत्राटी पध्दतीने नेमणूका देणेत आलेल्या आहेत. सदर कर्मचारी हे संस्थानला कंत्राटी कर्मचारी पुरविणारे कंत्राटदार यांचेकडील असल्याने, प्रत्यक्षात मंजूरीचे संख्येतून सदर कंत्राटी कर्मचारी संख्या कमी होवून, ज्या विभागातील कंत्राटी कर्मचारी यांना संस्थान कंत्राटी कर्मचारी म्हणून नेमणूक आदेश दिलेले आहेत, तेवढी कर्मचारी संख्या, कामाचे पॉईट कमी झालेले आहेत.

उपविषय (ब) बाबत विभागाचा अभिप्राय -

**(ड-०१)** कंत्राटी कर्मचारी पुरविणेचा ठेका मे.बी.व्ही.जी.इंडिया लि., पुणे यांना कामगार विभागाकडील जावक क्रमांक एसएसएस/वशी-७ए/२३०४/२०१९, दि.१३ सप्टेंबर, २०१९ नुसार कार्यादेश दिलेला आहे. सदर ठेक्याचा कालावधी दि.०१.१०.२०१९ ते दि.३०.०९.२०२०अखेर पर्यंत आहे. मात्र सदर ठेकेदाराकडील ३०८ कंत्राटी कामगार दि.०२.०१.२०२० च्या आदेशान्वये कायम कंत्राटी म्हणून संस्थान आस्थापनेकडे वर्ग झालेले आहेत. त्यामुळे त्यांचेकडे फक्त ५८४ कर्मचारी मंजूरी आवश्यक आहे व त्यानुसार सध्या त्यानुसार ते कर्मचारी पुरवित आहेत. मात्र ठेकेदाराच्या करारनाम्यात व पुरवठा आदेशात कर्मचारी मंजूरी ८९२ ऐवजी ५८४ करणेसाठी त्यामध्ये दुरुस्ती करावी लागेल.

**(ड-०२)** कंत्राटी कर्मचारी पुरविणेचा ठेका मे.मॉडर्न फॅसेलिटी मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे यांना कामगार विभागाकडील जावक क्रमांक एसएसएस/वशी-७ए/२३०५/२०१९, दि.१३ सप्टेंबर,२०१९ नुसार कार्यादेश दिलेला आहे. सदर ठेक्याचा कालावधी दि.०१.१०.२०१९ ते दि.३०.०९.२०२०अखेर पर्यंत आहे. मात्र सदर ठेकेदाराकडील १४५ कंत्राटी कामगार दि.०२.०१.२०२० च्या आदेशान्वये कायम कंत्राटी म्हणून संस्थान आस्थापनेकडे वर्ग झालेले आहेत. त्यामुळे त्यांचेकडे फक्त ७४७ कर्मचारी मंजूरी आवश्यक आहे व त्यानुसार सध्या त्यानुसार ते कर्मचारी पुरवित आहेत. मात्र ठेकेदाराच्या करारनाम्यात व पुरवठा आदेशात कर्मचारी मंजूरी ८९२ ऐवजी ७४७ करणेसाठी त्यामध्ये दुरुस्ती करावी लागेल.

**(ड-०३)** कंत्राटी सुरक्षा रक्षक पुरविणेसाठी मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन सिक्युरिटी सर्व्हिसेस, मुंबई कामगार विभागाकडील जावक क्रमांक एसएसएस / वशी-७ए / ६५० / २०१८, दि.०८.०६.२०१८ नुसार ८१५ सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेबाबत दिलेले आहेत. सदर ठेक्याचा कालावधी दि.१०.०६.२०१८ ते दि.२९.०२.२०२० अखेर पर्यंत होता. तदनंतर मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी, पुणे व मे. ईगल हंटर सोल्युशन लि. दिल्ली यांना दि.०१.०३.२०२० पासून नव्याने कार्यादेश विभागून देणेत आलेला आहेत. यामध्ये संरक्षण विभागाकडे १४५ कंत्राटी कामगार दि.०२.०१.२०२० च्या आदेशान्वये कायम कंत्राटी म्हणून संस्थान आस्थापनेकडे वर्ग झालेले आहेत. तथापि, संरक्षण विभागाकडे १४५ कामगार संख्या कमी करणेऐवजी वर नमुद केलेप्रमाणे २४ पॉईट

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

वाढल्याने १२१ कामगारांची संख्या कमी करुन त्यांना ६९४ कामगार पुरविणेबाबतचा आदेश मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी, पुणे यांना ३५३ व मे. ईगल हंटर सोल्युशन लि.दिल्ली यांना ३४१ या प्रमाणे देण्यात आलेला आहे. त्यानुसारच करारनामा केलेला आहे आणि त्या प्रमाणे कंत्राटी सुरक्षा रक्षक पुरवित आहेत.

**(ड-०४)** उपरोक्त मुद्दा क्र. क-०१ मध्ये नमूद एजन्सी / ठेकेदार मे. बी. व्ही. जी. इंडिया लि., पुणे यांनी दि.०३.०७.२०२० च्या पत्रानुसार त्यांचेकडील कर्मचारी मंजूरी ८९२ मधून ३०८ कर्मचारी मंजुरी कमी करुन ५८४ करणेबाबत विनंती केलेली आहे. तसेच उपरोक्त मुद्दा क्र. ०२ मध्ये नमूद मे.मॉडर्न फॅसेलिटी मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे यांनी दि.०३.०७.२०२० च्या पत्रान्वये त्यांचेकडील कामगार मंजूरी ८९२ मधून १४५ कामगार मंजूरी कमी करुन ७४७ करणेबाबत विनंती केलेली आहे.

प्रस्ताव -

(०१) उपरोक्त उपविषय (अ) मधील परिच्छेद (फ-०१), (फ-०२) व (फ-०३) नुसार मान्यता असावी.

(०२) उपरोक्त उपविषय (ब) मधील परिच्छेद (ड-०१), (ड-०२), (ड-०४) प्रमाणे कार्यवाही करण्यास आणि परिच्छेद (ड-०३) प्रमाणे केलेल्या कार्यवाहीस मान्यता असावी.

विषयांकित प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४२३** **अ) मा.तदर्थ समितीचे दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३६० मध्ये सदरहू उपविषय अ चे अनुषंगाने विशेषतः खालीलप्रमाणे नमूद आहे –**

**" .. .. Consequently, the Ad-hoc Committee has unanimously resolved to cancel and setaside all the appointment orders issued to 598 employees with effect from 31st July, 2020. This is in the light of the fact that due to Covid-19 situation the Committee has resolved to pay exgratia amount i.e. 50% of the salary to those 598 employees who were earlier working through the contractor. Therefore, the said employees are not likely to be financially affected.**

**The Committee has also resolved to extend liberty to the Sansthan to submit proposal in this regard as per their choice after due study of various Government Resolutions issued by the Government. "**

**याबाबत विवेचन असे की, उपरोक्त निर्णयाचे अनुषंगाने सभा कामकाज विभागाकडील पत्र क्रमांक एसएसएस/वशी४/७१६/२०२०,दिनांक १६ जुलै,२०२० अन्वये मा. तदर्थ समितीचे सदस्यांना विषयसूची पाठवून, समितीची सभा दिनांक २४ जुलै,२०२० रोजी अहमदनगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत कळविणेत आलेले होते. या सभेच्या विषयसूचीमध्ये विषयांकित प्रस्तावाचा समावेश करणेत आलेला होता. सदर सभा तहकुब झाली. तसे मा.तदर्थ समितीचे सदस्य श्री. दिलीप स्वामी, अपर महसूल आयुक्त नाशिक यांनी त्यांचेकडील दिनांक २३ जुलै,२०२० रोजीचे पत्राने, उपरोक्त बैठकीस (सभेस) हजर राहणेपासून सवलत मिळणेबाबत विनंती पत्र दिलेले होते.**

**या पार्श्वभूमीवर समितीचे सदस्य सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, सदर विषय मंजुर होण्यास सभेसमोर विलंबाने आलेला आहे. मा.तदर्थ समितीचे दि.१३ जुलै,२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.३६० अन्वये विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने दि.३१ जुलै,२०२० अखेर करावयाचे कार्यवाहीचे अंमलबजावणीसाठी सदर विषयात अंतिम निर्णय होईपर्यंत मुदतवाढ मिळणेस विनंती. सदर बाबत तदर्थ समितीची बैठक निर्धारित दिनांकांना न झाल्याने विषय प्रलंबीत राहिला. तथापी बैठकीत वरील वस्तुस्थिती विचारात न घेता सदरचा प्रस्ताव आज रोजी २x१ मताधिक्याने अमान्य करणे अयोग्य वाटते.**

**यावर समितीचे अध्यक्ष व सदस्य श्री.स्वामी यांनी सदर विषय चक्रिय पध्दतीने का आणला नाही, याबाबत विचारणा केली असता कुठलाही खुलासा करण्यात आला नाही. करीता मुदतवाढ न देता सदर विषय बंद करुन संस्थान प्रशासनास सुधारित प्रस्ताव देण्याची मुभा देणे योग्य होईल असे मताधिक्याने ठरले.**

**यावर संस्थान आस्थापनेवर कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे 598 कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत कंत्राटी पध्दतीने सामावून घेणेकामी करणेत आलेल्या कार्यवाहीस मान्यता न देण्याचा निर्णय तदर्थ समितीने दि.१३.०७.२०२० च्या सभेत ३x१ मताधिक्याने घेतलेला असल्याने मा.तदर्थ समितीचे दि.१३ जुलै,२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.३६० मधील नमुद केलेल्या निर्णयास अनुसरुन**

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

**दि.३१ जुलै, २०२० अखेर करावयाचे कार्यवाहीस मुदतवाढ देण्याची विनंती २x१ अशा मताधिक्याने अमान्य करण्यात आली.**

**ब) कंत्राटी कर्मचारी यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी म्हणून नेमणूकीस मान्यता मिळाल्यानंतर सदर कर्मचारी संख्या कत्राटदाराच्या मंजूर कर्मचारी संख्येतून कमी करणेबाबत आणलेल्या विषयावर चर्चा झाली. व अशी मान्यता देण्यात आलेली नसल्याने तो प्रश्न येत नाही.**

**तथापि सुधारित प्रस्ताव आणण्याची मुभा देण्यात आली.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.०४** **संस्थानमधील कायम कर्मचाऱ्यांना कामगार कायद्यातील तरतुदीनुसार रुपये २० लक्ष मात्र पर्यन्त उपदान रक्कम आदा न करता महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे रुपये १४ लक्ष पर्यंन्त उपदान रक्कम आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अ) विषयाची पूर्वपिठीका-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरील कायम कर्मचारी संस्थान सेवेतून सेवानिवृत्त झाल्यास, राजीनामा दिल्यास किंवा सेवानिवृत्त होण्यापूर्वीच अकस्मात मयत झाल्यास, सदर कर्मचाऱ्याला / त्याच्या वारसांना त्याच्या सेवानिवृत्तीपर्यंतची उपदानाची रक्कम (Gratuity Amount) सध्या **The Payment of Gratuity Act,1972** च्या कायद्यानुसार आदा करणेत येत आहे.

संस्थान कर्मचा-यांना आदा करावयाचे उपदानाचे रक्कमेबाबत तत्कालीन मा. व्यवस्थापन मंडळाचे दिनांक २२-२३ सप्टेंबर, २००१ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्रमांक ४१८ अन्वये, संस्थानच्या कायम कर्मचा-यांसाठी एलआयसी ग्रुप ग्रॅच्युईटी योजना लागू करणेत आलेली आहे. त्यानुसार कर्मचारी संस्थान सेवेतून सेवानिवृत्त झाल्यास/मयत झाल्यास/राजीनामा दिल्यास, त्यांचे ग्रॅच्युईटीचा क्लेम भारतीय जीवन विमा महामंडळ, पुणे यांचेकडे दाखल करुन, त्यांचेकडून संबंधित कर्मचा-याचे क्लेमची रक्कम प्राप्त झाल्यानंतर, संबंधीत कर्मचा-याचे बँक खात्यात जमा करण्यात येते. सदर कायद्याअंतर्गत कर्मचा-याला त्याचे शेवटचे वेतन व एकूण सेवाकालावधी विचारात घेऊन उपदानाची रक्कम आदा केली जाते.

Ministry of Law & Justice (Legislative Dept.), नवी दिल्ली दि.१८ मे,२०१० चे राजपत्र व श्रम आणि रोजगार मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील दि.२४ मे,२०१० च्या अधिसुचनेनुसार The Payment of Gratuity (Amendment) Act, 2010 (No.15 of 2010) अंमलात आलेला असून, त्यानुसार दिनांक २४ मे,२०१० पासून सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यास आदा करावयाचे उपदानाचे रकमेची कमाल मर्यादा रु.३,५०,०००/- मात्र वरुन रु.१०,००,०००/-मात्रपर्यंत वाढविणेत आलेली आहे.

या ग्रॅच्युईटीच्या कायद्यातील बदलानुसार, तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०४ जुलै, २०१० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५५४ अन्वये, " .. ..प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे The Payment of Gratuity Act, 1972 मध्ये झालेल्या सुधारणेप्रमाणे कर्मचा-यांना द्यावी लागणारी उपदान रकमेची कमाल मर्यादा रु.१०,००,०००/- पर्यंत वाढविण्यात आल्यामुळे दिनांक २४ मे, २०१० पासून सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांना या कायद्यानुसार उपदान रक्कम आदा करण्यात यावी, असे ठरले. " या निर्णयानुसार आजपावेतो कार्यवाही करणेत येत आहे.

तद्-नंतर Ministry of Law & Justice (Legislative Dept.), नवी दिल्ली दि.२९ मार्च,२०१८ चे राजपत्र व श्रम आणि रोजगार मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील दिनांक २९ मार्च, २०१८ च्या अधिसुचनेनुसार The Payment of Gratuity (Amendment) Act 2018 (No.12 of 2018) अंमलात आणलेला असुन, त्या अन्वये, दिनांक २९ मार्च, २०१८ पासून सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यास देय होणा-या ग्रॅच्युईटी रक्कमेची कमाल मर्यादा रुपये १० लाख मात्रवरुन रुपये २० लाख मात्रपर्यंत वाढविणेत आलेली आहे.

या कायद्यातील बदलानुसार, संस्थान कर्मचा-यांची ग्रॅच्युईटी रकमेची कमाल मर्यादा रुपये १० लाख मात्रवरुन रुपये २० लाख मात्र करणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १३ डिसेंबर, २०१८ रोजीचे सभेमध्ये निर्णय क्रमांक ७३१ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आलेला आहे -

" .. .. यावर सविस्तर चर्चा होऊन, The Payment of Gratuity Act, 1972 मध्ये झालेल्या सुधारणेप्रमाणे कर्मचा-यांना द्यावी लागणारी उपदानाच्या (ग्रॅच्युईटी) देय रक्कमेची कमाल मर्यादा रु.२० लक्ष पर्यंत वाढविण्यात आलेली असल्याने, दि.२९ मार्च, २०१८ नंतर संस्थान सेवेतून सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांना या कायद्यानुसार ग्रॅच्युईटी रक्कम आदा करणेस मान्यता देण्यात आली व त्याप्रमाणे शासनास कळविणेत यावे, असे ठरले. "

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

उपरोक्त निर्णयानुसार, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस लेखाशाखा यांचेकडील प्रस्ताव जावक क्रमांक एसएसएसटी/लेखा/४८५६/२०१८,दिनांक ०१ जानेवारी,२०१९ अन्वये,सदरचा प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी पाठविणेत आला होता.

त्यास अनुसरुन, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्रमांक –सांसवि-१०१९ / प्र.क्र.१३/का-१६,दिनांक ४ फेब्रुवारी,२०१९ रोजीचे पत्रान्वये "..श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या आस्थापनेवरील पदे राज्य शासनाच्या पदांशी समकक्ष आहेत किंवा कसे? या पदांना म.ना.से.(सुधारित वेतन) नियम,२००९,मधील तरतूदी लागु करण्यात येतात किंवा कसे ? या संदर्भातील स्पष्टीकरण सादर करण्यात यावे." असे कळविलेले होते. त्यानुसार, लेखाशाखेमार्फत मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना जा.क्र.एसएसएसटी/ लेखा/२०९०/२०१९, दिनांक ३० ऑगस्ट,२०१९ रोजीचे पत्राने सविस्तर माहिती-वजा-स्पष्टीकरण पाठविणेत आलेले होते.

मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी उपरोक्त विषयाचे अनुषंगाने झालेल्या पत्रव्यवहारास अनुसरुन, त्यांचेकडील पत्र क्रमांक माआअ-१०१९/प्र.क्र.१३/का-१६, दिनांक ०९ जुलै,२०२० रोजीचे पत्रानुसार खालीलप्रमाणे कळविलेले आहे –

" .. .. उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भाधिन पत्राच्या अनुषंगाने विषयानुंगाने, वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक सेनिवे-२०१९/प्र.क्र.२८ (प्रत्यक्षात ५८ आहे) / सेवा-४, दि.०१.०३.२०१९ च्या परिच्छेद ६ मध्ये नमूद तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत कळविण्यात येत आहे. "

(ब) वित्त विभाग,महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सेनिवे-२०१९/प्र.क्र.५८/सेवा-४, दिनांक ०१ मार्च,२०१९ मधील परिच्छेद ०६ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद नमूद आहे -

" .. .. सेवानिवृत्ती उपदान/मृत्यू उपदान या शीषाखलील -

६. या शासन निर्णयाच्या परिच्छेद ४ मध्ये नमुद केलेल्या सुधारीत मूळ वेतनावर निवृत्ती उपदानाची परिगणना करण्यात येईल. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम १११(१) अन्वये, दिनांक ०१.०१.२०१६ नंतर सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर अर्हताकारी सेवेच्या प्रत्येक पूर्ण सहामाही कालावधीकरिता त्याच्या सुधारीत वेतनाच्या एक चतुर्थांश इतके तथापि सुधारीत वेतनाच्या कमाल १६$^{1/2}$ पट किंवा रु.१४ लक्ष यापैकी जे कमी असेल ते सेवानिवृत्ती उपदान म्हणून देय राहील."

(क) विभागाचा अभिप्राय व प्रस्ताव-

मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील दिनांक ०९ जुलै, २०२० रोजीचे पत्राने कळविले नुसार, संस्थान आस्थापनेवरील पात्र कर्मचा-यांना यापुर्वीच्या मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक १३ डिसेंबर, २०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७३१ प्रमाणे रुपये २० लक्ष मात्रपर्यन्त उपदानाची रक्कम आदा न करतां, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील निर्णय क्रमांक सेनिवे-२०१९ / प्र.क्र.५८ / सेवा-४, दिनांक ०१ मार्च, २०१९ रोजीचे शासन निर्णयानुसार रुपये १४ लक्ष मात्रपर्यन्त सेवानिवृत्ती उपदान विहित पध्दतीने व निश्चित केलेल्या सुत्रानुसार आदा करता येईल.

उपरोक्त विषयांस अनुसरुन, **परिच्छेद क** मधील बाबीवर निर्णय होणेकामी मा. तदर्थ समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४२४ **महाराष्ट्र शासनाने पत्र क्र.माआअ-1019/प्र.क्र.13/का-16, दि.09 जुलै 2020 चे पत्रान्वये उपदानाची रक्कम 20 लक्ष पर्यंत वाढविण्याचा संस्थानने महाराष्ट्र शासनाला पाठविलेला प्रस्ताव अमान्य केलेला असल्याने सदरहु शासन निर्णयाचे विरोधात जावून उपदानाच्या रकमेत अशी वाढ करता येणार नाही असे समितीने एकमताने ठरवले. सबब, सदरचा प्रस्ताव सर्वानुमते मान्य करण्यात आला. सदरचा निर्णय हा धोरणात्मक असल्याने मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन करुन मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग /विधी विभाग)**

---

विषय नं.०५ **कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना ... संस्थान आस्थापनेवरील कायम कंत्राटी व बाहयस्त्रोत कर्मचारी कंत्राटदारामार्फत उक्ते पध्दतीने काम दिलेल्या कंत्राटदाराकडे कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचारी व इतर यांना माहे ऑगस्ट-२०२० वे तसेच Lockdown ची मुदत संपुन नियमितपणे संस्थान व्यवस्थापनाचे व प्रशासनाचे काम सुरु होईपावेतो विहीत कार्यपध्दतीने वेतन/पगार/मानधन इत्यादी आदा करणेबाबत.**

प्रस्ताव- (अ) विषयाची पूर्वपीठीका –

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

(अ-१) आपणांस विदितच आहे की, कोव्हीड १९ (कोरोना व्हायरस) या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव रोखणेसाठी करावयाचे प्रतिबंधात्मक उपाययोजनेनुसार मा. भारत सरकार व मा. महाराष्ट्र शासन यांचेकडून संपूर्ण भारत देशात तसेच महाराष्ट्र राज्यात दिनांक २३ मार्च, २०२० पासून संपूर्ण LOCKDOWN घोषित करणेत आलेला होता. मा. केंद्र व राज्य शासनाने या LOCKDOWN चा कालावधी आजपावेतो ०५ वेळा वाढविलेला आहे.

आता, मा.गृह मंत्रालय, केंद्र शासन (भारत सरकार) यांचेकडील शासन आदेश क्रमांक 40-3/2020-DM-I(A), दिनांक २९ जुलै, २०२० आणि मा. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नःवसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन आदेश क्रमांक DMU/2020/CR.92/DisM-1, दिनांक २९ जुलै, २०२० अन्वये, या LOCKDOWN ची मुदत (कालावधी) दिनांक ३१ जुलै, २०२० अखेर काही अटी-शर्तीवर तसेच काही अत्यावश्यक बाबींसाठी सवलत देऊन वाढविणेत आलेली असून, आज अखेर LOCKDOWN ची कठोर अंमलबजावणी स्थानिक महसूल व पोलिस प्रशासनामार्फत सुरु आहे.

तसेच मा. केंद्र व राज्य शासनाने अद्यापपावेतो धार्मिक स्थळे दर्शनासाठी खुली करणेबाबत ठोस निर्णय अथवा त्याबाबतचे आदेश पारित केलेले नाहीत. त्यामुळे संस्थान व्यवस्थापनाचे अखत्यारीतील श्री साई चे समाधी मंदिर व इतर मंदिरे भक्तांसाठी खुली करणेत आलेली नाहीत, मात्र संस्थान व्यवस्थापनामार्फत दैनंदिन पूजा-अर्जा, आरत्या ईत्यादी धार्मिक विधी कमीत कमी कर्मचा-यांच्या उपस्थितीत सुरु आहेत.

(अ-२) सामान्य प्रशासन विभागाकडील वेळोवेळी पारित करणेत आलेल्या आदेशांनुसार, कोव्हीड १९ या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव रोखणेसाठी मा. शासनाने निर्देशित केलेल्या उपाययोजनेनुसार, दिनांक २३ मार्च, २०२० पासून संस्थान आस्थापनेवरील अत्यावश्यक सेवेचे विभाग वगळतां, सर्व विभागातील कर्मचा-यांच्या कार्यालयातील/कार्यस्थळावरील उपस्थितीवर टप्प्या-टप्प्याने निर्बंध आणणेत येऊन, कर्मचा-यांना आळीपाळीने / चक्रीय पध्दतीने कामावर बोलविणेत येत असून, माहे मार्च, २०२० पासून आजपावेतो म्हणजेच माहे ऑगष्ट, २०२० मध्येही सलग व कायम ठेवणेत आलेली आहे.

(अ-३) माहे मे, २०२० चे वेतन आदा करणेबाबत, मा. तदर्थ समितीचे दिनांक ०९ जून, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३०८ अन्वये प्रशासकीय स्तरावर विहित कार्यपध्दती निश्चित करुन वेतन आदा करणेत आलेले आहे.

(अ-४) माहे जून, २०२० चे वेतन आदा करणेबाबत, मा. तदर्थ समितीचे दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे सभेत स्वतंत्र प्रस्ताव सादर करणेत आलेला होता, या प्रस्तावावर निर्णय क्रमांक ३५६ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला होता -

".. .. यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान आस्थापनेवरील कायम, कंत्राटी व कंत्राटी कर्मचारी तसेच बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचारी यांना माहे जून, २०२० चे वेतन आदा करणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आले –

१. मा. शासनाकडून प्रतिनियुक्तीने संस्थानमध्ये कार्यरत असणारे अधिकारी व संस्थान आस्थापनेवरील कायम (स्थायी) कर्मचारी यांचे वेतनाबाबत पुढील निर्णय मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावेत व त्याबाबत शासनाकडून वेळोवेळी जे निर्णय प्राप्त झाले व होतील त्या सर्व निर्णयांचे त्यांनी पालन करुन विहित पध्दतीने त्यांचे वेतन आदा करावे. यापुढे प्रतिनियुक्तीने संस्थानमध्ये कार्यरत असणारे अधिकारी व संस्थान आस्थापनेवरील कायम (स्थायी) यांचे वेतनाबाबतचा प्रस्ताव तदर्थ समिती समोर आणू नये.

२. *संस्थान आस्थापनेवर कार्यरत असणारे ५९८ कंत्राटी कर्मचारी त्यांचेबाबत निर्णय प्रलंबित आहे, या कर्मचा-यांना तसेच कंत्राटदारामार्फत असणारे कंत्राटी कर्मचारी, बाह्यस्त्रोत कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी आणि उक्त्या दराने दिलेल्या ठेक्याचे कंत्राटदाराकडे कार्यरत असणारे कर्मचारी यांना माहे मे, २०२० मध्ये प्रत्यक्ष कामावर हजर असलेल्या दिवसाचे वेतन हे किमान / विहित वेतनदरानुसार १०० टक्के आणि कोव्हीड १९ लॉकडाऊन कालावधीतील उर्वरित दिवस कामावर हजर नसल्याने, त्या दिवसांचे वेतन हे किमान / विहित वेतनदरानुसार ५० टक्के आदा करणेत यावे.*

३. *रुग्णालय विभागाकडील ५९८ कंत्राटी कर्मचारी त्यांचेबाबत निर्णय प्रलंबित आहे, या कर्मचा-यांना तसेच कंत्राटदारामार्फत असणारे कंत्राटी कर्मचारी, बाह्यस्त्रोत कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी आणि उक्त्या दराने दिलेल्या ठेक्याचे कंत्राटदाराकडे कार्यरत असणारे कर्मचारी यांना माहे जून, २०२० चे वेतन आदा करतांना ज्या कर्मचा-यांची उपस्थिती ५० टक्के व त्यापेक्षा जास्त असेल अशा कर्मचा-यांना किमान/ विहित वेतन दरानुसार १०० टक्के वेतन आदा करणेत यावे तसेच ज्या कर्मचा-यांची उपस्थिती ५० टक्क्यापेक्षा कमी असेल अशा कर्मचा-यांना अ. नं. २ प्रमाणे वेतन आदा करणेत यावे.*

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

*४. मा. राज्य शासनाने दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांना लॉकडाऊन कालावधीत कार्यालयात हजर राहण्यापासून सूट/ सवलत दिलेली असल्याने अशा दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांना माहे जून,२०२० चे १०० टक्के वेतन किमान/विहित वेतनदरानुसार आदा करणेत यावेत. "*

*(अ-५) माहे जून,२०२० चे वेतन आदा करणेबाबत, उपरोक्त निर्णयानुसार तसेच माहे जुलै,२०२० चे वेतन आदा करणेबाबत मा.तदर्थ समितीचे दिनांक १३ जुलै,२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३५७ अन्वये प्रशासकीय स्तरावर विहित कार्यपध्दती निश्चित करुन वेतन आदा करणेबाबत कार्यवाही करणेत आलेली आहे/ करणेत येत आहे.*

*(ब) माहे ऑगष्ट,२०२० चे वेतनाबाबतचा प्रस्ताव–*

*(ब-१) कायम कंत्राटी कर्मचारी (५९८ कर्मचारी) यांचे वेतन-*

*मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ आणि त्या अनुषंगाने प्रशासकीय स्तरावरील मान्यतेनुसार, सन २००१ ते २००४ या कालावधीत कंत्राटी कर्मचारी* कंत्राटदारामार्फत संस्थान सेवेत असणारे कुशल / अकुशल ६३५ कंत्राटी कर्मचा-यांपैकी ५९८ कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचा-यांना, किमान वेतन कायद्यानुसार व किमान वेतन दरानुसार माहे जानेवारी, २०२० मध्ये कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून संस्थानांचे विविध विभागांकडे नियुक्त्या देणेत आलेल्या आहेत.

या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना LOCKDOWN चे कालावधीत मा. शासनाचे नियमांचे पालन करुन, आवश्यकतेनुसार व गरजेनुसार काही विभागात पूर्ण उपस्थितीसह इतर विभागात आवश्यकतेनुसार चक्रीय पध्दतीने / आळीपाळीने कामावर बोलविणेत आलेले होते. या बाबीचा विचार करुन, या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना मा. तदर्थ समितीचे दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३५६ व निर्णय ३५७ अन्वये, निश्चित केलेल्या कार्यपध्दतीनुसार माहे ऑगष्ट, २०२० चे वेतन आदा करता येईल, असे मत आहे.

**(ब-२) कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी यांचे वेतनाबाबत –**
संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत सध्या खालीलप्रमाणे कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत -

१. कुशल/अकुशल कंत्राटी कर्मचारी (साधारणतः सर्व विभागात कार्यरत)
२. कुशल/अकुशल सुरक्षा निरीक्षक/सुरक्षारक्षक/बंदूकधारी सुरक्षारक्षक/माजी सैनिक (संरक्षण विभाग)
३. निश्चित मानधन/वेतनावर आणि निश्चित कालावधीसाठी नियुक्त करणेत आलेले कर्मचारी (उदा.भूसंपादन सल्लागार, मोजणीदार, वैद्यकीय अधिकारी, पॅरा मेडिकल स्टाफ, शिक्षक इत्यादी– विशेषतः रुग्णालये/मालमत्ता/प्रकाशने/आयटीआय विभाग ई.)
४. बाह्यस्त्रोत स्त्री/पुरुष पारिचारिका व इतर (किमान वेतनावर कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत-रुग्णालये विभाग)

वर नमुद केलेप्रमाणे संस्थान आस्थापनेवरील सर्वसाधारणपणे सर्वच विभागात कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत आहेत. या सर्व कर्मचा-यांना मा. तदर्थ समितीचे निर्णयानुसार, प्रशासकीय स्तरावर विहित कार्यपध्दती निश्चित करुन माहे मार्च, एप्रिल, मे, जून आणि जुलै, २०२० या महिन्यांचे मासिक वेतन आदा करणेत आलेले आहे.

या कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचा-यांना मा. शासनाचे नियमांचे पालन करुन, आवश्यकतेनुसार व गरजेनुसार चक्रीय पध्दतीने / आळीपाळीने कामावर बोलविणेत आलेले होते. या बाबीचा विचार करुन, या कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचा-यांना यांना मा. तदर्थ समितीचे दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३५६ व निर्णय ३५७ अन्वये, निश्चित केलेल्या कार्यपध्दतीनुसार माहे ऑगष्ट, २०२० चे वेतन आदा करता येईल, असे मत आहे.

**(ब-३)** या व्यतिरिक्त संस्थान आस्थापनेवरील खालील विभागांकडे उक्ते / ठोक पध्दतीने काम दिलेल्या बाह्यस्त्रोत कंत्राटदारामार्फत बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत –

०१. (अ) श्री साईनाथ रुग्णालय (हाऊसकिपींग)
(ब) श्री साईनाथ रुग्णालय (पारिचारिका )
(क) श्री साईनाथ रुग्णालय (इतर कर्मचारी)

०२. (अ) श्री साईबाबा हॉस्पीटल (हाऊसकिपींग)
(ब) श्री साईबाबा हॉस्पीटल (पारिचारिका)
(क) श्री साईबाबा हॉस्पीटल (इतर कर्मचारी)

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

०३. श्री साई प्रसादालय (चपाती / पुरी / नाष्टा पाकिटे / हाऊसकिपींग / वाढपी आदि)

०४. लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग ( बुंदी प्रसाद / बुंदी लाडू प्रसाद )

०५. व्दारावती / श्री साई आश्रम / श्री साई धर्मशाळा निवासस्थान विभाग (हाऊसकिपींग)

उपरोक्त नियुक्त करणेत आलेल्या बाह्यस्त्रोत कंत्राटदारांना तसेच उक्ते / ठोक पध्दतीने काम दिलेल्या कंत्राटदाराकडे काम करणारे कंत्राटी कर्मचा-यांना, ज्या-त्या संबंधित विभागांमार्फत स्वतंत्ररित्या अटी-शर्तीसह कार्यादेश देणेत आलेले आहेत.

त्यामुळे उपरोक्त अ.नं. ०१ व ०२ मधील, रुग्णालय विभागाकडील कंत्राटी कर्मचारी, ठोक/उक्ते दराने काम दिलेल्या कंत्राटदाराकडील कर्मचारी यांना यापुर्वी म्हणजेच, माहे जून, २०२० आणि माहे जुलै, २०२० मध्ये वेतनाबाबत विहित करणेत आलेल्या कार्यपध्दतीनुसार, माहे ऑगष्ट, २०२० चे वेतन आदा करता येईल.

तसेच उपरोक्त अ. नं. ०३, ०४ व ०५ मधील ठोक / उक्ते पध्दतीने अथवा त्यांना देणेत आलेल्या कामाचे कार्यादेशानुसार, अशा कंत्राटदाराकडे कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना माहे जुलै, २०२० चे मध्ये देणेत आलेल्या वेतनाचे कार्यपध्दतीप्रमाणे म्हणजेच हजर दिवसाला पूर्ण वेतन आणि कामावर नसलेल्या दिवसांसाठी अर्धे वेतन दयावे, असे मत आहे.

(क) विभागाचा अभिप्राय व प्रस्ताव- सध्या विषयांकित कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव वाढता असून, मा. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नःवसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक २९ जुलै, २०२० रोजीचे आदेशान्वये, या LOCKDOWN ची मुदत (कालावधी) दिनांक ३१ ऑगष्ट, २०२० अखेर काही अटी-शर्तीवर तसेच काही अत्यावश्यक बाबींसाठी सवलत देऊन वाढविणेत आलेली असून, आज अखेर या आदेशांची कठोर अंमलबजावणी स्थानिक महसूल व पोलिस प्रशासनामार्फत सुरु आहे.

त्यामुळे उपरोक्त परिच्छेद(अ)मधील पूर्वपीठीकेस अनुसरुन, परिच्छेद ब मधील उपपरिच्छेद (ब-१ ते ब-३) मध्ये नमूद केलेप्रमाणे, संस्थान व्यवस्थापनाकडे/आस्थापनेवर विविध विभागाकडे, विविध पध्दतीने कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना माहे ऑगष्ट,२०२०चे वेतन (माहे सप्टेंबर,२०२० मध्ये आदा करावयाचे वेतन) आणि तसेच माहे ऑगष्ट, २०२० नंतर मा.केंद्र व राज्य शासनाचे आदेशान्वये LOCKDOWN ची मुदत संपेपर्यन्त अथवा नियमितपणे संस्थान व्यवस्थापनाचे व प्रशासनाचे काम सुरु होईपावेतो, वर नमुद केलेप्रमाणे विहित कार्यपध्दती निश्चित करुन वेतन/पगार/मानधन आदि आदा करणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४२५ **संस्थान आस्थापनेवरील कायम कंत्राटी व बाहयस्त्रोत कर्मचारी कंत्राटदारामार्फत उक्ते पध्दतीने काम दिलेल्या कंत्राटदाराकडे कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचारी व इतर यांना पूर्वी माहे जुलैच्या वेतनासंबंधी झालेल्या निर्णयाप्रमाणेच त्यातील क्र. 2, 3, 4 प्रमाणे माहे ऑगस्ट-2020 चे (माहे सप्टेंबर 2020 मध्ये आदा करावयाचे) वेतन आदा करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. मा. उच्च न्यायालयात सिव्हील अॅप्लिकेशन करावा.**

**598 कंत्राटी कर्मचा-यांचे बाबतीत संस्थान नवीन प्रस्ताव सादर करण्याबाबत तदर्थ समितीने मुभा दिलेली आहे. अशा परिस्थितीत त्यांच्या बाबतीतील निर्णय तुर्तास स्थगित (in abeyance) ठेवण्यात येत आहे, असे सर्वानुमते ठरले. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग/विधी विभाग)**

---

विषय नं.०६ **A) मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार श्री.विजय गणपत रोहमारे, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) यांना प्रशासकीय अधिकारी पदावर नेमणूक करणेबाबत.**

**B) रिट पिटीशन क्र.४०१८/२०१९ चे निकालाबाबत मा.तदर्थ समिती सभेपुढे प्रस्ताव सादर करणेस झालेल्या विलंबाबाबत.**

**C) श्री.संजय चौधरी, शिर्डी यांचा सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी श्री.सुर्यभान विठ्ठलराव गमे याचे बाबत तक्रार.**

**D) प्रशासकीय अधिकारी पदावर पदोन्नतीने नेमणूक मिळणेकामी कर्मचा-यांचे आलेल्या अर्जावर निर्णय होणेबाबत.**

**E) प्रशासकीय अधिकारी पदाची पात्रता Feeder cadre (निम्नपद) व सेवा जेष्ठता यादी.**

प्रस्ताव- A) मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार श्री विजय गणपतराव रोहमारे, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) यांचा प्रशासकीय अधिकारी पदावर नेमणूक करणेबाबत...

अ) विषयाची पुर्वपिठीका -

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

अ-१) मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि.०७/०८/२००९ रोजीचे आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या आस्थापनेवरील पदांचे आकृतीबंधास काही अटी शर्तीसह मान्यता दिलेली असुन त्यात खालीलप्रमाणे अटी-शर्ती नमुद करण्यात आलेल्या आहेत -

अट-शर्त क्र.१ - समितीने पदनिहाय सेवाप्रवेश नियम तयार करावेत व त्यास शासन मान्यता घ्यावी. तसेच सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना सेवाप्रवेश नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.

क्र.२ - सेवाप्रवेश नियमांमध्ये प्रत्येक पदांची शैक्षणिक पात्रता, जबाबदारी व कर्तव्य ढोबळ मानाने निश्चित करण्यात यावे. सेवाप्रवेश नियमांमध्ये पदोन्नतीची साखळी याबाबत स्पष्टपणे उल्लेख असावा.

क्र.३ - सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी.

क्र.४- सेवा प्रवेश नियमांमध्ये वेतनश्रेणीचा उल्लेख असावा.

क्र.५- आकृतीबंधातील मंजुर पदांवर काम करणा-या कर्मचा-यांना शासनाप्रमाणे निवृत्तीवेतन लागू असणार नाही.

क्र.६- समितीला आकृतीबंधाबाहेर जाऊन पद भरती करता येणार नाही.

क्र.७ – समितीला कोणत्याही पदाचे पदनाम अथवा वेतनश्रेणी शासनाच्या पुर्व मान्यतेशिवाय बदलता येणार नाही.

क्र.८- समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी. जेणेकरून व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही.

क्र.९- आस्थापनेवरील खर्च सिमीत करण्यासाठी राज्य शासनाच्या अधिका-यांची आकृतीबंधामध्ये निश्चित पदांवर प्रतीनियुक्तीने नियुक्ती करण्याची तरतुद ठेवावी.

क्र.१०- तांत्रिक पदे नव्याने भरतांना त्याच क्षेत्रातील तज्ञांचा निवड प्रक्रियेत समावेश असेल याची दक्षता घ्यावी.

क्र.११- आकृतीबंधातील पदांवर नविन कर्मचा-यांची नियमित पदावर नियुक्ती झाल्यानंतर सदर कर्मचा-यांचा परिविक्षाधीन कालावधी एक वर्षाचा असावा व त्याचे वेतन वेतनश्रेणीतील सुरूवातीच्या टप्प्यावर निश्चित करावे.

**अ-२)** तसेच, मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि.२८/१०/२०१३ रोजीचे निर्णय व जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/४४६०/२०१४, दि.२७/१२/२०१४ रोजीचा आदेशान्वये, संस्थान अधिनियम २००४ मधील तरतुदीस अनुसरून दि.०१/०१/२०१५ पासून शासनाने मान्यता दिलेले विनियम संस्थानला लागू करण्यात आलेले आहे. लागू केलेल्या सर्व साधारण सेवा अटी विनियम, २०१३ मधील प्रकरण ४ - नियुक्त्या, परिवीक्षा, सेवा समाप्ती आणि नियत वयमान मधील कलम १२ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

(१) समिती आदेशाव्दारा विविध गटातील आणि प्रवर्गातील सेवा प्रवेशाचे धोरण आणि पध्दत घालुन देईल आणि उमेदवाराने भरावयाचा अर्ज नमुना किंवा नमुने आणि अशा अर्जांना जोडावयाची प्रमाणपत्रे आणि प्रमाणलेख विहित करेल.

(२) संस्थानाचे नियुक्ती प्राधिकारी संस्थानाच्या सेवेत सेवाप्रवेश आयोजित करताना वेळोवेळी महाराष्ट्र शासनाने अनुसूचीत जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, अपंग व्यक्ती, माजी सैनिक, या प्रवर्गातील उमेदवारांच्या किंवा शासनाने विहित केलेल्या इतर प्रवर्गातील उमेदवारांच्या शासकीय सेवा प्रवर्गाशी निगडीत वेळोवेळी पारित केलेल्या निर्देशांचे पालन करतील.

**अ-३)** तसेच, दि.२८ ऑक्टोबर, २०१३ च्या शासन निर्णयात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा संस्थानचे आस्थापनेवरील विविध संवर्ग, त्यांची शैक्षणिक पात्रता, नियुक्ती, वेतनश्रेणी व पदोन्नती इत्यादीबाबत छाननी करून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांच्या नियुक्ती व पदोन्नतीच्या विनियमाचे प्रारूप पदांचा तपशिलांच्या परिशिष्टासह शासनास तातडीने सादर करण्यात यावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.

संस्थानने विभागनिहाय व पदनिहाय सेवाप्रवेश नियम तयार करुन त्यास मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १२/०६/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४९३ अन्वये मान्यता घेऊन, सदर सेवाप्रवेश नियम (Recruitment Rules) परिशिष्ठासह जा.नं.एसएसएस/वशी-०१/१४७०/२०१४, दि.२६/०६/२०१४ रोजीचे

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

प्रस्तावाअन्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आले होते.

तथापी, जा.नं.एसएसएस/वशी-०१/१४७०/२०१४, दि.२६/०६/२०१४ रोजीचे प्रस्तावावर मा.विधी व न्याय विभाग यांनी पत्र क्र.सासंवि २०१५/५१९/प्र.क्र.३२/का.१६, दि.३० जुन, २०१५ अन्वये, लेखी पत्र पाठविले असुन सदर पत्रान्वये शासनाने संस्थान सेवाप्रवेश नियमांना पुर्वप्रसिध्दी देणे आवश्यक असुन सादर करणेत आलेले सेवा प्रवेश नियम पुर्व प्रसिध्द करुन, हरकती मागविणेत येऊन योग्य त्या सुधारणा करुन पुन्हा सादर करणेत यावेत, असे कळविले आहे.

उपरोक्त अटी-शर्तीस अनुसरून प्रारूप सेवाप्रवेश नियम मा.व्यवस्थापन समिती दि.२७/०७/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२२३ नुसार जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/२०२५/२०१५, दि.२७/०८/२०१५ चे परिपत्रकान्वये पूर्व प्रसिध्द करुन हरकती मागविण्यात आलेल्या होत्या. याकामी प्राप्त झालेल्या काही हरकतींवर मा.वरिष्ठ अधिकारी यांचे समक्ष सुनावणी घेऊन त्या फेटाळण्यात आल्या किंवा अंशतः मंजुर करणेत आल्या. सदरचा प्रस्ताव सन २०१४ पासुन प्रलंबित आहे.

**अ-४)** प्रलंबित सेवाप्रवेश नियम तसेच इतर आस्थापनाविषयक कामे करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६ फेब्रुवारी, २०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१६५ अन्वये श्री त्र्यंबक अंबादास खैरे, ॲड.डॉ.मधुकर दगडु गिरी, श्री बाळासाहेब बापुराव भंडारकवठे व श्री अशोक विठ्ठलराव शिंदे, सेवानिवृत्त शासन अधिकारी यांचे कार्यगटाची नियुक्ती करण्यात आलेली आहे. या कार्यगटाने कामकाज सुरू केलेले असुन सदरचे कामकाज पुर्ण झालेनंतर शासनाचे मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात येईल.

**अ-५)** मा.शासनाचे मान्यतेसाठी दि.२६ जुन, २०१४ रोजी सादर करणेत आलेल्या **प्रारूप सेवाप्रवेश नियमांमध्ये** सर्व साधारणपणे "प्रशासकीय अधिकारी" पदासाठी खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता व पात्रता नमुद/प्रस्तावित करणेत आलेली होती.

**विभाग - सामान्य प्रशासन विभाग**

| Designation<br>पदनाम | Pay scale<br>वेतनश्रेणी | Total Post<br>एकुण पदसंख्या | Qualification<br>पात्रता | |
|---|---|---|---|---|
| | | | By Nomination | By Promotion |
| Administrative Officer<br>प्रशासकीय अधिकारी | (६ व्या वेतनआयोगानुसार) 15600-39100 Grade Pay 5400<br>(७ व्या वेतनआयोगानुसार) S-20 (56100-177500) | 05<br>(दि.7/8/2009 चे मंजूर आकृतीबंधानुसार) | On Deputation from Government of Maharashtra | 1) Graduate from any Government recognized University;<br>2) MS-CIT or Government prescribed equivalent Computer Operating Course;<br>3) Experience minimum 5 years in Superintendent OR Law Officer OR Labour Officer OR Accounts Officer in Sansthan. |

मा. शासनाचे मान्यतेसाठी सादर करणेत आलेल्या **प्रारूप सेवाप्रवेश नियमांमध्ये** सरळसेवा व पदोन्नतीने पदे भरण्याचे प्रमाण ५०:५० असे प्रस्तावित करणेत आलेले होते.

**अ-६)** **यापुर्वी,** संस्थान आस्थापनेवरील प्रशासकीय अधिकारी या रिक्त पदांचे भरतीबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८/०७/२०१२ रोजीच्या सभेमध्ये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"संस्थानचा दिवसेंदिवस वाढता व्याप व नवीन संगणकीय माहिती तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी विचारात घेता सध्या रिक्त असणा-या प्रशासकीय अधिकारी या पदांच्या ५०% पदांवर शासनाकडुन महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेमार्फत निवड करण्यात आलेल्या तहसिलदार संवर्गातील व अन्य संवर्गातील अधिका-यांना प्रतिनियुक्तीवर घेण्यात यावे व उर्वरित ५०% पदे संस्थान सेवेतील कर्मचा-यांमधुन पदोन्नतीने घेणेत यावे आणि एक प्रशासकीय अधिकारी पद तांत्रिक दृष्ट्या संस्थानचे कामाचे स्वरूप पहाता संस्थानने ठरविलेल्या आवश्यक शैक्षणिक पात्रता व कामाचा अनुभव असलेल्या संवर्गातील घेणेबाबत प्रस्ताव सादर करावा."

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

अ-७) मा.त्रिसदस्यीय समितीचे दिनांक १५ मार्च, २०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २११ नुसार " महाराष्ट्र शासनाकडून दि.०७/०८/२००९ रोजी मंजूर होऊन आलेल्या संस्थानच्या कर्मचारी आकृतीबंधानुसार ०५ प्रशासकीय अधिका-यांची पदे मंजुर असून, त्यापैकी ०१ पद भरलेले असून इतर ०४ पदे रिक्त आहेत. यामधील ०२ पदांवर शासनाकडून योग्य व लायक अधिकारी प्रतिनियुक्तीने प्रशासकीय अधिकारी या पदावर घेणेबाबत पत्रव्यवहार चालू आहे. त्यामुळे ०२ पदांवर सेवाजेष्ठता व शैक्षणिक पात्रतेनुसार श्री. सुर्यभान विठ्ठलराव गमे व श्री सुभाष नारायण गर्कल यांना प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यात यावी. तसेच उर्वरित ०२ पदांवर श्री. उत्तम पंढरीनाथ गोंदकर व श्री. दिलीप त्र्यंबक उगले यांना शासनाकडून योग्य व लायक अधिकारी प्रतिनियुक्तीने उपलब्ध होईपर्यंत (अॅडव्हॉक नेमणूक) या अटीवर प्रशासकीय अधिकारी या पदावर सेवाजेष्ठता व शैक्षणिक पात्रतेनुसार पदोन्नतीने नेमणूक देण्यात यावी. त्याच बरोबर त्यांना सदर पदाचे लागु असलेले वेतन बॅण्ड, ग्रेड पे व अनुज्ञेय असणारे भत्ते देण्यात यावे, असे ठरले."

त्यानुसार,जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/४२१६/२०१४, दि.२० मार्च, २०१४ नुसार श्री सुर्यभान विठ्ठलराव गमे, यांना व जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/४२१७/२०१४, दि.२० मार्च, २०१४ नुसार श्री सुभाष नारायण गर्कल यांना प्रशासकीय अधिकारी या पदावर कार्यात्मक पदोन्नती देण्यात आलेली होती. तसेच जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/आस्था/४२१८/२०१४, दि.२० मार्च, २०१४ नुसार श्री उत्तम पंढरीनाथ गोंदकर यांना व जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/४२१९/२०१४, दि.२० मार्च, २०१४ नुसार श्री दिलीप त्र्यंबकराव उगले यांना प्रशासकीय अधिकारी या पदावर तात्कालिक आधारावर (on Ad-hoc Basis promotion) पदोन्नतीने नेमणूक देण्यात आलेली होती. तसेच तात्कालीन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशान्वये (जा.नं.एसएसटीएस/ वशी/वशी-१/९३८/२०१५, दिनांक ३० मे, २०१५ रोजीचे) श्री अशोक रभाजी औटी, यांचेकडे प्र. प्रशासकीय अधिकारी या पदाचा कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. त्यापैकी श्री सुभाष नारायण गर्कल, प्रशासकीय अधिकारी हे दिनांक ३० जुन, २०१५ रोजी व श्री उत्तम पंढरीनाथ गोंदकर, प्र. प्रशासकीय अधिकारी हे दिनांक ३१ मे, २०१८ रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत.

अ-८) श्री सुर्यभान विठ्ठलराव गमे, प्रशासकीय अधिकारी हे दिनांक ३१ मे, २०२० रोजी व श्री अशोक रंभाजी औटी, प्र. प्रशासकीय अधिकारी हे दिनांक ३० जुन, २०२० रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत. आता, श्री सुर्यभान विठ्ठलराव गमे, प्रशासकीय अधिकारी व श्री अशोक रभाजी औटी, प्र. प्रशासकीय अधिकारी हे सेवानिवृत्त झाले असून संस्थान आस्थापनेवर श्री दिलीप त्र्यंबकराव उगले, प्र. प्रशासकीय अधिकारी व डॉ आकाश किसवे, प्रशासकीय अधिकारी (प्रतिनियुक्ती) असे एकूण दोनच प्रशासकीय अधिकारी कार्यरत आहेत. संस्थान आस्थापनेवरील ०५ प्रशासकीय अधिकारी पदांपैकी ०३ प्रशासकीय अधिकारी पदे रिक्त राहणार आहेत.

**ब) मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ, यांचा आदेश-**

**ब-१)** श्री विजय गणपतराव रोहमारे, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ, येथील कोर्टात प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेकामी रिट पीटीशन नं. ४०१८/२०१९ दाखल केलेले होते. त्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाचे दि.११ मार्च, २०२० व दि.१८ मार्च, २०२० रोजी निकालपत्र/आदेश प्राप्त झालेले आहे.

मा.उच्च न्यायालयाचा निकाल व श्री रोहमारे यांनी मा.उच्च न्यायालयात केलेली मागणी यांचा तक्ता खालीलप्रमाणे-

| अ. क्र. | श्री रोहमारे यांनी मा.उच्च न्यायालयात केलेली मागणी (Prayer clause) | मा.उच्च न्यायालय यांचा दि.११ मार्च, २०२० रोजीचा आदेश | मा.उच्च न्यायालय यांचा दि.१८ मार्च, २०२० रोजीचा सुधारित आदेश |
|---|---|---|---|
| A | By way of Writ of Mandamus or any other writ or order, the impugned order dated 19/12/2018 (EXH. A-13) issued by the Respondent no.3 may kindly be quashed and set aside | 7. In the light of the statement made by the learned advocate for the Sansthan, it is not necessary to go into debate of promotion. The designation of the petitioner and the respondent No. 4 appears to be a Deputy Executive Engineer.<br>8. As only additional charge is given to supervise the work, we need not entertain the petition as far as said order is concerned and | - |

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

| | | | |
|---|---|---|---|
| | | the clarification is given that the respondent No. 4 is not an additional Administrative Officer<br>9.The another Contention of the petitioner is that, the respondent No.4 is writing confidential reports of the petitioners, but the confidential reports may be written by the administrative officer. The confidential reports cannot be written by the person holding co-ordinate post.<br>10. Mr. Kale, the learned advocate for the respondent No. 3/ sansthan submits that, the administrative officer would write the confidential reports of the petitioner. | |
| B | By way of Writ of Mandamus or any other Writ or Order, it may please be declared that the Petitioner is senior to the Respondent no.4 (in view of earlier Service Experience of the Petitioner after acquiring qualification) while considering the claim of the petitioner on the post of Administrative Officer . | 11. As far as prayer clause " B "is concerned, the respondent Nos. 2 and 3 may take decision upon the representation of the petitioner on its own merits, in accordance with law, expeditiously and preferably within a period of three (03) months from today . | 4. In light of that, in para No .11 of the order dated 11th March, 2020 instead of prayer clause (B) the same be substituted as prayer clause (D). |
| C | By way of Writ of Mandamus or any other Writ or Order, the Respondent Sansthan may please be directed to consider the claim of the Petitioner for his promotion to the post of Administrative Officer (Technical).<br>Or in the alternative<br>By way of Writ of Mandamus or any other Writ or Order, the Respondent Sansthan may please be directed to consider the claim of the Petitioner for his Promotion to the post of Administrative Officer. | We cannot consider prayer clause C in view of the orders passed in writ petition filed by the petitioner earlier. The review filed by the petitioner is also dismissed. | - |
| D | By way of Writ of Mandamus or any other Writ or Order, direct the Respondents to consider the representation of the Petitioner submitted on 5/11/2015 as early as possible preferably within the period of 15 days from the date of the order of this Hon' ble Court. | - | As far as prayer clause "D" is concerned, the respondent Nos 2 and 3 may take decision upon the representation of the petitioner on its own merits, in accordance with law, expeditiously and preferably within a |

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्यांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

| | | | |
|---|---|---|---|
| | | | period of three (03) months from today. |
| E | By way of Writ of Mandamus or any other Writ or Order, direct the Respondents to pay additional charge pay benefits [i.e. 5% of Basic + Grade pay] for 32 years (being HoD of Electrical Department) and for 8 years (being HoD of Water supply department) and for 27 years (being HoD of Mechanical Department) and for 14 years (being HoD of Sound System and CCTV department). | - | - |
| F | Pending hearing and final disposal of this Writ Petition, the impugned order dated 19/12/2018 **(EXH. A-13)** asking the Respondent no.4 to take charge of the post of Executive Engineer in the Respondent no.2 Sansthan, may kindly be stayed. | - | - |
| G | Any other suitable relief to which the Petitioner is entitled, in the facts and circumstances of the matter, to may please be issued in favour of the petitioner, in the interest of justice and obliged. | - | - |

उपरोक्त तक्त्यातील मा.उच्च न्यायालयाचे आदेशाचे अवलोकन करता, दि.११ मार्च २०२० मधील मुद्दा क्र.११ व दि.१८ मार्च, २०२० मधील मुद्दा क्र.०४ मध्ये नमुद केलेप्रमाणे, श्री रोहमारे यांच्या प्रशासकीय अधिकारी पदी नेमणुक होणेकामीचा दि.०५.११.२०१५ रोजीचा अर्जावर तात्काळ तीन महिन्याच्या आत गुणवत्तेनुसार व नियमानुसार संस्थानने निर्णय घ्यावा, असे मा.उच्च न्यायालयाने आदेशात म्हंटले आहे. सोबत, श्री.रोहमारे यांचा दि.०५.११.२०१५ रोजीचा प्रशासकीय अधिकारी म्हणुन नेमणुक होणेबाबतचा अर्ज अवलोकनार्थ सादर केला आहे.

उपरोक्त श्री रोहमारे यांचे दाव्याचे अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाबाबत लेखी अभिप्राय वजा मार्गदर्शन मिळणेकामी संस्थानचे मा.उच्च न्यायालयातील कामकाज पहाणारे विधीतज्ञ (वकील) ॲड.नितीन भवर पा. यांना दि.१३ एप्रिल, २०२० रोजीचे पत्र देणेत आलेले आहे. तथापी सध्या कोव्हीड-१९ चे प्रादुर्भावामुळे सर्वत्र लॉकडाऊन असल्याने त्यांचा अभिप्राय प्राप्त होऊ शकलेला नाही.

**ब- २) श्री विजय गणपतराव रोहमारे, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) यांचा संस्थान सेवेतील तपशील खालीलप्रमाणे-**

| **कर्मचा-यांचे नांव** | **जात** | **नियुक्ती दिनांक** | **नियुक्ती चे पदनाम** | **सध्याचे पदनाम व वेतनश्रेणी** | **शैक्षणिक पात्रता** | **अनुभव** |
|---|---|---|---|---|---|---|
| श्री विजय गणपतराव रोहमारे | हिंदु - कुणबी | १-७-१९८६ | विद्युत अभियंता | उपकार्यकारी अभियंता (विद्युत) ०६ व्या वेतन आयोगानुसार १५६०० - ३९१०० | डिप्लोमा इन इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग -प्रथम श्रेणी (जुन १९८२), बी.ए. (मे - जून-२०१८, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक), | १. दि.०१.०७.१९८६ रोजी विद्युत अभियंता पदी नेमणुक.<br>२. दि.२६.०४.२०१३ रोजीच्या आदेशान्वये विद्युत अभियंता पद उपकार्यकारी अभियंता असे |

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ग्रेड पे ५४०० + ६०० | एमएससीआयटी, कॅम्प्युटर कन्सेप्टस कोर्स, इलेक्टीकल सुपरवायझर कोर्स. [D.E.E.1ST Class (June 1982), MS-CIT, B.A.(Y.C.M.O.U May-June- 2018) , Electrical supervisory Course, Computer Concepts course] | करण्यात आले.<br>३. साधारणतः ३३ वर्ष सेवाकालावधीमध्ये श्री रोहमारे यांनी पाणीपुरवठा, ध्वनीक्षेपण, सीसीटीव्ही, दुरध्वनी, मेकॅनिकल विभाग यांचेकडील कामकाज ही पाहिलेले आहे. |
| | जन्म दिनांक - २३-९-१९६१ | **सेवा निवृत्ती दिनांक- ३०-०९-२०२१** | | ०७ व्या वेतन आयोगानुसार S-21 (57100-180800) | | |

- श्री रोहमारे यांनी डिप्लोमा इन इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग ही शैक्षणिक पात्रता जून १९८२ मध्ये धारण केलेली आहे.
- श्री रोहमारे यांनी बी.ए. ही शैक्षणिक पात्रता यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथून मे-जून-२०१८ मध्ये धारण केलेली आहे.

**ब-३) श्री विजय गणपतराव रोहमारे, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) यांचे गोपनीय अहवालबाबत माहिती खालीलप्रमाणे-**

| वर्ष | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ग्रेड | A | A+ | A+ | A+ | A | A | A+ | A+ | A+ | A+ |

**ब-४) श्री विजय गणपतराव रोहमारे, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) यांचेवर सेवाकालावधीत झालेल्या कार्यालयीन कारवाईचा तपशिल-**

| अ.क्र. | कारवाईचा तपशिल |
|---|---|
| १ | जा.नं.वशी-१० ए/१०६६८/१९८७, दि.२६/०६/१९८७ अन्वये गैरशिस्त वर्तनाबाबत चुका न होणेबाबत दक्षता घ्यावी. |
| २ | जा.नं.वशी-७ए/२५०७/१९९३, दि.०३/०३/१९९३ रोजीचे आदेशान्वये गैरशिस्त वर्तनाबाबत नुकसान भरपाई म्हणुन रक्कम रू.६०००/- मात्र पगारातुन वसुल करण्यात आली. |
| ३ | जा.नं.वशी-७ए/९७५/२००२, दि.२३/०४/२००२ रोजीचे आदेशान्वये दि.२३/०४/२००२ पासुन ०३ महिने सक्तीचे रजेवर पाठविणेत आले. |
| ४ | जा.नं.वशी-७ए/२१५६/२००५, दि.१६/०९/२००५ अन्वये गैरशिस्त वर्तनाबाबत सुचना देण्यात आली. |
| ५ | जा.नं.वशी-७ए/३६६४/२०१०, दि.३०/०६/२०१० अन्वये फिंगर प्रिन्ट पंचिग वेळेत करावे अशी सुचना देण्यात आली. |
| ६ | जा.नं.वशी-७ए/३५२३/२०१४, दि.२७/१०/२०१४ अन्वये गैरशिस्त वर्तनाबाबत सक्त ताकीद देण्यात आली. |
| ७ | जा.नं.वशी-७ए/४०४७/२०१६, दि.२६/०१/२०१६ रोजीच्या पत्रान्वये गैरशिस्त वर्तनाबाबत समज देण्यात आली. |
| ८ | जा.नं.वशी-७ए/१४१४/२०१६, दि.१३/०७/२०१६ रोजीच्या पत्रान्वये गैरशिस्त वर्तनाबाबत समज देण्यात आली. |
| ९ | जा.नं.वशी-७ए/४७७९/२०१८, दि.१५/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये गैरशिस्त वर्तनाबाबत लेखी समज देण्यात आली. |

**ब-५)** मा.तदर्थ समितीचे दि.०९ जून, २०२०, निर्णय क्र.३१३-श्री रोहमारे यांचेबाबत मा.न्यायालयाच्या निकालावर निर्णय घेणेकामी मा.तदर्थ समितीचे दि.०९ जुन, २०२० रोजीचे सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. त्यावर मा.तदर्थ समितीने पुढीलप्रमाणे निर्णय पारीत केलेला आहे. . "श्री विजय गणपतराव रोहमारे, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ, येथील कोर्टात प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेकामी रिट पिटीशन नं.४०१८/२०१९ दाखल केलेले होते.

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्यांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

त्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाचे दि.११ मार्च, २०२० व दि.१८ मार्च, २०२० रोजी निकालपत्र / आदेश प्राप्त झालेले असुन सदरचा विषय मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर विलंबाने का सादर केला ? याबाबत संबधीत श्री गमे यांना नोटीस देऊन खुलासा मागविण्यात यावा व तोपर्यंत त्यांचे सेवा निवृत्तीची देयके थांबवून ठेवावे, असे ठरले. तसेच प्रस्तुत प्रकरणी निर्णय घेणेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करून तीन महिन्याची मुदत वाढवुन मागणेबाबत कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले."

**ब–६)** उपरोक्त मा.तदर्थ समितीचे दि.०९ जून, २०२० रोजीच्या निर्णयास अनुसरून, सामान्य प्रशासन विभागामार्फत खालील कार्यवाही करणेत आलेली आहे –

i) सामान्य प्रशासन विभागामार्फत दिनांक १७ जून, २०२० रोजी कार्यालयीन टिपणी सादर करणेत येऊन, विषयांकित प्रस्तावाबाबत निर्णय घेणेकामी ०३ महिन्याची मुदतवाढ घेणेकामी संस्थानचे विधीज्ञ ॲड. नितिन भवर पा., औरंगाबाद यांना पत्र देणेस मान्यता घेणेत आली. दिनांक १७ जून, २०२० रोजीचे कार्यालयीन टिपणीवरील मान्यतेनुसार, संस्थानचे विधीज्ञ ॲड. नितिन भवर पा., औरंगाबाद यांना जा. क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/४४६/२०२०, दिनांक २५ जून,२०२० रोजी पत्र देणेत आलेले आहे. तसेच संस्थानचे विधी विभागामार्फत विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने मुदतवाढ घेणेकामी संस्थान विधीज्ञ ॲड. नितीन भवर पा. यांना दिनांक ०३ जुलै, २०२० रोजी पत्र देणेत आलेले असून, त्यानुसार संबंधित विधीज्ञ यांनी कार्यवाही सुरु केलेली असून, Online मुदतवाढीचा अर्ज दाखल केलेला आहे.

ii) मा. उच्च न्यायालयाच्या निकालास मुदतवाढ घेणेकामी सिव्हील ॲप्लीकेशन मा.कोर्टात सर्क्युलेशन घेणेकामी विनंती करणेत आलेली होती. त्यावर रजिस्ट्रार मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.०५/०८/२०२० रोजी खालीलप्रमाणे आदेश देण्यात आलेले आहेत.

**" The Hon'ble Lordships are pleased to reject your Circulation Note as there is no urgency with liberty to move afresh only after normal Court functioning is restored. "**

iii) श्री सुर्यभान विठ्ठलराव गमे, सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी यांना मा.उच्च न्यायालयाचे दि.११ मार्च, २०२० व दि.१८ मार्च, २०२० रोजी निकालपत्र/ आदेश प्राप्त झालेले असुन सदरचा विषय मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर विलंबाने का सादर केला ? याबाबत लेखी खुलासा मागविणेकामी जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/ ५००/२०२०, दि.१ जुलै, २०२० अन्वये पत्र देण्यात आलेले होते. सदर प्रकरणातील पुढील कार्यवाही उपविषय B मध्ये करण्यात आलेली आहे.

**- (A) या उपविषयाबाबत विभागाचा अभिप्राय -**

१) मा.शासनाचे मान्यतेसाठी दि.२६ जुन, २०१४ रोजी सादर करणेत आलेल्या प्रारूप सेवाप्रवेश नियमांमध्ये "प्रशासकीय अधिकारी" या पदासाठी कोणत्याही शाखेचा पदवीधर ही शैक्षणिक अर्हता नमुद/प्रस्तावित आहे. श्री रोहमारे यांनी डिप्लोमा इन इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग ही पदविका/शैक्षणिक पात्रता जून १९८२ मध्ये धारण केलेली असून, त्यांनी या तांत्रिक पदाची पदवी धारण केलेली नाही. उपरोक्त टिपणीतील अ-५ या मुद्दामधील तक्त्यामध्ये प्रशासकीय अधिकारी पदाची शैक्षणिक अर्हता व पात्रता नमूद केलेली आहे.

२) श्री रोहमारे यांनी बी.ए. ही शैक्षणिक पात्रता यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथून **मे-जून-२०१८** मध्ये धारण केलेली आहे. सदरची शैक्षणिक पात्रता ही सन २०१८ मध्ये धारण केलेली असल्याने याबाबतची त्यांची सेवाजेष्ठता ज्या वर्षी पदवी धारण केलेली आहे त्यावर्षापासून लागू होईल. तसेच, श्री रोहमारे यांनी धारण केलेली बी.ए.ही पदवी त्यांच्या डिप्लोमा इन इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग या तांत्रिक शिक्षणाशी संबंधीत नाही.

३) संस्थानमार्फत मा.शासनाकडे मान्यतेसाठी प्रस्तावित करणेत आलेल्या प्रारूप सेवाप्रवेशनियमांमध्ये प्रशासकीय अधिकारी या पदासाठी तांत्रिक शैक्षणिक पात्रता/तांत्रिक विभागातील पदे दर्शविणेत आलेली नाही.

४) प्रशासकीय अधिकारी या पदावर नियुक्ती होणेकामी प्रस्तावित करणेत आलेल्या सेवाप्रवेश नियमांमध्ये Feeder Cadre पुढीलप्रमाणे दर्शविणेत आलेली आहे.

- लिपीक टंकलेखक- वरिष्ठ लिपीक- उपअधिक्षक- अधिक्षक- प्रशासकीय अधिकारी
- लिपीक टंकलेखक- वरिष्ठ लिपीक- वरिष्ठ लेखापाल- लेखाधिकारी- प्रशासकीय अधिकारी
- कनिष्ठ कामगार अधिकारी - कामगार अधिकारी - प्रशासकीय अधिकारी
- विधी अधिकारी - प्रशासकीय अधिकारी

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

उपरोक्त प्रशासकीय अधिकारी या पदाच्या Feeder Cadre मध्ये उपकार्यकारी अभियंता (विद्युत) या किंवा इतर तांत्रिक पदाचा समावेश नाही.

५) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे सेवाप्रवेश नियम, सुधारीत विभागनिहाय आकृतीबंध, पदोन्नतीचे पदे, पदोन्नतीची साखळी, बिंदुनामावली इत्यादी कामे प्रलंबित आहेत. सदरची कामे पुर्ण करणेकामी कार्यगटाची नियुक्ती करणेत आलेली आहे. सदर कार्यगटाचे कामकाज सुरू आहे. सदर कार्यगटाचे कामकाज पुर्ण झालेनंतर त्यास मा.तदर्थ समितीची मान्यता घेऊन मा. शासनाचे मान्यतेसाठी पाठवावी लागेल. मा.शासनाची मान्यता प्राप्त झालेनंतर संस्थान कर्मचारी यांचे Feeder Cadre तयार करून त्यानुसार बिंदुनामावली निश्चित करून सेवाजेष्ठतेचा विचार करून प्रशासकीय अधिकारी या पदाची पदोन्नतीबाबतची कार्यवाही करता येईल.असे मत आहे.

६) मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि.०७.०८.२००९ रोजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे. सदर आकृतीबंधामध्ये कार्यकारी अभियंता हे पद बांधकाम विभागाच्या आकृतीबंधामध्ये समाविष्ट करणेत आलेले आहे. श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सवानिमित्त सन २०१७-१८ मध्ये कार्यकारी अभियंता पदावर मा. शासनाकडून प्रतिनियुक्तीने श्री रविंद्र सतिष घुले यांची नेमणूक करणेत आलेली होती. त्यांचेकडे बांधकाम विभाग, विद्युत विभाग, मेकॅनिकल विभाग व पाणी पुरवठा विभाग इ. विभागांच्या पर्यवेक्षणाची जबाबदारी देण्यात आलेली होती.

७) तसेच, मा.शासनाच्या मान्यतेसाठी दि.२६ जून, २०१४ रोजी पाठविणेत आलेल्या सेवाप्रवेश नियमांमध्ये कार्यकारी अभियंता या पदावर पदोन्नतीसाठी B.E.Civil, MS-CIT व किमान १० वर्ष उपकार्यकारी अभियंता या पदाचा संस्थानमधील अनुभव आवश्यक आहे. परंतु, सध्या संस्थानमध्ये उपकार्यकारी अभियंता पदावर कार्यरत असलेले

श्री रघुनाथ भागा आहेर व श्री विजय गणपतराव रोहमारे यांनी अनुक्रमे डीप्लोमा इन सव्हिील इंजिनिअरींग, डीप्लोमा इन इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग ह्या तांत्रिक पदवीका धारण केलेली असल्याने ते कार्यकारी अभियंता पदाची शैक्षणिक पात्रता पुर्ण करत नाहीत.

८) सामान्य प्रशासन विभागांच्या आकृतीबंधात ५ प्रशासकीय अधिकारी पदे दर्शविणेत आलेली आहेत. बांधकाम, विद्युत, मेकॅनिकल व पाणीपुरवठा या विभागांसाठी कार्यकारी अभियंता हे तांत्रिक विभागाचे पद पर्यवेक्षणासाठी असल्याने प्रशासकीय अधिकारी पदाची सदर विभागांवर पर्यवेक्षणांसाठी आवश्यकता वाटत नाही. सदर विभागांची आस्थापनाविषयक सर्व प्रशासकीय कामे ही संस्थानचे सामान्य प्रशासन विभागामार्फतच होणार आहेत.

९) सद्यस्थितीत श्री रघुनाथ भागा आहेर, उपकार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांचेकडे तात्पुरते स्वरूपात कार्यकारी अभियंता या पदाचा अतिरिक्त प्रभार देण्यात आलेला आहे. बांधकाम विभागातील अधिका-यांमध्ये श्री आहेर हे जेष्ठतम उपकार्यकारी अभियंता आहेत. परंतु, तेही पदविका धारक आहेत. मात्र, सद्यस्थितीत दर्शन रांग प्रकल्प, शैक्षणिक संकुल प्रकल्प, श्री साईनाथ रूग्णालयाचे वरचे मजल्याचे बांधकाम, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रूम) रूमचे नुतनीकरण व इतर बांधकामाशी संबधीत प्रकल्प सुरू असल्याने श्री आहेर यांचेकडे बांधकाम, विद्युत, मेकॅनिकल व पाणीपुरवठा विभागाचे पर्यवेक्षणाची जबाबदारी तात्पुरते स्वरूपात देण्यात आलेली आहे.

१०) उपरोक्त मुद्दांचा विचार करता, सद्यस्थितीत विद्युत विभागाचे उप कार्यकारी अभियंता श्री विजय गणपतराव रोहमारे यांना प्रशासकीय अधिकारी पदावर पदोन्नती देणे उचित वाटत नाही.

११) मा.उच्च न्यायालयाच्या निकालास मुदतवाढ घेणेकामी सिव्हील ॲप्लीकेशन मा.कोर्टात सर्क्युलेशन घेणेकामी विनंती करणेत आलेली होती. त्यावर रजिस्ट्रार मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.०५/०८/२०२० रोजी खालीलप्रमाणे आदेश देण्यात आलेले आहेत.

**" The Hon'ble Lordships are pleased to reject your Circulation Note as there is no urgency with liberty to move afresh only after normal Court functioning is restored. "**

१२) मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरगांबाद येथे रिट पीटीशन क्र.४०१८/२०१९ मध्ये दि.११ मार्च, २०२० व दि.१८ मार्च, २०२० रोजी दिलेल्या निकालास अनुसरून, श्री विजय गणपतराव रोहमारे, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) यांचा प्रशासकीय अधिकारी म्हणून नेमणूक होणेकामीचा दि.०५.११.२०१५ रोजीच्या अर्जावर गुणवत्तेनुसार व नियमानुसार निर्णय होणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

(B) रिट पिटीशन क्र.४०१८/२०१९ चे निकालाबाबत मा.तदर्थ समिती सभेपुढे प्रस्ताव सादर करणेस झालेल्या विलंबाबाबत...

अ) श्री सुर्यभान विठ्ठलराव गमे, सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी यानी दिनांक ०२ जुलै,२०२० रोजीचा लेखी खुलासा सादर केला असून त्यात त्यांनी असे नमुद केले आहे की,

१) सामान्य प्रशासन विभाग जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/१८९६/२०१८, दि.२७.०९.२०१८ रोजीचे कार्यालयीन आदेशान्वये माझेकडे अनुक्रमे सामान्य प्रशासन विभाग, मागासवर्ग विभाग, कामगार विभाग, सभाकामकाज विभाग, मंदिर विभाग, जनसंपर्क विभाग, विधी विभाग, अभिलेख कक्ष, कॅन्टीन विभाग व मुंबई कार्यालय इ. १० विभाग पर्यवेक्षेणासाठी नेमुन देण्यात आलेले होते.

सदर विभागांच्या कार्यालयीन टिपण्या, मा.तदर्थ समिती सभेचे प्रस्ताव तयार करून सादर करण्याची जबाबदारी संबंधीत विभागाचे प्र.अधिक्षक/प्र.विभागप्रमुख यांचेवर निश्चित करण्यात आलेली आहे. प्रशासकीय अधिकारी हे पर्यवेक्षणासाठी नेमून दिलेल्या विभागांच्या टिपण्या/ मा.तदर्थ समिती सभेचे प्रस्ताव स्वतः तयार करीत नसतात. विभागाच्या टिपण्या/मा.तदर्थ समिती सभेचे प्रस्ताव हे संबंधीत विभागाचे प्र.अधिक्षक/प्र.विभाग प्रमुख हे तयार करून प्रशासकीय अधिकारी यांचेमार्फत मा.उप मुख्यकार्यकारी अधिकारी व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करीत असतात.

२) सामान्य प्रशासन शाखा जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३८१३/२०१९, दि.३१.०३.२०१९ रोजीचे आदेशान्वये, सर्व विभागांच्या दैनंदिन प्रशासकीय कामकाजाच्या संचिका/कागदपत्रे, मा.व्यवस्थापन समिती प्रस्ताव/मा.तदर्थ समिती प्रस्ताव संबंधीत विभागाचे अधिक्षक/विभागप्रमुख यांनी प्रशासकीय अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेमार्फत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडेस सादर करणेत याव्यात, अशी प्रशासकीय कामकाजाची पध्दत निश्चित करणेत आलेली आहे व त्या पदसोपान (Proper Channel) पध्दतीने विभागप्रमुख/प्र.अधिक्षक/प्र.विभागप्रमुख यांचेमार्फत विभागांच्या संचिका/कार्यालयीन टिपण्या/मा.तदर्थ समितीचे प्रस्ताव तयार करुन सादर करणेत येतात. संबंधित विभागाकडील विषयांच्या संचिका/फाईल्स/कागदपत्रे ही संबंधित विभागाचे प्र.अधिक्षक/प्र.विभागप्रमुख यांचे ताब्यात (कस्टडीत) असतात. ती संचिका समितीसमोर प्र.अधिक्षक/प्र.विभागप्रमुख यांनी विलंबाने/उशीराने तयार करुन सादर केलेल्या प्रस्तावाचे विलंबास मला (प्रशासकीय अधिकारी यांना) जबाबदार धरणे नियमानुसार व नैसर्गिक न्याय तत्वानुसार उचित व योग्य होणार नाही. ते माझेवर अन्याय केलेसारखे होईल.

३) श्री. विजय गणपतराव रोहमारे, उप कार्यकारी अभियंता (विद्युत) यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेकामी रिट पिटीशन क्रमांक ४०१८/२०१९ दाखल केलेले होते. त्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाचे दिनांक ११/०३/२०२० व दिनांक १८/०३/२०२० रोजीचे निकालपत्र/आदेश प्राप्त झालेले असून सदरचा विषय मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर प्र.अधिक्षक/प्र.विभागप्रमुख सामान्य प्रशासन विभाग यांचेमार्फत विलंबाने तयार करुन सादर करणेत आलेला आहे. याबाबत माझा लेखी खुलासा खालीलप्रमाणे आहे.

४) सामान्य प्रशासन विभाग जावक क्रमांक एसएसएस/साप्रशा/आस्था/२८३२/२०२०, दिनांक १७/०३/२०२० रोजीचे आदेशान्वये कोरोना विषाणु (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून दिनांक १७ मार्च, २०२० रोजी दुपारी ३ वाजेपासून श्री साईबाबा समाधी मंदिरासह सर्व मंदिरे, निवासस्थाने, प्रसादालय, कॅन्टीन इ.सर्व सेवा बंद करणेत आलेल्या आहेत. त्यामुळे सर्व विभागांच्या कामकाजात व्यत्यय येऊन अडथळा निर्माण झालेला आहे. परिणामी सामान्य प्रशासन/आस्थापना विभागाकडून मा.उच्च न्यायालयाचे दिनांक ११/०३/२०२० व दिनांक १८/०३/२०२० रोजीचे निकालपत्र/आदेशासंदर्भात प्रस्ताव तयार करुन मा.तदर्थ समिती सभेपुढे सादर करणेस विलंब झालेला आहे. सदर विलंब जाणूनबुजून झालेला नाही.

५) सामान्य प्रशासन विभाग जावक क्रमांक एसएसएस/साप्रशा/आस्था/२९१६/२०२०, दिनांक २४/०३/२०२० रोजीचे आदेशान्वये कोरोना विषाणु (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना अंतर्गत मा.राज्य शासनाचे निर्देशानुसार ५ टक्के किंवा कमीत कमी कर्मचारी कामावर हजर/ उपस्थित ठेवणेत आल्यामुळे देखील सामान्य प्रशासन/आस्थापना विभागाचे दैनंदिन कामकाजात विस्कळीतपणा येऊन अडचणी निर्माण झाल्या. त्यामुळे देखील मा.उच्च न्यायालयाचे दिनांक ११/०३/२०२० व दिनांक १८/०३/२०२० रोजीचे आदेशासंदर्भात आस्थापना विभागाकडून मा.तदर्थ समिती सभेपुढे प्रस्ताव तयार करुन सादर करणेस विलंब झालेला आहे.

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

मा.उच्च न्यायालयाचे दिनांक ११/०३/२०२० व दिनांक १८/०३/२०२० रोजीचे निकालपत्र/ आदेशासंदर्भातील प्रकरण ०३ महिने कालमर्यादेचे असल्याची जाणीव मी वेळोवेळी प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग/आस्थापना विभाग यांना करुन दिलेली होती व त्याबाबत तात्काळ प्रस्ताव तयार करुन विनाविलंब मा.तदर्थ समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग / आस्थापना विभाग यांना अनेकवेळा कार्यालयात समक्ष बोलावून, वेळोवेळी दुरध्वनी / मोबाईलवरुन सुचना दिलेल्या आहेत. तथापि, ५ टक्केच्या मर्यादेमुळे आस्थापना विभागात अपुर्ण/अत्यल्प कर्मचारी संख्या उपस्थित असल्यामुळे त्यांचेकडून प्रस्ताव तयार करुन मा.तदर्थ समिती सभेपुढे सादर करणेस विलंब झालेला आहे.

६) मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथील याचिका क्रमांक ४०१८/२०१९ संदर्भातील दिनांक ११/०३/२०२० व दिनांक १८/०३/२०२० रोजीचे निकालावर / आदेशावर विश्लेषणात्मक (सविस्तर) लेखी अभिप्राय घेणेसंदर्भात सामान्य प्रशासन विभाग / आस्थापना विभागाकडून दिनांक ०२/०४/२०२० रोजीची कार्यालयीन टिपणी तयार करुन प्रशासकीय अधिकारी यांचेमार्फत मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेकडे सादर करणेत आलेली होती.

सदर ०२/०४/२०२० रोजीचे कार्यालयीन टिपणीस अनुसरुन मा.उच्च न्यायलयाचे दिनांक ११/०३/२०२० व दिनांक १८/०३/२०२० रोजीचे निकालपत्र / आदेशासंदर्भात विश्लेषणात्मक (सविस्तर) लेखी अभिप्राय घेणेसाठी सामान्य प्रशासन विभागाकडून श्री.नितीन आर. भवर, हायकोर्ट ॲडव्होकेट, औरंगाबाद यांना जावक नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/४०/२०२०, दिनांक १३/०४/२०२० रोजीचे पत्रान्वये लेखी कळविणेत आलेले होते. तथापि कोरोना विषाणु (कोव्हीड १९) साथरोगाचे प्रादुर्भावामुळे संपुर्ण भारत देशात व महाराष्ट्रात दिनांक २३/०३/२०२० पासून लॉकडाऊन (Lockdown) करणेत आलेले असल्यामुळे श्री.नितीन आर.भवर, हायकोर्ट ॲडव्होकेट, औरंगाबाद यांचेकडून अद्याप पर्यंत मा.उच्च न्यायालयाचे दिनांक ११/०३/२०२० व दिनांक १८/०३/२०२० रोजीचे निकालपत्र/आदेशाबाबत विश्लेषणात्मक (सविस्तर) लेखी अभिप्राय अद्यापपर्यंत प्रशासनास प्राप्त झालेला नाही. त्यामुळे देखील सामान्य प्रशासन/आस्थापना विभागाकडून मा.उच्च न्यायालयाचे दिनांक ११/०३/२०२० व दिनांक १८/०३/२०२० रोजीचे निकालपत्र/आदेशाबाबत करावयाच्या कार्यवाहीचा प्रस्ताव तयार करुन मा.तदर्थ समिती सभेसमोर सादर करणेस विलंब झालेला आहे. सदरचा प्रस्ताव कोणीही जाणूनबुजून मा.तदर्थ समिती सभेसमोर विलंबाने सादर केलेला नाही. सदरचा प्रस्ताव प्रशासकीय कामकाजाचे पध्दतीनुसार तयार करुन विहित वेळेत/मुदतीत मा.तदर्थ समिती सभेसमोर सादर करणेची जबाबदारी ही संबंधित विभागाचे प्र.अधिक्षक/विभागप्रमुख यांची आहे. त्याबाबत प्रशासकीय अधिकारी यांना जबाबदार धरणेत येऊ नये.

७) मा.उच्च न्यायालयाचे दिनांक ११/०३/२०२० व दिनांक १८/०३/२०२० रोजीचे निकालपत्र/ आदेशाचे कार्यवाही संदर्भात सामान्य प्रशासन/आस्थापना विभागाकडून प्रस्ताव तयार करुन मा.तदर्थ समिती सभेसमोर सादर करणेस वरील कारणामुळे विलंब झालेला आहे. त्याबाबत मी दिलगीरी व्यक्त करीत असून मला एकवेळ माफ करावे अशी नम्र विनंती आहे.

उपरोक्तप्रमाणे मी दिलेल्या माझ्या खुलाशातील वस्तुस्थितीचा व कारणांचा सहानुभुतिपुर्वक व मानवतेच्या दृष्टीकोनातून विचार होऊन मला मा.प्रशासनाकडुन जावक नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/५००/ २०२०, दिनांक ०१/०७/२०२० अन्वये देणेत आलेली नोटीस पत्र रद्द होणेस व माझे सेवानिवृत्तीची देयके मला आदा होणेस विनंती आहे. " असे म्हंटले आहे.

उपरोक्त श्री सुर्यभान विठ्ठलराव गमे, सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी यांचा लेखी खुलासा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे दि.१३ जुलै, २०२० रोजीचे सभेपुढे सादर करणेत आलेला होता. त्यावर मा.तदर्थ समितीने पुढीलप्रमाणे निर्णय क्र.३५९ पारीत करणेत आलेला आहे.

" या विषयावर सविस्तर चर्चा झाली, प्रस्तुत प्रकरणी श्री सुर्यभान विठ्ठलराव गमे, सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी यांनी दि.०२ जुलै, २०२० रोजी सादर केलेल्या लेखी खुलाशाचे अवलोकन केले असता त्यांनी मा.तदर्थ समिती सभेचे प्रस्ताव तयार करून सादर करण्याची जबाबदारी संबंधीत विभागाचे प्रभारी अधिक्षक/प्रभारी विभाग प्रमुख यांचेवर निश्चित करण्यात आलेली असल्याचे म्हटले आहे. त्यानुसार सबंधीत विभागाचे विभागप्रमुख व प्रभारी अधिक्षक यांना कारणे दाखवा नोटीस देऊन, त्यांचा खुलासा घेण्यात यावा, व सदर विलंबास कोण जबाबदार आहे, याबाबत विभागाने अभिप्रायासह सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करावा.

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

तसेच, संस्थानच्या ब-याच प्रकरणात ॲड नितीन भवर हे मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद या न्यायालयात हजर झालेले नाहीत असे ब-याच विषयात नमूद केलेले दिसते. असे असतांना संस्थानच्या विधी विभागाने सदरची बाब मा.तदर्थ समितीचे निदर्शनास का आणली नाही, पॅनलवर नसलेल्या वकिलांमार्फत सिव्हील ॲप्लीकेशन कसे दाखल केले व त्या वकिलांनी सदरहु सिव्हील ॲप्लीकेशनमध्ये संस्थानचे पॅनलवर नसतांना कसे काम पाहिले याचा खुलासा संबधीत विभाग प्रमुख व संबधीत कर्मचारी यांचेकडून घेण्यात यावा व तो खुलासा मा.तदर्थ समितीचे पुढील सभेसमोर ठेवण्यात यावा.

मा.उच्च न्यायालयामध्ये संस्थानचे वतीने कामकाज पाहण्यासाठी ॲडव्होकेट पॅनल तयार करण्याची आजच्या सभेतील विषय नं.१० निर्णय क्र.३६४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

श्री एस.व्ही.गमे यांना पाठविलेल्या नोटीसीचा मुळ मुद्दा हा श्री व्ही.जी.रोहमारे यांच्या पदोन्नतीबाबत आहे. यापुर्वी या विषयावर चर्चा होऊन सर्वसमावेषक विचार करून प्रशासकीय अधिकारी पदावर पदोन्नतीने नेमणूक करण्याबाबत पदोन्नतीची साखळी व पदोन्नतीकरीताचे निम्न पद (Feeder Cadre) सेवा जेष्ठता यादी यासह वरील सर्व विषयांचा एकत्रित प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेपुढे आणावा, असे ठरले होते. तसा संपुर्ण प्रस्ताव द्यावा."

उपरोक्त मा. तदर्थ समितीचे दि. १३ जुलै, २०२० रोजीचे सभेतील निर्णयानुसार, सामान्य प्रशासन विभागामार्फत दिनांक १५ जुलै, २०२० रोजी प्रभारी अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग यांचा खुलासा मागविणेकामी कार्यालयीन टिपणी सादर करुन, त्यानुसार जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/७३६/२०२०, दिनांक १८ जुलै, २०२० अन्वये प्रभारी अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग यांना पत्र देण्यात आलेले आहे.

ब) प्रभारी अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग यांनी दि.२० जुलै, २०२० रोजीच्या पत्रान्वये आपला लेखी खुलासा सादर केलेला असून तो पुढीलप्रमाणे-

श्री.विजय गणपतराव रोहमारे, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेकामी याचिका क्रमांक ४०१८/२०१९ दाखल केलेला होता. या दिवाणी अर्जावरील मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशाबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली आहे-

(1) विषयाची पूर्वपीठीका व आजपावेतो करणेत आलेली कार्यवाही -

(०१) या दिवाणी अर्जावर मा. न्यायालयात सुनावणी होऊन दिनांक ११ मार्च, २०२० आणि दिनांक १८ मार्च, २०२० रोजीचे निकालपत्रे/आदेश सामान्य प्रशासन विभागास अनुक्रमे आवक क्रमांक १९६८०/दिनांक १४ मार्च, २०२० आणि आवक क्रमांक २०१६९/दिनांक २१ मार्च, २०२० अन्वये प्राप्त झालेली होती.

(०२) तथापि, दरम्यानचे कालावधीत देशात / राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड १९) या संसर्गजन्य साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव रोखणेकामी करावयाचे उपाययोजनेंतर्गत, मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडील दिनांक १४ मार्च, २०२० रोजीचे आदेशानुसार दिनांक १७ मार्च, २०२० पासून संस्थान अखत्यारीतील सर्व मंदिरे, निवासस्थाने, प्रसादालय आदि विभाग बंद करणेत आले.

मा. केंद्र व राज्य शासनाने दिनांक २३ मार्च, २०२० पासून संपूर्ण देशात Lockdown घोषित केला. मा. राज्य शासनाचे निर्देशानुसार, सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक २४ मार्च, २०२० रोजीचे आदेशान्वये, कार्यालयांमध्ये/कार्यस्थळांवर ०५ टक्के किंवा कमीत कमी कर्मचारी हजर राहतील असे नियोजन करुन, सामान्य प्रशासन विभागासह इतर सर्व विभागातील कर्मचारी आळी-पाळीने अथवा चक्रीय पध्दतीने कामावर बोलविणेबाबत आदेशित करणेत आले.

(०३) या लॉकडाऊनचे कालावधीत कार्यालयातील कर्मचा-यांची उपस्थिती अत्यंत मर्यादित करणेत आल्याने, श्री.रोहमारे यांचे उपरोक्त दिवाणी अर्जावरील, मा. न्यायालयीन आदेशाबाबत सामान्य प्रशासन विभागामार्फत दिनांक ०२ एप्रिल, २०२० रोजी टिपणी सादर करणेत येऊन, मा. न्यायालयाने दिलेल्या निकालाबाबत संस्थानचे विधीज्ञ ॲड. नितिन भवर पा., औरंगाबाद यांचे विश्लेषणात्मक (सविस्तर) लेखी अभिप्राय घेणेकामी मान्यता मिळावी म्हणून तसेच त्यांचे द्यावयाचे पत्राचा मसुदा मान्यतेस्तव सादर करणेत आलेला होता.

(०४) सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक ०२ एप्रिल, २०२० रोजीचे टिपणीवरील मान्यतेनुसार, संस्थान विधीज्ञ ॲड. नितिन भवर पा., औरंगाबाद यांना जावक क्रमांक एसएसएस/साप्रशा/आस्था/४०/२०२०, दिनांक १३ एप्रिल,२०२० रोजी, मा.न्यायालयाचे याचिका क्रमांक ४०१८/२०१९ च्या निकालपत्राचे विश्लेषणात्मक (सविस्तर) लेखी अभिप्राय देणेबाबत पत्र देणेत आले.

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्‌यांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

त्यानंतर, ॲड. भवर पा. यांचे प्रतिनिधी श्री. खेडकर यांचेशी वेळोवेळी दूरध्वनीवरुन संपर्क साधला असतां, सध्या मा. न्यायालयाचे कामकाज संपूर्ण बंद असल्याने तसेच वैयक्तिक विधीज्ञांची कार्यालये १०० टक्के बंद असल्याने याबाबतचा अभिप्राय देणेस विलंब लागणार असलेबाबत समक्ष सांगितले. तसेच याबाबत आजपावेतो विधीज्ञ ॲड. भवर पा. यांचा अभिप्राय प्राप्त झालेला नाही.

(०५) दरम्यानचे कालावधीत, श्री.रोहमारे यांनी दिनांक ०७ एप्रिल, २०२० आणि दिनांक ०१ मे, २०२० रोजी विनंती अर्ज देऊन उपकार्यकारी अभियंता (बांधकाम) यांना पर्यवेक्षण करणेसाठी दिलेल्या आदेशाचा पुर्नविचार करणेस तसेच मा. न्यायालयाचे निकालाबाबत कार्यवाही करणेस विनंती केली.

(०६) याबाबत सामान्य प्रशासन विभागामार्फत, लॉकडाऊनचे कालावधीत कार्यालयातील कर्मचा-यांची संख्या मर्यादित असल्याने तसेच संबंधित कामकाज कर्मचारी हे आळीपाळीने/चक्रीय पध्दतीने कामावर हजर राहात असल्याने, उपरोक्त मा. न्यायालयाचे निकालावर तसेच श्री.रोहमारे यांचे अर्जावर विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने दिनांक १२ मे, २०२० रोजी सविस्तर टिपणी सादर करणेत आली.

(०७) सामान्य प्रशासन विभागामार्फत दिनांक १२ मे,२०२० रोजी सादर केलेल्या कार्यालयीन टिपणी मा.वरिष्ठ अधिकारी यांनी *" .. .. श्री. रोहमारे यांचा प्रशासकीय अधिकारी पद मिळणेकरीता अर्ज केलेला आहे सदर अर्ज तदर्थ (ad-hoc) समितीमध्ये तात्काळ सादर करणेत यावा त्यावरील निर्णयानंतर प्रकरण सादर करावे "* असे निर्देश दिले.

(०८) लॉकडाऊनचे कालावधीत कार्यालयातील कर्मचा-यांची संख्या मर्यादित असल्याने तसेच संबंधित कामकाज पहाणारे कर्मचारी हे आळीपाळीने/चक्रीय पध्दतीने कामावर हजर राहात असल्याने, सामान्य प्रशासन विभागामार्फत दिनांक १२ मे, २०२० रोजीचे टिपणीवरील निर्देशानुसार, दिनांक २३ मे,२०२० रोजी पुनःश्च विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने कार्यालयीन टिपणी सादर करणेत आली होती, त्यामध्ये श्री. रोहमारे यांना प्रभारी प्रशासकीय अधिकारी म्हणून नेमणूक देता येईल, असे प्रस्तावित करणेत आले होते. परंतु, या टिपणीवर मा. वरिष्ठ अधिकारी यांनी *" .. प्रशासकीय अधिकारी म्हणून नेमणूक करावी असा अर्ज आहे , तसाच प्रस्ताव Ad-hoc समिती समक्ष सादर करावा "* असे निर्देश दिले.

(०९) लॉकडाऊनचे कालावधीत कार्यालयातील कर्मचा-यांची संख्या मर्यादित असल्याने तसेच संबंधित कामकाज पहाणारे कर्मचारी हे आळीपाळीने/चक्रीय पध्दतीने कामावर हजर राहात असल्याने, सामान्य प्रशासन विभागामार्फत दिनांक २३ मे, २०२० रोजीचे टिपणीवरील निर्देशानुसार, दिनांक ३० मे, २०२० रोजी मा. तदर्थ समितीचे सभेपुढे सादर करावयाचा प्रस्ताव मा.वरिष्ठ अधिका-यांची मान्यता घेऊन, सभा कामकाज विभागाकडे यथोचित कार्यवाही सादर करणेत आला.

(१०) विषयांकित प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे दिनांक ०९ जून,२०२० रोजीचे सभेमध्ये निर्णयार्थ सादर करणेत आला असतां, त्यावर निर्णय क्रमांक ३१३ अन्वये,

" .. .. यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. विजय गणपतराव रोहमारे, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ, येथील कोर्टात प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेकामी रिट पीटीशन नं.४०१८/२०१९ दाखल केलेले होते. त्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाचे दि.११ मार्च, २०२० व दि.१८ मार्च,२०२० रोजी निकालपत्र/आदेश प्राप्त झालेले असुन सदरचा विषय मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर विलंबाने का सादर केला? याबाबत संबधीत श्री.गमे यांना नोटीस देऊन खुलासा मागविण्यात यावा व तोपर्यंत त्यांचे सेवानिवृत्तीची देयके थांबवून ठेवावे, असे ठरले. तसेच प्रस्तुत प्रकरणी निर्णय घेणेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन तीन महिन्याची मुदत वाढवुन मागणेबाबत कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले."

(११) मा.तदर्थ समितीचे उपरोक्त निर्णयानुसार, सामान्य प्रशासन विभागामार्फत दिनांक १७ जून, २०२० रोजी कार्यालयीन टिपणी सादर करणेत येऊन, विषयांकित प्रस्तावाबाबत निर्णय घेणेकामी ०३ महिन्याची मुदतवाढ घेणेकामी संस्थानचे विधीज्ञ ॲड. नितिन भवर पा., औरंगाबाद यांना पत्र देणेस मान्यता घेणेत आली.

(१२) दिनांक १७ जून, २०२० रोजीचे कार्यालयीन टिपणीवरील मान्यतेनुसार, संस्थानचे विधीज्ञ ॲड. नितिन भवर पा., औरंगाबाद यांना जावक क्रमांक एसएसएस/साप्रशा/आस्था/४४६/२०२०, दिनांक २५ जून,२०२० रोजी पत्र देणेत आलेले आहे. तसेच संस्थानचे विधी विभागामार्फत विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने मुदतवाढ घेणेकामी संस्थान विधीज्ञ ॲड. नितीन भवर पा. यांना दिनांक ०३ जुलै,२०२० रोजी पत्र देणेत आलेले असून, त्यानुसार संबंधित विधीज्ञ यांनी कार्यवाही सुरु केलेली असून, Online मुदतवाढीचा अर्ज दाखल केलेला आहे.

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील** PIL/120 **अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

(१३) तसेच, मा.तदर्थ समितीचे दिनांक ०९ जून,२०२० रोजीचे निर्णयानुसार, तत्कालीन प्रशासकीय अधिकारी श्री. सु. वि. गमे, शिर्डी यांचा लेखी खुलासा मागविणेकामी दिनांक २९ जून, २०२० रोजी टिपणी सादर करुन, सामान्य प्रशासन विभागाकडील जावक क्रमांक एसएसएस/साप्रशा/आस्था/५००/२०२०,दिनांक ०१ जुलै, २०२० रोजी लेखी सादर करणेबाबत पत्र देणेत आलेले होते.

त्यानुसार, तत्कालीन प्रशासकीय अधिकारी श्री.सु.वि.गमे यांनी दिनांक ०२ जुलै,२०२० रोजी सविस्तर लेखी खुलासा सादर केलेला आहे.

(१४) विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने, तत्कालीन प्रशासकीय अधिकारी श्री.सु.वि.गमे यांचा दिनांक ०२ जुलै, २०२० रोजीचा लेखी खुलासा मा.तदर्थ समितीचे सभेपुढे सादर करणेकामी सामान्य प्रशासन विभागामार्फत दिनांक ०२ जुलै,२०२० रोजी कार्यालयीन टिपणी सादर करणेत येऊन, सदरचा प्रस्ताव सभा कामकाज विभागाकडे दिनांक ०३ जुलै, २०२० रोजी देणेत आलेला होता. सभा कामकाज विभागामार्फत सदरचा विषयांकित प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे सभेत अवलोकनार्थ सादर करणेत आलेला होता.

(१५) मा.तदर्थ समितीचे दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे निर्णयानुसार, सामान्य प्रशासन विभागामार्फत दिनांक १५ जुलै, २०२० रोजी प्र. अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग यांचा खुलासा मागविणेकामी कार्यालयीन टिपणी सादर करुन, त्यानुसार प्र. अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग यांचा खुलासा जावक क्रमांक एसएसएस / साप्रशा / आस्था / ७३६ / २०२०, दिनांक १८ जुलै, २०२० अन्वये मागविणेत आलेला आहे.

**(2) प्र. अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग म्हणून लेखी खुलासा –**

(०१) उपरोक्त विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने, उपरोक्त परिच्छेद अ (या टिपणीतील परिच्छेद ब -1) मध्ये नमुद केलेल्या अ.नं.०१ ते १५ नुसार वस्तु:स्थितीदर्शक कार्यवाही सामान्य प्रशासन विभागामार्फत करणेत आलेली आहे.

दरम्यानचे कालावधीत मा. केंद्र व राज्य शासनाने कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव रोखणेसाठी दिनांक २३ मार्च, २०२० पासून महाराष्ट्र राज्यात तसेच संपूर्ण देशात Lockdown लागू केल्याने आणि मा.शासनाचे निर्देशानुसार, शासकीय-निमशासकीय कार्यालयांसह इतर अनुषंगिक आस्थापनेवरील कार्यालयातील कर्मचा-यांच्या उपस्थितीवर मोठया प्रमाणावर मर्यादा/निर्बंध आणल्यामुळे आणि संस्थानचे सामान्य प्रशासन विभागातील कर्मचारी ही आळी-पाळीने/चक्रीय पध्दतीने कामावर हजर राहत असल्याने, विषयांकित प्रस्तावावर कार्यवाही करणेस अल्पसा विलंब झालेला आहे.

(०२) तसेच, विषयांकित याचिका क्रमांक ४०१८/२०१९ मध्ये मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशाबाबत, २१ दिवसाचे आंत, म्हणजेच दिनांक १३ एप्रिल, २०२० रोजी संस्थानचे विधिज्ञ ॲड. नितिन भवर पा., औरंगाबाद यांना सविस्तर अभिप्राय देणेबाबत लेखी कळविणेत आलेले होते, परंतु त्यांनी ही लॉकडाऊनचे कालावधीत सर्व कामकाज बंद असल्याने, तसेच लॉकडाऊनमुळे त्यांनाही त्यांचे कार्यालयात उपस्थित रहाणेबाबत निर्बंध घातलेले असल्याने, याबाबतचा लेखी अभिप्राय अद्यापपावेतो प्राप्त झालेला नाही.

(०३) उपरोक्त परिच्छेद अ (या टिपणीतील परिच्छेद ब-1) मधील घटनाक्रम व सामान्य प्रशासन विभागामार्फत करणेत आलेली कार्यवाही लक्षात घेतां, सदरहू कार्यवाही करणेबाबत जरी अल्पसा विलंब झाला असला तरी विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने व मा. न्यायालयाचे आदेशानुसार कार्यवाही करणेबाबत हेतुपुरस्सर अथवा जाणीवपूर्वक विलंब करणेत आलेला नाही आणि तसा हेतू नव्हता व नाही. तथापि, परिच्छेद अ (या टिपणीतील परिच्छेद ब -1) मध्ये नमूद केलेल्या कारणास्तव, विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने झालेल्या अल्पशा विलंबाबत मी दिलगिरी व्यक्त करुन, आपली क्षमा मागतो.

तसेच उपरोक्त वस्तुस्थितीदर्शक घटनाक्रमांचा सहानुभूतीपूर्वक व मानवतेच्या दृष्टीकोनातून विचार होऊन, दिनांक १८ जुलै, २०२० रोजी मला वैयक्तिक देणेत आलेले नोटीस पत्र रद्द व्हावे, ही नम्र विनंती.

उपरोक्त प्रमाणे प्रभारी अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग यांनी आपला लेखी खुलासा सादर केला आहे.

**(B) या उपविषयाबाबत विभागाचा अभिप्राय -**

१. श्री विजय गणपतराव रोहमारे, उप कार्यकारी अभियंता (विद्युत) यांनी प्रशासकीय अधिकारी पदी पदोन्नती मिळणेकामी मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका क्र.४०१८/२०१९ दाखल केलेली होती. त्यावर सुनावणी होऊन दिनांक ११ मार्च, २०२० आणि दिनांक १८ मार्च, २०२० रोजीचे

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

निकालपत्रे / आदेश सामान्य प्रशासन विभागास अनुक्रमे आवक क्रमांक १९६८०/दिनांक १४ मार्च, २०२० आणि आवक क्रमांक २०१६९/दिनांक २१ मार्च, २०२० अन्वये प्राप्त झालेली होती.

२. मा. केंद्र व राज्य शासनाने कोरोना विषाणू (Covid 19) या संसर्गजन्य साथीच्या रोगाच्या प्रादुर्भावामुळे दिनांक २३ मार्च, २०२० पासून संपूर्ण देशात Lockdown घोषित केला. मा. राज्य शासनाचे निर्देशानुसार, सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक २४ मार्च, २०२० रोजीचे आदेशान्वये, कार्यालयांमध्ये/कार्यस्थळांवर ०५ टक्के किंवा कमीत कमी कर्मचारी हजर राहतील असे नियोजन करुन, सामान्य प्रशासन विभागासह इतर सर्व विभागातील कर्मचारी आळी-पाळीने अथवा चक्रीय पध्दतीने कामावर बोलविणेबाबत आदेशित करणेत आले.

३. मा.न्यायालयीन आदेशाबाबत सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक ०२ एप्रिल, २०२० रोजीचे टिपणीवरील मान्यतेनुसार, संस्थान विधीज्ञ अॅड. नितिन भवर पा., औरंगाबाद यांना जावक क्रमांक एसएसएस/साप्रशा/आस्था/४०/२०२०, दिनांक १३ एप्रिल, २०२० रोजी मा. न्यायालयाचे याचिका क्रमांक ४०१८/२०१९ च्या निकालपत्राचे विश्लेषणात्मक (सविस्तर) लेखी अभिप्राय देणेबाबत पत्र देणेत आले. त्यानंतर, अॅड.नितीन भवर पा.यांचे प्रतिनिधी श्री.खेडकर यांचेशी वेळोवेळी दूरध्वनीवरुन संपर्क साधला असतां, सध्या मा. न्यायालयाचे कामकाज संपूर्ण बंद असल्याने तसेच वैयक्तिक विधीज्ञांची कार्यालये १०० टक्के बंद असल्याने याबाबतचा अभिप्राय देणेस विलंब लागणार असलेबाबत समक्ष सांगितले. तसेच याबाबत आजपावेतो विधीज्ञ अॅड. भवर पा. यांचा अभिप्राय प्राप्त झालेला नाही.

४. सामान्य प्रशासन विभागामार्फत उपरोक्त विषयाचे अनुषंगाने दि.१२ मे, २०२० व दि.२३ मे, २०२० रोजी कार्यालयीन टिपणी सादर करणेत आलेली होती. या टिपणीवरील मा.वरिष्ठ अधिका-यांचे निर्देशानुसार, दि.३० मे, २०२० रोजी मा.तदर्थ समितीचे सभेपुढे सादर करावयाचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करणेत आला. सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे दि.०९ जुन, २०२० रोजीचे सभेत निर्णयार्थ ठेवणेत आला होता.

५. उपरोक्त सर्व घटनाक्रम पहाता, श्री विजय गणपतराव रोहमारे यांचे अर्जाबाबत निर्णय घेणेकामी प्रशासनामार्फत कार्यवाही करणेत आलेली आहे/सुरू आहे. दरम्यानच्या कालावधीत कोरोना (Covid 19) विषाणूचा प्रार्दुभाव रोखणेकामी कार्यालयीन कामकाज मर्यादित कर्मचा-यांच्या उपस्थितीत सुरू होते. त्यामुळे मा.तदर्थ समितीचे सभेसमोर प्रस्ताव सादर करणेस अल्पसा विलंब झालेला आहे. याबाबत सेवानिवृत्त तत्कालीन प्रशासकीय अधिकारी व सामान्य प्रशासन विभागाचे प्रभारी प्रमुखांनी दिलगिरी व्यक्त करून मा.तदर्थ समितीची माफी मागितलेली आहे.

६. वरील सर्व बाबींचा विचार करतां, श्री रोहमारे यांचे याचिका क्र.४०१८/२०१९ चे मा.न्यायालयाचे निकालाबाबत केलेली कार्यवाही/सुरू असलेली कार्यवाही विचारांत घेऊन, सेवानिवृत्त तत्कालीन प्रशासकीय अधिकारी व प्रभारी विभागप्रमुख यांना क्षमापित करून, सेवानिवृत्त तत्कालीन प्रशासकीय अधिकारी यांची सेवानिवृत्ती नंतरची देयके आदा करणेस मान्यता असावी.

**C)** श्री संजय चौधरी, शिर्डी यांचा सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी श्री सुर्यभान विठ्ठलराव गमे यांचेबाबत तक्रार अर्ज-

अ) श्री संजय चौधरी, शिर्डी यांनी श्री सुर्यभान विठ्ठलराव गमे, सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी यांना दिलेल्या ५ वेतनवाढी ह्या बेकायदेशीर असल्यामुळे सदर रकमेची पुर्ण वसूली करूनच श्री सुर्यभान गमे, सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी यांना त्यांची अंतिम रक्कम आदा व्हावी व तोपर्यंत त्यांची अंतिम रक्कम आदा करणेची कारवाई थांबविण्यात यावी, अशी विनंती केलेली आहे.

ब) श्री.सुर्यभान विठ्ठलराव गमे, प्रशासकीय अधिकारी यांचे फेर वेतननिश्चिती, वेतन कपात व वेतन वसुलीबाबत मा.त्रिसदस्यीय समितीचे दिनांक ०८/१०/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३२४ नुसार "सदरहू बाब प्रशासकीय स्वरुपाची असल्यामुळे या विषयावर नियमानुसार यथायोग्य निर्णय घेण्याचे अधिकारी कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले, परंतु असे करत असतांना श्री. गमे यांना दिलेल्या ६ वेतनवाढी या नियमास अनुसरुन दिल्या गेल्या आहेत काय, त्यावेळचे व्यवस्थापन मंडळाचा तसा स्पष्ट आदेश आहे काय, या सर्व गोष्टींचा कायदेशीर अभ्यास प्रशासनाने करावा. सर्व बाबींचा निपक्षपातीपणे कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करावी व त्याचा कार्यवाही अहवाल सादर करावा," असा निर्णय झाला होता.

**क)** उपरोक्त मा. त्रिसदस्यीय समितीचे निर्णयानुसार,आस्थापना विभागामार्फत दि.०१.०१.२०१६ रोजीचा तपशिलवार अहवाल सादर करणेत आला होता.

तसेच, श्री. सुर्यभान विठ्ठलराव गमे, प्रशासकीय अधिकारी यांचे वेतन निश्चितीतील अनियमितता व फेर वेतन निश्चितीबाबत दि.०१.०६.२०१५ व दि.१२.०८.२०१५ रोजीच्या आदेशाबाबत सामान्य प्रशासन विभाग

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

यांनी जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/१२३२/२०१६, दि.०४.०७.२०१६ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश पारीत केलेला आहे. सदर आदेशामध्ये तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी यांनी खालीलप्रमाणे निरीक्षणे नोंदवून आदेश दिलेला आहे.

**तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी यांनी नोंदविलेली निरीक्षणे:-**

१) श्री.सुर्यभान विठ्ठलराव गमे यांना दि.०८/०४/१९९९ रोजीचे आदेशान्वये दि.२६/१०/१९९८ पासून त्यांच्या मागणीनुसार एकत्रित वेतन रु.६५००/- वेतन मिळणेसाठी पाचव्या वेतन आयोगाच्या रु.४५००-१२५-७००० या वेतनश्रेणीमध्ये एकत्रित वेतन रक्कम रु.६५००/- देणेसाठी रु.१२५/- च्या ६ जादा वेतनवाढी मंजूर केल्याचे दिसून येते.

२) दि.३१/०७/२००४ व दि.०१/०८/२००४ रोजीच्या व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र.३८८ नुसार श्री.गमे यांना रु.४५००-१२५-७००० ऐवजी वेतनश्रेणी ५५००-१७५-९००० मंजूर करण्यात आलेली आहे. त्यामुळे श्री.गमे यांचे वेतन रु.५५००-१७५-९००० या वेतनश्रेणीत निश्चित करण्यात आलेले आहे. त्यामुळे श्री.गमे यांना यापुर्वी रु.४५००-१२५-७००० या वेतनश्रेणीमध्ये दिलेल्या ६ जादा वेतनवाढी नविन वेतनश्रेणी लागू झाल्यानंतर त्या वेतनश्रेणीमध्येच समाविष्ट आहेत. त्यामुळे समितीची मंजूरी नाही असा निष्कर्ष योग्य नाही.

३) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ हा संस्थानसाठी शासनाचा अधिनियम दि.१४ ऑगस्ट, २००४ पासून लागू करण्यात आलेला आहे. त्यातील कलम नं.१६ नुसार संस्थानमधील कायम कर्मचा-यांना नियत दिवसाच्या लगतपूर्वी जे वेतन लागू होते ते वेतन संरक्षीत (Protect) करणेत आलेले आहे.

४) तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाचे Civil Appeal No.11527/2014 मधील दि.१८/१२/२०१४ रोजीचे आदेशानुसार कर्मचा-यांच्या वेतनातून पाच वर्षापूर्वी जास्तीच्या दिलेल्या वेतनाची वसुली करु नये, असे आदेशीत करणेत आलेले आहे.

५) वरील सर्व बाबी पाहता, श्री.गमे यांना दि.२६/१०/१९९८ रोजी मंजूर केलेल्या ६ जादा वेतनवाढी समितीच्या दि.३१/०७/२००४ व दि.०१/०८/२००४ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.३८८ नुसार रु.५५००-१७५-९००० वेतनश्रेणी मंजूर केलेली असल्याने त्यांच्या वेतनास समितीची मंजूरी नाही, असे म्हणता येणार नाही.

तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी यांनी उपरोक्त निरीक्षणानुसार दिलेला आदेश:-

उपरोक्त निरिक्षणे व वस्तुस्थिती यांचा विचार करता, श्री.सुर्यभान विठ्ठलराव गमे, प्रशासकीय अधिकारी यांचे वेतन निश्चितीतील अनियमिततेबाबत जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/९९४/२०१५, दि.०१ जून, २०१५ रोजीचा आदेश व फेर वेतन निश्चितीबाबत जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/१७७३/२०१५ दि.१२ ऑगस्ट, २०१५ रोजीचा आदेश रद्द करणेत येत आहेत. श्री.सुर्यभान विठ्ठलराव गमे, यांनी संस्थान विरुध्द दाखल केलेले रिट पिटीशन क्र.६१०७ /२०१५ ही कोर्ट केस मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथुन मागे घ्यावी. त्यानंतर सदरच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी, तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा.त्रिसदस्य समितीसमोर सादर करावा.

ड) श्री. गमे, यांनी संस्थान विरुध्द दाखल केलेले रिट पिटीशन क्र. ६१०७/२०१५ ही कोर्ट केस मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथून दिनांक ११/०७/२०१६ रोजी मागे घेतलेली आहे. सबब सदर प्रकरणाची कार्यवाही पूर्ण झालेली असल्यामुळे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.१०.२०१५ रोजीचे सभेतील विषय नं.०५, निर्णय क्र.३२४ चे कार्यवाहीबाबतचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०८/२०१६ रोजीचे सभेत नोंद घेणेकामी सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र.४६६ अन्वये पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे. "यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.१०.२०१५ रोजीचे सभेतील विषय नं.०५ व निर्णय क्र.३२४ चे कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली." सबब सदरचे प्रकरण निकाली निघालेले आहे.

(C) या उपविषयाबाबतचा विभागाचा अभिप्राय -

१) श्री. संजय चौधरी, शिर्डी यांनी त्यांचे तक्रार अर्जासोबत श्री. गमे, सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी यांचे वेतनाबाबत अनियमितता झाल्याबाबतचे पृष्ठ्यार्थ कोणतीही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. तसेच श्री. संजय चौधरी यांनी त्यांचे दिनांक नसलेल्या तक्रार अर्जात त्यांचा पूर्ण पत्ता किंवा फोन नंबर दिलेला नसल्याने त्यांचेशी संपर्क साधणे ही शक्य नाही. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक शाकाप-२०१५/ प्र.क्र. ५/१८ (र.व का.) दिनांक २५ फेब्रुवारी, २०१५ रोजीचे परिपत्रकानुसार सदरचा तक्रार अर्ज निनावी म्हणून नस्तीबध्द करता येईल, असे मत आहे.

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

२) श्री सुर्यभान विठ्ठलराव गमे यांना देण्यात आलेल्या ०६ वेतनवाढीबाबत तत्कालीन मा. त्रिसदस्यीय समितीचे दिनांक ०८/१०/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३२४ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार तत्कालीन कार्यकारी अधिकारी श्री बाजीराव शिंदे यांनी चौकशी करून दि.०७.०८.२०१६ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर अहवाल सादर करणेत आला होता आणि मा.व्यवस्थापन समितीचे बैठकीमध्ये त्यास मान्यता दिलेली आहे. एकंदरीत सदर अहवालानूसार श्री गमे यांना देण्यात आलेल्या ०६ वेतनवाढी अनुज्ञेय ठरविणेत आलेल्या आहे. त्यामुळे सदर प्रकरणांची पुनश्चः चौकशी करण्याची आवश्यकता वाटत नाही.

D) प्रशासकीय अधिकारी पदावर पदोन्नतीने नेमणुक मिळणेकामी कर्मचा-यांचे आलेल्या अर्जावर निर्णय होणेबाबत...

सध्या संस्थान आस्थापनेवर श्री दिलीप त्र्यंबकराव उगले, प्र. प्रशासकीय अधिकारी व डॉ आकाश किसवे, प्रशासकीय अधिकारी (प्रतिनियुक्ती) असे दोनच प्रशासकीय अधिकारी कार्यरत आहेत. संस्थान आस्थापनेवरील ०५ प्रशासकीय अधिकारी पदांपैकी ०३ प्रशासकीय अधिकारी पदे रिक्त आहेत.

तसेच, संस्थानकडे प्रतिनियुक्तीवर असलेले अधिकारी श्री रविंद्र सतिष घुले, कार्यकारी अभियंता यांची बदली महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग आदेश क्रमांकःपीओजी-टीएफएस-१११८/ प्र.क्र.२२५/ सेवा-१, दि.१७ डिसेंबर, २०१८ ने सार्वजनिक बांधकाम (अदिवासी) विभाग, कळवण येथे झालेने कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग या रिक्त पदावर जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/२८१३/२०१८, दि.१९ डिसेंबर, २०१८ रोजीचे आदेशान्वये, प्रशासकीय कामकाजाचे सोईसाठी पुढील आदेश होईपावेतो कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग या पदाचा अतिरिक्त कार्यभार तसेच कार्यकारी अभियंता यांचेकडे पर्यवेक्षणासाठी देण्यात आलेले बांधकाम विभाग, विद्युत विभाग, पाणी पुरवठा विभाग व मेकॅनिकल विभागाचे तुर्त कामकाज श्री रघुनाथ भागा आहेर, उपकार्यकारी

अभियंता यांचेकडे सोपविणेत आलेले आहे. सध्या श्री आहेर हे प्र. कार्यकारी अभियंता या पदाचा अतिरिक्त कार्यभार पहात आहेत.

I) प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेबाबत खालील कायम कर्मचारी यांनी अर्ज केलेले आहेत.

| अ. क्र. | कर्मचा-याचे नांव | मुळ पदनाम | सध्याचे पदनाम, विभागाचे नांव | अर्ज आवक नं./ दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री रघुनाथ भागा आहेर | उपकार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग | प्र.कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग | ५७२३/२६.६.२०१५ |
| २ | श्री विजय गणपतराव रोहमारे | उपकार्यकारी अभियंता (विद्युत) | उपकार्यकारी अभियंता (विद्युत) | १०३२८/१.५.२०२० |
| ३ | श्री साहेबराव पांडुरंग लंके | वित्त व्यवस्थापक | प्र.लेखाधिकारी, लेखाशाखा | ३९३/८.५.२०२० |
| ४ | श्री कैलास सोनाजी खराडे | वरिष्ठ लेखापाल | प्र.लेखाधिकारी, लेखाशाखा | २७३/२७.४.२०२० |
| ५ | श्री रविंद्र बाळासाहेब नवले | एच.आर.मॅनेजर | एच.आर.मॅनेजर, रूग्णालये | ६०१/१९.५.२०२० |
| ६ | श्री अनिल बाळकृष्ण भणगे | कृषी अधिकारी | कृषी अधिकारी, बगीचा विभाग | ७५६/२६.५.२०२० |
| ७ | श्री राजेंद्र सोपानराव जगताप | विद्युत पर्यवेक्षक | प्र.विभाग प्रमुख, पाणीपुरवठा विभाग | ७६६/२७.५.२०२० |
| ८ | श्री विनोद गोवर्धन कोते | ज्युनिअर ईडीपी मॅनेजर | ज्युनि.ईडीपी मॅनेजर, श्री साईबाबा हॉस्पीटल | ८५३/३०.५.२०२० |
| ९ | श्री राजतिलक दत्तात्रय बागवे | वरिष्ठ लिपीक | प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग व अतिरिक्त कार्यभार प्र.अधिक्षक, शताब्दी कक्ष | ६६३/२१.५.२०२० |
| १० | श्री प्रमोद पंढरीनाथ पुरकर | वरिष्ठ लिपीक | प्र.वरिष्ठ लेखापाल, लेखाशाखा | ६१८/२०.५.२०२० |
| ११ | श्री प्रकाश दादा क्षीरसागर | वरिष्ठ लिपीक | प्र.अधिक्षक, वाहन विभाग | ६५२/२२.५.२०२० |
| १२ | श्री नवनाथ भाऊसाहेब कोते | वरिष्ठ लिपीक | प्र.अधिक्षक, सभाकामकाज विभाग | ८५४/३०.५.२०२० |
| १३ | श्री अविनाश विनायक कुलकर्णी | वरिष्ठ लिपीक | प्र.अधिक्षक, खरेदी विभाग व अतिरिक्त कार्यभार प्र.अधिक्षक, भांडार विभाग. | ४८६/१४.५.२०२० |

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेकामी केलेल्या कर्मचा-यांची तपशिलवार माहिती परिशिष्ठ अ (सर्वसाधारण सेवेची माहिती), परिशिष्ठ ब (गोपनीय अहवाल), परिशिष्ठ क (गैरशिस्तवर्तन/शिक्षा इ. बाबतचा तपशिल) व परिशिष्ठ ड (संवर्गनिहाय सेवाजेष्ठता यादी) म्हणुन सोबत जोडलेली आहे. त्यांचे अवलोकन होणेस विनंती.

(D) या उपविषयाचा विभागाचा अभिप्राय–

१. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे सेवाप्रवेश नियम, सुधारीत विभागनिहाय आकृतीबंध, पदोन्नतीचे पदे, पदोन्नतीची साखळी, बिंदुनामावली इत्यादी कामे प्रलंबित आहेत. तसेच, मा. शासनाचे मान्यतेसाठी दि.२६ जुन, २०१४ रोजी सादर करणेत आलेल्या प्रारूप सेवाप्रवेश नियमांमध्ये सर्व साधारणपणे "प्रशासकीय अधिकारी" पदासाठी पदोन्नतीने नेमणूकीसाठी खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता व पात्रता नमुद/प्रस्तावित करणेत आलेली होती.

| Designation पदनाम | Pay scale वेतनश्रेणी | Total Post एकुण पदसंख्या | Qualification पात्रता | |
|---|---|---|---|---|
| | | | By Nomination | By Promotion |
| Administrative Officer प्रशासकीय अधिकारी | (६ व्या वेतनआयोगानुसार) 15600-39100 Grade Pay 5400 | 05 (दि.7/8/2009 चे मंजूर आकृतीबंधानुसार) | On Deputation from Government of Maharashtra | 1) Graduate from any Government recognized University;<br>2) MS-CIT or Government prescribed equivalent Computer Operating Course;<br>3) Experience minimum 5 years in Superintendent OR Law Officer OR Labour Officer OR Accounts Officer in Sansthan. |

२. संस्थानचे प्रशासकीय कामकाजाच्या सोईचे दृष्टीने व श्री साईभक्तांना सोई सुविधा देणेकामी संस्थानमध्ये एकुण ४० विभाग कार्यरत आहेत. सध्या प्रशासकीय अधिकारी यांना पर्यवेक्षणकामी खालील विभागाचे कामकाज विभागुन देण्यात आलेले आहेत.

**(०१) श्री.दिलीप त्र्यंबक उगले, प्रशासकीय अधिकारी**

०१) साईबाबा भक्तनिवासस्थान ०२) व्दारावती भक्तनिवास ०३) साईप्रसाद निवासस्थान
०४) साईआश्रम भक्तनिवास ०५) साई धर्मशाळा ०६) श्री साईबाबा महाविद्यालय
०७) औद्योगिक प्रशिक्षण संस्था ०८) इंग्लिश मिडीयम स्कुल ०९) खरेदी विभाग
१०) कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय ११) प्रसादालय विभाग
१२) वाहन विभाग १३) बगीचा विभाग १४) आरोग्य विभाग

**(०२) डॉ.आकाश रामहरी किसवे, प्रशासकीय अधिकारी (प्रतिनियुक्तीने)**

०१) प्रकाशने विभाग ०२) मालमत्ता विभाग ०३) माहिती तंत्रज्ञान विभाग
०४) ध्वनीक्षेपण विभाग ०५) सी.सी.टी.व्ही.कंट्रोल सेल ०६) शताब्दी कक्ष
०७) रक्षण विभाग ०८) फायर ॲण्ड सेफ्टी विभाग ०९) माहिती अधिकार कक्ष
१०) भांडार विभाग ११) श्री साईनाथ रुग्णालय १२) लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग
१३) साईबाबा हॉस्पिटल

**(०३) श्री.बाबासाहेब बाळकृष्ण घोरपडे, मुख्य लेखाधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (प्रतिनियुक्तीने)**

०१) लेखाशाखा विभाग ०२) सामान्य प्रशासन विभाग ०३) मागासवर्ग कक्ष विभाग
०४) कामगार विभाग ०५) सभाकामकाज विभाग ०६) मंदिर विभाग
०७) जनसंपर्क विभाग ०८) विधी विभाग ०९) अभिलेख कक्ष

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

१०) कॅन्टीन विभाग ११) मुंबई कार्यालय

**(०४) श्री.रघुनाथ भागाजी आहेर, प्रभारी कार्यकारी अभियंता**

०१) बांधकाम विभाग ०२) विद्युत विभाग ०३) पाणीपुरवठा विभाग

०४) मॅकेनिकल विभाग

३. उपरोक्त तक्ता क्र.I मधील अ.क्र.०९ ते १३ हे कर्मचारी वरिष्ठ लिपीक असुन सध्या ते वेगवेगळया विभागांचे प्रभारी विभागप्रमुख म्हणून कित्येक वर्षापासून काम पहात असून त्यांना प्रशासकीय अधिकारी पद द्यावयाचे झाल्यास त्यांना अगोदर अधिक्षक या पदावर पदोन्नती द्यावी लागेल. संस्थानमध्ये अधिक्षक या पदानंतर पुढील पदोन्नतीचे पद हे प्रशासकीय अधिकारी पद आहे. तसेच,

४. अ.क्र.०४ हे कर्मचारी वरिष्ठ लेखापाल असुन सध्या ते प्रभारी लेखाधिकारी म्हणून काम पहात असून त्यांना प्रशासकीय अधिकारी पद द्यावयाचे झाल्यास त्यांना अगोदर लेखाधिकारी या पदावर पदोन्नती द्यावी लागेल.

५. उपरोक्त तक्ता क्र.I मधील अ.क्र.१,२,६ व ७ मध्ये कार्यरत असणारे कर्मचारी [ उपकार्यकारी अभियंता (बांधकाम), उपकार्यकारी अभियंता (विद्युत), कृषी अधिकारी, विद्युत पर्यवेक्षक ] यांच्या सवंर्गाचा मा.शासनाचे मान्यतेसाठी दि.२६ जून, २०१४ रोजी सादर करणेत आलेल्या प्रस्तावित प्रशासकीय अधिकारी या पदासाठी आवश्यक असलेल्या निम्न पद (Feeder Cadre) मध्ये समावेश नाही.

६. अ.क्र.०३,०५ व ०८ हे कर्मचारी (वित्त व्यवस्थापक, एच.आर.मॅनेजर, ज्युनिअर ईडीपी मॅनेजर) रूग्णालये आस्थापनेवर नेमणूक झालेले आहेत. संस्थान आस्थापना व रूग्णालये आस्थापना यांची सेवाजेष्ठता यादी वेगवेगळी आहे (वर्ग ०४ कर्मचारी वगळता). रूग्णालये विभागाकडील कर्मचा-यांसाठी प्रस्तावित सेवाप्रवेश नियमांमध्ये प्रशासकीय अधिकारी पद निश्चित करणेत आलेले नाही.

७. प्रशासकीय अधिकारी पदावर पदोन्नती मिळणेकामी अर्ज केलेले अर्जदार हे वेगवेगळया संवर्गात काम करत आहेत. त्यामुळे सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती द्यावयाची झाल्यास प्रशासकीय अधिकारी पदाच्या किमान शैक्षणिक पात्रतेनुसार म्हणजे ज्या दिनांकाला शैक्षणिक पात्रता धारण केली त्या दिनांकानुसार एकत्रित सेवाजेष्ठता यादी तयार करावी लागणार आहे. तसेच बिंदु नामावली निश्चित झालेनंतर पदोन्नतीचे उमेदवार निश्चित करता येईल. मात्र अर्ज केलेल्या उमेदवारांमध्ये प्रशासकीय अधिकारी या पदावर नियुक्ती होणेकामी प्रस्तावित सेवाप्रवेश नियमात अंर्तभुत केलेले निम्नपद (Feeder Cadre) धारण केलेला उमेदवार नाही.

प्रशासकीय अधिकारी या पदावर नियुक्ती होणेकामी प्रस्तावित करणेत आलेल्या सेवाप्रवेश नियमांमध्ये Feeder Cadre पुढीलप्रमाणे दर्शविणेत आलेली आहे.

लिपीक टंकलेखक- वरिष्ठ लिपीक- उपअधिक्षक- अधिक्षक- प्रशासकीय अधिकारी

लिपीक टंकलेखक- वरिष्ठ लिपीक- वरिष्ठ लेखापाल- लेखाधिकारी- प्रशासकीय अधिकारी

कनिष्ठ कामगार अधिकारी - कामगार अधिकारी - प्रशासकीय अधिकारी

विधी अधिकारी - प्रशासकीय अधिकारी

८. तसेच उपरोक्त तक्ता क्रमांक I मध्ये नमुद केलेल्या कर्मचा-यांव्यतिरिक्त संस्थान आस्थापनेवरील इतर पात्र कर्मचा-यांच्या बाबतीत विचार करणे आवश्यक राहील. फक्त अर्ज केलेल्या उमेदवारांचा विचार करणे संयुक्तिक होणार नाही.

९. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे सेवाप्रवेश नियम, सुधारीत विभागनिहाय आकृतीबंध, पदोन्नतीचे पदे, पदोन्नतीची साखळी, बिंदुनामावली इत्यादी कामे प्रलंबित आहेत. सदरची कामे पुर्ण करणेकामी कार्यगटाची नियुक्ती करणेत आलेली आहे. सदर कार्यगटाचे कामकाज सुरू आहे. सदर कार्यगटाचे कामकाज पुर्ण झालेनंतर त्यास मा.तदर्थ समितीची मान्यता घेऊन मा. शासनाचे मान्यतेसाठी पाठवावी लागेल. मा.शासनाची मान्यता प्राप्त झालेनंतर संस्थान कर्मचारी यांचे Feeder Cadre तयार करून त्यानुसार बिंदुनामावली निश्चित करून सेवाजेष्ठतेचा विचार करून प्रशासकीय अधिकारी या पदाची पदोन्नतीबाबतची कार्यवाही करता येईल, असे मत आहे.

**E) प्रशासकीय अधिकारी पदाची पात्रता, Feeder Cadre (निम्न पद) व सेवाजेष्ठता यादी-**

१) मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि.०७/०८/२००९ रोजीचे आदेशान्वये, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या आस्थापनेवरील पदांचे आकृतीबंधास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामधील सामान्य प्रशासन विभागाच्या पदांच्या आकृतीबंधामध्ये एकूण ०५ प्रशासकीय अधिकारी पदांना मान्यता देण्यात आलेली आहे.परंतु,

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे सेवाप्रवेश नियम, Feeder Cadre (निम्न पद), सुधारीत विभागनिहाय आकृतीबंध, पदोन्नतीचे पदे, पदोन्नतीची साखळी, बिंदुनामावली इत्यादी कामे प्रलंबित आहेत. सदरची कामे पुर्ण करणेकामी कार्यगटाची नियुक्ती करणेत आलेली आहे. सदर कार्यगटाचे कामकाज सुरू आहे.

तसेच, मा. शासनाचे मान्यतेसाठी दि.२६ जुन, २०१४ रोजी सादर करणेत आलेल्या **प्रारूप सेवाप्रवेश नियमांमध्ये** सर्व साधारणपणे "प्रशासकीय अधिकारी" पदासाठी पदोन्नतीने नेमणूकीसाठी खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता व पात्रता नमुद/प्रस्तावित करणेत आलेली होती.

| **Designation** **पदनाम** | **Pay scale** **वेतनश्रेणी** | **Total Post** **एकुण पदसंख्या** | **Qualification** **पात्रता** | |
|---|---|---|---|---|
| | | | **By Nomination** | **By Promotion** |
| Administrative Officer प्रशासकीय अधिकारी | (६ व्या वेतनआयोगानुसार) 15600-39100 Grade Pay 5400 | 05 (दि.7/8/2009 चे मंजूर आकृतीबंधानुसार) | On Deputation from Government of Maharashtra | 1) Graduate from any Government recognized University;<br>2) MS-CIT or Government prescribed equivalent Computer Operating Course;<br>3) Experience minimum 5 years in Superintendent OR Law Officer OR Labour Officer OR Accounts Officer in Sansthan. |

उपरोक्त तक्त्यात नमूद प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नतीसाठी पुढील Feeder Cadre (निम्न पद) दर्शविणेत आलेली आहे.

- अधिक्षक
- विधी अधिकारी
- कामगार अधिकारी
- लेखाधिकारी

२) सेवाजेष्ठता यादी- संस्थानमधील कर्मचा-यांची सन २०१६ ची संवर्गनिहाय (Cadre wise) सेवाजेष्ठता यादी अंतीम करणेत आलेली आहे.

प्रशासकीय अधिकारी पदावर पदोन्नती मिळणेकामी अर्ज केलेले अर्जदार हे वेगवेगळया संवर्गात काम करत आहेत. त्यामुळे सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती द्यावयाची झाल्यास प्रशासकीय अधिकारी पदाच्या किमान शैक्षणिक पात्रतेनुसार म्हणजे ज्या दिनांकाला शैक्षणिक पात्रता धारण केली त्या दिनांकानुसार एकत्रित सेवाजेष्ठता यादी तयार करावी लागणार आहे.

प्रशासकीय अधिकारी पदी अर्ज केलेल्या कर्मचा-यांची सवंर्गनिहाय (Cadre wise) सेवाजेष्ठता यादी सोबत परिशिष्ठ ड म्हणून जोडलेली आहे.

उपविषय (E) प्रशासकीय अधिकारी पदाची पात्रता, Feeder Cadre (निम्न पद) व सेवाजेष्ठता यादीबाबत विभागाचा अभिप्राय व प्रस्ताव-

१) प्रशासकीय अधिकारी पदावर पदोन्नती मिळणेकामी अर्ज केलेले अर्जदार हे वेगवेगळया संवर्गात काम करत आहेत. त्यामुळे सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती द्यावयाची झाल्यास प्रशासकीय अधिकारी पदाच्या किमान शैक्षणिक पात्रतेनुसार म्हणजे ज्या दिनांकाला शैक्षणिक पात्रता धारण केली त्या दिनांकानुसार एकत्रित सेवाजेष्ठता यादी तयार करावी लागणार आहे. तसेच, अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता दर्शविणारा तपशिल सोबत परिशिष्ठ अ मध्ये दर्शविलेला आहे.

२) मात्र, सद्यस्थितीत प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेकामी प्रस्तावित केलेले Feeder Cadre (निम्न पद) मध्ये नमूद केलेले अधिक्षक, विधी अधिकारी, कामगार अधिकारी व लेखाधिकारी ही पदे सध्या रिक्त आहेत.

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्द्यांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

३) प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेकामी अर्ज केलेले श्री राजतिलक द.बागवे, श्री प्रमोद पं.पुरकर, श्री प्रकाश दा.क्षीरसागर, श्री नवनाथ भा.कोते, श्री अविनाश वि.कुलकर्णी हे वरिष्ठ लिपीक असुन सध्या ते वेगवेगळया विभागांचे प्रभारी विभागप्रमुख म्हणून कित्येक वर्षापासून काम पहात असून त्यांना प्रशासकीय अधिकारी पद द्यावयाचे झाल्यास त्यांना अगोदर अधिक्षक या पदावर पदोन्नती द्यावी लागेल.

४) प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेकामी अर्ज केलेले श्री कैलास सो.खराडे हे वरिष्ठ लेखापाल असुन सध्या ते प्रभारी लेखाधिकारी म्हणून काम पहात असून त्यांना प्रशासकीय अधिकारी पद द्यावयाचे झाल्यास त्यांना अगोदर लेखाधिकारी या पदावर पदोन्नती द्यावी लागेल.

५) प्रस्तावित प्रशासकीय अधिकारी पदाच्या निम्न पद (Feeder Cadre) मध्ये समावेश नसलेले परंतु, प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेकामी अर्ज केलेले श्री रघुनाथ भा.आहेर हे उपकार्यकारी अभियंता (बांधकाम) या पदावर कार्यरत असून त्यांचेकडे सध्या कार्यकारी अभियंता या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे. प्रशासकीय अधिकारी पदाची किमान शैक्षणिक अर्हता ही शासनमान्य विद्यापीठातून पदवी ही असून, श्री आहेर यांनी डिप्लोमा इन सिव्हील इंजिनिअरींग ही पदवीका अभ्यासक्रम धारण केलेला आहे.

६) प्रस्तावित प्रशासकीय अधिकारी पदाच्या निम्न पद (Feeder Cadre) मध्ये समावेश नसलेले परंतु, प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेकामी अर्ज केलेले श्री विजय ग.रोहमारे हे उपकार्यकारी अभियंता (विद्युत) या पदावर कार्यरत आहेत.

प्रशासकीय अधिकारी पदाची किमान शैक्षणिक अर्हता ही शासनमान्य विद्यापीठातून पदवी ही असून, श्री रोहमारे यांनी डिप्लोमा इन इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग ही पदविका/शैक्षणिक पात्रता जून १९८२ मध्ये धारण केलेली असून, त्यांनी या तांत्रिक पदाची पदवी धारण केलेली नाही.

श्री रोहमारे यांनी बी.ए. ही शैक्षणिक पात्रता यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथून मे-जून- २०१८ मध्ये धारण केलेली आहे. सदरची शैक्षणिक पात्रता ही सन २०१८ मध्ये धारण केलेली असल्याने याबाबतची त्यांची सेवाजेष्ठता ज्या वर्षी पदवी धारण केलेली आहे त्यावर्षापासून लागू होईल. तसेच, श्री रोहमारे यांनी धारण केलेली बी.ए.ही पदवी त्यांच्या डिप्लोमा इन इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग या तांत्रिक शिक्षणाशी संबंधीत नाही.

७) प्रस्तावित प्रशासकीय अधिकारी पदाच्या निम्न पद (Feeder Cadre) मध्ये समावेश नसलेले परंतु, प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेकामी अर्ज केलेले श्री अनिल बा.भणगे हे कृषी अधिकारी या पदावर कार्यरत आहेत.

८) प्रस्तावित प्रशासकीय अधिकारी पदाच्या निम्न पद (Feeder Cadre) मध्ये समावेश नसलेले परंतु, प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेकामी अर्ज केलेले श्री राजेंद्र सो.जगताप हे विद्युत पर्यवेक्षक असून, ते सध्या प्रभारी विभागप्रमुख, पाणी पुरवठा विभागाचे कामकाज पहात आहेत.

९) प्रस्तावित प्रशासकीय अधिकारी पदाच्या निम्न पद (Feeder Cadre) मध्ये समावेश नसलेले व रूग्णालये विभागाकडे कार्यरत असलेले श्री साहेबराव पा.लंके हे वित्त व्यवस्थापक या पदावर कार्यरत असून, सध्या ते प्रभारी लेखाधिकारी या पदावर कार्यरत आहे.
संस्थान आस्थापना व रूग्णालये आस्थापना यांची सेवाजेष्ठता यादी वेगवेगळी आहे (वर्ग ०४ कर्मचारी वगळता). रूग्णालये विभागाकडील कर्मचा-यांसाठी प्रस्तावित सेवाप्रवेश नियमांमध्ये प्रशासकीय अधिकारी पद निश्चित करणेत आलेले नाही.

१०) प्रस्तावित प्रशासकीय अधिकारी पदाच्या निम्न पद (Feeder Cadre) मध्ये समावेश नसलेले व रूग्णालये विभागाकडे कार्यरत असलेले श्री रविंद्र बा.नवले हे एच आर मॅनेजर या पदावर कार्यरत आहेत.
संस्थान आस्थापना व रूग्णालये आस्थापना यांची सेवाजेष्ठता यादी वेगवेगळी आहे (वर्ग ०४ कर्मचारी वगळता). रूग्णालये विभागाकडील कर्मचा-यांसाठी प्रस्तावित सेवाप्रवेश नियमांमध्ये प्रशासकीय अधिकारी पद निश्चित करणेत आलेले नाही.

११) प्रस्तावित प्रशासकीय अधिकारी पदाच्या निम्न पद (Feeder Cadre) मध्ये समावेश नसलेले व रूग्णालये विभागाकडे कार्यरत असलेले श्री विनोद गो.कोते हे ज्युनिअर ईडीपी मॅनेजर या पदावर कार्यरत आहेत. संस्थान आस्थापना व रूग्णालये आस्थापना यांची सेवाजेष्ठता यादी वेगवेगळी आहे (वर्ग ०४ कर्मचारी वगळता). रूग्णालये विभागाकडील कर्मचा-यांसाठी प्रस्तावित सेवाप्रवेश नियमांमध्ये प्रशासकीय अधिकारी पद निश्चित करणेत आलेले नाही.

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

प्रशासकीय अधिकारी पदावर पदोन्नतीसाठी आवश्यक असणारे Feeder Cadre (निम्न पद) मधील पदे रिक्त असल्याने व संस्थानचे सेवाप्रवेश नियम व बिंदूनामावली अंतीम झालेली नसल्याने अधिक्षक, कामगार अधिकारी, विधी अधिकारी किंवा लेखाधिकारी या पदावर पात्र कर्मचारी यांना अगोदर तदर्थ पदोन्नती द्यावी लागणार आहे. असे मत आहे.

उपरोक्त प्रस्तावात एकूण ५ उपविषय (A,B,C,D व E) अंतर्भूत आहेत. या उपविषयांबाबत स्वतंत्ररित्या, उपविषयनिहाय खालीलप्रमाणे प्रस्तावित करणेत येत आहे.

उपविषय (A) मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार श्री विजय गणपतराव रोहमारे, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) यांचा प्रशासकीय अधिकारी पदावर नेमणूक करणेबाबतचा प्रस्ताव-

१) मा.शासनाचे मान्यतेसाठी दि.२६ जुन, २०१४ रोजी सादर करणेत आलेल्या प्रारूप सेवाप्रवेश नियमांमध्ये "प्रशासकीय अधिकारी" या पदासाठी कोणत्याही शाखेचा पदवीधर ही शैक्षणिक अर्हता नमुद/ प्रस्तावित आहे. श्री रोहमारे यांनी डिप्लोमा इन इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग ही पदविका/शैक्षणिक पात्रता जून १९८२ मध्ये धारण केलेली असून, त्यांनी या तांत्रिक पदाची पदवी धारण केलेली नाही. उपरोक्त टिपणीतील अ-५ या मुद्दामधील तक्त्यामध्ये प्रशासकीय अधिकारी पदाची शैक्षणिक अर्हता व पात्रता नमूद केलेली आहे.

२) श्री रोहमारे यांनी बी.ए. ही शैक्षणिक पात्रता यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथून मे-जून- २०१८ मध्ये धारण केलेली आहे. सदरची शैक्षणिक पात्रता ही सन २०१८ मध्ये धारण केलेली असल्याने याबाबतची त्यांची सेवाजेष्ठता ज्या वर्षी पदवी धारण केलेली आहे त्यावर्षापासून लागू होईल. तसेच, श्री रोहमारे यांनी धारण केलेली बी.ए.ही पदवी त्यांच्या डिप्लोमा इन इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग या तांत्रिक शिक्षणाशी संबंधीत नाही.

३) संस्थानमार्फत मा.शासनाकडे मान्यतेसाठी प्रस्तावित करणेत आलेल्या प्रारूप सेवाप्रवेशनियमांमध्ये प्रशासकीय अधिकारी या पदासाठी तांत्रिक शैक्षणिक पात्रता/तांत्रिक विभागातील पदे दर्शविणेत आलेली नाही.

४) प्रशासकीय अधिकारी या पदावर नियुक्ती होणेकामी प्रस्तावित करणेत आलेल्या सेवाप्रवेश नियमांमध्ये Feeder Cadre पुढीलप्रमाणे दर्शविणेत आलेली आहे.

- लिपीक टंकलेखक- वरिष्ठ लिपीक- उपअधिक्षक- अधिक्षक- प्रशासकीय अधिकारी
- लिपीक टंकलेखक- वरिष्ठ लिपीक- वरिष्ठ लेखापाल- लेखाधिकारी- प्रशासकीय अधिकारी
- कनिष्ठ कामगार अधिकारी - कामगार अधिकारी - प्रशासकीय अधिकारी
- विधी अधिकारी - प्रशासकीय अधिकारी

उपरोक्त प्रशासकीय अधिकारी या पदाच्या Feeder Cadre मध्ये उपकार्यकारी अभियंता (विद्युत) या किंवा इतर तांत्रिक पदाचा समावेश नाही.

५) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे सेवाप्रवेश नियम, सुधारीत विभागनिहाय आकृतीबंध, पदोन्नतीचे पदे, पदोन्नतीची साखळी, बिंदुनामावली इत्यादी कामे प्रलंबित आहेत. सदरची कामे पुर्ण करणेकामी कार्यगटाची नियुक्ती करणेत आलेली आहे. सदर कार्यगटाचे कामकाज सुरू आहे. सदर कार्यगटाचे कामकाज पुर्ण झालेनंतर त्यास मा.तदर्थ समितीची मान्यता घेऊन मा. शासनाचे मान्यतेसाठी पाठवावी लागेल. मा.शासनाची मान्यता प्राप्त झालेनंतर संस्थान कर्मचारी यांचे Feeder Cadre तयार करून त्यानुसार बिंदुनामावली निश्चित करून सेवाजेष्ठतेचा विचार करून प्रशासकीय अधिकारी या पदाची पदोन्नतीबाबतची कार्यवाही करता येईल.असे मत आहे.

६) मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि.०७.०८.२००९ रोजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे. सदर आकृतीबंधामध्ये कार्यकारी अभियंता हे पद बांधकाम विभागाच्या आकृतीबंधामध्ये समाविष्ट करणेत आलेले आहे. श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सवानिमित्त सन २०१७-१८ मध्ये कार्यकारी अभियंता पदावर मा. शासनाकडून प्रतिनियुक्तीने श्री रविंद्र सतिष घुले यांची नेमणूक करणेत आलेली होती. त्यांचेकडे बांधकाम विभाग, विद्युत विभाग, मेकॅनिकल विभाग व पाणी पुरवठा विभाग इ. विभागांच्या पर्यवेक्षणाची जबाबदारी देण्यात आलेली होती.

७) तसेच, मा.शासनाच्या मान्यतेसाठी दि.२६ जून, २०१४ रोजी पाठविणेत आलेल्या सेवाप्रवेश नियमांमध्ये कार्यकारी अभियंता या पदावर पदोन्नतीसाठी B.E.Civil, MS-CIT व किमान १० वर्ष उपकार्यकारी अभियंता या पदाचा संस्थानमधील अनुभव आवश्यक आहे. परंतु, सध्या संस्थानमध्ये उपकार्यकारी अभियंता पदावर कार्यरत असलेले श्री रघुनाथ भागा आहेर व श्री विजय गणपतराव रोहमारे यांनी अनुक्रमे डीप्लोमा इन

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

सव्हिल इंजिनिअरींग, डीप्लोमा इन इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग ह्या तांत्रिक पदवीका धारण केलेली असल्याने ते कार्यकारी अभियंता पदाची शैक्षणिक पात्रता पुर्ण करत नाहीत.

८) सामान्य प्रशासन विभागांच्या आकृतीबंधात ५ प्रशासकीय अधिकारी पदे दर्शविणेत आलेली आहेत. बांधकाम, विद्युत, मेकॅनिकल व पाणीपुरवठा या विभागांसाठी कार्यकारी अभियंता हे तांत्रिक विभागाचे पद पर्यवेक्षणासाठी असल्याने प्रशासकीय अधिकारी पदाची सदर विभागांवर पर्यवेक्षणांसाठी आवश्यकता वाटत नाही. सदर विभागांची आस्थापनाविषयक सर्व प्रशासकीय कामे ही संस्थानचे सामान्य प्रशासन विभागामार्फतच होणार आहेत.

९) सद्यस्थितीत श्री रघुनाथ भागा आहेर, उपकार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांचेकडे तात्पुरते स्वरूपात कार्यकारी अभियंता या पदाचा अतिरिक्त प्रभार देण्यात आलेला आहे. बांधकाम विभागातील अधिका-यांमध्ये श्री आहेर हे जेष्ठतम उपकार्यकारी अभियंता आहेत. परंतु, तेही पदविका धारक आहेत. मात्र, सद्यस्थितीत दर्शन रांग प्रकल्प, शैक्षणिक संकुल प्रकल्प, श्री साईनाथ रूग्णालयाचे वरचे मजल्याचे बांधकाम, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रूम) रूमचे नुतनीकरण व इतर बांधकामाशी संबधीत प्रकल्प सुरू असल्याने श्री आहेर यांचेकडे बांधकाम, विद्युत, मेकॅनिकल व पाणीपुरवठा विभागाचे पर्यवेक्षणाची जबाबदारी तात्पुरते स्वरूपात देण्यात आलेली आहे.

१०) उपरोक्त मुद्दांचा विचार करता, सद्यस्थितीत विद्युत विभागाचे उप कार्यकारी अभियंता श्री विजय गणपतराव रोहमारे यांना प्रशासकीय अधिकारी पदावर पदोन्नती देणे उचित वाटत नाही.

११) मा. उच्च न्यायालयाच्या निकालास मुदतवाढ घेणेकामी सिव्हील ॲप्लीकेशन मा.कोर्टात सर्क्युलेशन घेणेकामी विनंती करणेत आलेली होती. त्यावर रजिस्ट्रार मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.०५/०८/२०२० रोजी खालीलप्रमाणे आदेश देण्यात आलेले आहेत.

**" The Hon'ble Lordships are pleased to reject your Circulation Note as there is no urgency with liberty to move afresh only after normal Court functioning is restored. "**

१२) मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पीटीशन क्र.४०१८/२०१९ मध्ये दि.११ मार्च, २०२० व दि.१८ मार्च, २०२० रोजी दिलेल्या निकालास अनुसरून, श्री विजय गणपतराव रोहमारे, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) यांचा प्रशासकीय अधिकारी म्हणून नेमणूक होणेकामीचा दि.०५.११.२०१५ रोजीच्या अर्जावर गुणवत्तेनुसार व नियमानुसार निर्णय होणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**उपविषय (B) रिट पिटीशन क्र.४०१८/२०१९ चे निकालाबाबत मा.तदर्थ समिती सभेपुढे प्रस्ताव सादर करणेस झालेल्या विलंबाबाबतचा प्रस्ताव-**

१. उपरोक्त प्रस्तावातील उपविषय (B) मधील परिच्छेद अ,ब (ब-1,ब-2) मधील घटनाक्रम पहाता, श्री विजय गणपतराव रोहमारे यांचे अर्जाबाबत निर्णय घेणेकामी प्रशासनामार्फत कार्यवाही करणेत आलेली आहे/ सुरू आहे. दरम्यानच्या कालावधीत कोरोना (Covid 19) विषाणूचा प्रार्दुभाव रोखणेकामी कार्यालयीन कामकाज मर्यादित कर्मचा-यांच्या उपस्थितीत सुरू होते. त्यामुळे मा.तदर्थ समितीचे सभेसमोर प्रस्ताव सादर करणेस अल्पसा विलंब झालेला आहे. याबाबत सेवानिवृत्त तत्कालीन प्रशासकीय अधिकारी व सामान्य प्रशासन विभागाचे प्रभारी प्रमुखांनी दिलगिरी व्यक्त करून मा.तदर्थ समितीची माफी मागितलेली आहे.

२. उपरोक्त प्रस्तावातील उपविषय (B) मधील परिच्छेद अ,ब (ब-1,ब-2) चा विचार करतां, श्री रोहमारे यांचे याचिका क्र.४०१८/२०१९ चे मा.न्यायालयाचे निकालाबाबत केलेली कार्यवाही/सुरू असलेली कार्यवाही विचारांत घेऊन, सेवानिवृत्त तत्कालीन प्रशासकीय अधिकारी व प्रभारी विभागप्रमुख यांना क्षमापित करून, सेवानिवृत्त तत्कालीन प्रशासकीय अधिकारी यांची सेवानिवृत्ती नंतरची देयके आदा करणेस मान्यता असावी.

**उपविषय (C) श्री संजय चौधरी, शिर्डी यांचा सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी श्री सुर्यभान विठ्ठलराव गमे यांचेबाबत तक्रार अर्जाबाबतचा प्रस्ताव-**

१. श्री. संजय चौधरी, शिर्डी यांनी त्यांचे तक्रार अर्जासोबत श्री. गमे, सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी यांचे वेतनाबाबत अनियमितता झाल्याबाबतचे पृष्ठ्यार्थ कोणतीही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. तसेच श्री. संजय चौधरी यांनी त्यांचे दिनांक नसलेल्या तक्रार अर्जात त्यांचा पूर्ण पत्ता किंवा फोन नंबर दिलेला नसल्याने त्यांचेशी संपर्क साधणे ही शक्य नाही. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक शाकाप-२०१५/प्र.क्र.५/१८(र.व का.)दिनांक २५ फेब्रुवारी,२०१५ रोजीचे परिपत्रकानुसार सदरचा तक्रार अर्ज निनावी म्हणून नस्तीबध्द करता येईल, असे मत आहे.

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

२. श्री सुर्यभान विठ्ठलराव गमे यांना देण्यात आलेल्या ०६ वेतनवाढीबाबत तत्कालीन मा. त्रिसदस्यीय समितीचे दिनांक ०८/१०/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३२४ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार तत्कालीन कार्यकारी अधिकारी श्री बाजीराव शिंदे यांनी चौकशी करून दि.०७.०८.२०१६ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर अहवाल सादर करणेत आला होता आणि मा.व्यवस्थापन समितीचे बैठकीमध्ये त्यास मान्यता दिलेली आहे. एकंदरीत सदर अहवालानूसार श्री गमे यांना देण्यात आलेल्या ०६ वेतनवाढी अनुज्ञेय ठरविणेत आलेल्या आहे. त्यामुळे सदर प्रकरणांची पुनश्चः चौकशी करण्याची आवश्यकता वाटत नाही.

**उपविषय (D) प्रशासकीय अधिकारी पदावर पदोन्नतीने नेमणुक मिळणेकामी कर्मचा-यांचे आलेल्या अर्जावर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव**

उपरोक्त प्रस्तावातील D या उपविषयातील तक्ता क्र. I मधील अ.क्र.०१ ते १३ यांनी प्रशासकीय अधिकारी या पदावर नेमणूक होणेकामी केलेल्या अर्जांवर यथोचित निर्णय होणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**उपविषय (E) प्रशासकीय अधिकारी पदाची पात्रता, Feeder Cadre (निम्न पद) व सेवाजेष्ठता यादीबाबत विभागाचा अभिप्राय व प्रस्ताव-**

१) प्रशासकीय अधिकारी पदावर पदोन्नती मिळणेकामी अर्ज केलेले अर्जदार हे वेगवेगळया संवर्गात काम करत आहेत. त्यामुळे सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती द्यावयाची झाल्यास प्रशासकीय अधिकारी पदाच्या किमान शैक्षणिक पात्रतेनुसार म्हणजे ज्या दिनांकाला शैक्षणिक पात्रता धारण केली त्या दिनांकानुसार एकत्रित सेवाजेष्ठता यादी तयार करावी लागणार आहे. तसेच, अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता दर्शविणारा तपशिल सोबत **परिशिष्ठ अ** मध्ये दर्शविलेला आहे.

२) मात्र, सद्यस्थितीत प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेकामी प्रस्तावित केलेले Feeder Cadre (निम्न पद) मध्ये नमूद केलेले अधिक्षक, विधी अधिकारी, कामगार अधिकारी व लेखाधिकारी ही पदे सध्या रिक्त आहेत.

३) प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेकामी अर्ज केलेले श्री राजतिलक द.बागवे, श्री प्रमोद पं.पुरकर, श्री प्रकाश दा.क्षीरसागर, श्री नवनाथ भा.कोते, श्री अविनाश वि.कुलकर्णी हे वरिष्ठ लिपीक असुन सध्या ते वेगवेगळया विभागांचे प्रभारी विभागप्रमुख म्हणून कित्येक वर्षापासून काम पहात असून त्यांना प्रशासकीय अधिकारी पद द्यावयाचे झाल्यास त्यांना अगोदर अधिक्षक या पदावर पदोन्नती द्यावी लागेल.

४) प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेकामी अर्ज केलेले श्री कैलास सो.खराडे हे वरिष्ठ लेखापाल असुन सध्या ते प्रभारी लेखाधिकारी म्हणून काम पहात असून त्यांना प्रशासकीय अधिकारी पद द्यावयाचे झाल्यास त्यांना अगोदर लेखाधिकारी या पदावर पदोन्नती द्यावी लागेल.

५) प्रस्तावित प्रशासकीय अधिकारी पदाच्या निम्न पद (Feeder Cadre) मध्ये समावेश नसलेले परंतु, प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेकामी अर्ज केलेले श्री रघुनाथ भा.आहेर हे उपकार्यकारी अभियंता (बांधकाम) या पदावर कार्यरत असून त्यांचेकडे सध्या कार्यकारी अभियंता या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे. प्रशासकीय अधिकारी पदाची किमान शैक्षणिक अर्हता ही शासनमान्य विद्यापीठातून पदवी ही असून, श्री आहेर यांनी डिप्लोमा इन सिव्हील इंजिनिअरींग ही पदवीका अभ्यासक्रम धारण केलेला आहे.

६) प्रस्तावित प्रशासकीय अधिकारी पदाच्या निम्न पद (Feeder Cadre) मध्ये समावेश नसलेले परंतु, प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेकामी अर्ज केलेले श्री विजय ग.रोहमारे हे उपकार्यकारी अभियंता (विद्युत) या पदावर कार्यरत आहेत.

प्रशासकीय अधिकारी पदाची किमान शैक्षणिक अर्हता ही शासनमान्य विद्यापीठातून पदवी ही असून, श्री रोहमारे यांनी डिप्लोमा इन इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग ही पदविका/शैक्षणिक पात्रता जून १९८२ मध्ये धारण केलेली असून, त्यांनी या तांत्रिक पदाची पदवी धारण केलेली नाही.

श्री रोहमारे यांनी बी.ए. ही शैक्षणिक पात्रता यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथून मे-जून- २०१८ मध्ये धारण केलेली आहे. सदरची शैक्षणिक पात्रता ही सन २०१८ मध्ये धारण केलेली असल्याने याबाबतची त्यांची सेवाजेष्ठता ज्या वर्षी पदवी धारण केलेली आहे त्यावर्षापासून लागू होईल. तसेच, श्री रोहमारे यांनी धारण केलेली बी.ए.ही पदवी त्यांच्या डिप्लोमा इन इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग या तांत्रिक शिक्षणाशी संबंधीत नाही.

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

७) प्रस्तावित प्रशासकीय अधिकारी पदाच्या निम्न पद (Feeder Cadre) मध्ये समावेश नसलेले परंतु, प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेकामी अर्ज केलेले श्री अनिल बा.भणगे हे कृषी अधिकारी या पदावर कार्यरत आहेत.

८) प्रस्तावित प्रशासकीय अधिकारी पदाच्या निम्न पद (Feeder Cadre) मध्ये समावेश नसलेले परंतु, प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेकामी अर्ज केलेले श्री राजेंद्र सो.जगताप हे विद्युत पर्यवेक्षक असून, ते सध्या प्रभारी विभागप्रमुख, पाणी पुरवठा विभागाचे कामकाज पहात आहेत.

९) प्रस्तावित प्रशासकीय अधिकारी पदाच्या निम्न पद (Feeder Cadre) मध्ये समावेश नसलेले व रूग्णालये विभागाकडे कार्यरत असलेले श्री साहेबराव पा.लंके हे वित्त व्यवस्थापक या पदावर कार्यरत असून, सध्या ते प्रभारी लेखाधिकारी या पदावर कार्यरत आहे.

१०) प्रस्तावित प्रशासकीय अधिकारी पदाच्या निम्न पद (Feeder Cadre) मध्ये समावेश नसलेले व रूग्णालये विभागाकडे कार्यरत असलेले श्री रविंद्र बा.नवले हे एच आर मॅनेजर या पदावर कार्यरत आहेत.

११) प्रस्तावित प्रशासकीय अधिकारी पदाच्या निम्न पद (Feeder Cadre) मध्ये समावेश नसलेले व रूग्णालये विभागाकडे कार्यरत असलेले श्री विनोद गो.कोते हे ज्युनिअर ईडीपी मॅनेजर या पदावर कार्यरत आहेत.

अ.नं.०९, १० व ११ मध्ये नमूद केलेले कर्मचारी हे रूग्णालये विभागाकडे कार्यरत असून, संस्थान आस्थापना व रूग्णालये आस्थापना यांची सेवाजेष्ठता यादी वेगवेगळी आहे (वर्ग ०४ कर्मचारी वगळता). रूग्णालये विभागाकडील कर्मचा-यांसाठी प्रस्तावित सेवाप्रवेश नियमांमध्ये प्रशासकीय अधिकारी पद निश्चित करणेत आलेले नाही.

प्रशासकीय अधिकारी पदावर पदोन्नतीसाठी आवश्यक असणारे Feeder Cadre (निम्न पद) मधील पदे रिक्त असल्याने व संस्थानचे सेवाप्रवेश नियम व बिंदूनामावली अंतीम झालेली नसल्याने अधिक्षक, कामगार अधिकारी, विधी अधिकारी किंवा लेखाधिकारी या पदावर पात्र कर्मचारी यांना अगोदर तदर्थ पदोन्नती द्यावी लागणार आहे. असे मत आहे.

उपरोक्त प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.४२६** **अ) मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार श्री. विजय गणपत रोहमारे, उप कार्यकारी अभियंता (विद्युत) यांना प्रशासकीय अधिकारी पदावर नेमणूक करणेबाबतच्या विषयावर चर्चा करण्यात आली. श्री. विजय गणपत रोहमारे यांचे अर्जाचा विचार करतांना उपकार्यकारी अधिकारी श्री.ठाकरे यांनी तदर्थ समितीसमोर असे प्रतिपादन केले की, दिनांक २६/०७/२०१४ रोजी शासनाला सादर करण्यात आलेल्या प्रारुप सेवाप्रवेश नियमामध्ये प्रशासकीय अधिकारी या पदाकरिता चार फिडर केडर आहेत 1. अधीक्षक, 2.लेखाधिकारी, 3. कामगार अधिकारी व 4. विधी अधिकारी परंतु अशा सर्व श्रेणींची एकत्र अशी सेवाजेष्ठता अद्याप तयार करावयाची बाकी आहे. श्री.विजय गणपत रोहमारे हे तांत्रिक संवर्गात उपकार्यकारी अभियंता (विद्युत) या पदावर कार्यरत आहेत. उपरोक्त नमुद फिडर केडर मध्ये त्यांचे पदाचा समावेश नाही. त्यामुळे त्यांना अशा पदोन्नतीच्या सेवाजेष्ठता यादीत समावेश करणे विधीसंमत नाही. सबब मा.उच्च न्यायालयास सदर कामी गुणवत्तेवर पात्रता नसल्याने अवगत करणे रास्त राहील. श्री. रोहमारे यांच्या विनंतीचा व उच्च न्यायालयाचे आदेशानुसार पदोन्नती गुणवत्तेवर देता येणार नाही, असे स्पष्ट होत आहे.**

**यावरुन तदर्थ समितीचे असे निदर्शनास आले की, संस्थानने एकत्रीत सेवा जेष्ठता यादी केलेली नाही म्हणून लवकरात लवकर अशी एकत्रीत सेवाजेष्ठता यादी तयार करुन ती तदर्थ समितीसमोर सदरील विषयासोबत ठेवण्यात यावी म्हणजे त्यांच्या अर्जावर तदर्थ समितीला विचार करता येईल असे एकमताने ठरले.**

**ब) रीट पिटीशन क्र.4018/2019 चे निकालाबाबत मा.तदर्थ समिती सभेपुढे प्रस्ताव सादर करणेस झालेल्या विलंबाबाबत चर्चा करत असतांना सर्व गोष्टींचे, अभिलेखाचे अवलोकन करता असे लक्षात येते की, श्री. बजाज, प्रभारी विभाग प्रमुख यांनी कर्तव्यात कसूर केलेली असून सेवानिवृत्त प्रशासकीय श्री. गमे यांचा या विलंबाबत सहभाग दिसून येत नाही. त्यामुळे श्री. गमे यांचे सेवानिवृत्ती नंतरचे सर्व परतावे त्यांना त्वरीत देण्यात यावेत.**

**क) श्री. संजय चैधरी, शिर्डी यांचा सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी श्री.सुर्यभान विठ्ठलराव गमे यांचे तक्रारीबाबत विचार करता असे दिसून आले की, श्री.गमे यांना दिलेल्या 5 वेतनवाढीबाबत आधीच निर्णय झालेला आहे तसेच तक्रारदार यांनी स्वत:ची ओळख लपविलेली आहे. अशा परिस्थितीत**

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

आता पूर्वी झालेल्या निर्णयाचा पुन्हा विचार करणे संयुक्तिक ठरणार नाही. करिता सदरची तक्रार दप्तरी दाखल करण्यात येत आहे, असे सर्वानुमते ठरले.

ड) प्रशासकीय अधिकारी पदावर पदोन्नतीने नेमणूक मिळणेकामी कर्मचा-यांचे आलेल्या अर्जावर चर्चा करत असतांना असे ठरले की, प्रशासकीय अधिकारी या पदासाठीचे फिडर केडर आणि संयुक्तिक सेवाजेष्ठता यादी तयार झाल्यानंतर या अर्जांचा विचार करता येईल.

इ) प्रशासकीय अधिकारी पदाची पात्रता Feeder Cadre (निम्न पद) व सेवाजेष्ठता यादी याविषयी चर्चा करतांना वर उल्लेख केल्याप्रमाणे लेखाधिकारी यांनी माहिती सांगितली व संयुक्त सेवाजेष्ठता यादी तयार केली नसल्याचे सांगितले म्हणून लवकरात लवकर अशी एकत्रीत सेवाजेष्ठता यादी तयार करुन ती तदर्थ समितीसमोर सदरील विषयासोबत ठेवण्यात यावी म्हणजे तदर्थ समितीला त्यावर विचार करता येईल असे एकमताने ठरले.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

**विषय नं.०७** प्र.विधी अधिकारी, विधी विभाग यांनी मा.तदर्थ समितीचे दि.१३ जुलै,२०२० रोजीचे सभेतील निर्णयानुसार देण्यात आलेल्या नोटीसीचा खुलासा.

**विषय नं.०८** संस्थानचे सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी श्री.सुर्यभान गमे यांचे बाबत श्री.सोमनाथ बनकर, शिर्डी बन यांचे दिनांक २२.०७.२०२० रोजीचे अर्जाबाबत.

**विषय नं.०९** कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेतंर्गत चावडी मंदिर दर्शनासाठी बंद केले असतांना महिला साईभक्ताने चावडी मंदिरामध्ये दर्शनास जाऊन केकसह सेल्फी घेतले बाबत दि.२५ जून,२०२० रोजीचे व्हिडीओ क्लीप सोशल मिडीयावर व्हायरल झालेबाबत.

**विषय नं.१०** कोते मिनिनाथ भाऊसाहेब व आंबेकर विलास अशोक यांचे दि.१६.०७.२०२० चे ई-मेलने प्राप्त झालेले "मा.उच्च न्यायालयात मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेश पालन न करण्याबाबत" असा विषय असलेले पत्र.

**विषय नं.११** श्री.अशोक कोते, शिर्डी यांचे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवसथा, शिर्डी येथील अनागोंदी कारभाराबाबत विना दिनांकाचे पत्र.

**विषय नं.१२** सुनिल जोसेफ गायकवाड यांचे दि.०१.०७.२०२० चे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा सदस्य, तदर्थ समिती, श्री साईबाबा ट्रस्ट शिर्डी यांना दिलेले तसेच सामान्य प्रशासनाकडे दि.१४.०७.२०२० रोजी प्राप्त पत्र.

**विषय नं.१३** श्री.राजु जोंधळे, शिर्डी यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्विय सहाय्यक सुनिल तांबे यांनी पदाचा गैरफायदा घेऊन मोठया रकमेचे वैद्यकीय बिल संस्थानकडून परतावा मिळणेबाबत सादर केलेबाबत विना दिनांकाचे पत्र.

**विषय नं.१४** श्री.राजेंद्र कोते, शिर्डी यांचे श्री साईबाबा संस्थानमधील बदल्या व नेमणूका व भ्रष्टाचाराचे विना दिनांकाचे पत्र.

**निर्णय क्र.४२७** उपरोक्त विषय नं.०७ ते १४ या विषयावरील चर्चा सायंकाळी ६.३० नंतर उशीर झाल्याने पुढे ढकलण्यात आली.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

**विषय नं.१५** **अकुशल, कुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी नविन लेबर कॉन्ट्रक्टर्सची नेमणूक करण्यासाठी निवीदा मागविणेस अथवा मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना दि.०१.१०.२०१९ ते दि.३०.०९.२०२० अखेर १ वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कर्मचारी पुरविणेकामी ०२ एजन्सींची नेमणूक करण्यात आलेली असून, त्यात मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. पुणे व मे.मॉडर्न फॅसेलिटि मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे यांना संस्थानचे विविध विभागांना कंत्राटी कर्मचारी पुरविण्याचे ०.००००००००००१% सर्व्हीस चार्जेस दराने कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

संबंधित लेबर कॉन्ट्रॅक्टर यांचेमार्फत संस्थानला प्रतिदिनी व मंजूर संख्येनुसार कंत्राटी पध्दतीने खालीलप्रमाणे अकुशल, कुशल कर्मचारी पुरविणेत येत आहेत.

इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्द्यांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.

| अ.नं. | एजन्सीचे नांव व आदेश | विभागांना दिलेल्या मंजूरी प्रमाणे कंत्राटी कर्मचारी संख्या | | | हजेरी पटावरील कंत्राटी कर्मचारी संख्या | | | प्रति महिना वेतन बिल खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अकुशल | कुशल | एकूण | अकुशल | कुशल | एकूण | एकूण |
| १ | मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे. जा.नं.एसएसएस/वशी-७ए/ २३०४/२०१९,दि.१३.०९.२०१९ | ६६९ | २२३ | ८९२ | ३९६ | १५३ | ५४९ | १,०९,२३,७५०/- |
| २ | मे.मॉडर्न फॅसेलिटी मॅनेजमेंट लि.पुणेजा.नं.एसएसएस/वशी७ए २३०५/२०१९,दि.१३.०९.२०१९ | ४०४ | ४८८ | ८९२ | ३०० | ३९७ | ६९७ | १,४९,३५,१४५/- |
| | एकूण (१ + २ ) - | १०७३ | ७११ | १७८४ | ६९६ | ५५० | १२४६ | २,५८,५८,८९५/- |

प्रस्तावनाः- उपरोक्तप्रमाणे पुरविणेत येणा-या कंत्राटी अकुशल, कुशल कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार महाराष्ट्र शासनाचे शॉप ॲण्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.- ०३ (मुंबई, सिकंदराबाद कार्यालयासाठी झोन नं. ०१) प्रमाणे अनुज्ञेय असणारे किमान वेतनदर व वेतनदरावर ४०% वेतनवाढ धरुन येणारे वेतनदर अधिक प्रॉव्हीडंड फंड प्रशासकीय चार्जेसह (मालकाचा हिस्सा–१३%) अधिक कंत्राटी अकुशल व कुशल कर्मचा-यांचे वेतनदराचे रक्कमेवर ०.०१% सर्व्हिस चार्ज अधिक संपूर्ण बिलाचे रक्कमेवर CGST ९ % + SGST ९% (एकूण GST१८%),अधिक सानुग्रह अनुदान ८.३३%, अधिक कामगार नुकसान भरपाई अधिनियम अंतर्गत ग्रुप इन्शुरन्स प्रिमियम (अंशदान) रक्कम संस्थानकडून देण्यात येते. तसेच दि.०१.१२.२०१८ पासून कंत्राटी अकुशल, कुशल व सरक्षा कर्मचा-यांना महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (रोजगाराचे विनियमन व सेवेच्यां शर्ती) कायदा २०१७, दि.०७.०९.२०१७ रोजीचे नोटीफिकेशन नुसार साप्ताहिक सुट्टी (Paid Weekly Off) देण्यात येत आहेत.

विभागाचा अभिप्रायः- सध्याचे लेबर कॉन्ट्रॅक्टर्सची मुदत दि.३०.०९.२०२० अखेर संपूष्टात येत असल्याने, पुढील एक वर्ष कालावधीसाठी संस्थानला दि.०१.१०.२०२० पासून ते दि.३०.०९.२०२१ अखेर या कालावधीसाठी अकुशल, कुशल कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी प्रचलित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबवून ठेकेदाराची/कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करता येईल, त्याकरीता लायसेन्सधारक व अनुभवी ठेकेदाराकडून (त्यांची ठेकेदारी कर्मचारी पुरविण्याची क्षमता किमान १००० पेक्षा जास्त आहे, ज्यांना किमान ०३ वर्षेपेक्षा जास्त पुर्वानुभव आहे व ज्यांची वार्षिक उलाढाल किमान १० कोटी पेक्षा जास्त आहे.) अशा पात्र ठेकेदारांकडून निविदा मागविणेकामी विविध वर्तमानपत्रात व संस्थानच्या संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन, ई- निविदेव्दारे निविदा मागविता येतील.

तरी पुढील एक वर्ष कालावधीसाठी संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी नवीन लेबर कॉन्ट्रॅक्टर्सची नियुक्ती करणेकामी मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता मिळालेनंतर ई-निविदा मागविणे, सदर ई-निविदा खरेदी समितीचे सभेत उघडणेस, निम्नतम निविदा धारकास मा.समितीपुढे उपस्थित ठेवून निर्णय घेणेस व मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेत मान्यता मिळालेनंतर संबधितांना कार्यादेश देणेस मान्यता असावी. ई-निविदा मागविणेकामी विविध वर्तनामपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेस व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता असावी.

किंवा

मे.बी.व्ही.जी. इंडिया लि, पुणे यांनी दि.२०.०७.२०२० रोजीचे पत्रान्वये '' आम्हाला देण्यात आलेल्या कामाची मुदत दि.३०.०९.२०२० अखेर संपुष्टात येत आहे. तरी कार्यादेशातील अट क्र.३१ नुसार संस्थानला आवश्यकता असल्यास त्यानुसार पुढील कामास मुदतवाढ देण्यात येईल असे नमूद आहे. त्यानुसार आमचे कंपनीला सदर कामास किमान १ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ दिल्यास आम्ही कार्यादेशातील अटी व शर्तीनुसार संस्थानच्या संबंधित विभागांना अकुशल व कुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणेस तयार आहे. असे नमूद केले आहे.

मे.मॉडर्न फॅसेलिटी मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे यांनी दि.२०.०७.२०२० रोजीचे पत्रान्वये ''संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल व कुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणेबाबतच्या कामास आमचे एजन्सीला दि.०१.१०.२०२०

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

पासून पुढे मुदतवाढ दिल्यास सदर मुदतवाढीच्या कालावधीत आम्ही काम करण्यात तयार आहोत. असे नमूद केले आहे.

मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२३०४/२०१९, व मे.मॉडर्न फॅसेलिटी मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२३०५/२०१९, दि.१३.०९.२०१९ अन्वये या दोन एजन्सींची नेमणूक अकुशल व कुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणेकरीता दि.०१.१०.२०१९ ते दि.३०.०९.२०२० अखेर पर्यंत कार्यादेश देण्यात आलेले आहेत. सदर दोन्ही एजन्सींना ०.००००००००१% इतके सर्व्हिस चार्जेस देण्यात येत आहे. त्यामुळे, दरमहा सदर दोन एजन्सीला एकूण बिलावर कोणतीही रक्कम सेवा आकार म्हणून अदा करण्यात येत नाही. त्यामुळे संस्थानला कोणताही आर्थिकभार पडत नाही.

प्रस्तावः- मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे व मॉडर्न फॅसेलिटी मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे या दोन्ही एजन्सीकडे कंत्राटी कामगार पुरविण्याचे काम आहे. त्याचा कालावधी दि.०१.१०.२०१९ ते दि.३०.०९.२०२० असा आहे. त्याच अटी व शर्तीवर १ वर्ष मुदतवाढ दिल्यास त्यांनी काम करण्याची तयारी दर्शविली आहे.

सदर एजन्सींला सध्या ०.००००००००१% सेवाआकार असल्याने एकूण बिलावर कोणताही सेवा आकार द्यावा लागत नाही.

त्यामुळे सदर दोन्ही एजन्सी यांना आहे त्याच अटि व शर्तीवर दि.०१.१०.२०२० पासून दि.३०.०९.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यास हरकत नाही.

तरी सदरचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४२८** **यावर सदस्य सचिव मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे मत व्यक्त केले की, सदरची एजन्सी अतिशय कमी सेवा आकार दराने किंबहुना विनामुल्य दरामध्ये काम करीत आहे. तरी त्यांना मुदतवाढ दिल्यास संस्थानवर सेवाआकाराचा कोणताही आर्थिक भार पडणार नाही. व मुदतवाढ दिल्यास निविदा प्रक्रिया राबविण्याची गरज राहणार नाही. तरी आहे त्याच एजन्सीला आहे त्याच दराने अकुशल, कुशल कंत्राटी कामगार पुरविण्यास मुदतवाढ देण्यात यावी.**

**यावर तदर्थ समितीचे अध्यक्ष तसेच सदस्य श्री. स्वामी साहेब यांचे असे मत मांडले की, संस्थानचे प्रशासन मुदतीत अशा निविदा न काढता अशा प्रकारच्या प्रकरणात वेळेवर मुदतवाढीचा प्रस्ताव तदर्थ समितीसमोर आणतात. तसेच या ठिकाणी अशा एजन्सीला दिली जाणारी मोबदला रक्कम महत्वाची नसून त्यांचेकडून श्री साईबाबांना आपली सेवा देण्याचा भाव महत्वाचा आहे. अशा परिस्थितीत दिनांक 30 सप्टेंबर 2020 पर्यंत वरील प्रक्रिया पूर्ण होणारच नाही अशीही परिस्थिती नाही. या ठिकाणी श्री. बजाज, प्रभारी विभाग प्रमुख यांनी असे प्रतिपादन केले की, लवकरात लवकर कार्यवाही केल्यास ही प्रक्रिया मुदतीत पूर्ण होवू शकते. अशा परिस्थितीत मुदतवाढीचा प्रस्ताव 2x1 मताधिक्याने अमान्य करण्यात येत आहे असा निर्णय झाला.**

**या विषयावर चर्चा करत अकुशल, कुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी नवीन लेबर कान्ट्रक्टर्सची नेमणूक करण्यासाठी निविदा मागविणेस 30.09.2020 पर्यंत मुदत आहे, या तारखेच्या आत सदरची निविदा प्रक्रिया पूर्ण करावी असे ठरले. मुदतवाढीची मागणी अमान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**विषय नं.१६** **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.११४ मधील स्वागत कक्षाचे जागेत बॅग क्लोकरुमसाठी वापरास दिलेल्या जागेच्या वापराची मुदत वाढवुन मिळणेकामी मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं.श्रीसासंएक्रेस/३१/२०२०,दि.०८.०७.२०२०.**

**विषय नं.१७** **संस्थान परिसरात साईभक्तांच्या सोईसाठी प्रसाद नॉव्हेल्टी, दुध व दुग्धजन्य पदार्थ, थंडपेय विक्री, जनरल स्टोअर्स, शालेय साहित्य इत्यादी व्यवसायासाठी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना वापरास दिलेल्या संस्थानमालकीचे विविध बारा ठिकाणचे जागा/गाळे वापराची मुदतवाढ देणेबाबत मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं.श्रीसासंएक्रेस/१९३/ २०१९, दि.१४.१२.२०१९.**

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

**विषय नं.१८** **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.शिर्डी या संस्थेमार्फत साईभक्तांच्या सेवेसाठी व सोयीसाठी संस्थान परिसरात चालवत असलेल्या विविध प्रकारच्या व्यवसायाकामीचे स्टॉल/गाळयांचे जागा वापराचे भाडे माफ होणेबाबत मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र जा.क्र.श्रीसासंएक्रेसो/१२/२०२०, दि.२०.०५.२०२०.**

**विषय नं.१९** **मौजे शिर्डी येथे श्री साईबाबा संस्थान परिसरात रेल्वे बुकींग काऊंटर सुरु करणेकामी रेल्वे विभागास विनामुल्य वापरास दिलेल्या सेवाधाम इमारतीतील दोन रुम्सच्या वापराची मुदत वाढवून मिळणेबाबत सिनियर डिव्हीजनल कमर्शियल मॅनेजर, सोलापूर यांचेकडील पत्र जा.नं.SUR/C/518/SNSI/ PRS/ 2020 दि.१४.०७.२०२०.**

**विषय नं.२०** **दर्शनरांग व्यवस्थापन कार्य प्रणाली. (टाईमबेस) मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया प्रा.लि.यांना त्यांचे कर्मचाऱ्यांचे निवासव्यस्थेसाठी संस्थानचे शांतीनिकेतन इमारतीतील वापरास दिलेल्या खोली नं.६,७ व किचन रुम अशा तीन खोल्यांचे वापरास मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.४२९** **उपरोक्त विषय नं. १६ ते २० या विषयावरील चर्चा सायंकाळी ६.३० नंतर उशीर झाल्याने पुढे ढकलण्यात आली.** **(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२१** **श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्याय,मोहटे यांना शिर्डी संस्थान परिसरात माहिती केंद्रा करीता जागा मिळणेबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्याय,मोहटे, ता.पाथर्डी यांचेकडील पत्र जा.क्र.५१/२०२०, दि.११.०२.२०२०.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना– मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास, मोहटे, ता.पाथर्डी, जि.अहमदनगर यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्रं.५१/२०२० दि.११/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये "श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास,मोहटे ही नोंदणीकृत विश्वस्त संस्था असून सदरचे देवस्थान हे माहुरगड निवासिनी रेणुकादेवीचे अत्यंत पुरातन असे स्थान आहे व येथे चौसष्ट योगिनी, दशमहाविद्या, अष्टभैरव देवदैवतांची स्थापना केलेली आहे. श्री जगदंबा मोहटा देवीचे श्री यंत्रावर आधारित भव्य असे मंदीर,पाथर्डी शहरापासून पूर्वेकडे ९ किमी.अंतरावर आहे. शिर्डी-शनि शिंगणापूर-पाथर्डी-मोहटे या रस्ता मार्गाने शिर्डीपासून मोहटे पर्यंतचे अंतर फक्त १३० किमी.एवढे आहे. राज्यातून व परराज्यातून येथे असंख्य भाविक भक्त दर्शनासाठी येत असतात. गडावर दैनंदिन नित्य पूजा,अभिषेक तसेच नवरात्रौत्सव,इतर वार्षिक उत्सव हे सातत्याने सुरु असतात. गडावर येणा-या भाविक भक्तांना देवस्थान विश्वस्त मंडळामार्फत अनेक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. ५०० भाविकांच्या निवासाची व्यवस्था असलेले भक्तनिवास येथे या न्यासाने उभारलेले आहे. तसेच विशेष अतिथी कक्ष आहे. पाथर्डी येथून गडावर येण्यासाठी मिनी बस,डांबरी रस्ता,पिण्याचे पाणी, अन्नदान, स्वच्छतागृह इ. सोयी उपलब्ध आहेत. एवढेच नव्हे तर अध्यात्मिक उन्नतीबरोबरच परिसरातील नागरीकांच्या विकासात्मक दृष्टिने व विशेषत: लहान मुलांच्या बौध्दीक विकासाच्या दृष्टिने देवस्थान मार्फत माध्यमिक विद्यालय,उच्च माध्यमिक विद्यालय व वसतीगृह चालविले जाते. त्याचबरोबर सार्वजनिक हिताच्या दृष्टिने देवस्थान मार्फत सौर उर्जा व पवन उर्जा प्रकल्प उभारले असून निसर्गाचा समतोल राखण्याच्या दृष्टिने मोठया प्रमाणावर वृक्षारोपण इ.केलेले आहे. तसेच विश्वस्त मंडळामार्फत भविष्यात भाविकांच्या व परिसरातील गोरगरीब नागरीकांच्या आरोग्य सेवेसाठी धर्मादाय दवाखाना तसेच विनामुल्य स्वरुपात भोजनप्रसाद उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट,शिर्डी या जागतिक स्थळास देश विदेशातून अनेक भक्तांचा ओघ सुरु असतो. त्याचबरोबर राज्य व परराज्यातील अनेक भाविक शिर्डीबरोबरच श्री शनि शिंगणापूर,देवगड व मोहटा देवी देवस्थान येथेही वर्षभर भेटी देत असतात. श्री मोहटा देवी देवस्थान हे अत्यंत निसर्गरम्य परिसरात गडावर वसलेले असून सदर देवस्थानच्या वतीने देण्यात येत असलेल्या व उपलब्ध सोयी सुविधा,संस्थानमार्फत सुरु असलेले विविध धार्मिक व समाजोपयोगी उपक्रम हे जास्तीत जास्त भाविकांपर्यंत, जनसामान्यांपर्यंत पोहचावेत. जेणेकरुन शिर्डी,शिंगणापूर येथे येणा-या भाविकांना या देवस्थानची व उपक्रमांची माहिती व्हावी. अहमदनगर जिल्यातील

पर्यटनवाढीला चालना मिळावी इ.विविध हेतूने मोहटादेवी देवस्थानचा प्रचार,प्रसार होणे आवश्यक आहे. या दृष्टिकोनातून शिर्डी या जागतिक स्थळी मंदीर परिसरात मोहटा देवी देवस्थानला आवश्यक ती जागा मिळाल्यास तेथे माहिती केंद्र उभारुन वरील हेतू साध्य होवू शकतो. अशा दृष्टिकोनातून मोहटा देवी विश्वस्त मंडळाने ठराव संमत केलेला आहे. तरी आपणास नम्र विनंती करण्यात येते.की, श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास,मोहटे या देवस्थानच्या विविध सोयी सुविधा,उपक्रम इ.ची जास्तीत जास्त भाविकांना माहिती व्हावी या दृष्टिने शिर्डी साईबाबा संस्थान मंदिर परिसरामध्ये श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्याय,मोहटे यांना जागा उपलब्ध करुन देण्यात यावी," असेबाबत इकडेस विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय- मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास, मोहटे, ता.पाथर्डी, जि.अहमदनगर यांचेकडील उपरोक्त पत्रास अनुसरुन खालीलप्रमाणे तीन जागांपैकी एक जागा उपलब्ध करुन देता येईल.

संस्थानचे साईनाथ छाया इमारतीतील पूर्वीचे युनियन बँक ऑफ इंडीया यांना दिलेल्या जागेत.

सेवाधाम इमारतीतील बाहेरील बाजूस १०x१० फुट साईजच्या मोकळया असलेल्या रुम नं.५७,५८, ६८, ६९,७०,७१ पैकी एक रुम.

कै.हंसाबेन विष्णुकुमार त्रिवेदी यांनी संस्थानला दान केलेल्या साई समर्पण इमारतीतील रुम नं.५ व ६ पैकी एक रुम या तीन जागांपैकी एक जागा ११ महिन्यांचे कालावधीसाठी शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील त्या मासिक भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन देता येईल.

प्रस्ताव-श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास,मोहटे,ता.पाथर्डी जि.अहमदनगर यांना

१) संस्थानचे साईनाथ छाया इमारतीतील पूर्वीचे युनियन बँक ऑफ इंडीया यांना दिलेल्या जागेत.

२) सेवाधाम इमारतीतील बाहेरील बाजूस १०x१० फुट साईजच्या मोकळया असलेल्या रुम नं.५७,५८,६८, ६९,७०,७१ पैकी एक रुम.

३) कै.हंसाबेन विष्णुकुमार त्रिवेदी यांनी संस्थानला दान केलेल्या साई समर्पण इमारतीतील रुम नं.५ व ६ पैकी एक रुम या तीन जागांपैकी एक जागा ११ महिन्यांचे कालावधीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील त्या मासिक भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन भाडेकराराने देणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४३०** **सदर प्रस्तावाबाबत समिती सदस्य सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, विषय पत्रिकेवरील विषय हा मुलत: ११ महिने व सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चीत करील अशा मासिक भाडे दराने आकारणी संदर्भात आहे. अशा प्रस्तावास मंजूरी देण्यासाठी संस्थानकडून स्वतंत्र धोरण निश्चीत करणे आवश्यक आहे. संस्थानकडून अशा प्रकारे कोणत्याही धार्मिक संस्थाना जागा आजपर्यंत देण्यात आलेली नाही. जर अशा प्रकारे प्रस्ताव मंजुर केल्यास इतर धार्मिक संस्थाच्या मागण्या देखील येतील, व त्या नाकारता येणार नाही. सबब धोरणात्मक ठराव केल्याशिवाय सदर प्रस्तावाबाबत निर्णय करणे विधिवत नाही. तरी इतर धार्मिक देवस्थानांना जागा देण्याबाबत प्रथम धोरण व नियमावली निश्चीत करावी व त्या संदर्भात निर्णय झाल्यानंतर सदर प्रस्तावाचा विचार करावा. मात्र समिती सदस्यांचे असे लक्षात आले की, संस्थान मालकीच्या विविध मालमत्ता व्यक्ती संस्था इत्यादि यांना कुठलेही धोरण नसतांना नाममात्र दरावर दिल्या आहेत. अशा परिस्थितीत जर अहमदनगर जिल्हयातील एक नोंदणीकृत न्यास अशी मागणी भक्तांना माहिती व्हावी या उद्देशाने करत असेल तर धोरण व नियम नाही असे दाखविणे योग्य नाही.**

**यावर तदर्थ समितीचे सदस्य श्री. स्वामी साहेब यांनी असे प्रतिपादन केले की, सदरचा विषय दरमहा नाममात्र भाडे रु.500/- (वीज बील व पाणीपट्टी व्यतिरिक्त) आकारुन मंजुरी देण्यात यावी, याविषयावर संस्थान प्रशासनाने कोणताही लेखी आक्षेप नोंदविलेला नाही. यावर सदस्य सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुन्हा प्रतिपादन केले की, संस्थानची जागा इतर धार्मिक संस्थाना देणेबाबत धोरणात्मक निर्णय घेतल्यानंतर सदरचा प्रस्ताव मंजुर करणे योग्य राहील. यावर श्री.स्वामी साहेब यांनी असे प्रतिपादन केले की, संस्थान प्रशासनाने याबाबत सर्व समावेशक असा अभ्यासपुर्वक धोरणात्मक निर्णयाचा प्रस्ताव तदर्थ समितीपुढे आणावा. तदनंतर पुढे त्यावर यथायोग्य निर्णय घेता येईल.**

**या विषयावर चर्चा करतांना अध्यक्ष व श्री.स्वामी साहेब यांनी असा निर्णय घेतला की, श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास, मोहटे यांना शिर्डी संस्थान परिसरात माहिती केंद्र सुरु करण्याकरिता विभागाच्या अभिप्रायामध्ये दर्शविलेली क्र. 2 मधील सेवाधाम इमारतीतील बाहेरील बाजुची 10x10**

फुट मोजमापाची खोली क्र.57 ही दरमहा नाममात्र भाडे रु.500/- (वीज बील व पाणीपट्टी व्यतिरिक्त) आकारुन प्रत्येकी 11 महिन्याच्या करारानंतर नुतनीकरणाच्या अटीवर 11 वर्षासाठी देण्यास मंजुरी देण्यात आली.

सदरचा श्री. जगदंबा देवी सार्वजनिक न्यासास माहिती केंद्र सुरु करण्यासाठी सेवाधाम येथील वरील जागा देण्याचा निर्णय हा तदर्थ समितीचे अध्यक्ष व एक सदस्य यांचे 2x1 मताधिक्याने घेण्यात आला.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.२२** माहे फेब्रुवारी-२०२० व मार्च-२०२० जमा खर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत.

**विषय नं.२३** योगीराज सद् गुरु गंगागिरीजी महाराज संस्थान ट्रस्ट यांना रु.१.२५ कोटी आर्थिक मदत देणेबाबत.

**विषय नं.२४** करनिर्धारण वर्ष २०१८-१९ व २०१९-२० ची आयकर रिफंड रक्कम रु.२२,१९,५९,०४०/- संस्थानचे बँक खात्यात जमा झाल्याची नोंद घेणे व गुंतवणूकीबाबत.

**विषय नं.२५** अ) लॉकडाऊनचे काळात संस्थानला उत्पन्न फारसे नसतांना कर्मचा-यांचे पगार करणेसाठी व रुई येथील जमीन खरेदी करणेसाठी कोणत्या रकमा वापरल्या बाबत विचारणा करणारे पत्र.

ब) लॉकडाऊन झालेपासून किती मुदत ठेवी ठेवल्या, किती मुदत ठेवींच्या मुदती संपल्या, मुदत संपलेल्या मुदतठेवीतील रकमांचा विनियोग कसा केला व तो विनियोग करण्याबाबत तदर्थ समितीची परवानगी घेतली काय. याकाळात किती मुदतठेवी मोडल्या, मोडल्या असतील तर त्यासाठी तदर्थ समितीची परवानगी घेतली काय?

क) Trust Corpus Fund बाबत संस्थानची भुमिका.

**विषय नं.२६** संस्थानचे आयकर कामकाजाकरीता कर सल्लागार सीए आर.आर.मुणी, मुंबई यांची फी ठरविणेबाबत.

**विषय नं.२७** श्रींचे समाधी मंदिरातील तळघरात भिंतीचे खालील भागातुन झिरपणारे पाणी बंद करणेसाठी करण्यात आलेल्या उपयायोजनांबाबतचा अहवाल.

**निर्णय क्र.४३१** उपरोक्त विषय नं.२२ ते २७ या विषयावरील चर्चा सायंकाळी ६.३० नंतर उशीर झाल्याने पुढे ढकलण्यात आली.

---

**विषय नं.२८** संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं.२४५/१ पै.मधील नविन साठवण तलावामध्ये गोदावरी उजवा तट कालव्यामधुन पाणी घेणेकरीता जलवाहिनी टाकणे व इतर अनुषंगीक कामाकरीता महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांची सल्लागार म्हणून करण्यात आलेली नियुक्ती रद्द करुन नव्याने सल्लागार नियुक्ती करीता या क्षेत्रातील तांत्रिक सल्लागाराकडून e-RFP (e-Request for proposal) प्रस्ताव मागविणेबाबत.

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पूरविणे, तसेच पोट कलम १ (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

**मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय:-**

१. दि.३०/०१/२०१९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्र.४५ संमत झालेला आहे.

"...यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.२४५/१ मधील नवीन साठवण तलावामध्ये पाणी घेणेकरीता ९०० mm व्यासाची पाईपलाईन व इतर अनुषंगिक कामे करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करणेस मान्यता देण्यात आली. तसेच याकामी त्यांना आदा करावयाचे फी बाबतचा सविस्तर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले."

२. दि.११/०५/२०२० रोजीचे मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्र.३०३ संमत झालेला आहे.

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

"...सदरचा विषय स्थगित ठेवण्यात आला. तसेच संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.२४५/१ पै. मधील नविन साठवण तलावामध्ये गोदावरी उजवा तट कालव्यामधून पाणी घेणेकरीता जलवाहिनी टाकणे व इतर अनुषंगीक कामांकरीता महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांचे सल्लागार म्हणून करणेत आलेली नियुक्ती रद्द करुन नव्याने सल्लागार नियुक्ती करीता या क्षेत्रातील तांत्रिक सल्लागारांकडून e-RFP (e-Request for Proposal) प्रस्ताव मागवण्याबाबत आभ्यासपूर्वक सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेसमोर ठेवणेत यावा, असे ठरले".

३. दि.१३/०७/२०२० रोजीचे मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्र.३६५ संमत झालेला आहे.

"...यावर सविस्तर चर्चा होवून, प्रस्तुत प्रकरणी मा. व्यवस्थापन समितीने वेळोवेळी घेतलेले निर्णय व महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांचेशी याबाबत झालेला पत्रव्यवहार यासह आभ्यासपूर्वक सविस्तर प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर ठेवण्यात यावा, असे ठरले".

प्रस्तावना:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालकीचे मौजे निमगांव को-हाळे येथिल गट नं.२४५/१ मध्ये देणगीदार साईभक्त यांचे देणगीतून पाणीपुरवठा विभागामार्फत नविन साठवण तलावाची निर्मिती करणेत आलेली आहे. सदरहू तलावाचे काम पूर्ण झाले असून गोदावरी उजवा तट कालव्यापासून पाईपलाईन टाकणेचे काम बाकी आहे.

वर नमूद दि.१३/०७/२०२० रोजीचे मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेतील निर्णय क्र.३६५ अनुसार मा. व्यवस्थापन समितीने वेळोवेळी घेतलेले निर्णय वर नमूद केले असून व महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांचेशी याबाबत झालेल्या पत्रव्यवहाराचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) पाणीपूरवठा विभागाने दि.०७/०१/२०१९ च्या आदेशान्वये इकडील विभागास खालील कामे पूर्ण करुन त्याबाबतचा लेखी अहवाल सादर करणेबाबत कळविले होते.

अ) साठवण तलावात पाणी घेणेकरीता ९०० एम.एम व्यासाची पाईपलाईन टाकणेबाबत इस्टीमेट तयार करुन कार्यवाही करणे (९०० एम.एम व्यासाची पाईपलाईन टाकणे, मीटर रुम बांधणे, वॉटर फ्लो मीटर, कॅनॉल गेट तयार करणे व ठिकठिकाणी चेंबरचे बांधकाम करणे).

ब) नविन साठवण तलाव निमगांव-को-हाळे गट नं.२४५/१ ते जुना साठवण कनकुरी फिल्टर प्लॅन्टपर्यंत पाईपलाईन टाकणेकरीता नाली खोदाई करणे.

२) उपरोक्त कामे करणेसाठी खालीलप्रमाणे कार्यवाहीचे टप्पे पूर्ण करणे आवश्यक आहे.

- कॅनॉल, नविन साठवण तलाव, जुना साठवण तलाव यांचे लोकेशन, अलाईनमेंट व लेव्हल घेणेसाठी टोटल स्टेशन सर्व्हे करणे.
- पाईपलाईन डिझाईन करणे, इनटेक वेल तयार करणे, मीटर रुमचे प्लॅन व डिझाईन करणे, वॉटर फ्लो मीटर, कॅनॉल गेट डिझाईन करणे, मोजमापासहं नकाशे तयार करणे इ.
- वर नमूद कामांचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन त्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची तांत्रीक मान्यता घेणे व मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे.
- ई-निविदा प्रक्रिया राबविणे.

वर नमूद कामे ही वैशिष्टपूर्ण (Specialized) स्वरुपाची असून त्यासाठी आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ बांधकाम विभागाकडे उपलब्ध नसल्याने संस्थानचे मौजे निमगाव-को-हाळे येथील गट नं.२४५/१ पै. मधील नवीन साठवण तलावामध्ये पाणी घेणेकरीता पाईपलाईन टाकणे व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करणेकामाचा प्रस्ताव दि.३०/०१/२०१९ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात आला होता.

दि.३०/०१/२०१९ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्र.४५ संमत झालेला आहे.

*"...यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.२४५/१ मधील नवीन साठवण तलावामध्ये पाणी घेणेकरीता ९०० mm व्यासाची पाईपलाईन व इतर अनुषंगिक कामे करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांची सल्लागार म्हणून नियुक्तीकरणेस मान्यता देण्यात आली. तसेच याकामी त्यांना आदा करावयाचे फी बाबतचा सविस्तर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले."*

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

३) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, संगमनेर यांना जा.क्र.७१८/२०१९, दि.०१/०६/२०१९ अन्वये पत्र देणेत येवून खालीप्रमाणे माहिती मागविणेत आली.

*".. .. उपरोक्त विषयाबाबत संस्थानचे मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेत संमत करणेत आलेल्या निर्णय क्र.४५ अन्वये महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करणेस मान्यता देणेत आली आहे.*

*उपरोक्त प्रकल्पासाठी सर्वेक्षण, डिझाईन, सविस्तर अंदाजपत्रक तसेच इतर अनुषंगिक तपशिल तयार करणेची कार्यवाही सुरु करणेत यावी. तसेच सध्या श्री साईबाबा संस्थान शिर्डी, कोपरगांव व शिर्डी शहरासाठी निळवंडे धरणातून थेट पाईपलाईनव्दारे पाणीपुरवठा करणेचे प्रस्तावित संयुक्त पाणी पुरवठा योजना टप्पा क्र.०१ चे कामास सुरूवात झालेली आहे. सदर कामास संस्थानमार्फत आपली प्रकल्प सल्लगार म्हणून नियुक्ती करणेत आली आहे. सदर योजनेचे टप्पा क्र.०१ चे काम The Indian Hume Pipe Co. Ltd., Ahmednagar या ठेकेदारास बहाल करणेत आले असून सदर काम सध्या प्रगतीत आहे. सदर कामाचे निविदेत पाईपलाईन टाकणे कामाचा समावेश आहे. सदर कामातील पाईपलाईन टाकणेचे कामात काही बचत होणार आहे किंवा नाही? तसेच जर बचत होणार असेल तर निविदेतील अटी व शर्तीनूसार सदर मौजे निमगाव को-हाळे, ता.राहाता येथिल गट नं.२४५/१ मधील नवीन साठवण तलावामध्ये पाणी घेणेकरीता या निविदेच्या माध्यमातून सदर नविन जलवाहीनी टाकता येईल का?*

*याबाबत आपण इकडील कार्यालयास मार्गदर्शन करावे म्हणजे सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करता येईल. त्यासाठी आवश्यक ती माहिती संस्थानमार्फत आपणास उपलब्ध करणेत येईल."*

४) याबाबत कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संगमनेर यांनी जा.क्रं./तांशा-३/१३१०/२०१९, दि.२१/०६/२०१९चे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

१. *निमगांव को-हाळे येथील गट क्र.२४५/१ मधील साठवण, तलाव भरणेकामी सध्या मंजूर (निळवंडे धरण उदभव) योजनेतून भरण्याची तरतूद नाही, तसेच या कामी लागणारे पाईपाचा समावेश मंजूर प्रकल्प आराखडयात धरण्यात आलेला नाही, त्यामुळे या निविदेमधून सदर पाईपलाईन टाकणे असंभव आहे.*

२. *तथापि, सदर साठवण तलाव भरावयाचा झाल्यास त्याची क्षमता, त्याची FSL,LSL या पातळया, आवश्यक आहेत, तसेच सदर ठिकाणी पाणी आणणेकामी गोदावरी उजवा कालव्यावर Canal Intake कोठे बांधण्यात येईल, त्यास पाटबंधारे विभागाची परवानगी कॅनालच्या FSI, LSL या पातळ्या ज्यावरुन कॅनाल ते साठवण तलाव या पाईपचे संकल्पन करणे सोयीस्कर होईल.*

३. *तसेच सदर कामाचा मंजूर प्रकल्प आराखडयात तसेच IHP कं. (The Indian Hume Pipe Co. Ltd., Ahmednagar) यांचे निविदेत समावेश नसल्याने त्यास प्रथम शिर्डी संस्थान विश्वस्त व्यवस्थेची मंजुरी घ्यावी लागेल, तद्नंतर उपरोक्त कामांचे स्वंतत्र अंदाजपत्रके करुन त्यास मान्यता घेणे आवश्यक आहे.*

४) वरील दि.३०/०१/२०१९ चे मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयाचे अनुषंगाने मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, नाशिक यांना जा.क्र.२०७६/२०१९, दि.२९/०८/२०१९ अन्वये सदर कामाचे नियुक्ती पत्र देणेत आले आहे.

५) तथापी तदनंतर मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, नाशिक यांनी दि.०६/०९/२०१९ (आवक दि.१२/०९/२०१९) चे पत्रान्वयेखालीलप्रमाणे कळविले,

".. .. वाढीव श्री साईबाबा संस्थान शिर्डी, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा (निळवंडे धरण उद्भव) या योजनेचे प्रकल्पव्यवस्थापन सल्लागार शुल्कापोटी उर्वरीत रक्कम रू.६,२७,१५,४१३/- मात्र म. जि. प्रा. कडे त्वरीत भरणा करणेत यावी. सदर शुल्काची रक्कम भरल्यानंतरच वरील विषयांकीत कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लगार म्हणून काम करणेबाबत निर्णय घेण्यात येईल".

७) तसेच सदर प्रकरणी मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, नाशिक यांना संस्थानकडील जा.क्र.२७८३, दि.१९/१०/२०१९ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविणेत आले,

*".. .. वरील विषयांकीत काम व वाढीव श्री साईबाबा संस्थान शिर्डी, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा (निळवंडे धरण उद्भव) योजना हे प्रकल्प वेगवेगळ्या स्वरूपाचे आहेत. त्याकरिता आपणास देण्यात आलेले आदेश देखील स्वतंत्र आहेत. त्यामुळे या दोन्ही प्रकल्पांसाठी प्रकल्प व्यवस्थापन शुल्काचा संबंध जोडणे संयुक्तिक होणार नाही. तरी वरील विषयांकीत कामी आपण सर्व्हेक्षण, डिझाईन, सविस्तर अंदाजपत्रक लवकरात लवकर सादर करावे, जेणेकरुन ई-निविदा राबविणेची कार्यवाही सुरु*

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

*करता येईल. तसेच या कामाचे फी चा प्रस्ताव देखील या कार्यालयाकडे सादर करावा म्हणजे त्यास संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करता येईल."*

८) तसेच मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, नाशिक यांना संस्थानकडील पत्र क्र.जा.क्र.३५७४, दि.१०/१२/२०१९ चे पत्रान्वये, उक्त कामाबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा करणेसाठी शिर्डी येथे दि.१७/१२/२०१९ राजी सकाळी ११:०० वाजता संस्थानचे कार्यालयात उपस्थित राहणेबाबत कळविणेत आले होते. तथापि सदर वेळी ते उपस्थित राहू शकले नाही.

यावरुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना वरील विषयांकित प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम करण्यात स्वारस्य नसल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर प्रकल्प लवकर कार्यान्वित होण्याचे दृष्टीने संस्थानमार्फत या क्षेत्रातील खाजगी तांत्रिक सल्लागाराची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणे उचित होईल, असे मत आहे.

त्याकरीता मौजे निमगांव-को-हाळे येथिल गट नं.२४५/१ पै. मधील नविन साठवण तलावामध्ये गोदावरी उजवा तट कालव्यामधून पाणी घेणेकरीता जलवाहीनी टाकणे व इतर अनुषंगीक कामांकरीता महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांना सल्लागार म्हणून नियुक्तीसाठी देणेत आलेला नियुक्ती आदेश रद्द करून सदर कामासाठी सल्लागार नियुक्तीकरीता ई-आरएफपी प्रस्ताव मागविणेत यावेत असे मत आहे.

याबाबत नव्याने नियुक्त करावयाचे सल्लागाराची कार्यकक्षा (Scope of Services) खालीलप्रमाणे असेल.

- Total station survey of balancing tank & canal area including alignment of the proposed pipeline.
- Workout L-section of the pipeline.
- Preparing the Hydraulic design.
- Submission of detailed estimate & drawings.
- Submission of draft tender papers and evaluation of bids.
- Periodic supervision and certification of the contractor's bills.

**प्रस्ताव:-** तरी मौजे निमगांव-को-हाळे गट नं.२४५/१ पै. मधिल नविन साठवण तलावामध्ये गोदावरी उजवा कालव्यातून पाणी घेणेसाठी Meter Room, DI Pipe, Intake Well व इतर अनुषंगीक बाबींचे कामांसाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांना दि.२९/०८/२०१९ रोजी देणेत आलेला सल्लागार नियुक्तीचा आदेश रद्द करणेस तसेच सदरकामी सर्वेक्षण, संकल्पन, सविस्तर अंदाजपत्रक, नकाशे, निविदा प्रपत्रे तयार करणे, कामावर देखरेख ठेवून ठेकेदार यांची बिले प्रमाणित करणे या व इतर अनुषंगीक सेवा प्राप्त करणेसाठी नव्याने सल्लागार नियुक्तीकरीता वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे e-RFP (e-Request for Proposal) प्रस्ताव मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.४३२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव-को-हाळे गट नं.२४५/१ पै. मधिल नविन साठवण तलावामध्ये गोदावरी उजवा कालव्यातून पाणी घेणेसाठी Meter Room, DI Pipe, Intake Well व इतर अनुषंगीक बाबींचे कामांसाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांना दि.२९/०८/२०१९ रोजी देणेत आलेला सल्लागार नियुक्तीचा आदेश रद्द करणेस तसेच सदरकामी सर्वेक्षण, संकल्पन, सविस्तर अंदाजपत्रक, नकाशे, निविदा प्रपत्रे तयार करणे, कामावर देखरेख ठेवून ठेकेदार यांची बिले प्रमाणित करणे या व इतर अनुषंगीक सेवा प्राप्त करणेसाठी नव्याने सल्लागार नियुक्तीकरीता वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे संस्थानचे www.sai.org.in संकेतस्थळावर e-RFP (e-Request for Proposal) प्रस्ताव मागविणेस मान्यता देण्यात आली.**

**यावेळी समितीच्या असे निदर्शनास आले की, संस्थानचे सदर कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांचा सकारात्मक प्रतिसाद दिसुन येत नाही. (कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

विषय नं.२९ **शिर्डी सर्व्हे नं. १/१ मधील रुई रस्त्यालगत हॉटेल तुलसी समोर असलेल्या शिर्डी नगरपंचायत यांचे मालकीचे मोकळया जागेतील दुरवस्था झालेली मुतारी पत्राशेड बांधकाम पाडलेबाबत.**

निर्णय क्र.४३३ **सदर विषयावरील चर्चा सायंकाळी ६.३० नंतर उशीर झाल्याने पुढे ढकलण्यात आली.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

**विषय नं.३०** **संस्थानच्या भांडार विभागाकडे शिल्लक असलेले खाद्यतेल पुरवठाधारक मे.कैलास फुड अँन्ड जनरल स्टोअर्स, सातारा यांना परत करणेबाबत.**

प्रस्ताव- संस्थानकडून साईभक्तांना प्रसादभोजन तयार करण्यासाठी खादयतेल वापरण्यात येते. सदर खादयतेल प्रसादालय विभागाचे मागणीप्रमाणे खरेदी विभागामार्फत वार्षिक ई-निविदा पध्दतीने खरेदी प्रक्रिया करुन मासिक पध्दतीने खरेदी करण्यात येते. त्याचा साठा भांडार विभागाकडे असतो. सन २०१९-२०२० वर्षात मे कैलास फुड अॅण्ड किराणा जनरल स्टोअर्स, सातारा यांना खादयतेल(सुर्यफुल तेल) पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. तसेच सन २०२०-२१ ची खादयतेल खरेदी प्रक्रिया सध्या खरेदी विभागामार्फत चालू आहे.

देशभरात कोरोना व्हायरस प्रादुर्भावामुळे लॉकडाऊन करण्यात आले होते. त्यामुळे दि.१७.०३.२०२० पासुन श्री साईबाबा मंदिर व साईभक्तांना देण्यात येणा-या प्रसाद भोजन, लाडू प्रसाद व कॅन्टीन सेवाही बंद करण्यात आल्या होत्या. अजूनही कोरोना व्हायरस प्रादुर्भावामुळे महाराष्ट्रात दि.३१ जुलै २०२० पर्यंत Lockdown वाढविण्यात आलेले आहे.

संस्थानचे प्रसादालय Lockdown मुळे साईभक्तांसाठी बंद ठेवण्यात आलेले आहे. तसेच राज्यातील कोरोना प्रार्दुभावाची सध्याची परिस्थिती विचारात घेता सध्या सुरू असलेले Lockdown पुढे वाढू शकते किंवा लॉकडाउन शिथील केले तरी शिर्डी येथे मोठया प्रमाणावर साईभक्तांची गर्दी होण्याची शक्यता नाही किंबहुना कोराना प्रादुर्भावामुळे गर्दी होण्यास प्रतिबंध राहील. असे वाटते.

लॉकडाऊन शिथिल होऊन मंदिर जरी चालू झाले तरी सुरुवातीचे टप्प्यामध्ये साधारण दिवसाला फक्त ३००० ते ५००० पर्यत साईभक्तांना दर्शनासाठी शासनाकडून निर्देशित केले जाईल असे वाटते.

संस्थानच्या भांडार विभागामध्ये सध्या खालीलप्रमाणे खादयतेलाचा साठा आहे.

| अ.नं. | तपशिल | एकूण साठा(किलो) | प्रती किलो दर | एकूण किंमत | वापराची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | खादयतेल | १,८०० | ९२.५० | १,६६,५००/- | ३०.०९.२०२० |
| २ | खादयतेल | १९,२५० | ९२.५० | १७,८०,६२५/- | ३१.१०.२०२० |
| एकूण | | २१,०५० | | **१९,४७,१२५/-** | |

सध्या प्रसादालयात महिन्याकाठी अंदाजे फक्त १८ क्विंटल खादयतेलाचा वापर केला जातो. प्रसादालयाकडून त्यांना सप्टेंबर २०२० अखेर किती खादयतेल लागेल याबाबत लेखी पत्राद्वारे माहिती मागविली असता प्रसादालय विभागाने दि.२३/७/२०२० चे पत्राने ३००० किलो तेल त्यांना सप्टेंबर अखेर लागेल आणि प्रसादालय चालू झाले तर अंदाजे ४५०० किलो तेल लागेल असे कळविलेले आहे.

संस्थानकडे शिल्लक असलेले खादय तेलाची वापराची अंतिम मुदत ही ३१ ऑक्टोबर, २०२० आहे तसेच महाराष्ट्र राज्यातील सध्याची कोरोना प्रादुर्भावाची स्थिती पाहता प्रसादालय चालू होणे/ न होणे याबाबीची सध्या काहीच खात्री देता येत नाही व संस्थानकडे सदर खादयतेल परत करणेसाठी हाताशी पुरेसा वेळ आहे या बाबी विचारात घेऊन संस्थानच्या आर्थिक हिताचा विचार करता, वरील तेलाचे साठयातून ३०५० किलो खादय तेल संस्थानकडे प्रसादालय वापरासाठी ठेवून १८,००० किलो तेल खादयतेल पुरवठादार मे कैलास फुड अॅण्ड किराणा जनरल स्टोअर्स, सातारा यांना त्यांनी ज्या दराने संस्थानला तेल पुरविले आहे त्याच दराने ते परत करावे असे मत आहे.

मे कैलास फुड अॅण्ड किराणा जनरल स्टोअर्स, सातारा यांना याबाबत खादयतेल परत करणेबाबत विचारणा केली असता त्यांनी दि.२२.०७.२०२० रोजी खालीलप्रमाणे मेलव्दारे कळविले आहे.

" वरील विषयानूसार आपल्या संस्थान दि.२१.०७.२०२० रोजी ई-मेलव्दारे सूर्यफुल तेल शिल्लक असलेबाबत कळविले होते तरी सदरचे खादयतेल संस्थानकडून पोहोच मिळावा. तसेच ट्रान्सपोर्ट खर्च संस्थानने सहन करावे व GST मध्ये सवलत मिळावी सदर तेलाचे पेमेंट संस्थानकडून पोहोच झाल्यावर आम्ही RTGS व्दारे पेमेंट करू ही विनंती "

वरील पुरवठादाराचे विनंती अर्जाचा विचार करता यामध्ये त्यांनी जीएसटी सवलत, खादयतेल सातारा येथे पोहोच करणे व सदर तेलाचे पेमेंट सातारा येथे तेल पोहोच केलेनंतर करणे या तीन मागण्या दिसून येतात.

यातील पुरवठादाराची GST मध्ये सवलत मिळणेची मागणीबाबत श्री.अंदानी, सी.ए. अहमदनगर यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी संस्थानकडून पुरवठादाराला खादयतेल परत केलेवर पुरवठादाराने त्याची

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्द्यांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

क्रेडिट नोट तयार करावी म्हणजे त्यांना त्यांनी भरलेली GST रक्कम परत मिळेल, त्यामुळे GST मध्ये संस्थानकडून सवलत देण्याचा प्रश्न उदभवत नाही.

पुरवठादाराची दुसरी मागणी तेलाचे डबे सातारा येथे पोहच करणेबाबतचे वाहतूक खर्चाची मागणी विचारात घेता वाहतूक खर्चासाठी साधारण २० ते २५ हजार पर्यत ट्रान्सपोर्ट खर्च अपेक्षित आहे. संस्थानचा शिल्लक खादयतेलाचा साठा किंमत रू.१६,६५,०००/- आहे. हा साठा परत जाऊन त्यापोटीची रक्कम संस्थानला परत मिळणेसाठी संस्थानकडून या मागणीचा सकारात्मक विचार व्हावा असे मत आहे. शिर्डी ते सातारा खादय तेल वाहतूक खर्चासाठी अंदाजे रक्कम रू.२५,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

पुरवठादाराची तिसरी मागणी तेलाची गाडी पुरवठादाराकडे पोहोच झालेनंतर गाडी अनलोड होण्यापूर्वी लगेचच RTGS करावे लागेल हे त्यांना कळविता येईल.

इतःपर संस्थानचे प्रसादालयाला खादयतेलाची गरज पडल्यास दरम्यानचे काळात संस्थानची खादयतेलासाठीची नवीन ई-निविदा प्रक्रिया अंतीम होईल. त्यातील न्युनतम दरधारकाकडून खादयतेलाची खरेदी करता येईल.

वरील नमुद वस्तुस्थिती विचारात घेता खादयतेल १८० क्विंटल पुरवठाधारक मे कैलास फुड ॲण्ड किराणा जनरल स्टोअर्स, सातारा यांना परत करणेस व त्यापोटीची एकूण रुक्कम रु.१६,६५,०००/- स्विकारणेस व याकामीचा वाहतूकीसाठीचा येणारा खर्च संस्थानमार्फत करणेस मंजुरी मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४३४** **संस्थानच्या भांडार विभागाकडे शिल्लक असलेले खाद्यतेल पुरवठाधारक मे.कैलास फुड ॲन्ड जनरल स्टोअर्स, सातारा यांना परत करणेबाबत मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची चक्रिय पध्दतीने मान्यता घेण्यात आलेली असुन आजचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.०६ म्हणून नोंद घेण्यासाठी सादर केलेला असल्याने सदरचा विषय मागे घेण्यात आला.**

**(कार्यवाही-भांडार विभाग)**

---

**विषय नं.३१** **संस्थानच्या भांडार विभागाकडे शिल्लक असलेले गाईचे शुध्द तुप पुरवठाधारक मे.हर्ष फ्रेश डेअरी प्रा.लि., हरिव्दार यांना परत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानकडून साईभक्तांना लाडू व बुंदी प्रसाद तयार करण्यासाठी गाईचे शुध्द तुप वापरण्यात येते. सदर गाईचे शुध्द तुप लाडू व बुंदी प्रसाद निर्मिती विभागाचे मागणीप्रमाणे खरेदी विभागामार्फत वार्षिक ई-निविदा पध्दतीने खरेदी प्रक्रिया करुन मासिक पध्दतीने खरेदी करण्यात येते, त्याचा साठा भांडार विभागाकडे असतो.

संन २०२० वर्षात मे.हर्ष फ्रेश डेअरी प्रा.लि., भगवानपुर, हरिव्दार, यांचेकडून प्रथम २७ जानेवारी ते २६ फेब्रुवारी, २०२० या एक महिन्याचे कालावधीसाठी १,००० क्विंटल गाईचे शुध्द तूप खरेदी करण्यात आले होते. तसेच १० मार्च ते ३१ मार्च, २०२० या कालावधीसाठी १,१०० क्विंटल गाईचे शुध्द तूपाचा पुरवठा आदेश दिला होता. त्यापैकी ७४९.५५ क्विंटल गाईचे शुध्द तुप खरेदी करण्यात आले होते. त्यानंतर लॉकडाऊन असल्यामुळे पुढील पुरवठा आदेशही देण्यात आलेला नाही.

वरील खरेदी केलेल्या शुध्द तूपापैकी संस्थानच्या भांडार व लाडू निर्मिती विभागाकडे सध्या खालीलप्रमाणे गाईचे शुध्द तुप साठा आहे.

| अ.नं. | तपशिल | एकूण साठा क्विंटल | प्रती क्विंटल दर | एकूण किंमत | वापराची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | गाईचे शुध्द तुप- बॅच नं.४ | ९.५० | २६,१५०/- | २,४८,४२५/- | १५.१०.२०२० |
| २ | गाईचे शुध्द तूप (लाडू विभागाकडील साठा)बॅच नं.४ | ४६.६५ | २६,१५०/- | १२,१९,८९७.५० | १५.१०.२०२० |
| ३ | गाईचे शुध्द तुप – बॅच नं.५ | २५०.०५ | २६,१५०/- | ६५,३८,८०८/- | ३१.१०.२०२० |
| ४ | गाईचे शुध्द तुप – बॅच नं.९ | ३७५.०० | २६,१००/- | ९७,८७,५००/- | ०५.१२.२०२० |
| ५ | गाईचे शुध्द तुप – बॅच नं.११ | ३७४.५५ | २६,१००/- | ९७,७५,७५५/- | १७.१२.२०२० |
| | एकूण- क्विंटल | १,०५५.७५० | | २,७५,७०,३८५.५० | |

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

देशभरात कोरोना व्हायरस प्रादुर्भावामुळे लॉकडाऊन करण्यात आले होते. त्यामुळे दि.१७.०३.२०२० पासुन श्री साईबाबा मंदिर व साईभक्तांना देण्यात येणा-या लाडू व बुंदी प्रसाद सेवाही बंद करण्यात आल्या होत्या. त्या अजूनही साईभक्तांसाठी बंद आहेत. तसेच महाराष्ट्रात दि.३१ जुलै २०२० पर्यंत Lockdown वाढविण्यात आलेले होते व नुकताच महाराष्ट्र शासनाने कंटेनमेंट झोनमध्ये ३१ ऑगस्ट, २०२० पर्यंत लॉकडाऊन कालावधी वाढविलेला आहे.

सध्या श्री समाधी मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी बंद असल्यामुळे लाडू व बुंदी प्रसाद तयार केला जात नाही. त्यामुळे लाडू निर्मिती विभागातील गाईचे शुध्द तूपाचा वापर पूर्णतः बंद आहे. तर प्रसादालयातील शुध्द तूपाचा वापर (जुन व जुलै महिन्यासाठी ६० किलो) नगण्य आहे.

महाराष्ट्र राज्यातील सध्याची कोरोना प्रादुर्भावाची स्थिती पाहता लाडू व बुंदी प्रसाद निर्मिती चालू होणे/ न होणे याची सध्या काहीच खात्री देता येत नाही. त्यामुळे पुरवठाधारक यांचेशी वरील शुध्द तूपापैकी पहिल्या टप्प्यामध्ये वरील अ.नं.१ ते ३ मध्ये नमूद केलेले ३०६.२० क्विंटल शुध्द तूप परत घेणेबाबत चर्चा करुन त्यांना ई-मेल पाठविण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे पुरवठाधारक यांचे संस्थानचे शुध्द तूपाचे निविदेसाठी प्राधिकृत केलेले प्रतिनिधींशी याबाबत चर्चा केली असता त्यांनी मी कंपनीचे मालकाशी चर्चा करुन कळवितो असे सांगितले होते, दरम्यान त्यांनी चर्चा करुन संस्थानकडे असलेले शुध्द तूप बदलून देणेबाबत विचार करु, तुम्ही मेल पाठवा असे फोनवरुन सांगितले होते.

त्याप्रमाणे मे.हर्ष फ्रेश डेअरी प्रा.लि., भगवानपुर यांना संस्थानकडे असलेले साठयापैकी पहिले टप्प्यात गाईचे शुध्द तुपाबाबत दि.२२/७/२०२० रोजीचे मेलद्वारे विनंती करण्यात आली होती.

त्यांनी उत्तरादाखल दिलेले दि.३०/०७/२०२० रोजीचे मेलव्दारे खालीलप्रमाणे विनंती केली होती.

"As per your mail we had received for Exchange of pure Cow Ghee for our Brand Mother Food we would like to Bring you kind notice that goods we had supply to you for the Temple from before of Covid-19 that B.No.4 & 5 have a expired date is still 3 month remain & if your temple will be open before for the expiry date you may can use the same goods for it and after that If the temple does not open & you still have some goods left of B.No.4 & 5, then we are in a situation we can consult together for the best salutation for the same & whatever extra cost will be spent, we will also think about it and whatever will be the right decision,we will decide together.

As you know, because of Covid-19, no goods have been dispatched since March and in view of Covid-19 we feel that it cannot be continued till 6 months i.e. September 2020 & Due to the non-dispatch of the goods we had to face a lots of loss, So we are requesting to you please continue the same tender from January 2021 to June 2021 & in these 6 Month whatsoever goods (Cow Ghee) will be supplied to you are going to be at the same rate as from October 2020 to December 2020.

Your support is very important for us & we hope that you will be taken the right decision in this situation so that we remain connected together.

We hope that you will decide to take care of our problem and loss in this situation & we sure that whatever will be decided will be in our and your interest, we were always with you and will always be with you. We need you the most in this situation.

थोडक्यात संस्थानला शुध्द तूप बदलून देण्यासाठी त्यांनी काही काळ थांबण्याची व याबाबत आपण एकत्रित निर्णय घेऊ. तसेच मे.हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्टस प्रा.लि. हरिद्वार यांनी त्यांचे पुरवठा कालावधीमध्ये डिसेंबर, २०२० नंतर ६ महिन्यांची मुदतवाढ मिळण्याची विनंती केली होती.

सदर ई-मेल मध्ये शुध्द तूप बदलून देणेसाठी त्यांनी काही काळ थांबण्याचे व नंतर एकत्रित निर्णय घेऊ असे सुचविले होते. तथापि, संस्थानकडे असलेले शुध्द तूप बदलून देणेबाबत मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्टस लि., भगवानपूर, यांची भूमिका काय असेल याबाबत स्पष्टता येण्यासाठी मा.प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. ठाकरे साहेब, यांनी सदर पुरवठादार कंपनीचे प्रोप्रायटर श्री. पोमिल जैन, यांच्याशी दुरध्वनीद्वारे चर्चा केली असता त्यांनी खालीलप्रमाणे सुधारित मेल दि.०५/०८/२०२० रोजी पाठविला आहे.

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

Dear Sir,

As per our discussion in the previous mail, In case you want to return the goods which are about to expire. There are some norms associated with it which is following below:-

1. The goods have to return to us 15 days before its expiry date.
2. The goods which you return to us, in its place we will give you the fresh goods with the same quantity. As per our norms we cannot give the amount for the returned goods, we can only exchange the goods with the fresh goods.
3. You will have to pay the occuring expenses in it which includes Freight, Processing charges, Tin costs etc.

वरील प्रमाणे मे.हर्ष फ्रेश डेअरी प्रा.लि., हरिव्दार, यांच्याकडून मेल प्राप्त झाल्यानतंर वरिल अ.नं.३ मध्ये संस्थानला प्रासंगिक खर्च यामध्ये वाहतूक भाडे, प्रोसेसिंग चार्जेस व टिन कॉस्ट हा खर्च सहन करावा लागेल असे कळविले होते. म्हणून पुन्हा त्यांच्याशी संपर्क करून सदर खर्च नेमका किती येईल याबाबत सविस्तर कळविणेबाबत विनंती केली होती. त्यांनी दि.०६/०८/२०२० रोजीचे ई-मेलव्दारे सदर खर्च खालीलप्रमाणे कळविला आहे.

Dear sir,

After our telephonic conversation, we have prepared the estimated cost of 15 Kgs tins.

| Product | Approx Rates | Remarks |
|---|---|---|
| Ghee Procesing Charges | 30.00 | For 15 Kg tin |
| Loading Unloading Charges | 6.00 | For 15 Kg tin |
| Empty Tin Cost | 100.00 | 1 tin for 15 Kg |
| Empty Tin Carton | 25.00 | For 15 Kg tin |
| Freight (Both Side) | 100.00 | For 1250 Tins Freight |
| Total- | 261.00 | For 15 Kg tin-1 tin Cost |

वरील ई-मेल नुसार मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रा.लि., हरिव्दार, यांनी संस्थानला शुध्द तुप बदलून देणेकामी खालील अटी कळविल्या आहेत.

१) शुध्द तूप मुदत संपण्याचे अगोदर १५ दिवस परत करावे.

२) परत केलेल्या शुध्द तूपाचे बदल्यात नवीन शुध्द तूप त्याच दर्जाचे पुरविले जाईल. शुध्द तूपाची किंमत म्हणून रक्कम परत केली जाणार नाही, परत केलेले शुध्द तूप बदलून दिले जाईल.

३) संस्थानला प्रासंगिक खर्च यामध्ये वाहतूक भाडे, प्रोसेसिंग चार्जेस व टिन कॉस्ट हा खर्च सहन करावा लागेल. यामध्ये त्यांनी शुध्द तुपाचा १५ किलोचा एक डबा बदलण्यासाठी अंदाजे रक्कम रू. २६१/- खर्च येईल. त्यानुसार १ किलो शुद्ध तुप बदलून घेणेकामी अंदाजे रु. १७.४० इतका खर्च येईल, म्हणजेच वरील सर्व १०५५.७५ क्विंटल शुद्ध तुप बदलावयाची गरज पडल्यास त्यासाठी अंदाजे एकूण रक्कम रु.१८,३७,००५/- इतका खर्च येईल. तथापि, वाहतूक खर्च संस्थानमार्फत केल्यास मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रा.लि., भगवानपुर, हरिद्वार यांना बील आदा करताना हा खर्च वजा होईल.

मंदिर साईभक्तांसाठी खुले करण्याबाबत शासनाचे अदयाप आदेश नाहीत,त्यामुळे मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी कधी खुले होईल याबाबत साशंकता आहे. त्यामुळे सध्या तरी लाडू व बुंदी प्रसादासाठी शुध्द तूपाचा वापर होत नाही.

तथापि, शासनाने मंदिर साईभक्तांसाठी खुले करण्यास साईभक्तांची संख्या ५,००० पर्यत मर्यादीत ठेवून परवानगी दिल्यास १ महिन्याचे कालावधीसाठी दररोज अंदाजे ५,००० बुंदी पाकीटे वाटप व ५,००० लाडू प्रसाद पाकीटांची विक्री होईल असे गृहीत धरल्यास त्यासाठी अंदाजे ९३.३० म्हणजेच ९५ क्विंटल शुध्द तूपाचा वापर होईल. असे लाडू निर्मिती विभागाने दि.२१/७/२०२० चे पत्राने कळविले आहे.

विभागाचा अभिप्राय:- वरील नमूद वस्तुस्थिती विचारात घेता शुध्द तूप बदलण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करणे उचित होईल असे मत आहे.

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

१. २२ सप्टेंबर, २०२० पूर्वी मंदिर साईभक्तांसाठी खुले झालेस व लाडू आणि बुंदी प्रसाद व्यवस्था चालू झाली तर FIRST IN FIRST OUT प्रमाणे शुध्द तूपाचा वापर करता येईल व पहिल्या टप्प्यात जेवढे शुध्द तूप वापरले ते वजा जाता उर्वरित प्रथम Expiry date असलेले तूप परत करता येईल.

२. जर मंदिर व लाडू आणि बुंदीप्रसाद सेवा चालूच झाल्या नाहीत, तर, सप्टेंबर, २०२० चे शेवटचे आठवडयात ३०६.२० क्विंटल शुध्द तूप (Expiry date १५ ऑक्टोबर व ३१ ऑक्टोबर २०२०) मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्ट प्रा. लि., भगवानपूर, हरिद्वार, यांना परत करता येईल व त्यांचेकडून तेवढेच शुध्द तूप स्वीकारता येईल.

३. लाडू प्रसाद व बुंदी प्रसाद व्यवस्था चालू झालेस अगर चालू न झालेस वरील नमूद केलेप्रमाणेच उर्वरित शुध्द तूप बदलून घेण्याची कारवाई करावी लागेल.

४. संस्थानकडून ज्या गाडीत जेवढे शुध्द तूप पुरवठादाराकडे पाठविले जाईल, तेवढेच शुध्द तूप त्याच गाडीत शिर्डी येथे आणून भांडार विभागात जमा करता येईल किंवा पुरवठादाराकडून जेवढे शुद्ध तुप प्राप्त होईल, तेवढे शुद्ध तूप पुरवठादाराला त्याच गाडीने परत करता येईल.

५. शुध्द तूप परत करणेचे काम हे लाडू व बुंदी प्रसाद व्यवस्था चालू झाली अगर चालू झाली नाही अशा परिस्थितीवर अवलंबून राहील, परिस्थितीनुरुप याबाबत निर्णय घ्यावे लागतील. त्यामुळे यासंबंधीत संस्थान हित विचारात घेऊन सर्व अनुषंगिक बाबींचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान केल्यास हे काम सोईस्कर होईल.

६. नवीन प्राप्त झालेले शुध्द तूपाची संस्थानचे नेहमीचे प्रथेप्रमाणे लॅब तपासणी करुन घेता येईल.

७. शुध्द तूप बदलून मिळालेनंतर प्रोसेसिंग चार्जेस, टिन कॉस्ट, वाहतुक भाडे, वगैरे बीले संबंधितांना आदा करता येईल.

८. संस्थान शुद्ध तुप पाठविणेसाठी वाहतुकीची व्यवस्था केल्यास संस्थानमार्फत ट्रान्सपोर्टला बिल आदा करावे लागेल व मे. हर्ष फ्रेष डेअरी प्रॉडक्टस प्रा.लि., भगवानपूर यांना वाहतूक खर्च वगळता उर्वरित रक्कम आदा करावी लागेल.

९. मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रा.लि., भगवानपूर, हरिद्वार, यांनी ट्रान्सपोर्टची व्यवस्था केल्यास त्यांना वाहतूक खर्चासह अगर त्यांनी निश्चित केलेले ट्रान्सपोर्टला बिल अदा करावे लागेल.

१०. संस्थानकडे असलेला शुद्ध तुपाचा साठा एक्सपायरी डेट होत आहे त्यापूर्वी बदलून मिळत असल्यामुळे मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रा.लि., भगवानपूर, हरिद्वार, यांनी मागणी केल्याप्रमाणे प्रोसेसिंग चार्जस, वाहतुक खर्च व टिन कॉस्ट याबाबत सकारात्मक विचार व्हावा, ही विनंती.

तरी शुध्द तूप बदलून घेणेकामी,

अ) वरील नमूद केलेप्रमाणे प्रसंगानूरुप प्राप्त परिस्थितीचा विचार करुन ,बुंदी व लाडू प्रसाद सेवा चालू होणे/ न होणे, शुद्ध तुप एक्सपायरी तारीख, शुध्द तूपाचे एक्सपायरी डेटपूर्वी होणारा वापर वगैरे सर्व अनुषंगिक बाबी विचारात घेऊन संस्थानचे सन २०२० वर्षासाठीचे शुध्द तूप पुरवठाधारक मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रा.लि., भगवानपुर, हरिद्वार, यांना शुध्द तूप परत करणे व बदलून घेणेबाबतचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करणेस.

ब) शुद्ध तुप बदलून मिळालेनंतर याकामीचे खर्चाची रक्कम मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रा.लि.,भगवानपुर, हरिद्वार, यांना परिस्थितीनुरुप जेवढे शुध्द तूप परत करावे लागेल त्याप्रमाणे येणारे प्रोसेसिंग चार्जेस, वाहतूक खर्च, हमाली, टीन कॉस्ट वगैरे अंदाजे रक्कम रु. २६१/- प्रती १५ किलोसाठी आदा करणेस व याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता मिळणेस.

क) संस्थानने वाहतूक व्यवस्था केलेस याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता मिळणेस.

वरील "अ", "ब" व "क" बाबत उचित निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.४३५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या भांडार विभागाकडे शिल्लक असलेले गाईचे शुध्द तुप पुरवठाधारक मे.हर्ष फ्रेश डेअरी प्रा.लि., हरिव्दार यांना परत करुन शुध्द तुप बदलुन घेणेसाठी उपरोक्त प्रस्तावात नमुद अ,ब व क प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-भांडार विभाग)**

---

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्द्यांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

**विषय नं.३२** **मार्च-२०२० महिन्याकरीता किराणा माल मा.तदर्थ समितीचे दि.०४.०३.३०३०चे सभेतील निर्णय क्र.१७० नुसार खरेदी करणेची व त्यासाठी सिव्हील ॲप्लीकेशन करण्याची गरज नसल्याची बाब मा.तदर्थ समितीचे अवलोकनार्थ सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.४३६** **सदर विषयावरील चर्चा सायंकाळी ६.३० नंतर उशीर झाल्याने पुढे ढकलण्यात आली.**

---

**विषय नं.३३** **संस्थानला माहे फेब्रुवारी-२०२० ते मार्च-२०२० या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या शुध्द तुप व खाद्यतेलाचे विविध प्रयोगशाळेमार्फत करणेत आलेल्या तपासण्यांचे अहवालाबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०८.१०.२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८०० अन्वये "यापुढे मोतीचुर लाडु प्रसाद निर्मीती करीता खरेदी करणेत येत असलेल्यागावरान तुपाचे प्रत्येक नमुन्याची तपासणी अश्वमेध इंजिनीअर्स ॲण्ड कन्सलटंटस नासिक, या NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडुन करुन घेण्यात यावी", असे ठरलेले आहे.

खरेदी विभागाचे दि.१४.०७.२०१७ रोजीचे टिपणीवरील निर्देशानुसार संस्थानला प्राप्त होणा-या गाईचे शुद्ध तुप व खाद्यतेलाची तपासणी राज्य/ केंद्र शासनाच्या प्रयोगशाळेमधून करुन घेणेबाबत निर्देश आहेत.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.३१.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६३७ अन्वये "संस्थानसाठी किराणा माल अथवा इतर ज्या साहित्यांच्या नमुन्यांची लॅब तपासणी करण्यात येते अशा लॅब तपासण्यांचा अहवाल सभेसमोरसादर करण्यात यावा", असे ठरलेले आहे.

वरील नमुद निर्णयाप्रमाणे, गाईचे शुद्ध तुपाचे सध्याचे पुरवठादार मे. हर्ष फ्रेष डेअरी प्रॉडक्टस प्रा.लि. हरिद्वार, यांचेकडून संस्थानला प्राप्त होणा-या शुद्ध तूपाची तपासणी संस्थानचे प्रयोगशाळेसह अश्वमेध इंजिनीअर्स ॲण्ड कन्सलटंटस, नासिक, (एन.ए.बी.एल. मान्यताप्राप्त प्रयोगशाळा), जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा (राज्य शासकीय प्रयोगशाळा) व केंन्द्रीय खाद्य प्रोद्योगिक अनुसंधान संस्थान, मैसूर, (केंद्र शासन मध्यवर्ती प्रयोगशाळा) यांचेकडून करणेत येत आहे. तसेच खाद्यतेलाची तपासणी संस्थानचे प्रयोगशाळेसह राज्य शासकीय प्रयोगशाळेकडून करणेत येत आहे.

वरील निर्णयानुसार संस्थानला माहे फेब्रवारी, २०२० ते मार्च, २०२० या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या शुद्ध तुप व खाद्यतेलाचे विविध प्रयोगशाळेंमार्फत करणेत आलेल्या तपासण्यांचे अहवाल तपशिलवार परिशिष्ठासह यासोबत सादर केले आहेत. त्यामध्ये सर्व प्रयोगशाळेंचे तपासणी अहवालामध्ये शुद्ध तूपाचे व खाद्यतेलाचे सर्व नमुने अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६, (नियम व नियमन २०११) नुसार योग्य (**conform**) असल्याचे नमुद केलेले आहे.

तरी वरीलप्रमाणे तपासणी अहवालाच्या झेरॉक्स प्रती (पा.नं.१ ते २७) व दि.०८.०८.२०२० रोजीचे तपशिलवार परिशिष्ठ (पा.नं. १ ते ६) यासोबत सादर केलेले आहे, ते मा. तदर्थ समितीचे सभेपुढे नोंद घेणेसाठी सादर.

**निर्णय क्र.४३७** **याबाबतीत प्राप्त झालेल्या शुध्द तुप व खाद्यतेलाचे विविध प्रयोगशाळे मार्फत करणेत आलेल्या तपासण्यांचे अहवालांचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली. याबाबत असे ठरले की, संबंधीत प्रयोग शाळांकडून गाईच्या शुध्द तुपातील Reichert-Meissl-Wollny (RM) Valve बाबतचा अहवाल मागविण्यात यावा व तो समिती समोर लवकरात लवकर ठेवावा.**

**(कार्यवाही-भांडार विभाग)**

---

**विषय नं.३४** **सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागातील कडधान्य व किराणा मालाचे घटतुटीबाबत.**

**निर्णय क्र.४३८** **सदर विषयावरील चर्चा सायंकाळी ६.३० नंतर उशीर झाल्याने पुढे ढकलण्यात आली.**

---

**विषय नं.३५** **आयशर कंपनीच्या १४ प्रवासी बसेसचा वार्षिक टॅक्स भरणेकामी येणाऱ्या खर्चास तसेच सदर रक्कम लेखाशाखेमार्फत ऑनलाईन भरणेस मान्यता मिळणेबाबत..**

**प्रस्ताव-** **महाराष्ट्र शासन अधिनियम-२००४ मधील तरतुद:-**

1. कलम १७ (१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व व कामाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, भक्तगणांना आवश्यकत्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये, विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करणेसाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील" असे नमुद केलेले आहे.

2. कलम २१ (१)(ज)मध्ये, विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधीन राहून,त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये विश्वस्तव्यवस्थेकडून देय असलेले कोणतेही कर, भाडे, भरपाई, आकार व इतर रकमा यांचे प्रदान करण्यात येईल, नमुद केलेले आहे.

प्रस्तावनाः- साईभक्तांच्या सुविधेकरीताखरेदी करण्यात आलेल्या ०९ बसेसच्या वार्षिक टॅक्सची मुदत दि.३१/०८/२०२० रोजी व व श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील मुलींसाठीखरेदी करण्यात आलेल्या ०५ बसेसच्या वार्षिक टॅक्सची मुदत दि.३०/०९/२०२० रोजी संपुष्टात येत आहे. या बसचा पुढील ०१ वर्ष कालावधी करीता प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे नियमानुसार १४ प्रवासी बसेसचे वार्षिक टॅक्स भरणे कामी खालील प्रमाणे खर्च येणार आहे.

| अ. नं. | वार्षिक टॅक्स कालावधी | टॅक्स रक्कम (प्रति सिट) | प्रति बस आसन क्षमता | प्रति बस टॅक्स | बस संख्या | एकुण वार्षिक टॅक्सरक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | दि.०१/०९/२०२० ते दि.३१/०८/२०२१ | १९००/- | ५० सिट | ९५,०००/- | ०९बस | ८,५५,०००/- |
| ०२. | दि.०१/१०/२०२० ते दि.३०/०९/२०२१ | १९००/- | ५० सिट | ९५,०००/- | ०५बस | ४,७५,०००/- |
| | | | | एकुण | **१४ बस** | **१३,३०,०००/-** |

विभागाचा अभिप्रायः- सध्या आर.टी.ओ. कार्यालयातील वाहनाच्या टॅक्सची रक्कम भरणेची कामे ऑनलाईन झालेली असलेने सदरची रक्कम त्यांचे संकेतस्थळावर ऑनलाईन भरावी लागणार आहे. उपरोक्त प्रमाणे १४ प्रवासी बसेसच्या वार्षिक टॅक्सची एकुण रक्कम रु.१३,३०,०००/- (अक्षरी रु. तेरा लाख तिस हजार मात्र) लेखाशाखा विभागामार्फत संस्थानचे बचत खात्यामधील रक्कमेतुन संस्थानचेच भारतीय स्टेट बैंक, शाखा-शिर्डीचे ऑनलाईन भरणा करणे कामी असलेला खातेनंबर 32444777814 मध्ये वर्ग करण्यात येऊन या खात्यातुन सदर रक्कम उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर यांचेकडे ऑनलाईनद्वारे भरणा करावी लागणार आहे. सदर खर्च मोटारकार कर व भाडे या अंदाजपत्रकातुन करता येईल.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी / शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमानः- महाराष्ट्र शासनाचे प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे नियमानुसार वार्षिक टॅक्स भरणे आवश्यक असुन सदर बाब आर्थिक स्वरुपाची आहे.

मागणीः- तरी उपरोक्त प्रमाणे १४ प्रवासी बसेसचा पुढील एक वर्ष कालावधी करीता वार्षिक टॅक्स भरणे व या कामी येणा-या एकुण रक्कम रु.१३,३०,०००/- (अक्षरी रु. तेरा लाख तिस हजार मात्र) चे खर्चास मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४३९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्यानुसार १४ प्रवासी बसेसचा पुढील एक वर्ष कालावधीकरीता वार्षिक टॅक्स भरणेस व याकामी येणा-या एकुण रक्कम रु.१३,३०,०००/- मात्रचे खर्चास तसेच सदर रक्कम लेखाशाखेमार्फत ऑनलाईन भरणेस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-वाहन विभाग)**

---

विषय नं.३६ **श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) सुविधा DTH (डीश टीव्ही) टिव्ही चॅनल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन पुरवठा धारकांना कार्यादेश देईपर्यंत याकामी M/s Tata Communication Ltd. Mumbai यांना देणेत आलेल्या कार्यादेशास मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुदः- कलम २१(१) ग नुसार भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य/समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :- ०१. दि.२८.०४.२०१७ निर्णय क्र.३२२ (१३)
०२. दि.११.०५.२०२० निर्णय क्र.२६१, २६२.
०३. दि.०९.०६.२०२० निर्णय क्र.३०६ (०२),३२९.

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्द्यांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

प्रास्ताविक:- साईभक्तांना श्रींचे ऑनलाईन (Live) दर्शन DTH (डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी संस्थानचे विहित पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली होती. ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८.०४.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३२२ (१३) अन्वये, M/s Tata Communications Ltd., Mumbai व M/s Associated Broadcasting co. Pvt Ltd, Hyd यांनी देऊ केलेले पुढीलप्रमाणे उच्चत्तम दर स्विकारणेत येऊन त्यांना दि.०१.०६.२०१७ ते दि.३१.०५.२०२० या कालावधीकरीता याकामी कार्यादेश देणेस मान्यता देणेत आलेली होती.

१. DTH (डिश टिव्ही) साठी M/s Tata Communications यांनी देऊ केलेले Exclusive दर.

| Platform | 1st Year | 2nd Year | 3rd Year | Total |
|---|---|---|---|---|
| DTH | 1,96,00,000 | 1,97,00,000 | 1,98,00,000 | 5,91,00,000 |
| Total- | | | | 5,91,00,000 |

२. इंटरनेट व मोबाईल प्लॅटफॉर्मसाठी M/s Tata Communications यांनी देऊ केलेले Exclusive दर.

| Platform | 1st Year | 2nd Year | 3rd Year | Total |
|---|---|---|---|---|
| Mobile & Internet | 19,00,000 | 21,00,000 | 23,00,000 | 63,00,000 |

३. T.V. चॅनलसाठी M/s Tata व M/s Associated यांनी देऊ केलेले Non Exclusive दर.

| Platform | 1st Year | 2nd Year | 3rd Year | Total |
|---|---|---|---|---|
| M/s Tata Communications Ltd., Mumbai | 3,00,000 | 4,00,000 | 5,00,000 | 12,00,000 |
| M/s Associated Broadcasting Co Pvt Ltd., | 25,30,000 | 25,30,000 | 25,30,000 | 75,90,000 |
| Total- | | | | 87,00,000 |

उपरोक्त तक्त्याप्रमाणे, M/s Tata Comm व M/s Associated यांना जा.नं.एसएसएसटी/आयटी/१०५९ ते १०६१/२०१७ दि.३० मे,२०१७ अन्वये, व जा.नं.एसएसएसटी/आयटी/५६७६/२०१८ दि.२४.०१.२०१८ अन्वये, तीन वर्षांकरीता (दि.०१.०६.२०१७ ते दि.३१.०५.२०२०) कार्यादेश देणेत आलेले आहेत.

M/s Tata Comm व M/s Associated यांना देणेत आलेल्या कार्यादेशाची मुदत दि.३१.०५.२०२० अखेर संपुष्टात येत असल्याने याकामी नविन पुरवठाधारकांची नेमणूक करणेसाठी प्रचलित पद्धतीनुसार ई-निविदा राबविणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे दि.११.०५.२०२० रोजीचे सभेसमोर सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चेअंती निर्णय क्र.२६१ अन्वये पुढीलप्रमाणे निर्देश देणेत आलेले होते. "श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) DTH (डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी Exclusive rights व Non-Exclusive rights देणेबाबत अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर ठेवणेत यावा."

उपरोक्त निर्देशान्वये अनुषांगिक माहितीसहचा साईभक्तांना श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) सुविधा उपलब्ध करुन देणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेकामीचा सविस्तर प्रस्ताव इकडील विभागाचे दि.३० मे, २०२० रोजीचे मंजुर टिपणीअन्वये, मा. तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करणेत आला होता. सदरचे प्रस्तावावर मा.तदर्थ समितीचे दि.०९.०६.२०२० रोजीचे सभेमध्ये सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्रं.३२९ अन्वये श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) DTH (डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता देणेत आली. सदर निर्णयाची प्रत पुढील कार्यवाहीकरिता दि.०१.०७.२०२० रोजी इकडील विभागास प्राप्त झालेली आहे.

दरम्यानचे कालावधीमध्ये M/s Tata Comm व M/s Associated Broadcasting यांना देणेत आलेल्या कार्यादेशाची मुदत दि.३१.०५.२०२० रोजी संपुष्टात येत असल्याने याकामी मा.तदर्थ समितीचे मान्यतेने ई-निविदा प्रक्रिया राबवून नविन पुरवठाधारकाची नेमणूक होईपर्यंत ऑनलाईन (Live) दर्शन सुविधा सुरळीत सुरू राहणेकामी M/s Tata Comm यांना देण्यात आलेल्या कार्यादेशामधील दरामध्ये नमुद वार्षिक वाढीप्रमाणे तसेच M/s Associated Broadcasting यांना देण्यात आलेल्या कार्यादेशामध्ये नमुद वार्षिक दर व अटी/शर्तीप्रमाणे तीन महिने मुदतवाढ देणेस मा.तदर्थ समितीचे दि.०९.०६.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.३०६(०२) अन्वये

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

मान्यता देणेत आली. सदर मान्यतेन्वये इकडील विभागाचे दि.०८.०७.२०२० रोजीचे मंजुर टिपणीअन्वये, M/s Tata Comm यांना पुढील वार्षिक दराप्रमाणे जा.न.एसएसएसटी/वशी-आयटी/६७६ ते ६७८/२०२०, दि.१३ जुलै, २०२० ने तीन महिने कालावधी (दि.०१.०६.२०२० ते दि.३१.०८.२०२०) साठी मुदतवाढ देणेत आलेली आहे.

| Platform | Annual Charges | Charges for Extension (3 Months) |
|---|---|---|
| DTH (Exclusive) | 1,99,00,000 | 49,75,000 |
| Mobile & Internet (Exclusive) | 25,00,000 | 6,25,000 |
| TV Channel (Non- Exclusive) | 6,00,000 | 1,50,000 |

तसेच M/s Associated Broadcasting (TV1 TV Channel) यांना याकामी दि.०१.०६.२०२० पासून तीन महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेकामीचा कार्यादेश देणेस Annual Charges-Rs.25,30,000/- & Charges for Extension (3 Months) Rs.6,32,500/- याप्रमाणे इकडील विभागाचे दि.०८.०७.२०२० रोजीचे मंजुर टिपणीअन्वये, M/s Associated यांना जा.न.एसएसएसटी/वशी-आयटी/६७५/२०२०, दि.१३ जुलै, २०२० ने तीन महिने कालावधी (दि.०१.०६.२०२० ते दि.३१.०८.२०२०) साठी मुदतवाढ देणेत आलेली आहे. परंतू M/s Associated यांनी दि.११.०७.२०२० रोजीचे ई-मेलद्वारे सदरची मुदतवाढ नाकारल्याने त्यांना याकामी देणे प्रस्तावीत असलेला कार्यादेश रद्द होणेस प्रशासकीय मान्यता मिळणेकामी प्रस्ताव इकडील विभागामार्फत सादर करणेत आलेला आहे.

दि.०१.०७.२०२० रोजी प्राप्त झालेल्या दि.०९.०६.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.३२९ अन्वये, श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) सुविधा उपलब्ध करुन देणेकामी विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी निविदेचा मसुदा इकडील विभागामार्फत तयार करणेत आलेला आहे. सदर निविदेचे स्वरुप हे इतर निविदांच्या तुलनेने वेगळ्या पद्धतीचे असल्याने निविदा मसुदा तयार करणेस थोडा अवधी लागलेला आहे. सदर मसुदा निविदा दस्तऐवज समितीचे दि.२१.०७.२०२० रोजीचे सभेमध्ये तपासून घेऊन सदर सभेमध्ये सुचविलेले बदल/सुधारणा मसुद्यामध्ये करणेत आलेले आहेत. सदरचे मसुद्याप्रमाणे ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी प्रशासकीय मान्यता घेणेची कार्यवाही सद्यस्थितीत सुरू आहे. याकामी यापुर्वी राबविलेल्या निविदा प्रकियेअंतर्गत निविदाधारकांकडून प्राप्त झालेल्या दरांचा विचार करता, प्रस्तावीत ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत निविदाधारकांना निविदा सादर करणेस किमान तीन आठवड्यांचा कालावधी द्यावा लागणार आहे. त्यामुळे प्रशासकीय मान्यतेनंतर प्रचलीत पद्धतीनुसार ई-निविदा प्रसिद्ध करणे, तांत्रिक निविदा उघडणे, तांत्रिक निविदांचे अवलोकन करुन निकाल प्रसिद्ध करणे व पात्र निविदाधारकांच्या वाणिज्यीक ई-निविदा उघडणे, तद्नंतर येणारे मा.तदर्थ समितीचे सभेसमोर याबाबत निर्णय होणेकामी प्रस्ताव सादर करणे व सदर निर्णयानुसार पुढील कार्यवाही करणे या सर्व कार्यवाहीचा विचार करता, निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन पुरवठाधारकांना कार्यादेश देणेची कार्यवाही ऑगष्ट-२०२० अखेर पुर्ण होणे शक्य नाही. सबब, M/s Tata Comm यांचेमार्फत सुरू असलेली सदरची सुविधा सुरळीत सुरू राहून साईभक्तांना लॉकडाऊनचे कालावधीमध्ये श्रींचे ऑनलाईन दर्शन उपलब्ध व्हावे, याकरीता M/s Tata Comm यांना याकामी ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन पुरवठाधारकांना कार्यादेश देईपर्यंत कार्यादेशातील अटी/शर्तीप्रमाणे मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीसमोर निर्णयार्थ सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी:- प्रास्तविकेत नमुद केलेप्रमाणे साईभक्तांना श्रींचे ऑनलाईन (Live) दर्शन DTH (डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेसाठी, मा.तदर्थ समितीचे दि.०९.०६.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३०६ (०२) अन्वये M/s Tata Comm यांना मुदतवाढ देणेकामी, देणेत आलेल्या कार्यादेशाची मुदत दि.३१.०८.२०२० रोजी संपुष्टात येत आहे. मा.तदर्थ समितीचे दि.०९.०६.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३२९ अन्वये श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी प्रशासकीय मान्यता घेणेची कार्यवाही सद्यस्थितीत सुरू आहे. परंतू सदरची ई-निविदा प्रक्रिया राबवून नविन पुरवठाधारकास कार्यादेश देणेची कार्यवाही दि.३१.०८.२०२० अखेर पुर्ण होणे शक्य नाही. त्यामुळे M/s Tata Comm यांचेमार्फत सुरू असलेली सदरची सुविधा सुरळीत सुरू राहून साईभक्तांना लॉकडाऊनचे कालावधीमध्ये श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) उपलब्ध व्हावे, याकरीता M/s Tata Comm यांना याकामी ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन पुरवठाधारकांना कार्यादेश देईपर्यंत कार्यादेशातील

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

अटी/शर्तीप्रमाणे मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीसमोर निर्णयार्थ सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम/ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:- तांत्रिक, प्रशासकीय व आर्थिक

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- साईभक्तांना श्रींचे ऑनलाईन (Live) दर्शन DTH (डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेसाठी, मा.तदर्थ समितीचे दि.०९.०६.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३०६ (०२) अन्वये M/s Tata Comm यांना मुदतवाढ देणेकामी, देणेत आलेल्या कार्यादेशाची मुदत दि.३१.०८.२०२० रोजी संपुष्टात येत आहे. मा.तदर्थ समितीचे दि.०९.०६.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३२९ अन्वये श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी प्रशासकीय मान्यता घेणेची कार्यवाही सद्यस्थितीत सुरू आहे.

दि.०१.०७.२०२० रोजी प्राप्त झालेल्या दि.०९.०६.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.३२९ अन्वये, श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) सुविधा उपलब्ध करुन देणेकामी विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी निविदेचा मसुदा इकडील विभागामार्फत तयार करणेत आलेला आहे. सदर निविदेचे स्वरुप हे इतर निविदांच्या तुलनेने वेगळ्या पद्धतीचे असल्याने निविदा मसुदा तयार करणेस थोडा अवधी लागलेला आहे. सदर मसुदा निविदा दस्तऐवज समितीचे दि.२१.०७.२०२० रोजीचे सभेमध्ये तपासून घेऊन सदर सभेमध्ये सुचविलेले बदल/सुधारणा मसुद्यामध्ये करणेत आलेले आहेत. सदरचे मसुद्याप्रमाणे ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी प्रशासकीय मान्यता घेणेची कार्यवाही सद्यस्थितीत सुरू आहे. याकामी यापुर्वी राबविलेल्या निविदा प्रक्रियेअंतर्गत निविदाधारकांकडून प्राप्त झालेल्या दरांचा विचार करता, प्रस्तावीत ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत निविदाधारकांना निविदा सादर करणेस किमान तीन आठवड्यांचा कालावधी द्यावा लागणार आहे. त्यामुळे प्रशासकीय मान्यतेनंतर प्रचलीत पद्धतीनुसार ई-निविदा प्रसिद्ध करणे, तांत्रिक निविदा उघडणे, तांत्रिक निविदांचे अवलोकन करुन निकाल प्रसिद्ध करणे व पात्र निविदाधारकांच्या वाणिज्यीक ई-निविदा उघडणे, तद्नंतर येणारे मा.तदर्थ समितीचे सभेसमोर याबाबत निर्णय होणेकामी प्रस्ताव सादर करणे व सदर निर्णयानुसार पुढील कार्यवाही करणे या सर्व कार्यवाहीचा विचार करता, निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन पुरवठाधारकांना कार्यादेश देणेची कार्यवाही ऑगष्ट-२०२० अखेर पुर्ण होणे शक्य नाही.

सबब, M/s Tata Comm यांचेमार्फत सुरू असलेली सदरची सुविधा सुरळीत सुरू राहून साईभक्तांना लॉकडाऊनचे कालावधीमध्ये श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) उपलब्ध व्हावे, याकरीता M/s Tata Comm यांना याकामी ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन पुरवठाधारकांना कार्यादेश देईपर्यंत कार्यादेशातील अटी/शर्तीप्रमाणे व पुढील वार्षिक दरांप्रमाणे मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीसमोर सविनय सादर.

**Tata Communication Ltd, Mumbai (Tata Sky)**

| **Platform** | **1st year** | **2nd year** | **3rd year** | **4th year (Extension)** |
|---|---|---|---|---|
| DTH (Exclusive) | 1,96,00,000/- | 1,97,00,000/- | 1,98,00,000/- | **1,99,00,000/-** |
| Mobile & Internet (Exclusive) | 19,00,000/- | 21,00,000/- | 23,00,000/- | **25,00,000/-** |
| TV Channel (Non-Exclusive) | 3,00,000/- | 4,00,000/- | 5,00,000/- | **6,00,000/-** |

**निर्णय क्र.४४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) सुविधा DTH (डीश टीव्ही) टिव्ही चॅनल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी M/s Tata Communication Ltd. Mumbai यांना देण्यात आलेल्या कार्यादेशास दि.३०.०९.२०२० अखेर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.३७** **कॅन्टीन विभागाकडे शिल्लक असलेल्या पाणी बाटल्यांबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासन राजपत्रातील अधिनियम २००४ मधील - १७/१ मध्ये भक्तगणांना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी तरतुद करून देण्यात आलेली आहे.त्यानुसार कॅन्टीन विभागामार्फत चहा,कॉफी,दुध सोबतच बिस्कीटे व पाणी बाटली विक्री केली जाते. कॅन्टीनचे सर्व ठिकाणचे स्टॉलवर पाणी

बाटली विक्री व इतर विभागांना त्याचे मागणीप्रमाणे पाणी बाटल्या पुरविल्या जातात. त्यांची प्रति दिवशी ४००० ते ६००० पर्यंत पाणी बाटल्यांची विक्री होत असते.

संस्थानचे कॅन्टीन विभागाकडे खालील प्रमाणे १ लिटरच्या पाणी बाटल्यांचा दि. १८/०३/२०२० रोजी साठा होता. व हा साठा ४ ते ५ दिवसांचाच होता.

| अ.क्र | कंपनीचे नांव | १ लिटर |
|---|---|---|
| १ | राजहंस | १०५१२ |
| २ | साईगंगा | १२९५४ |
| | एकुण | २३४६६ |

कोराना विषाणु (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणुन दि.१७/०३/२०२० रोजी दुपारी ३ वाजेपासुन भक्तांसाठी पुढील आदेश होईपर्यंत दर्शनाकरीता (मुखदर्शनासह) अनिश्चीत कालावधी करीता मंदिर बंद करण्यात आले आहे. त्या अनुशंगाने सर्व भक्तनिवासस्थाने बंद ठेवण्यात आलेली आहेत. त्यामुळे कॅन्टीन विभागकडील सर्व विक्री काऊंटर्स बंद झालेली आहेत.

वरील शिल्लक पाणी बाटल्यांबाबत संबधीत पुरवठा धारक यांच्याशी प्र.खरेदी अधिकारी यांनी विचारणा केली असता. त्यांनी सदर बाटल्यांवर संस्थानचे पुरवठा आदेशामध्ये दिले प्रमाणे सदर बाटल्या या संस्थान करीता व किंमत रू.१०/- अशी त्यावर छपाई केलेली आहे. त्यामुळे त्या परत घेता येत नाही असे सांगितले त्यामुळे वरील साठा विक्री करणेबाबत अथवा हॉस्पिटल मधील कॉव्हीड सेंटर येथे मोफत वाटप करणेकरीता दि. २२/०६/२०२० रोजी प्रस्ताव सादर केला होता. त्यावर सद्यस्थितीत श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालय स्टॉलवर विक्री करणेबाबत निर्देश झाले होते. सदर निर्देशाप्रमाणे दि. २९/०६/२०२० ते ३१/०७/२०२० पर्यंत २६८५ पाणी बॉटलची विक्री झालेली आहे व दरम्यान च्या कालावधीत रूग्णालयाचे मागणी नुसार व इतर वापराकरीता ४८७९ बाटल्या वापरात आलेल्या आहेत.

श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटल हे पुर्णक्षमतेने चालु नाहीत त्यामुळे पाणी बाटली विक्री करीता पाहिजे तसा प्रतिसाद मिळाला नाही.

सध्या कॅन्टीन विभागाकडे दि ०७/०८/२०२० रोजी खालील प्रमाणे पाणी बाटली शिल्लक आहे.

| अ.क्र | कंपनीचे नांव | १ लिटर | मुदत |
|---|---|---|---|
| १ | राजहंस | २४२० | १९/०८/२०२० |
| २ | राजहंस | ५४० | ०८/०९/२०२० |
| ३ | साईगंगा | १२९४२ | ०२/०९/२०२० |
| | एकुण | १५९०२ | |

वरील १ लिटर पाणी बाटल्यांची विक्री श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटल येथे चालु आहे. मुदत संपण्यापुर्वी त्यापैकी अंदाजे १९०२ बाटल्यांची विक्री होणेची शक्यता आहे. उर्वरीत १४००० बाटल्या शिल्लक राहतील सदर शिल्लक पाणी बाटल्या या विक्री होवु शकत नसल्यामुळे कोरोना विषाणु (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजनेचा भाग म्हणुन स्थापन करण्यात आलेल्या साई आश्रम धर्मशाळा येथील विलगीकरण कक्ष , कोव्हीड केअर सेंटर व द्वारावती येथील विलगीकरण कक्षातील संस्थान हॉस्पीटल स्टाफ, साईबाबा,साईनाथ रुग्णालयातील दाखल रुग्ण या सर्वांना दोन वेळेस देणेत येणारे चहा/कॉफी/दुध देतेवेळी त्यासोबत १ पाणी बाटली मोफत दिल्यास त्याचा वापर होईल अंदाजे १४००० पाणी बाटल्या वाटप करावयाचे झाल्यास प्रति बाटली रू.५.३३ पैसे प्रमाणे एकुण रक्कम रू.७४६२०/-मात्र एवढी रक्कम खर्च होईल तरी मुदतीपुर्वी शिल्लक पाणी बाटल्यांपैकी ज्यांची विक्री होईल त्यांची विक्री करून उर्वरीत शिल्लक राहिलेल्या पाणी बाटल्या मोफत वाटप करणेसाठी व त्याकामीचे खर्चास मान्यता मिळणेसाठीचा विषय मा.तदर्थ समिती समोर निर्णयार्थ सादर .

निर्णय क्र.४४१ **यावर सविस्तर चर्चा झाली. यावर सदस्य सचिव मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, संस्थानचा स्वत:चा RO प्लॅन्ट आहे व विषयात नमूद असलेल्या बाटल्या या आपण विक्रीसाठी ठेवलेल्या असतात. यावर सर्वानुमते कोव्हिड-19 च्या या काळात प्रस्तावीत केल्याप्रमाणे प्रति बाटली रु.१०.०० प्रमाणे शक्य त्या पाण्याच्या बाटल्यांची विक्री करण्यास व शिल्लक बाटल्या मोफत वाटण्यास मंजूरी देण्यात आली.**

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

तसेच तदर्थ समितीचे अध्यक्ष तसेच सदस्य श्री.स्वामी यांनी असे प्रतिपादन केले की, संस्थानच्या RO प्लॅन्टद्वारे अशा पाण्याच्या बाटल्या पुरविणे शक्य आहे काय याचा अभ्यास करावा व अभ्यासपूर्वक प्रस्ताव आगामी सभेसमोर ठेवण्यात यावा.

समिती सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत सादर केले की, RO प्लॅन्ट संस्थानकडे संस्थापित केलेला आहे. तो उत्तम चाललेला आहे. त्यामुळे याबाबत सुचनांची पुर्ती अगोदर झालेली आहे. तसेच पाण्याच्या पॅकेज बाटल्या पुरवठा करण्याची सूचना व्यवहार्य नाही. कारण त्यासाठी ब-याच औपचारीकता जसे विविध परवाने घ्यावे लागतील तसेच संस्थान असा व्यवसाय करत नाही.

तथापि तदर्थ समितीचे अध्यक्ष तसेच सदस्य श्री.स्वामी यांचे मते सदस्य सचिव यांचे वरील मतास अनुसरुन कार्यालयीन टिपणी नाही तसेच सदस्य सचिव यांनी दिलेली माहिती व केलेली सुचना कशी अव्यवहार्य आहे, याबाबत अभ्यास अभिलेखावर नाही. तसेच जर संस्थान व्यवसाय करीत नाही तर सदर बाटल्या विकण्यासाठी का घ्यावयाच्या, हे स्पष्ट नाही. करिता संस्थानच्या RO प्लॅन्टव्दारे अशा पाण्याच्या बाटल्या पुरविणे शक्य आहे काय याचा अभ्यास करावा व अभ्यासपुर्वक प्रस्ताव आगामी सभेसमोर ठेवण्यात यावा.

(कार्यवाही-कॅन्टीन विभाग)

---

**विषय नं.३८** **श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०२० साजरा करणेस व त्याकामी येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. कलम २१ (१) (ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे;

४. (ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे;

**प्रस्तावना:-** उपरोक्त अधिनियमातील तरतुदीनुसार व पुर्वापार रुढी परंपरेनुसार संस्थान व्यवस्थापनामार्फत धार्मिक पुजा विधी, उत्सव साजरे केले जात आहेत. यंदाचा श्री पुण्यतिथी उत्सव शनिवार, दि.२४ /१०/२०२० ते सोमवार, दि.२६ /१०/२०२० (अश्विन शु ८/९॥ शके १९४२ ते अश्विन शु १०॥ शके १९४२) असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे.

**विभागाचा अभिप्राय –**

**सन-२०२० मध्ये साजरा करावयाचे श्री पुण्यतिथी उत्सवासाठी पुढीलप्रमाणे नियोजन करावे लागणार आहे.**

| अ.नं | तपशिल | उत्सवासाठी करावयाची तयारी व कामे |
|---|---|---|
| १. | उत्सव निमत्रंण पत्रिका व उदीप्रसाद | अधिनियमातील तरतुदीनुसार भक्तमंडळाचे सामान्य, आजीव व आश्रयदाते सभासदांना तसेच मान्यवरांना उत्सवाच्या निमत्रंण पत्रिका पाठवाव्या लागतात. मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.०९/०३/२०२० रोजी सन २०२० मधील तीनही उत्सवांच्या निमंत्रणपत्रिका सामान्य,आजीव,आश्रयदाते सभासद यांना पाठविणेस मान्यता दिली आहे. तसेच नेहमीप्रमाणे वर्तमानपत्रातून प्रेस नोट (न्यूज ॲटम) प्रसिध्दीस देण्यात येईल. |
| | सांस्कृतिक कार्यक्रमाची पार्श्वभुमी | श्री.गो.र.दाभोळकर लिखित व संस्थान प्रकाशित श्री साईसच्चरित या ग्रंथात तसेच याच ग्रंथाचे गद्य रुपांतर असलेल्या (ले.कर्नल.श्री.मु.ब. निंबाळकर लिखीत) श्रीसाईचे सत्यचरित्र या ग्रंथातल्या |

इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.

| | | |
|---|---|---|
| | | अध्याय क्र.२९ मध्ये पुढीलप्रमाणे मजकूर आहे.<br>**श्री साईसच्चरित**<br>साईबाबा महासंत \| धीर उदार आणि दान्त \| यात्रेकरुंसी कृपावंत \| पैसे अत्यंत वांटिती\|\|४\|\| दिडक्या चवल्या हाताचा कीस \| अधेल्या-पावल्यांचा पाऊस \| रुपये दहा कोणास वीस \| कोणास पन्नास ते देत \|\|५\|\| हें काय सणासुदा दिसी \| कार्यविशेषीं कां पर्वकाळासी \| प्रतिदिवशीं उक्त प्रमाणेंसीं \| संतोषेंसीं अर्पीत \|\|६\|\| पहूड येती भवय्ये नाचती \| गवय्ये गाती भाट वानिती \| तमासगीर मुजरे देती \| भजनीं रंगती हरिभक्त \|\|७\|\| ऐसे महाराज उदारवृत्ती \| दानधर्मी सढळ स्थिती \| ऐकूनि कर्णोपकर्णी ही कीर्ति \| इच्छा धरिती दर्शनाची \|\|८\|\| कधीं आलिया बाबांचे चित्तीं \| पांथस्थांतेंही पैसे वांटिती \| दीनदुबळ्यांचा परामर्ष घेती \| कृपामुर्ति साईनाथ \|\|९\|\|<br>**श्री साईचे सत्य चरित्र**<br>साईबाबा थोर, उदार व दान करणारे महान संत होते. यात्रेकरुंना कृपावंत होऊन ते खूप पैसा वाटीत असत. दिडक्या-चवल्या (एक पैसा व दोन आण्यांची नाणी. त्या काळची अगदी कमी किंमतीची नाणी.४ पैसे = १ आणा, १६ आणे= १ रुपया) अगदी सहजपणे आणि अधेल्या पावल्यांचा (चार व आठ आण्यांचा म्हणजे आजच्या पंचवीस व पन्नास पैशांच्या नाण्यांचा) पाऊस पाडत; म्हणजे भरपूर पैसे वाटत असत. कोणाला दहा, पैशांच्या नाण्यांचा) पाऊस पाडत; म्हणजे भरपूर पैसे वाटत असत. |
| | | कोणाला वीस, तर कोणाला पन्नास रुपये ते देत असत. हे काय सणाच्या किंवा उत्सवाच्या दिवशी काही विशेष कार्य असताना किंवा पुण्यकाळ असतानाच नव्हे, तर दररोज वर म्हटल्याप्रमाणे मोठ्या खुशीने ते वाटीत असत. पहूडे व भवय्ये ( तमासगीर व नाचे लोक)येत असत आणि नाचत असत, गवई गाणे गात असत आणि भाट स्तुती करीत असत. तमासगीर मुजरे देत असत आणि हरिभक्त भजन करण्यात रंगून जात असत. महाराजांची अशा उदार स्वभावाची व दानधर्म करण्यात सढळ हाताची कीर्ती कर्णोपकर्णी ऐकून हे लोक दर्शनाची इच्छा मनात धरीत असत.कधी मनाला आले, तर बाबा प्रवाशांनाही पैसे वाटीत असत. साईनाथ दयेची मूर्ती होते. दीन-दुबळ्यांच्या गरजा व दु:खे काय आहेत याची सहृदयपणे ते विचारपूस करीत असत आणि त्यांना मदत करीत असत.<br>थोडक्यात श्री साईबाबांच्या काळापासूनच शिर्डीत सांस्कृतिक कार्यक्रम होत असल्याचे आढळून येते व श्री साईबाबा हे कोणाचीही सेवा–चाकरी मोफत वा विनामुल्य घेत नसत ते स्वतः सढळहस्ताने कलाकारांना मानधन देत असत हीच परंपरा आजही शिर्डीत सुरु आहे. |
| ०२ | **सांस्कृतिक कार्यक्रम** | **संस्थानमार्फत** |
| | प्रारंभ दिवस,<br>शनिवार,<br>दि.२४/१०/२०२०<br>आश्विन शु ८/९ \|\| शके १९४२ | उत्सवांचे तीनही दिवसाकरीता निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम निश्चीत करावयाचे आहेत. सांस्कृतिक कार्यक्रमाचा स्वतंत्रपणे प्रस्ताव सादर करण्यात येईल. मागील श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवातील (२०१९) कलाकार कार्यक्रम साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप (१६ गुठें) याठिकाणी आयोजित करण्यात आले होते. आता सायंकाळी ७.३० ते रात्रौ १०.०० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप स्टेजवर आयोजित करता येईल. |
| | मुख्य दिवस<br>रविवार,<br>दि.२५/१०/२०२०<br>आश्विन शु ९/१०\|\| शके १९४२ | १) सायंकाळी ७.३० ते रात्रौ १०.०० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडप स्टेजवर आयोजित करता येईल.<br>२) कलाकार हजेरी कार्यक्रमात रात्रौ. १०.३० ते पहाटे ५.०० पर्यत (दि.२६/१०/२०२०) इच्छुक कलाकारांच्या साईभजनांचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप स्टेजवर आयोजित करता येईल. या मुख्य दिवशी समाधी मंदीर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल. |
| | सांगता दिवस<br>सोमवार,<br>दि.२६/१०/२०२०<br>आश्विन शु.१० शके १९४२ | सायंकाळी ७.३० ते १०.०० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडप स्टेजवर आयोजित करता येईल. |
| | | **कीर्तन कार्यक्रम** |
| | शनिवार, | **कीर्तन कार्यक्रम -** |

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्यांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

| | | |
|---|---|---|
| | दि.२४/१०/२०२० (सायं. ४ ते ६) रविवार, दि.२५/१०/२०२० (सकाळी. १० ते १२) सोमवार, दि.२६/१०/२०२० (सकाळी १० ते १२) | उत्सवाचे तिन्ही दिवसांकरीता कीर्तनकार निश्चित करावयाचा आहे. याकरीता स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्यात येईल.<br>निमंत्रीत कीर्तनकारांची निवासव्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येईल. निमंत्रीत कीर्तनकारांचे मानधन मंदीर विभागामार्फत आदा करण्यात येईल.<br>नेहमीच्या प्रथेप्रमाणे कीर्तनकार्यक्रम समाधी मंदिराचे उत्तर बाजुस असलेल्या जागेत स्टेज उभारुन करता येईल. |
| | | **विविध मिरवणूका** |
| | शनिवार, दि.२४/१०/२०२० ते सोमवार, दि.२६/१०/२०२० | पोथी-फोटो-वीणा, पालखी, रथ, भिक्षाझोळी,सिमोल्लंघन मिरवणूक प्रथेप्रमाणे करण्यात येतील.उत्सवाचे प्रथम व मुख्य दिवशी सकाळी ५ वा पोथी फोटो-वीणा मिरवणूक निघेल. सकाळी ९ वा.भिक्षाझोळी, सायं. ५ वा. सिमोल्लंघन तसेच उत्सवाचे पहिले दिवशी दिनांक.२४/१०/२०२० रोजी श्रींचे पालखीची गावांतून रात्रौ. ९.१५ वा मिरवणूक निघेल व दुस-या (मुख्य) दिवशी दि.२५.१०.२०२० रोजी श्रींचे रथाची गावांतून रात्रौ. ९.१५ वा मिरवणूक निघेल. |
| | | **आराधना विधी**<br>आराधना विधी समाधी मंदिराच्या पहिल्या माळयावर करण्यात येईल. सदरहू आराधना विधीचे थेट प्रक्षेपण (Live telecast) संस्थानचे फेसबुक लाईव्ह कव्हरेजपेजवर करण्यात येईल त्यामुळे संपुर्ण जगात देखील भक्तांना हा सोहळा बघता येईल तसेच हे प्रक्षेपण समाधी मंदिर परिसरातील दूरचित्रवाणीवर करण्यात येईल. समाधी मंदिराचे वास्तुस (बुटी वाडयास ) १०० वर्ष झाल्याने गावकरी व इतर साईभक्त यांची वर्दळ पहिल्या मजल्यावर बंद करुन लाईव्ह दर्शन देणेत येईल. आराधना विधीकरीता यजमानाची (पतीपत्नी) प्रसाद भोजनाची व्यवस्था मंदिराचे पहिल्या माळयावर हॉलमध्ये करणेत येईल, त्यांचे शिवाय इतरांना समाधी मंदीर हॉलवर प्रवेश दिला जाणार नाही. जे भोजन यजमान, ब्राम्हण सुवासिनीना दिले जाते, तेच भोजन गावकरी व मान्यवर यांना श्रीसाईप्रसादालयाच्या व्ही.आय.पी. च्या दोन हॉलमध्ये ठराविक वेळेत देण्याची व्यवस्था करण्यात येईल. या दिवशी साईभक्त व गावक-यांसाठी श्री साई प्रसादालयामध्ये उत्सवाचे नेहमीचे प्रसाद भोजन संस्थानतर्फे मोफत देण्यात येईल. |
| ३. | अखंड पारायण व्यवस्था | उत्सव काळात शनिवार, दि.२४/१०/२०२० रोजी पहाटे ५.१५ वा श्री व्दारकामाई मंदीरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल.<br>मा.तदर्थ समितीचे सदस्य पहिले ०५ अध्याय वाचतील व उर्वरित राहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक असे ४८ साईभक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नावे दि.२३/१०/२०२० रोजी नोंदवीली जातील. त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणाकरीता नावे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तांस प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल. दि.२५/१०/२०२० रोजी पहाटे ५.०० वा पारायण समाप्ती होईल. अखंड पारायणाकरीता व्दारकामाई रात्रभर उघडी ठेवण्यात येईल.<br>श्री पुण्यतिथी उत्सवात पोथी-वीणा प्रतीमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपुजा या कार्यक्रमांकरीता मा.तदर्थ समितीच्या सदस्यांची नावे निश्चित करणे आहे. याबाबतची टिपणी मा. तदर्थ समितीचे सभेत अलाहिदा स्वतंत्रपणे सादर करण्यात येईल. |
| ४. | श्री साईसत्यव्रत पुजा व अभिषेक पुजा | उत्सव काळात शनिवार, दि.२४/१०/२०२०ते सोमवार, दि.२६/१०/२०२०अखेर श्री साईसत्यव्रत (सत्यनारायण पुजा) व अभिषेक पुजा गर्दीचा अंदाज घेवून बंद किंवा चालू ठेवणेबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर निर्णय घेता येईल. |
| ५. | विद्युत रोषणाई | श्री पुण्यतिथी उत्सवात विद्युत विभागामार्फत समाधी मंदीर, व्दाराकामाई, श्री चावडी, श्री गुरुस्थान व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करण्यात येईल. विद्युत रोषणाईचे कामासाठी येणा-या साईभक्तांची निवास, भोजन, चहा-नाष्टयाची व्यवस्था संस्थानमार्फत दरवर्षी विनामुल्य करण्यात येते. त्याप्रमाणे याही वर्षी विनामुल्य करण्यात येईल. मात्र विद्युत रोषणाईचे सामान आणणे व नेणेकामीचे ट्रक भाडे व जाणे-येण्याचा खर्च देण्यात येतो. या उत्सवातही त्याप्रमाणे कार्यवाही |

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

| | | |
|---|---|---|
| | | करण्यात येईल. ते न आल्यास संस्थानमार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल. |
| ६. | प्रसाद-भोजन, चहा, कॉफी, दुध, बिस्कीट , लाडु व्यवस्था | उत्सव काळात प्रसादालयात मिष्टान्नासह भक्तांना मोफत प्रसाद भोजन दिले जाते. मा. तदर्थ समितीचे सदस्य व त्यांचे कुटुंबिय तसेच निमंत्रित कलाकारांना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येईल. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीसाठी येणा-या व्यक्तीची प्रसाद भोजनाची व्यवस्था नेहमीप्रमाणे केली जाईल. साईभक्तांचे सोयीसाठी चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादीची कॅटींनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध करुन दिली जाईल. तीनही दिवस मिष्टान्न प्रसाद नेहमीप्रमाणे देण्यात येईल. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री जास्तीत जास्त ठिकाणी सुरु करणेत येईल. याकामी सबंधित विभागाकडुन नियोजन करणेत येईल.<br>सन २०२० चे श्री पुण्यतिथी उत्सवात तिनही दिवसांचे प्रसाद भोजनात मिषूटांन्न पदार्थ देणेसाठी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर निश्चिती करता येईल. |
| ७. | संरक्षण विभाग | उत्सव काळात समाधी मंदिर व मंदिर परिसरात संरक्षण विभागामार्फत बंदोबस्त ठेवण्यात येईल. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा. पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना तसेच सांस्कृतिक कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपणचे परवानगीबाबत मा. पोलीस निरीक्षक, शिर्डी यांना विनंती करण्यात येईल.. |
| ८. | लेखाशाखा (देणगी काऊंटर) | उत्सवाचे मुख्य दिवशी मंदीर रात्रभर उघडे असल्याने देणगी काऊंटर्स तीन शिफ्टमध्ये सुरु ठेवण्यात येतील. तसेच उत्सव कालावधीत देणगी काऊंटर्सची वेळ सकाळी ५ वा. ते रात्रौ ११ वा. पर्यत करण्यात येईल. |
| ०९. | बांधकाम | उत्सव कालावधीत समाधी मंदीर परिसरात व इतर ठिकाणी तसेच आवश्यकतेनुसार मंडप/शामियाने व कलाकारांसाठी स्टेज इ.व्यवस्था केली जाईल. |
| १०. | जादा कंत्राटी कर्मचारी | आवयकता भासल्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने जादा कंत्राटी कर्मचारी वर्ग देण्यात येईल. |
| ११. | प्रथमोपचार | संस्थानमार्फत मंदीर परिसर,पिंपळवाडी रोड दर्शन रांग व श्री साई प्रसादालय या ठिकाणी प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात येतील. तसेच सुसज्य अशी रुग्णवाहिका मंदीर परिसरात ठेवण्यात येईल. |
| १२. | पालखी व्यवस्था | श्री पुण्यतिथी उत्सवात ब-याच ठिकाणाहून पालख्या येत असतात, उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था श्री साईबाबा धर्मशाळा येथे करण्यात येते. या वर्षीही नेहमीप्रमाणे ती व्यवस्था करण्यात येईल. त्याचप्रमाणे येणा-या पालख्यांसाठी पिण्याचे पाण्याची व्यवस्था मागील उत्सवाप्रमाणे यंदाही करण्यात येईल नेहमीप्रमाणे पालखी मंडप, वीज व पाणी व्यवस्था करणेत येईल. |
| १३ | पाणी पुरवठा | पाटबंधारे खात्यास उत्सव काळात कॅनॉल चालू ठेवणे बाबत विनंती करण्यात येईल. नियमित पाणीपुरवठा राहील याची व्यवस्था करण्यात येईल. |
| १४ | भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था | संस्थानचे भक्तनिवासस्थान इमारतीमधून तसेच साई आश्रम, व साई धर्मशाळा परिसरात स्वतंत्र मंडप टाकून पालखी पदयात्रीसाठी व भक्तांची निवासव्यवस्था करण्यात येईल. उत्सवात समाधी मंदीर परिसर व इतर ठिकाणी तसेच आवश्यकतेनुसार मंडप/शामियाने टाकणेत येतील. आवश्यकतेनुसार व गरजेनुसार त्यात वाढ करता येईल याकामी बांधकाम विभागासह इतर संबंधीत विभागामार्फत नियोजन करणेत येईल. |
| १५ | फोटो व्हीडीओ शुटींगबाबत | उत्सवाचे कार्यक्रमाचे फोटो व व्हीडीओ शुटींगची क्लीप मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने प्रेसला देण्यात येईल |
| १६ | खर्चाचे अंदाजपत्रक | श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव -२०१९साठी रु.७५,५८,८९८ /- मात्र इतक्या रक्कमेस मंजुरी देण्यात आली होती. प्रत्यक्षात रु. ४९,७२,७७४/- मात्र इतका खर्च झालेला आहे.<br>श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०२० करीता रु.४७,०५,१००/- मात्रचा खर्च मंजुरीसाठी सादर केला आहे. |

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

श्री पुण्यतिथी उत्सव-२०१९ करीता झालेला खर्च व अपेक्षित खर्च तपशिलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

**श्री पुण्यतिथी उत्सव -२०२० अंदाजपत्रक**

| अ. क्र | खर्च तपशिल | श्री पुण्यतिथी उत्सव -२०२० | | श्री पुण्यतिथी उत्सव-२०२० अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|
| | | अंदाजे खर्च | प्रत्यक्ष खर्च | |
| १ | मंडप, कमानी, स्टेज, व इतर | १४,८२,१७६ | १२,७८,२१४.८८ | १०,६८,००० |
| २ | कलाकार बिदागी (वाजंत्री, किर्तनकार, निमंत्रीत कलाकार ) व मंदिराकडील शिराप्रसाद , दहीहंडी, कलाकार निवास, इतर खर्च | १०,००,००० | ४,९५,९५९.०० | ५,००,००० |
| ३ | भक्तांना मिष्टान्न व फर्निचर भाडे खर्च (श्रम परिहार मजुरीसह) | ११,०७,८८० | ९,७२,४४६.१० | ८,५०,००० |
| ४ | विद्युत रोषणाई (जनरेटर भाडे, इंधन खर्च ) | १५,००,०००. | ७,७१,२११.२४ | ९,००,००० |
| ५ | निमंत्रण पत्रिका, उदीप्रसाद पाठविणेकामी पोष्टेज खर्च (आश्रयदाते विदेशी भक्तांसह ) | १३,९५,००० | १३,११,५४३.०० | १०,००,००० |
| ६ | जादा कर्मचारी स्वयंसेवक (विदयार्थी ) मानधन | ७,०८,८४२ | १,४३,४००.०० | १,५०,००० |
| ७ | पालख्याचे ठिकाणी पिण्याची पाण्याची व्यवस्था खर्च (टॅंकर डिझेलसह) | ३,५०,००० | - | १०,००० |
| ८ | सीसीटीव्हीसेल - कॅमेरे व सीडी डीव्हीडी खरेदी | - | - | २५,००० |
| ९ | मंदिर व मंदिर परीसर फुलाचे डेकोरेशन | - | - | २,००,००० |
| १० | इतर खर्च फर्निचर व भांडी खर्च | १५,००० | - | २,१०० |
| | **एकुण रुपये** | ७५,५८,८९८ | ४९,७२,७७४.२२ | ४७,०५,१०० |

**विभागाचा अभिप्राय**–मंदिर व मंदिर परिसरात करावयाच्या फुल सजावटीसाठी देणगीदार साईभक्तांचा प्रस्ताव प्राप्त न झाल्यास संस्थानमार्फत फुल सजावट करणेसाठी उपरोक्त अ.नं.९ मध्ये तरतूद करणेत आलेली आहे.

संस्थानमध्ये साज-या होणा-या सर्वच उत्सवांना साईबाबा हयात असल्यापासूनची परंपरा आहे. साहजिकच उत्सव हा संस्थानचा नियमित कार्यक्रमांचा भाग आहे. पर्यायाने त्यासाठी विविध बाबींवर होणारा खर्च हा देखील नियमित खर्चाचा भाग आहे. संस्थान कर्मचा-यांची दरमहाची पगार बिले, विद्युत बिले, इंधन बिले आदी प्रमाणेच सुमारे शंभरपेक्षा अधिक वर्षाची परंपरा असलेल्या उत्सवांसाठी करावा लागणारा खर्च हा संस्थानच्या नियमित खर्चाचाच भाग आहे. सदर खर्चासाठी संस्थानच्या प्रत्येक वर्षीच्या मुळ अंदाजपत्रकात तरतुद केलेली असते व मुळ अंदाजपत्रकास मा. व्यवस्थापन/तदर्थ समिती यांची मान्यता घेतली जाते त्याचप्रमाणे प्रत्येक उत्सवाचे आगोदर त्या त्या उत्सवास लागणा-या अपेक्षित खर्चासही मा.व्यवस्थापन समिती/ तदर्थ समितीची मान्यता घेण्यात येते त्यामुळे अधिनियमातील तरतुदीनुसार उत्सव आयोजित करणे व तो पार पाडण्याची अंमलबजावणी करावयाची असल्याने उत्सवाच्या नियमीत खर्चास मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेण्याची आवश्यकता नसावी असे नम्र मत आहे.

सध्या देशात/महाराष्ट्र राज्यात कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव आहे त्यामुळे राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायद्यान्वये अधिसुचना निर्गमीत करण्यात आलेली आहे सदरच्या अधिसूचनेचा कालावधी कधीपर्यंत असेल हे आज सांगता येणार नाही.

तरी साथरोग प्रतिबंधात्मक कायद्याच्या अधिसुचनेच्या अधिन राहून श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०२० साजरा करता येईल असे नम्र मत आहे.

**प्रस्ताव**–तरी विभागाच्या अभिप्रायात नमुद केलेप्रमाणे साथरोग प्रतिबंधात्मक कायद्याच्या अधिसुचनेच्या अधिन राहून श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०२० चे आयोजन करणे व त्याबाबतच्या अनुषंगिक सुविधा उभारणेकामी उपरोक्त नमूद बाबी व त्यासाठी येणा-या रक्कम रुपये ४७,०५,१००/- (रुपये सत्तेचाळीस लाख, पाच हजार, शंभर) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कोव्हिड-19 च्या पार्श्वभूमिवर या विषयाचा सर्वकष अभ्यास करुन प्रस्ताव समिती समोर ठेवण्यात यावा.**

**(कार्यवाही-शताब्दी कक्ष)**

---

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

**विषय नं.३९** **श्री साईबाबा हॉस्पिटल तसेच श्री साईनाथ हॉस्पिटल येथील ए.सी.यंत्रणेचे एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेस्हि सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकरीता ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**विषय नं.४०** **श्री साई प्रसादालयातील वायुविजन यंत्रणेचे एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेस्हि सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकरीता ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**विषय नं.४१** **श्री साई प्रसादालय व साई आश्रम भक्तनिवास येथील असणा-या साईटेक प्रोजेक्ट करीता बसविणेत आलेल्या ए.सी.यंत्रणेचे सन २०२०-२१ या एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेस्हि सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकरीता ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**विषय नं.४२** **श्री साईबाबा संस्थान परिसरात लावणेत आलेल्या सर्व वॉटर कुल यंत्रणेचे एक वर्ष कालावधी करीता वार्षिक कॉम्प्रेस्हि सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकरीता ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**विषय नं.४३** **दि.०१ एप्रिल,२०१९ ते दि.३१ मार्च,२०२० अखेर/कालावधीत अनुदान दिलेले रुग्ण संख्या व अनुदान रक्कम यांची नोंद घेणेबाबत.**

**विषय नं.४४** **सुधारीत वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावली लागू करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**विषय नं.४५** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये जुन-२०२० महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.३०,८४,८९५/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४४३** **उपरोक्त विषय नं.३९ ते ४५ या विषयावरील चर्चा सायंकाळी ६.३० नंतर उशीर झाल्याने पुढे ढकलण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.४६** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे कामकाज करुन घेणेकामी मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.०४ मार्च २०१९ रोजीचे मा.स्थानिक उपसमितीचे सभेतील निर्णय क्र.०३ अन्वये, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छता हाऊसकिपींग कामाकरीता केमिकल साहित्य/सामुग्रीसहचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रकियेतील निम्नतम निविदाधारक मे. फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांचे निम्नतम वार्षिक दर रक्कम रु.२,३२,००,५८४/- मात्र स्विकारणेत येऊन मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६ फेब्रुवारी २०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१६९ अन्वये त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असा निर्णय झाला होता.

सदर निर्णयान्वये मे.फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांना जा.क्र.एसएसएस/एसएसबीएच/पीआरओ/६६३/२०१९, दि.२९ मे २०१९ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छता हाऊसकिपींग कामाकरीता केमिकल साहित्य/सामुग्रीसहचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी दि.०१ जून २०१९ ते दि.३१ मे २०२० या १ वर्ष कालावधीचा कार्यादेश देण्यात आलेला होता. दि.३१ मे २०२० रोजी त्यांची सदर कामाची मुदत संपुष्टात येणार असल्याने सन २०२०-२१ ह्या वर्षासाठी नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे खर्चास मान्यता मिळणेकामी दि.२७ मार्च २०२० रोजीचे मा.तदर्थ समितीचे सभेत विषय सादर केला असता निर्णय क्रं.२२९ नुसार, यावर सविस्तर चर्चा होऊन सन २०२०-२१ या वर्षाकरीता संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे कामकाज करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अदांजे रक्कम रु.२,९०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील अॅप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.

सदर निर्णयाची दि.२४ एप्रिल २०२० रोजी कामापुरती नक्कल सभाकामकाज विभागाकडून प्राप्त होताच मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील अॅप्लीकेशन दाखल करुन मान्यता मिळविणेकामी संस्थानचे विधी विभागाकडे त्वरीत जमा केलेली होती. त्यानुसार विधी विभागाने आवश्यक पुर्तता करुन दि.१४ मे २०२० रोजी संस्थानचे पॅनलवरील वकीलांकडे मसुदा नोटरी करुन सिव्हील अॅप्लीकेशन मा.उच्च न्यायालयात ऑनलाईन दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळणेकामी दिलेले आहे. सदर परवानगी मिळणेसाठी तसेच ई-निविदा प्रक्रिया राबवुण नविन ठेकेदाराची नेमणुक होणेस काही कालावधी लागणार असल्याने निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन ठेकेदाराची नेमणुक हाईपर्यंत सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदारास

निविदा, कार्यादेश व करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार मंजुर दरात मुदतवाढ देणेबाबत दि.११ मे २०२० रोजीचे मा. तदर्थ समितीचे सभेत विषय सादर केला असता, विषय नं.६२ व निर्णय क्र.२९६ नुसार यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम करणारे सध्याचे ठेकेदार मे. फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांना निविदा, कार्यादेश व करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार तीन महिने कालावधीसाठी अथवा ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन ठेकेदाराची नेमणुक होईपर्यंत यापैकी जे आधी होईल तो पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार मे. फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांना दि.२६ मे २०२० रोजीचे पत्रान्वये अवगत करुन कामकाज सुरु ठेवले आहे.

तथापी उपरोक्त निर्णयान्वये दिलेली मुदतवाढ दि.३१ ऑगस्ट २०२० रोजी संपुष्टात येणार आहे. नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मा.उच्च न्यायालयाची परवाणगी मिळणेकामी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर दि.०८ जूलै २०२० रोजी सिव्हील ॲप्लीकेशन (CA/4409/2020) सादर झालेला असून त्यास मा.उच्च न्यायालयाची अद्याप मान्यता मिळाली नसल्याची माहिती विधी विभागाने दिली आहे. त्यामुळे मे.फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांना देण्यात आलेली मुदतवाढ पुन्हा नव्याने वाढवावी लागणार आहे.

**सद्यस्थिती**– मे.फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांना दोन्ही रुग्णालयांसाठी यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छताकामी कामाचे स्वरुपानुसार लागणारे मनुष्यबळ, मशिनरी/ साहीत्य तसेच उपकरणे व केमिकल या साहित्यासह प्रती महिना रक्कम रु.१९,३३,३८२/- (अक्षरी एकोनावीस लाख तेहेत्तीस हजार तीनशे ब्याऐंशी रुपये मात्र) प्रमाणे (वार्षीक रक्कम रु.२,३२,००,५८४/- मात्र) कामाचा दि.०१ जून २०१९ ते दि.३१ मे २०२० या १ वर्ष कालावधीचा ठेका देण्यात आलेला होता. सदर कामाची मुदत दि.३१ मे २०२० रोजी संपुष्टात येणार असल्याने दि.११ मे २०२० रोजीचे मा. तदर्थ समितीचे सभेतील विषय नं.६२ व निर्णय क्र.२९६ नुसार श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम करणारे सध्याचे ठेकेदार मे.फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांना निविदा, कार्यादेश व करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार तीन महिने कालावधीसाठी अथवा ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन ठेकेदाराची नेमणुक होईपर्यंत यापैकी जे आधी होईल तो पर्यंत मुदतवाढ देणेबाबत निर्णय झाल्याने त्यांचेकडून कामकाज सुरु ठेवले आहे.

**विभागाचा अभिप्राय**–श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे कामकाज करणेकामी मे. फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांना देण्यात आलेल्या कामाची मुदत दि.३१ मे २०२० रोजी संपुष्टात येत होती. नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी मा.उच्च न्यायालयाची परवाणगी मिळाले नंतर काही कालावधी लागणार असल्याने, दि.११ मे २०२० रोजीचे मा. तदर्थ समितीचे सभेत सदर ठेकेदारास मुदतवाढ देऊन कामकाज करुन घेणेबाबत विषय सादर केला असता, निर्णय क्र.२९६ नुसार श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम करणारे सध्याचे ठेकेदार मे.फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांना निविदा, कार्यादेश व करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार तीन महिने कालावधीसाठी अथवा ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन ठेकेदाराची नेमणूक होईपर्यंत यापैकी जे आधी होईल तो पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार मे. फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांना दि.२६ मे २०२० रोजीचे पत्रान्वये मुदतवाढबाबत अवगत करुन कामकाज सुरु ठेवले आहे.

मात्र सदर दिलेल्या मुदतवाढीची मुदत दि.३१ ऑगस्ट २०२० रोजी संपुष्टात येणार आहे. तसेच नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मा.उच्च न्यायालयाची अद्याप परवाणगी मिळाली नसल्याने मे.फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांना आणखी काही कालावधीकरीता मुदतवाढ देऊन कामकाज करुन घ्यावे लागणार आहे, असे नम्र मत आहे. कारण मा.उच्च न्यायालची मान्यता मिळालेनंतरही ई-निविदा प्रक्रिया राबविणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणे, प्री-बिड, तांत्रिक व व्यावसायीक बिड प्रक्रिया पुर्ण करुन मा.तदर्थ समीतीचे मान्यतेने कार्यादेश देणे याकांमी साधारणत: तीन महिन्याचा वाढीव कालावधी लागणार आहे.

मागणी– श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेकामास मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळाले नंतर ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणे, प्रीबिड, तांत्रिक व व्यवसायीक बिड प्रक्रिया पुर्ण करुन मा.तदर्थ समीतीचे मान्यतेने कार्यादेश देणे याकामी साधारणत: तीन महिन्याचा वाढीव कालावधी लागणार असल्याने ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन ठेकेदाराची नेमणूक होईपर्यंत सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदारास निविदा, कार्यादेश व करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

मंजुर दरात पुन्हा मुदतवाढ देऊन कामकाज करुन घेणेबाबत मान्यता मिळणेस सदरचा विषय मा.तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४४४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे कामासाठी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार मे.फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांना निविदा, कार्यादेश व करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार दि.३०.०९.२०२० अखेर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

विषय नं.४७ **Corona Virus (Covid-19) संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आवश्यक असणारे PPE-Kit N-95 Face Mask खरेदीस व याकामी येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

विषय नं.४८ **Corona Virus (Covid-19) संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव होणा-या रुग्णांकरीता तसेच दोन्ही रुग्णालयातील दैनंदिन रुग्णांचे वापराकरीता औषधे सर्जिकल साहित्य तथा लॅब मटेरियल पुरेशा स्वरुपात उपलब्ध ठेवणेबाबत.**

विषय नं.४९ **मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्विय सहाय्यक सुनिल तांबे यांनी पदाचा गैरवापर घेऊन मोठया रकमेचे वैद्यकीय बील संस्थानकडून परतावा मिळणेसाठी सादर केलेबाबत राजु जोंधळे शिर्डी यांच्या विना दिनांकाचे पत्राबाबत.**

निर्णय क्र.४४५ **उपरोक्त विषय नं.४७ ते ४९ या विषयावरील चर्चा सायंकाळी ६.३० नंतर उशीर झाल्याने पुढे ढकलण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

विषय नं.५० **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे अधिकारी/कर्मचा-यांसाठी (प्रशासकीय/तांत्रिक) सेवाप्रवेश नियमास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **विषयाची पूर्वपीठीका -**

**अ)** श्री साईबाबा संस्थान अधिनियम-२००४ च्या कलम १३ (४) मधील परंतुकातील तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती यांच्या आस्थापनेवर आवश्यक असणा-या कर्मचा-यांच्या आकृतीबंधास महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांचे शासन निर्णय क्रमांकः सासंवि-२००९ /४३३/ (३७/०९)/ का. १६, मंत्रालय मुंबई. दिनांक ०७ ऑगस्ट, २००९ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ४८२६ पदांचे आकृतीबंधास मान्यता देणेत आलेली असून त्यामध्ये खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूरी देणेत आलेले आहे. त्या खालीलप्रमाणे-

१) समितीने पदनिहाय सेवा प्रवेश नियम तयार करावेत व त्यास शासन मान्यता घ्यावी. तसेच सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना सेवा प्रवेश नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.

२) सेवा प्रवेश नियमांमध्ये प्रत्येक पदांची शैक्षणिक पात्रता, जबाबदारी व कर्तव्य ढोबळ मानाने निश्चित करण्यात यावे. सेवा प्रवेश नियमांमध्ये पदोन्नतीची साखळी याबाबत स्पस्टपणे उल्लेख असावा.

३) सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी.

४) सेवा प्रवेश नियमांमध्ये वेतनश्रेणीचा उल्लेख असावा.

५) आकृतीबंधातील मंजुर पदांवर काम करणा-या कर्मचा-यांना शासनाप्रमाणे निवृतीवेतन लागू असणार नाही.

६) समितीला आकृतीबंधाबाहेर जाऊन पदे भरती करता येणार नाही.

७) समितीला कोणत्याही पदाचे पदनाम अथवा वेतनश्रेणी शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय बदलता येणार नाही.

८) समितीने शक्यतो आकृतीबंधामधील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी. जेणेकरून व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही.

९) आस्थापनेवरील खर्च सिमीत करण्यासाठी राज्य शासनाच्या अधिका-यांची आकृतीबंधामध्ये निश्चित पदांवर प्रतीनियुक्तीने नियुक्ती करण्याची तरतूद ठेवावी.

१०) तांत्रिक पदे नव्याने भरतांना त्याच क्षेत्रातील तज्ञांचा निवड प्रक्रियेत समावेश असेल याची दक्षता घ्यावी.

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

११) आकृतीबंधातील पदांवर नविन कर्मचा-यांची नियमित पदावर नियुक्ती झाल्यानंतर सदर कर्मचा-याचा परिविक्षाधीन कालावधी एक वर्षाचा असावा व त्याचे वेतन वेतनश्रेणीतील सुरवातीच्या टप्प्यावर निश्चित करावे.

(ब) मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक २८ ऑक्टोबर,२०१३ व दिनांक ३० जानेवारी, २०१४ चे पत्रान्वये, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरिल पदांचे कर्मचारी आकृतीबंधास अनुसरुन, संस्थानचे आस्थापनेवरील विविध संवर्ग, त्यांची शैक्षणिक पात्रता, नियुक्ती, वेतनश्रेणी व पदोन्नती इत्यादीबाबत छाननी करुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचे आस्थापनेवरील कर्मचा-यांच्या नियुक्ती व पदोन्नतीच्या विनियमाचे प्रारुप पदांच्या तपशिलांच्या परिशिष्टासह शासनास तातडीने सादर करणेबाबत कळविलेले होते.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १२ जून,२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ४९३ अन्वये, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचा विनियम (सेवाप्रवेश नियम) मध्ये प्रस्तावित दुरुस्त्या करणेत येऊन, सदर सेवाप्रवेश नियमाचा प्रस्ताव परिशिष्टांसह मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस मान्यतेसाठी सादर करणेत यावा, असा निर्णय पारित करणेत आला.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय क्रमांक ४९३ अन्वये मान्यता मिळालेनुसार, सामान्य प्रशासन विभागाकडील पत्र क्रमांक १४७०/२०१४, दिनांक २६ जून,२०१४ अन्वये,विविध विभागातील अ.नं.१ ते ११ पदांबाबत आवश्यक ते बदल करुन तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचा विनियम (सेवाप्रवेश नियम) मध्ये प्रस्तावीत दुरुस्त्या करणेत येऊन, प्रारुप सेवा प्रवेश नियमांचा प्रस्ताव परिशिष्टांसह मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करणेत आला.

उपरोक्त दिनांक २६ जून, २०१४ रोजीचे सादर करणेत आलेल्या प्रस्तावाबाबत, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील पत्र दिनांक ३० जून,२०१५ नुसार,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम,२००४ च्या कलम २५ (३) मधील तरतुदीनुसार सदर अधिनियमांतर्गत लागू करण्यात आलेल्या नियमांना पुर्व प्रसिद्धी देणे आवश्यक असुन त्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणी सदर नियमांना पुर्वप्रसिद्धी देण्यात आली आहे किंवा कसे हे स्पष्ट करावे, असे कळविले.

मा.शासनाचे उपरोक्त दिनांक ३० जून,२०१५ रोजीचे पत्रानुसार कार्यवाही करुन सेवाप्रवेश नियमाचा अंतिम मसुदा सादर करणेत येईल, असे सामान्य प्रशासन विभागाकडील पत्र दिनांक ३१ जुलै, २०१५ अन्वये कळविणेत आलेले आहे. मा. शासनाचे निर्देशानुसार, संस्थान प्रशासनामार्फत दिनांक १० ऑगष्ट, २०१५ रोजीचे परिपत्रकान्वये, सेवाप्रवेशाचे प्रारुप/सेवा प्रवेश नियमांचा मसुदा प्रसिध्द करणेत येऊन कर्मचा-यांच्या हरकती मागविणेत आल्या.

संस्थान आस्थापनेवरील कर्मचा-यांनी प्रारुप सेवाप्रवेश नियमाबाबत घेतलेल्या हरकतींवर दिनांक १४ जानेवारी, २०१६ व दिनांक २० फेब्रुवारी, २०१६ रोजी मा.प्रशासकीय अधिकारी यांचे समितीपुढे कर्मचारीनिहाय सुनावणी घेणेत आलेली होती. त्यानुसार सर्व संबंधित कर्मचा-यांना हरकती निकाली काढलेबाबत/अंशतः मान्य केलेबाबत इकडील विभागाकडील दिनांक २९ मार्च,२०१७ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आलेले आहे.

(क) श्री साईबाबा संस्थान आस्थापनेवर अधिकारी/कर्मचारी याचे सेवाप्रवेश नियम अंतिम न झाल्यामुळे त्यांच्या नियुक्ती व पदोन्नतीत अनियमितता होत असल्याच्या अनेक तक्रारी शासनस्तरावर प्राप्त होत आहेत. त्यामुळे सेवाप्रवेश नियम अंतिम करणे आवश्यक आहे. शासनाकडून या संदर्भात वारंवार पत्रव्यवहार करुनही सेवाप्रवेश नियम तयार करुन त्यांना पुर्वप्रसिद्धी देवुन त्याचे प्रारुप अद्यापही शासनास सादर करण्यात आलेले नाही. तरी संस्थान आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांचे सेवाप्रवेश नियमांचे प्रारुप दि.०४/०६/२०१८ पुर्वी शासनास सादर करावे असे शासनाने पत्राने कळविलेले आहे.

(ड) तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०२.२०१९ रोजीचे सभेत निर्णय क्र.१६५ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे कर्मचा-यांचा सुधारीत आकृतीबंध व सेवा प्रवेश नियम एक महिन्यात करणेकामी या क्षेत्रातील सेवानिवृत्त तज्ञ शासकीय अधिकारी/कर्मचारी यांची मानधनावर नेमणूक करणेस व याकामी येणा-या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली.

उपरोक्त मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार, सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक ११ जून, २०१९ व दिनांक १३ जून, २०१९ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये, संस्थान आस्थापनेवरील विविध विभागांचे सुधारित आकृतीबंध आणि सेवाप्रवेश नियमांचे प्रारुप तयार करुन त्यास अंतिम स्वरुप देणे, मा. शासनाने सुधारित आकृतीबंध व सेवाप्रवेश नियमांस मान्यता दिलेनंतर बिंदू नामावली तयार करुन अद्यायवत करणे आदि अनुषंगिक

आस्थापनाविषयक कामकाजासाठी सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी यांची नामिका सुची/कार्यगट तयार करणेकामी विहित कार्यपध्दती अवलंबून खालील ०४ सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची आस्थापना विषयक कामकाजासाठी नियुक्ती करणेत आलेली होती.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. त्र्यंबक अंबादास खैरे | २) | ॲड. डॉ. मधुकर दगडू गिरी |
| ३) | श्री. बाळासाहेब बापूराव भांडारकवठे | ४) | श्री. अशोक विठ्ठलराव शिंदे |

त्यानुसार सदरचे अधिकारी/कर्मचारी यांचे कार्यगटाने **दिनांक ०३ सप्टेंबर,२०१९** पासून कामकाजास सुरवात केली असून वेळोवेळी त्यांनी संस्थानचे विविध विभागांमध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहून कामकाजचा आढावा घेतलेला आहे.

**आता,** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे सुधारित आकृतीबंध, सेवाप्रवेश नियम, पदोन्नतीची साखळी, कार्यपध्दती एकल पदे तसेच आरक्षण नियमानुसार बिंदु नामावलीचे प्रस्ताव तयार करणेकामी नेमणेत आलेल्या कार्यगटाने विभागनिहाय प्रारुप सेवा प्रवेश नियम इकडील विभागाकडे दिनांक १४ ऑगस्ट,२०२० रोजी सादर केलेले आहेत. सदरचे प्रारुप सेवाप्रवेश नियम मा. तदर्थ समितीची सभेपुढे सादर करावे लागणार आहे. सदरचे प्रारुप सेवाप्रवेश नियमांस मा.तदर्थ समितीची मान्यता मिळालेनंतर ते मा.शासनाकडे मान्यतेसाठी पाठवावे लागणार आहे.

प्रस्ताव-

१) आस्थापनाविषयक कार्यगटाने निश्चित करुन दिलेली सेवाप्रवेश नियमावलीस मान्यता असावी.

२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडील सांप्रत आकृतीबंध, पदोन्नतीची साखळी, एकल पदे, तसेच आरक्षण नियमानुसार बिंदू नामावलीचे प्रस्ताव तयार करणेकामी नेमणेत आलेल्या कार्यगटाने विभागनिहाय प्रारुप सेवाप्रवेश नियमांस मान्यता असावी.

३) सदरचे सेवाप्रवेश नियमांस मा. तदर्थ समितीचे मान्यतेनंतर, मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे याचीका दाखल करणेच्या मान्यतेस्तव तसेच सदरचे सेवाप्रवेश नियमांचा प्रारुप पूर्वप्रसिध्द करणेस मान्यता असावी.

४) मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांनी सदरचे सेवाप्रवेश नियमांस मान्यता दिलेनंतर ते मा. शासन मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता असावी.

तरी उपरोक्तप्रमाणे मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीपुढे सविनय सादर.

निर्णय क्र.४४६ **सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली, सदस्य सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत मा.उच्च न्यायालयाचे निर्णयाप्रमाणे पदोन्नती देण्यासाठी सेवाप्रवेश नियम आवश्यक आहेत. श्री साईबाबा संस्थानकडे सेवा प्रवेश नियमच नाहीत. त्यामुळे संस्थान प्रशासनात कुंठीतावस्था असुन प्रशासकीय कार्यक्षमतेवर त्याचा परिणाम होत आहे. यासाठी सेवा प्रवेश नियम कमिटीने नियम तयार करुन दिलेले आहेत. त्याचे अवलोकन व्हावे.**

**सदरचा विषय सभेत मंजुर केल्यास अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती व प्रोत्साहन मिळून कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल. यावर मा.अध्यक्ष यांनी सेवा प्रवेशाबाबत झालेले निर्णयाचे संदर्भात औरंगाबाद खंडपीठात कुठली याचिका, जनहित याचिका प्रलंबीत आहे का? याबाबत श्री.बजाज, प्रभारी विभागप्रमुख यांना विचारणा केली असता त्यांनी असे म्हटले की, एक याचिका होती पण त्याचे काय झाले हे मला माहीत नाही कारण मी तीन वर्षापुर्वीच या विभागात रुजू झालो त्यामुळे मला माहीत नाही, असे बेजबाबदारपणाचे उत्तर दिले, यावर अध्यक्षांनी सदस्य सचिवांना असे विषय मांडतांना संपूर्ण अभ्यास करणे गरजेचे आहे असे दाखवून दिले व याविषयी माहिती घेण्यास सांगितले व सदरचा विषय परिपुर्ण सादर करण्याचे निर्देश दिले. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**यानंतर आजचे तदर्थ (Ad-hoc) समिती सभेमध्ये आयत्या वेळी खालील विषयांवर निर्णय घेण्यात आले.**

**आयत्या वेळेचा विषय नं.०१** **आयकर कायदा, १९६१ च्या तरतुदीनुसार रु.२२५ कोटी अखर्चीत उत्पन्न दि.३१.०३.२०२१ अखेर विनियोगाबाबत.**

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

निर्णय क्र.४४७ सदर विषयावरील चर्चा सायंकाळी ६.३० नंतर उशीर झाल्याने पुढे ढकलण्यात आली.

(कार्यवाही-लेखाशाखा)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०२ श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीवर वाढीव तिस-या मजल्याचे बांधकामासाठी यापुर्वी मंजूर रू.४०.३४ कोटी व्यतिरिक्त शिर्डी नगरपंचायत प्रिमियम चार्जेस व इतर करांसाठी अंदाजे रू.६.९१ कोटी मात्रचे वाढीव खर्चास मान्यता देणे, तसेच सध्या बांधकाम चालू असलेल्या (G+2) इमारतीसाठी मंजूर रू.११२.४०९ कोटी रकमेसह एकूण रू.१५७.४०५ कोटी मात्रचे सुधारीत अंदाजपत्रकीय रकमेच्याप्रस्तावाबाबत व राज्य शासनाने कळविलेल्या बाबींची पूर्तता करून पुनश्च परिपूर्ण प्रस्ताव राज्य शासनाचे प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणेस, तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेसाठी सिव्हील अर्ज दाखल करणेस मान्यता देणे बाबत.

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद** - अधिनियमाचे कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल, अशी तरतूद आहे.तसेच अधिनियमाचे कलम २१ (१) मधील पोटकलम (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे, अशी तरतूद आहे.

**शासन निर्णय:**- १)शासन निर्णय क्र.सासंवि-१०१७/१३१३/प्र.क्र.१३३/का.१६, दि.१६/०२/२०१८ अन्वये, शिर्डी सर्व्हे नं.२/४, ३/१ व ३/७ मधिल संस्थान मालकीच्या क्षेत्रफळावर नविन दर्शनरांग प्रकल्प उभारणीसाठी येणा-या रू.११२,४०,९०,०५९/- मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

२) शासन निर्णय क्र.सासंवि-१०१७/१३१३/प्र.क्र.१३३/का.१६, दि.१६/०८/२०१९ अन्वये, सर्व व्यवहार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांच्या नावाने करण्यास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली आहे.

*"२. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मे. भानू कन्स्ट्रक्शन मुंबई या भागीदारी पेढीस श्रीम भानु कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई कंपनीने विधिवत Take Over केले आहे करिता श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारत बांधकाम प्रकल्पासंबंधी येथून पुढील सर्व व्यवहार तसेच कर कपात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे श्रीम भानु कन्स्ट्रक्शन प्रा.लि. मुंबई यांच्या नावाने करण्यास मान्यता देण्यात येत आहे."*

**मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय -**

- मा. व्यवस्थापन समितीचे दि.२२/०८/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५०६ नुसार श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारतींचे बांधकाम करणेसाठी ठेकेदार भानू कन्स्ट्रक्शन, मुंबई यांना जा.नं.एसएसएसटी/ बांधकाम/ २५२०/२०१८, दि.२३/०८/२०१८ अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे.
- मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३११ खालील प्रमाणे संमत झालेला आहे.

*"....साईभक्तांचे दर्शनासाठी दर्शनरांगेचे काम भानू कन्स्ट्रक्शन, मुंबई यांचेमार्फत सुरु आहे. सदरहू बांधकामात भविष्यात ०१ मजल्याचे बांधकाम प्रस्तावित आहे. दर्शनरांग भक्तांचे वापरासाठी खुली झालेनंतर भविष्यात वरच्या मजल्याचे बांधकाम करणे अडचणीचे होईल. भक्तांच्या गर्दीचा विचार करता तिस-या मजल्याचे बांधकाम भानू कंन्स्ट्रक्शन, मुंबई यांचेकडून करणेस किती खर्च अपेक्षित आहे. याकरीता आर्किटेक्ट माथुर ॲन्ड काप्रे यांचेकडून खर्चाचा तपशिल मागवून पुढील बैठकीत सादर करावे, असे ठरले."*

- मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३४५ खालील प्रमाणे संमत झालेला आहे.

*"..... श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारतीचे बांधकाम हे सदर कामाचे ठेकदार भानू कंन्स्ट्रक्शन, मुंबई यांना बांधकामाचे एकूण क्षेत्रफळानुसार (Lumpsum) दिलेले असून Item wise दिलेले नाही. त्यामुळे दर्शन रांग इमारतीवर वाढीव तिस-या मजल्याचे बांधकाम करावयाचे असल्यास त्यासाठी स्वतंत्र ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागेल. तथापी सध्या दर्शनरांग इमारतीवर वाढीव तिस-या मजल्याची आवश्यकता नाही, असे ठरले."*

- मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४०६ खालील प्रमाणे संमत झालेला आहे.

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

*"…..यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीवर वाढीव तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत रक्कम रु.३४.०७ कोटी इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास तसेच त्याव्यतिरिक्त अधिकचे FSI करीता प्रिमियम चार्जेस, विकसन शुल्क व छाननी शुल्क आदा करणेसाठी नियमानुसार येणाऱ्या अतिरिक्त खर्चास मान्यता देण्यात आली. सदरहु प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा, व शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले."*

- मा. व्यवस्थापन समितीचे दि.२१/०८/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४७६ खालील प्रमाणे संमत झालेला आहे.

*"….. मा. व्यवस्थापन समितीच्या दि.२६.०७.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४०६ अन्वये श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीवर वाढीव तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत रक्कम रु.३४.०७ कोटी इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास तसेच त्याव्यतिरिक्त अधिकचे FSI करीता प्रिमियम चार्जेस, विकसन शुल्क व छाननी शुल्क आदा करणेसाठी नियमानुसार येणाऱ्या अतिरिक्त खर्चास मान्यता देण्यात आली. सदरहु प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा, व शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणे यावी, असे ठरले.*

*तथापी याबाबत सदर प्रकल्पाचे आर्किटेक्ट यांचे समवेत चर्चा करणेत आली. त्यावेळी सदर कामात टेरेस वॉटर प्रुफींग, ओव्हर हेड टँक, ममटी रुम, इलेक्ट्रीकल सबस्टेशन बिल्डींग विस्तारीकरण करणे, वॉटर सप्लाय पाईप लाईन, ड्रेनेज पाईपलाईन, एच.व्ही.ए.सी. पाईपलाईन, लिफ्ट संदर्भातील किरकोळ कामे, डी.जी.सेट, ट्रांसफार्मर, इले.केबलींग इत्यादी कामात वाढ होईल, त्यामुळे वर नमुद खर्चात रक्कम रु.६.२७ कोटी रुपयांनी वाढ होईल. त्यामुळे दर्शनरांग इमारतीचे तिसरा मजला बांधकामासाठी एकूण रक्कम रु.४०.३४ कोटी खर्च अपेक्षित आहे.*

*यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीवर वाढीव तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत रक्कम रु.४०.३४ कोटी इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास तसेच त्याव्यतिरिक्त अधिकचे FSI करीता प्रिमियम चार्जेस, विकसन शुल्क व छाननी शुल्क आदा करणेसाठी नियमानुसार येणाऱ्या अतिरिक्त खर्चास मान्यता देण्यात आली."*

**प्रस्तावना**-श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीचे बांधकाम श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांचेमार्फत सुरु आहे. सदरहू इमारतीचे बांधकाम सध्या निविदेप्रमाणे G+2 असून त्यामध्ये खालीलप्रमाणे सुविधा आहेत.

- **तळमजला**-नियोजित दर्शनांग इमारतीमध्ये ०३ भव्य प्रवेश हॉल आहेत, त्यामध्ये भक्तांना मोबाईल व चप्पल लॉकर्स, बायोमेट्रीक पास काऊंटर - ४८, पेड पास काउंटर -२०, लाडू काउंटर - १०, उदी व कापडकोठी काऊंटर - १०, बुक स्टॉल, डोनेशन ऑफिस, चहा / कॉफी काउंटर, सिक्युरिटी चेक एकाच ठिकाणी व एकाच वेळी-४० व्यक्तींची, जीने-११, विदयुतीकरण व्यवस्था जनरेटर बॅकअपसह, लेडीज व जेन्टस टॉयलेट व्यवस्था इ.
- **पहिला व दुसरा मजला**-भक्तांकरीता बसण्याची व्यवस्था असेलेले एकूण १२ मोठे हॉल (एक हॉल साईज - १५.१० मी. x ३१.१५ मी.), चहा / कॉफी काउंटर, विदयुतीकरण व्यवस्था जनरेटर बॅकअपसह, वायुविजन व्यवस्था, उदवाहक / लिफ्ट व्यवस्था - १०, जीने - ११, लेडीज व जेन्टस टॉयलेट व्यवस्था, आर. ओ. प्रक्रियेव्दारे शुध्द पिण्याचे पाण्याची व्यवस्था, फायर फायटींग व्यवस्था इ.

या व्यतिरिक्त या प्रकल्पात सांडपाणी प्रक्रिया संयंत्र, रॅम्प, प्रथमोपचार केंद्र, संपूर्ण इंटेरीअर वर्क, सायनेजेस, अंतर्गत रस्ते, स्ट्रीट लाईट, इलेक्ट्रीकल सबस्टेशन, जनरेटर व्यवस्था, वायुविजन व्यवस्था, लॅण्डस्केपींग, रेनवॉटर हार्वेस्टिंग, पिंपळवाडी रस्त्यावरुन मंदिर परिसरातील जुन्या दर्शनरांगेला जोडण्यासाठी कनेक्टींग ब्रिज, संरक्षण भिंत इत्यादी सुविधांचा समावेश करणेत आला आहे.

सदरहू प्रकल्पाचा ठळक तपशिल व बांधकामाच्या प्रगतीची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नाव : | श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारतीचे बांधकाम करणे. |
| आर्किटेक्ट : | माथूर ॲण्ड काप्रे असो., नवी दिल्ली. |
| ठेकेदार : | श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई. |
| कार्यादेश : | १) जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/२५२०/२०१८, दि.२३/०८/२०१८.<br>२) जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/१९९९/२०१९, दि.२२/०८/२०१९. |
| मंजूर निविदा रक्कम : | रु.१०९.५० कोटी. (Lumpsum Contract). |

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुदयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

| | |
|---|---|
| भानू कन्स्ट्रक्शन, मुंबई यांचेशी केलेल्या करारनाम्याचा दिनांक : | दि.२२/१०/२०१८. |
| श्रीम भानू कन्स्ट्रकशन प्रा. लि., मुंबई यांचेशी केलेल्या करारनाम्याचा दिनांक : | दि.२३/०८/२०१९. |
| कामाचा कालावधी : | १२ महिने (दि.१९/१०/२०१८ ते दि.१८/१०/२०१९). |
| मुदतवाढ : | मा. व्यवस्थापन समिती दि.२६/०७/२०१९ - निर्णय क्र.४३० - *यावर सविस्तर चर्चा होऊन, ठेकेदार यांना ESS, UGT व STP चे बांधकामासाठी अद्याप संस्थानकडून जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रकल्पाचे सर्व काम पुर्ण करण्यासाठी या जागा उपलब्ध करणेत आल्यानंतर तेथुन पुढे चार महिन्यांची मुदतवाढ निविदेतील पृष्ठ क्रं.०५ वरील अ.नं. ०७ ची Incentive अदा करणेबाबतची शर्त रद्द करण्याचे अटीवर देण्यास मान्यता देण्यात आली.* |
| एकूण बांधकाम क्षेत्रफळ : | निविदेत नमूद एकूण बांधकाम क्षेत्रफळ - २२,२१४ चौ. मी. (FSI Area.) |
| कामाची सद्यस्थिती : | • **मुख्य इमारत -**<br>**तळमजला** - आर.सी.सी काम पूर्ण, बांधकाम पूर्ण, प्लास्टर पूर्ण, ग्रेनाईट फ्लोरींगचे काम प्रगतीत, विंडो सिल व जॅम्बला रेड आग्रा स्टोन बसविणे प्रगतीत. प्लंबींगचे काम प्रगतीत, एच.व्ही.ए.सी चे काम प्रगतीत, फायर फायटींगचे काम प्रगतीत, इलेक्ट्रीकल कन्डयूटींग व वायरींगचे काम प्रगतीत, टॉयलेट वॉटरप्रुफिंग काम प्रगतीत.<br>**पहिला मजला** - आर.सी.सी काम पूर्ण, बांधकाम पूर्ण, प्लास्टर पूर्ण, एच.व्ही.ए.सी चे काम प्रगतीत, फायर फायटींगचे काम प्रगतीत, इलेक्ट्रीकल कन्डयूटींग व वायरींगचे काम प्रगतीत.<br>**दुसरा मजला** - आर.सी.सी काम पूर्ण, बांधकाम अंतिम टप्प्यात, प्लास्टर अंतिम टप्प्यात, एच.व्ही.ए.सी चे काम प्रगतीत, फायर फायटींगचे काम प्रगतीत, इलेक्ट्रीकल कन्डयूटींग व वायरींगचे काम प्रगतीत.<br>**टेरेस** - प्रस्तावित तिसरा मजल्यामुळे रॅम्पचे उत्तर व दक्षिण बाजूचे स्लॅब कास्टींग बाकी आहे. पॅरापेट बांधकाम, टेरेस वॉटरप्रुफिंग, ओव्हर हेड टॅंक, ममटी रूम, लिफ्ट रूमचे काम प्रलंबित आहे. |
| | • **कनेक्टींग कॉरीडॉर** -कनेक्टींग कॉरीडॉरपैकी मंदिर परिसरातील पी.आर.ओ चे समोरील कारंजाचे भागातील आर.सी.सी. काम पूर्ण झाले आहे. बांधकाम प्रगतीत आहे. प्रशासकीय इमारतीस जोडणा-या कॉरीडॉरचे कामाचे आर.सी.सी. काम जवळपास ९०% पूर्ण झालेले आहे.<br>**नियोजीत दर्शनरांग प्रकल्पातील** Connecting Corridor above Pimpalwadi Road (From Proposed Main Building to Mandir Complex) **चे कामात येत असलेले विद्युत जनित्र स्थलांतरीत केलेनंतर सदर कामास सुरूवात करता येईल.**<br>• **इतर कामे** -स्टॉर्म वॉटर लाईन, सिव्हरेज लाईन, फायर हायड्रंट लाईन, इलेक्ट्रीकल केबलकरीता पाईपलाईन व ट्रेंच, चेंबर बांधकाम, रस्त्याचे संदर्भातील इतर कामे इ., पिण्याचे पाईपलाईन इ. कामे प्रगतीत.<br>• **मुख्य इमारतीचे स्टोन क्लॅडींगचे काम प्रगतीत.**<br>• **ESS चे खोदाई कामास दि.१०/०५/२०२० पासून सुरूवात करणेत आली आहे.**<br>• **STP & UGT चे काम सुरू करणेबाबत ठेकेदारास कळविले आहे. सदर कामास सुरूवात करणेत येत आहे.** |

विषयांकित इमारतीवर तिस-या मजल्याचे वाढीव बांधकाम करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०८/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४०६ अन्वये रु.४०.३४ कोटी मात्र इतक्या अपेक्षित खर्चास मान्यता मिळालेली आहे. तसेच याव्यतिरिक्त अधिकचे FSI करीता प्रिमियम चार्जेस भरणे; विकसन शुल्क, छाननी शुल्क, आर्किटेक्ट फी अदा करणेसाठी अतिरिक्त खर्च येणार आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२१/०८/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४०६ अन्वये, नियोजीत श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीच्या प्रस्तावित तिस-या मजल्याचे बांधकामासाठी येणारे अपेक्षित खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेकरीता मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे संस्थानकडील पत्र जा.क्र.२३२८/२०१९, दि.१४/०९/२०१९ अन्वये प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

तदनंतर मा. कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी पत्र क्र.सासंवि-१०१७/१३१३/प्र.क्र.१३३ (भाग-२) का.१६, दि.२२/१०/२०१९ अन्वये, *"श्रीम भानू कंस्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांना देण्यात आलेल्या कार्यादेशाच्या रकमेमधून टेरस लेव्हलचे वरील भागातील कामे ठेकेदार यांचे स्कोपमधून कमी करण्यात येत असल्याचे सदर कामे कमी केल्यामुळे याबाबतचा न होणारा खर्च कमी करण्यात येणार आहे किंवा कसे, सदरहू रक्कम किती असेल, याबाबतची सविस्तर माहिती शासनास सादर करण्यात यावी."* असे कळविले आहे.

याबाबत आर्किटेक्ट यांना दि.०९/११/२०१९ रोजीचे पत्राव्दारे संबंधित तपशिल सादर करणेबाबत कळविणेत आले होते. आर्किटेक्ट यांचेकडून दि.०२/१२/२०१९ रोजी सदर कामाचे कार्यादेशाच्या रकमेमधून कमी होणारे खर्चाचा तपशिल प्राप्त झाला आहे. सदर कमी होणा-या खर्चाचा तपशिल मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे इकडील पत्र जा.क्र.३४२०/२०१९, दि.०५/१२/२०१९ व्दारे सादर करणेत आला आहे.

त्यावर मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मुंबई यांनी पत्र क्र. सासंवि-१०१७/१३१३/प्र.क्र.१३३ (भाग-२) का.१६, दि.१३/१२/२०१९ चे अनुषंगाने खालील बाबींची पूर्तता करुन पुनश्च परिपूर्ण प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करणेबाबत कळविले होते.

- मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी श्री.उत्तमराव शेळके यांनी दाखल केलेल्या जनहित याचिका क्र.१२०/२०१९ संदर्भात दिलेला आदेश तसेच सिव्हिल ॲप्लिकेशन क्र.१३०२९/२०१९ संदर्भात दिलेल्या आदेशाचे अनुषंगाने कार्यवाही करून प्रस्ताव सादर करणे.
- सदर प्रस्तावास संबंधित यंत्रणेकडून तांत्रिक मान्यता घेणे.
- अधिकचे एफएसआय करीता प्रिमियम चार्जेस, विकसन शुल्कव छाननी शुल्क यांच्या रकमेसह मान्यता.
- तिस-या मजल्याच्या बांधकामासाठी निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे किंवा कसे ?

वर नमूद बाबींचे अनुषंगाने आजपावेतो करणेत आलेल्या पूर्ततेची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | शासन पत्रातील बाब | करणेत आलेल्या पूर्ततेची सद्यस्थिती |
|---|---|---|
| ०१ | मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी श्री. उत्तमराव शेळके यांनी दाखल केलेल्या जनहित याचिका क्र.१२०/२०१९ संदर्भात दिलेला आदेश तसेच सिव्हिल ॲप्लिकेशन क्र.१३०२९/२०१९ संदर्भात दिलेल्या आदेशाचे अनुषंगाने कार्यवाही करून प्रस्ताव सादर करणे. | श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीवर वाढीव तिस-या मजल्याचे बांधकाम करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०८/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४०६ अन्वये रु.४०.३४ कोटी मात्र इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास तसेच त्याव्यतिरिक्त अधिकचे FSI करीता प्रिमियम चार्जेस, विकसन शुल्क व छाननी शुल्क आदा करणेसाठी नियमानुसार येणाऱ्या अतिरिक्त खर्चास मान्यता देण्यात आली आहे.<br>आता रु.४७.२५ कोटीह मात्रचे अपेक्षित खर्चास मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे मान्यतेने मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हिल ॲप्लिकेशन दाखल करणेस मान्यता मिळणेसाठी सदरहू प्रस्ताव सादर करणेत येत आहे. |
| ०२ | सदर प्रस्तावास संबंधित यंत्रणेकडून तांत्रिक मान्यता घेणे. | याबाबत मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडे अधिक्षक अभियंता, अहमदनगर यांचेमार्फत तांत्रिक मान्यता मिळणेसाठी इकडील जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/३८१३/२०१९, दि.३०/१२/२०१९ अन्वये प्रस्ताव सादर करणेत आला होता. मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी त्यांचेकडील दि.१०/०७/२०२० रोजीचे पत्राने पुढीलप्रमाणे कळविले आहे,<br>*".. .. सदर कामाची किंमत ही १५ कोटी पेक्षा जास्त असल्याने प्रस्तावाची छाननी करुन सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा रू.१५२.७५ कोटी किंमतीचा प्रस्ताव आपल्यामार्फत विधी व न्याय विभागास सादर करण्यासाठी पाठविण्यात येत आहे."*<br>*तसेच सदर कामास सुधारीत प्रशासकिय मान्यता प्राप्त झाल्यानंतर तिस-या मजल्याचे काम सुरू करणेपुर्वी सा.बां. विभागाकडून तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे व त्यासाठी आवश्यक असलेले छाननी शुल्क सा.बां. विभागाकडे भरणे आवश्यक असल्याचे सदरील वर नमूद पत्रात कळविले आहे."* |
| ०३ | अधिकचे एफएसआय करीता प्रिमियम चार्जेस, विकसन शुल्क व छाननी शुल्क यांच्या रकमेसह मान्यता. | याबाबत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना इकडील कार्यालयाचे दि.१७/१२/२०१९ रोजी पत्र देणेत आले. त्याअनुषंगाने शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी पत्र क्र.जा.क्र.नप/टे-८/२/११४८/२०१९, दि.२०/१२/२०१९ अन्वये छाननी शुल्क, विकास शुल्क, प्रिमियम चार्जेस, बांधकाम कामगार उपकरव सुरक्षा ठेव या |

**इकडील पत्र क्र.SSS/वशी-०४/१९७४ दि.२८.१०.२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील PIL/120 अनुसार झालेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त हे मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सर्व मुद्दयांचा अंतर्भाव करुन सुधारित होणेवर.**

| | | |
|---|---|---|
| | | सदराखाली एकूण रू.६,९०,८३,३८७/- इतकी रक्कम कळविली आहे. तसेच मंजूर नकाशातील बांधकामानुसार उपरोक्त रकमेत बदल होऊ शकतो असे कळविले आहे. संस्थान मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२१/०८/२०१९ मधिल निर्णय क्र.४७६ अन्वये,"…. *यावर सविस्तर चर्चा होवून, श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीवर वाढीव तिस-या मजल्याचे बांधकाम करणेस व त्याकामी येणा-या अपेक्षित रू.४०.३४ कोटी इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास तसेच त्याव्यतिरीक्त अधिकचे FSI करीता प्रिमियम चार्जेस, विकसन शुल्कव छाननी शुल्क आदा करणेसाठी नियमानुसार येणा-या अतिरीक्त खर्चास मान्यता देण्यात आली."*<br>प्रस्तावित तिसरा मजला बांधकामास शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांची परवानगी मिळणेकरीता संस्थानमार्फत पत्र जा.क्र.२८०२/२०१९, दि.२३/१०/२०१९ अन्वये अर्ज करणेत आलेला आहे. शिर्डी नगरपंचायत यांचेमार्फत सदर प्रस्ताव दि.०२/११/२०१९ रोजी सहा. संचालक, अहमदनगर यांचेकडे शिफारस मिळणेकरीता सादर करणेत आला आहे.<br>तसेच बांधकाम विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.२४.८ नुसार वाढीव चटई क्षेत्र (FSI) मंजूर होणेसाठी मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आला आहे.<br>तसेच मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर व मा. पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांचेकडे ना-हरकत दाखला मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आला आहे.<br>त्यावर मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना अग्रेषीत त्यांचेकडील पत्र क्र. मह. कार्या./जमिन-३ब/का.वि.११४/२०२०, दि.०२/०६/२०२० अन्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.<br>"….*विषयांकीत जमिन ही शिर्डी नगरपंचायत क्षेत्रातील श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अंतर्गत होणा-या बांधकामाबाबत असल्याने उक्त अधिनियमातील कलम १८ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार बांधकाम परवानगीचे अधिकार हे नियोजन प्राधिकारी म्हणून आपणास असल्याने शिर्डी नगरपंचायत क्षेत्रातील श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अंतर्गत होणा-या बांधकामाबाबत ना-हरकत प्रमाणपत्र देणेबाबतची कार्यवाही आपलेमार्फत करणेत यावी."* असे कळविले आहे. |
| ०४ | तिस-या मजल्याच्या बांधकामासाठी निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे किंवा कसे ? | याबाबत संस्थानचे पत्र क्र. जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/३६४०/२०१९, दि.१७/१२/२०१९ अन्वये तिस-या मजल्याचे प्रस्तावित बांधकामासाठी निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे किंवा कसे? याबाबत मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडून त्यांचे विभागाचे कार्यपद्धतीस अनुसरून मार्गदर्शन होणेबाबत विनंती करणेत आली. |
[illegible] दि. १३.०७.२०२० चे [illegible] क्र. १९ निर्णय क्र. १७३ [illegible]

[illegible] (Metes & Bound) [illegible]

[illegible] पाण्याची टाकी [illegible] आहे. त्यास [illegible] वर्षापासून [illegible] आहे.

[illegible] अतिक्रमण [illegible] अधिनियम १९६६ नुसार असे अतिक्रमण [illegible] नगरपंचायत ही स्थानिक स्वराज्य संस्था आहे व त्यांचेकडून जाणीवपूर्वक अतिक्रमण [illegible] नाही.

७. मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णयाप्रमाणे जर दावा दाखल केला तर त्याचे खालील प्रमाणे परिणाम होतील.

अ) कोर्ट दावा प्रदिर्घ काळ चालेल व संस्थान Litigation मध्ये खर्च व वेळ जाईल.

ब) Limitation Act section 27 प्रमाणे नगरपंचायत Adverse Possession क्लेम करू शकते.

क) सदर जागेवर पाण्याची टाकी आरक्षण असल्याने जरी जागा परत मिळाली तर त्याचा संस्थानला उपयोग नाही. त्यामुळे संस्थानला Litigation मध्ये वेळ लागून खर्च होणार आहे. वास्तव सदर प्रकरणी दिवाणी दावा दाखल करणेची बाब अप्रस्तुत असुन ती आवश्यक नाही असे आग्रही मत मांडले.

त्यावर तदर्थ समितीचे सदस्य श्री. स्वामी साहेब, अपर महसूल आयुक्त, नाशिक यांनी असे प्रतिपादन केले की, सदरचा निर्णय हा संपूर्ण विषयाचा अभ्यास करुन ३:१ अशा मताधिक्याने मंजूर करण्यात आलेला असल्याने त्यात बदल करण्याचा प्रश्न येत नाही. सबब सदरचा निर्णय मताधिक्याने कायम करण्यात आला.

---

निर्णय क्र. ३७४ – पायाभूत समिती सदस्य सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना शहर स्वच्छतेसाठी शासनाकडून शासन निर्णयाद्वारे खर्चासाठी रक्कम निर्धारित करुन दिलेली आहे. हे करताना विश्वस्तव्यवस्थापनाकडून विहीत पध्दतीने पायाभूत कार्यवाही करुनच शासन निर्णय झालेला असल्याने पायाभूत तदर्थ समिती पुर्वीच्या निर्णयाचे तसेच शासन आदेशाचे पुनर्विलोकन करु शकते काय? असा मुद्दा उपस्थित केला.

त्यावर तदर्थ समितीचे अध्यक्ष व सदस्य श्री. स्वामी साहेब, अपर महसूल आयुक्त, नाशिक यांनी असे प्रतिपादन केले की, पूर्वी सदरचा निर्णय हा संपूर्ण विषयाचा अभ्यास करुन ३:१ अशा मताधिक्याने मंजूर करण्यात आलेला असल्याने त्यात बदल करण्याचा प्रश्न येत नाही. सबब सदरचा निर्णय मताधिक्याने कायम करण्यात आला.

(कार्यवाही - पायाभूत विभाग)

---

१६. निर्णय क्र. ४०५ – यावर सविस्तर चर्चा झाली. संबंधीत विभाग TCS चे तज्ञ व संस्थेचे अधिकारी यांना Firewall खरेदी करण्याच्या प्रस्तावाची गरज/आवश्यकता पुढाऱ्यांनी तर्फने पटवू शकले नाहीत तसेच जुनी Firewall प्रणाली तात्पुरत्या काळात उपयोगात येऊ शकते असे समितीच्या लक्षात आणून [illegible]

Scanned with CamScanner

सुधारित पत्र क्र. ८८५/वशी-०४/१३०४/२०२० दि. २८/१०/२०२० चे पत्रानुसार माझी मते आक्षेपासह कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरित असे.

[illegible]

पूर्वीच्या निर्णयाऐवजी खालील प्रमाणे निर्णय वाचण्यात यावा.

यावर सविस्तर चर्चा झाली. [illegible] Firewall खरेदी करण्याच्या प्रस्तावाशी [illegible] तसेच जुनी Firewall प्रणाली [illegible] देण्यात आले. म्हणून माहिती तंत्रज्ञान विभागातील डेटा सेंटर [illegible] कार्यालयात [illegible] प्रणालीचे सुरक्षिततेच्या दृष्टीने [illegible] Firewall [illegible] Firewall खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

संस्थानकरिता एक नग Firewall खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३५,००,०००/- चे खर्चास या दुरुस्तीस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)

---

७. निर्णय क्र.४११ - यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांच्या वैद्यकीय बिलाचा परतावा करणेकामी नियमावली तयार करण्यात यावी, असे ठरले. तसेच उपरोक्त प्रस्ताव, अ मधील अ.नं.१२ भाऊसाहेब गंगाधर काळे व अ.नं.१४ पोपट गणपत महाले तसेच प्रस्ताव, ब, मधील अ.नं.७ भाऊसाहेब गंगाधर काळे यांचे बिलाची फेर तपासणी करण्यात यावी, असे ठरले.

तसेच उपरोक्त प्रस्ताव, अ, मधील अ.नं.१२ भाऊसाहेब गंगाधर काळे व अ.नं.१४ पोपट गणपत महाले तसेच प्रस्ताव, ब, मधील अ.नं.७ भाऊसाहेब गंगाधर काळे यांचे वैद्यकीय बिलाची फेर तपासणीच्या अधिन राहून, प्रस्ताव, अ, मधील १५ कर्मचाऱ्यांना देय असणारी वैद्यकीय बिलाची रक्कम रु.१,८४,७२५/- मात्र तसेच प्रस्ताव, ब, मधील ११ कर्मचाऱ्यांना देय असणारी वैद्यकीय बिलाची रक्कम रु.३,५१,३८६/- मात्र त्यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांच्या वैद्यकीय बिलाचा परतावा करणेकामी नियमावली तयार करण्यात यावी, असे ठरले. तसेच उपरोक्त प्रस्ताव, अ, मधील अ.नं.१२ भाऊसाहेब गंगाधर काळे व अ.नं.१४ पोपट गणपत दमाले तसेच प्रस्ताव, ब, मधील अ.नं.७ भाऊसाहेब गंगाधर काळे यांचे बिलाची फेर तपासणी करण्यात यावी, असे ठरले.

तसेच उपरोक्त प्रस्ताव, अ, मधील अ.नं.१२ भाऊसाहेब गंगाधर काळे व अ.नं.१४ पोपट गणपत दमाले तसेच प्रस्ताव, ब, मधील अ.नं.७ भाऊसाहेब गंगाधर काळे यांचे वैद्यकीय बिलाची फेर तपासणीच्या अधिन राहून, प्रस्ताव, अ, मधील १५ कर्मचाऱ्यांना देय असणारी वैद्यकीय बिलाची रक्कम रु.१,८४,७२५/- मात्र तसेच प्रस्ताव, ब, मधील ११ कर्मचाऱ्यांना देय असणारी वैद्यकीय बिलाची रक्कम रु.३,५१,३८६/- मात्र त्यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली.

महाले ऐवजी दमाले असा बदल संमत झाला.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

उपरोक्त पैकी निर्णय क्र.३६०, ३६६, ३७३ व ३७४ व्यतिरिक्त इतर कुठल्याही विषयावरील निर्णयाबाबत सदस्य समितीत सदरचे निर्णय कायम करण्याबाबत कुठलाही हरकतीचा मुद्दा कोणीही उपस्थित केला नसल्याने ते सर्व निर्णय सर्वानुमते कायम करण्यात आले.

---

Scanned with CamScanner

इतिवृत्त पत्र क्र. SSS/वशी-०४/१५६४ दि. २८/१०/२०२० चे प्रमाणसार [illegible] मते अभिलेखात कायम ठेवून दुरुस्त [illegible] स्वाक्षरीत केले

विषय नं.०२ अ) चक्रिय पध्दतीने मान्यता मिळाले विषय कायम करणे

अ) श्री साईबाबा संस्थानने भोयरे पठार (सुपा) येथे उभारणेत आलेल्या २.५ मेगावॅट (१.२५ मेगावॅट x २) क्षमतेचा पवनचक्की प्रकल्पातून निर्मित होणारी वीज (कॅप्टिव्ह) वापरणेकामी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेशी करारनामा करणेबाबत.

निर्णय क्र.४२२/अ सदरील चक्रिय पध्दतीने घेतलेल्या निर्णयास मान्यता घेण्यासाठी हा विषय घेतला असता, तदर्थ समितीचे अध्यक्ष यांनी अशी सूचना केली की, शिर्डीतील ज्या इमारती परिसर किंवा संकुल यांचा वीज वापर 2.5 मेगावॅट किंवा त्यापेक्षा जास्त आहे अशा इमारती परिसर किंवा संकुल यांना एकत्र करून त्यासाठी एका मिटरची मागणी MSEDCL कडे करावी. अशी वीज सदरचे पवन चक्कीवरून Captive mode ने देण्यात यावी अशी मागणी केल्यास संस्थानला वीज निर्मितीचा फायदा मिळावा यासाठी सदरची पवनचक्की उभारली नव्हती. संस्थान सध्या जास्त दराने वीज घेत असताना अशा परिस्थितीत सदर पवनचक्कीवरून Captive mode ने वीज मिळण्याची मागणी MSEDCL कडे करणे उचित दिसते.

यावर तदर्थ समितीचे सदस्य सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे मत मांडले की, सदर बाबतची मुलभूत वस्तुस्थिती प्रथमतः विचारात घेणे आवश्यक आहे. सुमारे १३.०८ वर्षापूर्वी भोयरे पठार ता.पारनेर येथे पवनचक्की प्रकल्प उभा करण्यात आला असुन संस्थानने तेथे २.५ मेगावॅट इतक्या क्षमतेच्या उर्जा प्रकल्पात सुमारे रक्कम रु.१५,१२,००,०००/- गुंतविले होते. त्यातुन १३ वर्षांचा करार महावितरण सोबत करून प्रति युनिट रु.५.३०/- दराने परतावा मिळत होता. तो सुमारे रक्कम रु.२५,८१,००,०००/- इतका मिळाला आहे. सदर करारनामा दि.१३.०८.२०२० रोजी संपुष्टात आलेला असुन याबाबत आज रोजी सध्याचा परतावा दर रु.२.५२ पै. म्हणजे फारच नाममात्र असुन त्यामुळे संस्थानला २.५ मेगावॅट विज निर्मितीतुन मिळणारा परतावा अत्यल्प आहे. तसेच दरवर्षी संस्थान विजबिलापोटी सुमारे रु.१५ कोटी खर्च करीत आहे. म्हणून सदरची विज निर्मिती संस्थानला आर्थिक दृष्ट्या किफायतशीर (economically afforadable) होण्यासाठी आणखी काय पर्याय आहेत याबाबत महावितरणाचे अधिक्षक अभियंता श्री.मेश्राम यांचेशी चर्चा केली असता त्यांनी सांगितले की, Captive mode पेक्षा इतर स्पर्धात्मक mode उपलब्ध असुन त्याबाबत अभ्यासपुर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे.

तसेच २.५ मेगावॅट वीज आज रोजी संस्थान एकाच मिटरवरुन घेऊ शकत नाही. संस्थानची वीज वापराची ठिकाणे ही विखुरलेली आहेत. त्यामुळे तेही व्यवहार्य नाही. यास्तव याकामी एखाद्या सल्लागाराची नेमणूक करावी, असे सुचविले.

यावर समितीचे दुसरे सदस्य श्री. स्वामी साहेब यांनी असे मत मांडले की, एखादी व्यक्ति सल्लागार म्हणून नेमणे ही बाब खर्चिक आहे त्याप्रमाणे प्रत्येक वेळी वीज दर बदलल्यानंतर त्याचा कागदोपत्री पाठपुरावा करणे संस्थानला शक्य नाही किंवा संस्थानचा तसा उद्देश नाही किंवा व्यवसाय नाही. तसेच एका मिटरवर सदर पुरवठा घेता येत नाही असे MSEDCL चे पत्र नाही, तसा अभिलेख नाही. त्यामुळे एका मिटरची मागणी MSEDCL कडे करून सदरचे पवन चक्कीवरून Captive mode ने वीज देण्यात यावी अशी मागणी करावी. तसेच एका मिटरवरून विज घेण्यास अडचण येत असल्यास मा.उच्च न्यायालयात सिव्हील अप्लीकेशन दाखल करून MSEDCL यांना तसे आदेश करण्याबाबत विनंती करावी, असे मा.अध्यक्ष यांनी सुचविले.

तदर्थ समितीचे सदस्य सचिव यांचे मताशी तदर्थ समितीचे अध्यक्ष तसेच दुसरे सदस्य श्री. स्वामी साहेब, अपर महसूल आयुक्त, नाशिक विभाग नाशिक हे सहमत नसल्याने व एक मिटर घेवून Captive mode ने वीज घेणे संस्थानचे हिताचे व आर्थिक फायद्याचे असल्यामुळे 2+1 अशा मताधिक्याने तसा निर्णय घेण्यात आला.

(कार्यवाही: विद्युत विभाग)

---

ब) श्री साईबाबा महाविद्यालयाकरीता शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता आवश्यक प्राध्यापक भरतीबाबत. (दि.०७.०८.२०२० रोजीचा निर्णय)

निर्णय क्र.४२२/ब श्री साईबाबा महाविद्यालयाकरीता शैक्षणिक वर्ष2020-21 करीता आवश्यक प्राध्यापक भरतीबाबत दि.०७.०८.२०२० रोजी तदर्थ समितीने चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेला निर्णय सर्वानुमते कायम करण्यात आला.

(कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय)

---

क) श्री साईबाबा महाविद्यालयाकरीता शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील (Ad-hoc) प्राध्यापक भरतीबाबत. (दि.११.०८.२०२० रोजीचा निर्णय)

(10) 21.08.2020 SHIADI

Scanned with CamScanner

इकडील पत्र क्र. ८८२/कवि-०४/१९६४ दि. २८/१०/२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.

निर्णय क्र.४२२/क श्री साईबाबा महाविद्यालयाकरिता शैक्षणिक वर्ष 2020-21 करिता (Ad-hoc) प्राध्यापक भरतीबाबत घेण्यात पध्दतीने घेतलेल्या निर्णयाला,तसेच सुधारीत जाहिरातीस व मुलाखतीच्या तारखांना मान्यता देण्यात आली. तसेच सदर मुलाखत समितीत समिती सदस्या श्रीमती गीता बनकर, सहा.धर्मादाय आयुक्त यांचा समावेश करण्याचा निर्णय सर्वानुमते कायम करण्यात आला.

(कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय)

---

विषय नं.०३ अ) संस्थान आस्थापनेवर कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे ५९८ कंत्राटी कर्मचा-यांना मा.शासन निर्णयाप्रमाणे संस्थान सेवेत कंत्राटी पध्दतीने सामावुन घेणेकामी करणेत आलेल्या कार्यवाहीस मान्यता तसेच मा.तदर्थ समितीचे दि.१३ जुलै,२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.३६० मधील नमुद घेतलेल्या निर्णयास अनुसरुन करावयाचे कार्यवाहीस मुदतवाढ मिळणेबाबत.

ब) कंत्राटी कर्मचारी यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी म्हणून नेमणूकीस मान्यता मिळाल्यानंतर सदर कर्मचारी संख्या कंत्राटदाराच्या मंजूर कर्मचारी संख्येतून कमी करणेबाबत.

निर्णय क्र.४२३ अ) मा. तदर्थ समितीचे दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३६० मध्ये सदरचा उपविषय अ चे अनुषंगाने विशेषतः खालीलप्रमाणे नमुद आहे.-

" .. .. Consequently, the Ad-hoc Committee has unanimously resolved to cancel and setaside all the appointment orders issued to 598 employees with effect from 31" July, 2020. This is in the light of the fact that due to Covid-19 situation the Committee has resolved to pay exgratia amount i.e. 50% of the salary to those 598 employees who were earlier working through the contractor. Therefore, the said employees are not likely to be financially affected.

The Committee has also resolved to extend liberty to the Sansthan to submit proposal in this regard as per their choice after due study of various Government Resolutions issued by the Government. "

याबाबत विवेचन असे की, उपरोक्त निर्णयाचे अनुषंगाने सभा कामकाज विभागाकडील पत्र क्रमांक एसएसएस/वशी४/७१६/२०२०,दिनांक १६ जुलै,२०२० अन्वये मा. तदर्थ समितीचे सदस्यांना विषयसूची पाठवून, समितीची सभा दिनांक २४ जुलै,२०२० रोजी अहमदनगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत कळविणेत आलेले होते. या सभेच्या विषयसूचीमध्ये विषयांकित प्रस्तावाचा समावेश करणेत आलेला होता. सदर सभा तहकुब झाली. तसे मा. तदर्थ समितीचे सदस्य श्री. दिलीप स्वामी, अपर महसूल आयुक्त,नाशिक यांनी त्यांचेकडील दि. 23 जुलै 2020 रोजीचे पत्राने, उपरोक्त बैठकीस (सभेस) हजर राहणेपासून सवलत मिळणेबाबत विनंती पत्रदिलेले होते.

या पार्श्वभूमिवर समितीचे सदस्य सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, सदर विषय मंजूर होण्यास सभेसमोर विलंबाने आलेला आहे. मा. तदर्थ समितीचे दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३६० अन्वये विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने दिनांक ३१ जुलै, २०२० अखेर करावयाचे कार्यवाहीचे अंमलबजावणीसाठी सदर विषयात अंतिम निर्णय होईपर्यंत मुदतवाढ मिळणेस विनंती. सदर बाबत तदर्थ समितीची बैठक निर्धारीत दिनांकाला न झाल्याने विषय प्रलंबीत राहिला. तथापी बैठकीत वरील वस्तुस्थिती विचारात न घेता सदरचा प्रस्ताव आज रोजी २x१ मताधिक्याने अमान्य करणे अयोग्य वाटते.

यावर, समितीचे अध्यक्ष व श्री.स्वामी यांनी सदर विषय फक्रीम पध्दतीने का आणला नाही, याबाबत विचारना केली असता कुठलाही खुलासा करण्यात आला नाही. करिता मुदतवाढ न देता सदर विषय बंद करुन संस्थान प्रशासनास सुधारीत प्रस्ताव देण्याची मुभा देणे योग्य होईल असे मताधिक्याने ठरले.

यावर, संस्थान आस्थापनेवर कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे 598 कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत कंत्राटी पध्दतीने सामावून घेणेकामी करणेत आलेल्या कार्यवाहीस मान्यता न देण्याचा निर्णय तदर्थ समितीने दि.13.07.2020 च्या सभेत 3X1 अशा मताधिक्याने घेतलेला असल्याने मा. तदर्थ समितीचे दि.13 जुलै 2020 रोजीचे सभेतील निर्णय क्र.360 मधील नमूद केलेल्या निर्णयास अनुसरुन दि.31 जुलै 2020 अखेर करावयाचे कार्यवाहीस मुदतवाढ देणेची विनंती 2X1 अशा मताधिक्याने अमान्य करण्यात आली.

ब) कंत्राटी कर्मचारी यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी म्हणून नेमणूकीस मान्यता मिळाल्यानंतर सदर कर्मचारी संख्या कंत्राटदाराच्या मंजूर कर्मचारी संख्येतून कमी करणेबाबत आणलेल्या विषयावर चर्चा झाली व अशी मान्यता देण्यात आलेली नसल्याने हो प्रश्न येत नाही.

तथापि सुधारित प्रस्ताव आणण्याची मुभा देण्यात आली.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

(10)21.08.2020 SRBM.

इकडील पत्र क्र SSS/कार्या०/३६५४ दि. २८/१०/२०२० चे पत्रानुसार माझे मत अभिलेखावर कायम ठेवून स्वाक्षरीत आहे.

Scanned with CamScanner

विषय नं.०४ : [illegible] उपदान [illegible] रुपये २० लक्ष मात्र पर्यंत [illegible] रुपये १४ लक्ष पर्यंत उपदान रक्कम [illegible]

निर्णय क्र.४२४ : [illegible] 10 [illegible] दि.09 जुलै 2020 [illegible] 20 लक्ष [illegible] शासनाला पाठविलेला प्रस्ताव [illegible] [illegible] आली [illegible] [illegible] अधिवेशन [illegible]

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.०५ : कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) [illegible] आस्थापनेवरील कायम कंत्राटी व बाह्यस्त्रोत कर्मचारी कंत्राटदारामार्फत [illegible] संस्थान [illegible] कंत्राटदारामार्फत कायम असलेल्या कंत्राटी कर्मचारी [illegible] Lockdown [illegible] नियमितपणे संस्थान व्यवस्थापनाचे व प्रशासनाचे काम सुरु [illegible] सिद्धीत कार्यपद्धतीने वेतन/पगार/मानधन इत्यादी अदा करणेबाबत.

निर्णय क्र.४२५ : संस्थान आस्थापनेवरील कायम कंत्राटी व बाह्यस्त्रोत कर्मचारी कंत्राटदारामार्फत उक्त पध्दतीने काम दिलेल्या कंत्राटदारायचे कायम असलेल्या कंत्राटी कर्मचारी व इतर यांना पूर्वी माहे जुलै 2020 वेतनासंबंधी झालेल्या निर्णयाप्रमाणेच यातील क्र. 2, 3, 4 प्रमाणे माहे ऑगस्ट-2020 व (माहे सप्टेंबर 2020) मध्ये अदा करावयाचे वेतन अदा करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. मा. उच्च न्यायालयात सिव्हील अप्लिकेशन करावा.

598 कंत्राटी कर्मचा-यांचे बाबतीत संस्थान नवीन प्रस्ताव सादर करण्याबाबत तदर्थ समितीने मुभा दिलेली आहे. अशा परिस्थितीत त्यांच्या बाबतीतील निर्णय तूर्तास स्थगित (In abeyance) ठेवण्यात येत आहे असे सर्वानुमते ठरले.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.०६ :

A) मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार श्री.विजय गणपत रोहमारे, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) यांना प्रशासकीय अधिकारी पदावर नेमणूक करणेबाबत.

B) रिट पिटीशन क्र.४०१८/२०१० चे निकालाबाबत मा.तदर्थ समिती समोर प्रस्ताव सादर करणेस झालेल्या विलंबाबाबत.

C) श्री.संजय चौधरी, शिर्डी यांचा सेवानियुक्त प्रशासकीय अधिकारी श्री.सुभाष विठ्ठलराव गम यांचे बाबत तक्रार.

D) प्रशासकीय अधिकारी पदावर पदोन्नतीने नेमणूक मिळणेकामी कर्मचा-यांचे आलेल्या अर्जावर निर्णय होणेबाबत.

E) प्रशासकीय अधिकारी पदाची पात्रता Feeder cadre (निम्नपद) व सेवा जेष्ठता यादी.

निर्णय क्र.४२६ : अ) मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार श्री.विजय गणपत रोहमारे, उप कार्यकारी अभियंता (विद्युत) यांना प्रशासकीय अधिकारी पदावर नेमणूक करणेबाबतच्या विषयावर चर्चा करण्यात आली. श्री.विजय गणपत रोहमारे यांचे अर्जाचा विचार करताना उप कार्यकारी अधिकारी श्री. ठाकरे यांनी तदर्थ समितीसमोर असे प्रतिपादन केले की, दिनांक २६/०७/२०१४ रोजी शासनाला सादर करण्यात आलेल्या प्रारुप सेवाप्रवेश नियमामध्ये प्रशासकीय अधिकारी या पदाकरीता चार फिडर केडर आहेत. 1. अधीक्षक, 2.लेखाधिकारी, 3. कामगार अधिकारी व 4. विधी अधिकारी परंतु अशा सर्व श्रेणींची एकत्र अशी सेवाजेष्ठता तयार अद्याप तयार करावयाची बाकी आहे. श्री.विजय गणपत रोहमारे हे तांत्रिक संवर्गात उपकार्यकारी अभियंता (विद्युत) या पदावर कार्यरत आहेत. ते उपरोक्त नमुद फिडर केडर मध्ये त्यांचे पदाचा समावेश नाही. त्यामुळे त्यांना अशा पदोन्नतीच्या सेवाजेष्ठता यादीत समावेश करणे विधीसंमत नाही. सबब मा.उच्च न्यायालयास सदर कामी गुणवत्तेवर पात्रता नसल्याने अवगत करणे रास्त राहील. श्री रोहमारे यांच्या विनंतीचा मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार पदोन्नती गुणवत्तेवर देता येणार नाही, असे स्पष्ट होत आहे.

यावर तदर्थ समितीचे असे निदर्शनास आले की, संस्थानने एकत्रीत सेवाजेष्ठता यादी केलेली नाही म्हणून लवकरात लवकर अशी एकत्रीत सेवाजेष्ठता यादी तयार करुन ती तदर्थ

Scanned with CamScanner

दुरुस्तीद पत्र क्र. SSS/वसुलि-०४/३९०४ दि. २८/१०/२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत केले.

समितीसमोर सदरील विषयासोबत ठेवण्यात यावी म्हणजे त्यांच्या अर्जावर तदर्थ समितीला विचार करता येईल असे एकमताने ठरले.

ब) रीट पिटीशन क्र.4018/2019 चे निकालाबाबत मा. तदर्थ समिती समोर प्रस्ताव सादर करणेस झालेल्या विलंबाबाबत चर्चा करत असताना सर्व गोष्टींचे, अभिलेखाचे अवलोकन करता असे लक्षात येते की, श्री. बजाज, प्रभारी विभाग प्रमुख यांनी कामकाजात कसूर केलेली असून सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी श्री. गवे यांना या विलंबाबाबत सहभागी धरून येत नाही. त्यामुळे श्री. गवे यांचे सेवानिवृत्ती नंतरचे सर्व परतावे त्यांना त्वरीत देण्यात यावेत.

क) श्री. संजय चौधरी, शिर्डी यांच्या सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी श्री. सुर्यभान विठ्ठलराव गवे यांचे तक्रारीबाबत विचार करता असे दिसून आले की, श्री. गवे यांना दिलेल्या 5 वेतनवाढीबाबत आधीच निर्णय झालेला आहे तसेच तक्रारदार यांनी स्वतःची ओळख लपविलेली आहे. अशा परिस्थितीत आता पूर्वी झालेल्या निर्णयाचा पुन्हा विचार करणे संयुक्तिक ठरणार नाही करिता सदरची तक्रार दप्तरी दाखल करण्यात येत आहे, असे सर्वानुमते ठरले.

ड) प्रशासकीय अधिकारी पदावर पदोन्नतीने नेमणूक मिळणेकामी कर्मचा-यांचे आलेल्या अर्जावर चर्चा करत असतांना असे ठरले की, प्रशासकीय अधिकारी या पदासाठीचे फिडर केडर आणि संयुक्तिक सेवाजेष्ठता यादी तयार झाल्यानंतर या अर्जाचा विचार करता येईल.

इ) प्रशासकीय अधिकारी पदाची पात्रता Feeder Cadre (निम्न पद) व सेवाजेष्ठता यादी याविषयी चर्चा करतांना वर उल्लेख केल्याप्रमाणे लेखाधिकारी यांनी माहिती मागितली व संयुक्त सेवाजेष्ठता यादी तयार केली नसल्याचे सांगितले म्हणून लवकरात लवकर अशी एकत्रीत सेवाजेष्ठता यादी तयार करुन ती तदर्थ समितीसमोर सदरील विषयासोबत ठेवण्यात यावी म्हणजे तदर्थ समितीला त्यावर विचार करता येईल असे एकमताने ठरले.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

| | |
|---|---|
| विषय नं.०७ | प्र.विधी अधिकारी, विधी विभाग यांनी, मा.तदर्थ समितीचे दि.१३ जुलै,२०२० रोजीचे सभेतील निर्णयानुसार देण्यात आलेल्या नोटीसीचा खुलासा. |
| विषय नं.०८ | संस्थानचे सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी श्री.सुर्यभान गवे यांचे बाबत श्री.सोमनाथ बनकर, शिर्डी यांचे दिनांक २२.०७.२०२० रोजीचे अर्जाबाबत. |
| विषय नं.०९ | कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेंतर्गत चावडी मंदिर दर्शनासाठी बंद केलें असतांना महिला साईभक्ताने चावडी मंदिरामध्ये दर्शनास जाऊन केकसह सेल्फी घेतले बाबत दि.२५ जून,२०२० रोजीचे व्हिडीओ क्लीप सोशल मिडीयावर व्हायरल झालेबाबत. |
| विषय नं.१० | कोते मिनिनाथ भाऊसाहेब व आंबेकर विलास अशोक यांचे दि.१६.०७.२०२० चे ई-मेलने प्राप्त झालेले "मा.उच्च न्यायालयात मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेश पालन न करण्याबाबत" असा विषय असलेले पत्र. |
| विषय नं.११ | श्री.अशोक कोते, शिर्डी यांचे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील अनागोंदी कारभाराबाबत विना दिनांकाचे पत्र. |
| विषय नं.१२ | सुनिल जोसेफ गायकवाड यांचे दि.०१.०७.२०२० चे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा सदस्य, तदर्थ समिती, श्री साईबाबा ट्रस्ट शिर्डी यांना दिलेले तसेच सामान्य प्रशासनाकडे दि.१४.०७.२०२० रोजी प्राप्त पत्र. |
| विषय नं.१३ | श्री.राजु जोंधळे, शिर्डी यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्विय सहाय्यक सुनिल तांबे यांनी पदाचा गैरफायदा घेऊन मोठ्या रकमेचे वैद्यकीय बिल संस्थानकडून परतावा मिळणेबाबत सादर केलेबाबत विना दिनांकाचे पत्र. |
| विषय नं.१४ | श्री.राजेंद्र कोते, शिर्डी यांचे श्री साईबाबा संस्थानमधील बदल्या व नेमणूका व भ्रष्टाचाराचे विना दिनांकाचे पत्र. |
| निर्णय क्र.४२७ | उपरोक्त विषय नं. ०७ ते १४ या विषयावरील चर्चा सायंकाळी ६.३० नंतर उशीर झाल्याने पुढे ढकलण्यात आली. |

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

| | |
|---|---|
| विषय नं.१५ | अकुशल, कुशल कमाटी कर्मचारी पुरविणेकामी नविन लेबर कॉन्ट्रक्टर्सची नेमणूक करण्यासाठी निवीदा मागविणेस अथवा मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेबाबत. |

Scanned with CamScanner

एकत्रित पत्र क्र SSS/प्रशा-04/9548 दि 28/07/2020 चे पत्रानुसार मासिक प्रती अभिलेख्यात कायम ठेवून [illegible]
स्वाक्षरीत अर्ज

निर्णय क्र. ४२८ यावर सदस्य सचिव मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे मत व्यक्त केले की सदरची एजन्सी अतिशय [illegible] सेवा [illegible] दिनांक [illegible] रोजीपासून कार्य करीत आहे तरी त्यांना मुदतवाढ दिल्यास [illegible] [illegible] नाही व मुदतवाढ दिल्यास निविदा प्रक्रिया [illegible] [illegible] अकुशल, कुशल कंत्राटी [illegible]

[illegible] सदस्य, समिती सदस्य श्री. [illegible] यांनी असे मत मांडले की [illegible] अशा प्रकारच्या प्रकरणात [illegible] मुदतवाढीचा प्रस्ताव [illegible] या ठिकाणी अशा [illegible] दिली जाणारी [illegible] परिस्थितीत दिनांक 30 [illegible] 2020 पर्यंत सदर प्रक्रिया पूर्ण होणार नाही अशी परिस्थिती [illegible] या ठिकाणी श्री. [illegible] यांनी असे प्रतिपादन केले की [illegible] प्रक्रिया [illegible] पूर्ण होऊ शकते. अशा परिस्थितीत मुदतवाढीचा प्रस्ताव [illegible] असा निर्णय झाला.

[illegible] कंत्राटी [illegible] कर्मचारी पुरविणेकामी [illegible] कामकाजासाठी [illegible] दिनांक 30.09.2020 पर्यंत मुदत आहे. या [illegible] आत सदरची निविदा प्रक्रिया पूर्ण करावी असे ठरले. मुदतवाढीची मागणी अमान्य करण्यात आली.

(कार्यवाही-कामगार विभाग)

---

विषय नं. १६ श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी लि.शिर्डी यांना संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. ११४ मधील [illegible] जागेत [illegible] वापराची मुदत वाढवून मिळणेकामी मा.चेअरमन श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं.श्रीसासएक्रेस/३१/२०२० दि.०८.०७.२०२०.

विषय नं. १७ संस्थान परिसरात साईभक्तांच्या सोईसाठी प्रसाद, नॉव्हेल्टी, दूध व दुग्धजन्य पदार्थ, पेढे, विक्री, जनरल स्टोअर्स, उपाहारगृह, साहित्य इत्यादी व्यवसायासाठी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी लि.शिर्डी यांना वापरास दिलेल्या संस्थानमालकीचे विविध बारा ठिकाणचे जागा/गाळे वापराची मुदतवाढ देणेबाबत मा.चेअरमन श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं.श्रीसासएक्रेस/१०३/२०१० दि.१४.१२.२०२०.

विषय नं. १८ श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी लि.शिर्डी या संस्थेमार्फत साईभक्तांच्या सेवेसाठी व सोयीसाठी संस्थान परिसरात चालू असलेल्या विविध प्रकारच्या व्यवसायाकरीताचे स्टाल/गाळ्याचे जागा वापराचे भाडे माफ होणेबाबत मा.चेअरमन श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र जा.क्र.श्रीसासएक्रेसो/१२/२०२० दि.२०.०५.२०२०.

विषय नं. १९ मौजे शिर्डी येथे श्री साईबाबा संस्थान परिसरात रेल्वे बुकींग काऊंटर सुरु करणेकामी रेल्वे विभागास विनामूल्य वापरास दिलेल्या सेवाधाम इमारतीतील दोन रुमच्या वापराची मुदत वाढवून मिळणेबाबत सिनियर डिव्हीजनल कमर्शियल मॅनेजर, सोलापूर यांचेकडील पत्र जा.नं.SUR/C/518/SNSI/PRS/2020 दि.१४.०७.२०२०.

विषय नं. २० दर्शनरांग व्यवस्थापन कार्य प्रणाली (टाईमवेल) मे.त्रिलोक सिक्युरीटी सिस्टीम इंडीया प्रा.लि. यांना त्यांचे कर्मचाऱ्यांचे निवासव्यवस्थेसाठी संस्थानचे शांतीनिकेतन इमारतीतील वापरास दिलेल्या खोली नं. ६,७ व किचन रुम अशा तीन खोल्यांचे वापरास मुदतवाढ देणेबाबत.

निर्णय क्र. ४२९ (१) उपरोक्त विषय नं. १६ ते २० या विषयावरील चर्चा सायंकाळी ६:३० नंतर उशीर झाल्याने पुढे ढकलण्यात आली.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

विषय नं. २१ श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास मोहटे यांना शिर्डी संस्थान परिसरात माहिती केंद्राकरीता जागा मिळणेबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास, मोहटे, ता.पाथर्डी यांचेकडील पत्र जा.क्र.५१/२०२०, दि.११.०२.२०२०.

निर्णय क्र. ४३० सदर प्रस्तावाबाबत समिती सदस्य सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, विषय पत्रिकेवरील विषय हा मुलत: ११ महिने व सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चीत करील अशा मासिक भाडे दराने आकारणी संदर्भात आहे. अशा प्रस्तावास मंजूरी देण्यासाठी संस्थानकडून स्वतंत्र धोरण निश्चीत करणे आवश्यक आहे. संस्थानकडून अशा प्रकारे कोणत्याही धार्मिक संस्थांना जागा आजपर्यंत देण्यात आलेली नाही. जर अशा प्रकारे प्रस्ताव मंजूर केल्यास इतर धार्मिक संस्थांच्या मागण्या देखील येतील, व त्या नाकारता येणार नाही. सबब धोरणात्मक ठराव केल्याशिवाय सदर प्रस्तावाबाबत निर्णय करणे विधियुक्त नाही. तरी इतर धार्मिक देवस्थानांना जागा देण्याबाबत प्रथम धोरण व नियमावली निश्चीत करावी व त्या संदर्भात निर्णय झाल्यानंतर सदर

Scanned with CamScanner

प्रस्ताव पत्र क्र. ssJ/वस्ती-08/१९५४ दि. २८/१०/२०२० चे पत्रानुसार माझी प्रत अभिलेखात कायम करून हाताने स्वाक्षरी असे.

[illegible] ... आहे की, संस्थान मालकीच्या विविध ... [illegible] ... दिल्या आहेत, असा ... [illegible] ... सर्व बाबींना माहिती घावी ... [illegible]

[illegible] ... रु. 500/- ... [illegible] ... सदरचा विषय ... [illegible] ... यांची या ... [illegible] ... सचिव/मुख्य ... [illegible] ... धार्मिक संस्थांना देणेबाबत ... [illegible] ... स्वामी यांचे पाणी ... [illegible] ... अभ्यासपूर्वक योजनात्मक ... [illegible] ... निर्णय घेता येईल ... [illegible] ... असा निर्णय घेतला की, श्री ... [illegible] ... संस्थान परिसरात माहिती केंद्र सुरु करण्याकरिता ... [illegible] ... क्र.57/1 ... [illegible] ... इमारतीतील बाहेरील बाजूची 10x10 ... [illegible] ... मासिक भाडे रु.500/- (वीज, फोन व पाणीपट्टी व्यतिरिक्त) ... [illegible] ... 11 महिन्यांसाठी देण्यास मंजुरी देण्यात आली.

सदरचा श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास माहिती केंद्र सुरु करण्यासाठी भाडेतत्वावर देण्याचा निर्णय हा तदर्थ समितीच्या अध्यक्ष व एक सदस्य यांचे 2:1 मताधिक्याने घेण्यात आला.

---

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

विषय नं.२२ माहे फेब्रुवारी-२०२० व मार्च-२०२० जमा खर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत.

विषय नं.२३ योगीराज सद्गुरु गंगागिरीजी महाराज संस्थान ट्रस्ट यांना रु.१.२५ कोटी आर्थिक मदत देणेबाबत.

विषय नं.२४ करनिर्धारण वर्ष २०१८-१९ व २०१९-२० ची आयकर रिफंड रक्कम रु.२२,१०,०४०/- संस्थानच्या बँक खात्यात जमा झाल्याची नोंद घेणे व गुंतवणुकीबाबत.

विषय नं.२५ अ) लॉकडाऊनच्या काळात संस्थानला उत्पन्न कमी असताना कर्मचाऱ्यांचे पगार करणेसाठी व रुई येथील जमीन खरेदी करणेसाठी कोणत्या एफडी वापरल्या याबाबत विचारणा करणारे पत्र.

ब) लॉकडाऊन झालेपासून किती मुदत ठेवी ठेवल्या, किती मुदत ठेवींच्या मुदती संपल्या, मुदत संपलेल्या मुदतठेवीतील रकमांचा विनियोग कसा केला व तो विनियोग करण्याबाबत तदर्थ समितीची परवानगी घेतली काय, या काळात किती मुदतठेवी मोडल्या, मोडल्या असतील तर त्यासाठी तदर्थ समितीची परवानगी घेतली काय?

क) Trust Corpus Fund बाबत संस्थानची भूमिका.

विषय नं.२६ संस्थानचे आयकर कामकाजाकरिता कर सल्लागार सीए आर आर मुणोत, मुंबई यांची फी ठरविणेबाबत.

विषय नं.२७ श्रींचे समाधी मंदिरातील तळघरात भिंतीच्या खालील भागातून झिरपणारे पाणी बंद करणेसाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांबाबतचा अहवाल.

निर्णय क्र.४३१ उपरोक्त विषय नं.२२ ते २७ या विषयावरील चर्चा सायंकाळी ६:३० नंतर उशीर झाल्याने पुढे ढकलण्यात आली.

---

विषय नं.२८ संस्थानच्या मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.२४५/१ पै. मधील नविन साठवण तलावामध्ये गोदावरी उजवा तट कालव्यामधून पाणी घेणेकरीता जलवाहिनी टाकणे व इतर अनुषंगिक कामाकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची सल्लागार म्हणून करण्यात आलेली नियुक्ती रद्द करुन नव्याने सल्लागार नियुक्ती करीता या क्षेत्रातील तांत्रिक सल्लागाराकडून e-RFP (e-Request for proposal) प्रस्ताव मागविणेबाबत.

निर्णय क्र.४३२ यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगाव को-हाळे गट नं.२४५/१ पै. मधील नविन साठवण तलावामध्ये गोदावरी उजवा कालव्यातून पाणी घेणेसाठी Meter Room, DI Pipe, Intake Well व इतर अनुषंगिक बाबींचे कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना दि.२१/०८/२०१९ रोजी देण्यात आलेला सल्लागार नियुक्तीचा आदेश रद्द करणेस तसेच सदरकामी सर्वेक्षण, संकल्पन, सविस्तर अंदाजपत्रक, नकाशे, निविदा प्रपत्रे तयार करणे, कामावर देखरेख ठेवून ठेकेदार यांची बिले प्रमाणित करणे या व इतर अनुषंगिक सेवा प्राप्त करणेसाठी नव्याने सल्लागार नियुक्तीकरीता वर्तमानपत्रातील जाहिरातीद्वारे संस्थानचे www.sai.org.in संकेतस्थळावर e-RFP (e-Request for Proposal) प्रस्ताव मागविणेस मान्यता देण्यात आली.

Scanned with CamScanner

इच्छित पत्र क्र ऽऽऽ/ग्रामि-०४१/१६५४ [illegible] २५/३०/२०२० चे पत्रानुसार माहिती मते अभिलेखात कायम ठेवून प्रमाणित स्वाक्षरीत असे.

[illegible]

पाचेळी समितीच्या असे निदर्शनास आले की, संस्थानचे सदर कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

**विषय नं.२९** शिर्डी सर्व्हे नं. १/१ मधील रा.रा. संस्थानचे हॉटेल तुळशी समोर असलेल्या शिर्डी नगरपंचायत यांचे मालकीचे मोकळ्या जागेतील दुकाने व (तात्पुरती) पुरातन पाडलेबाबत.

**निर्णय क्र.४३३** सदर विषयावरील चर्चा सायंकाळी ६.३० नंतर उशीर झाल्याने पुढे ढकलण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

**विषय नं.३०** संस्थानच्या भांडार विभागाकडे शिल्लक असलेले खाद्यतेल पुरवठाधारक मे.कैलास फुड अॅन्ड जनरल स्टोअर्स, सातारा यांना परत करणेबाबत.

**निर्णय क्र.४३४** संस्थानच्या भांडार विभागाकडे शिल्लक असलेले खाद्यतेल पुरवठाधारक मे.कैलास फुड अॅन्ड जनरल स्टोअर्स, सातारा यांना परत करणेबाबत मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची परिपत्रक पध्दतीने मान्यता घेण्यात आलेली असून आजचे सभेतील आयत्या वेळचा विषय नं.०६ म्हणून नोंद घेण्यासाठी सादर केलेला असल्याने सदरचा विषय मागे घेण्यात आला.

(कार्यवाही-भांडार विभाग)

---

**विषय नं.३१** संस्थानच्या भांडार विभागाकडे शिल्लक असलेले गाईचे शुध्द तुप पुरवठाधारक मे.हर्ष फ्रेश डेअरी प्रा.लि., हरिव्दार यांना परत करणेबाबत.

**निर्णय क्र.४३५** यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या भांडार विभागाकडे शिल्लक असलेले गाईचे शुध्द तुप पुरवठाधारक मे.हर्ष फ्रेश डेअरी प्रा.लि., हरिव्दार यांना परत करुन शुध्द तुप बदलुन घेणेसाठी उपरोक्त प्रस्तावात नमुद अ,ब व क प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-भांडार विभाग)

---

**विषय नं.३२** मार्च-२०२० महिन्याकरीता किराणा माल मा.तदर्थ समितीचे दि.०४.०३.२०२० चे सभेतील निर्णय क्र.१७० नुसार खरेदी करणेची व त्यासाठी सिव्हील अॅप्लीकेशन करण्याची गरज नसल्याची बाब मा.तदर्थ समितीचे अवलोकनार्थ सादर करणेबाबत.

**निर्णय क्र.४३६** सदर विषयावरील चर्चा सायंकाळी ६.३० नंतर उशीर झाल्याने पुढे ढकलण्यात आली.

(कार्यवाही-भांडार विभाग)

---

**विषय नं.३३** संस्थानला माहे फेब्रुवारी-२०२० ते मार्च-२०२० या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या शुध्द तुप व खाद्यतेलाचे विविध प्रयोगशाळेमार्फत करणेत आलेल्या तपासण्यांचे अहवालाबाबत.

**निर्णय क्र.४३७** याबाबती प्राप्त झालेल्या शुध्द तुप व खाद्यतेलाचे विविध प्रयोगशाळे मार्फत करणेत आलेल्या तपासण्यांचे अहवालाचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली. याबाबत असे ठरले की, संबधीत प्रयोग शाळांकडून गाईच्या शुध्द तुपातील Reichert-Meissl-Wollny (RM) Valve बाबतचा अहवाल मागविण्यात यावा व तो समिती समोर लवकरात लवकर ठेवावा.

(कार्यवाही-भांडार विभाग)

---

**विषय नं.३४** सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागातील कडधान्य व किराणा मालाचे घटतुटीबाबत.

**निर्णय क्र.४३८** सदर विषयावरील चर्चा सायंकाळी ६.३० नंतर उशीर झाल्याने पुढे ढकलण्यात आली.

(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

**विषय नं.३५** आयशर कंपनीच्या १४ प्रवासी बसेसचा वार्षिक टॅक्स भरणेकामी येणाऱ्या खर्चास तसेच सदर रक्कम लेखाशाखेमार्फत ऑनलाईन भरणेस मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.४३९** यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्यानुसार १४ प्रवासी बसेसचा पुढील एक वर्ष कालावधीकरीता वार्षिक टॅक्स भरणेस व याकामी येणा-या एकुण रक्कम रु.१३,३०,०००/- चे खर्चास तसेच सदर रक्कम लेखाशाखेमार्फत ऑनलाईन भरणेस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वाहन विभाग)

(10) 28.08.2019, SHIRDI

Scanned with CamScanner

उक्त पत्र क्र. ५५५/पक्की-०४/१५६४ दि. २५/१०/२०२० चे पत्रानुसार मासी मते अभिलेखात कायम ठेवून राजपत्र स्वाक्षरीत अर्ज

विषय नं.४५ श्री. आनलाईन [illegible] (Live) [illegible] D.T.H (डीश टीव्ही) [illegible] [illegible] व [illegible] [illegible] [illegible] M/s. Dish Communication Ltd. Mumbai [illegible] [illegible]

निर्णय क्र.४४६ [illegible] (Live) [illegible] D.T.H (डीश टीव्ही) [illegible] [illegible] M/s. Dish Communication Ltd. Mumbai [illegible] [illegible]

(कार्यवाही माहिती तंत्रज्ञान विभाग)

---

विषय नं.४६ [illegible]

निर्णय क्र.४४७ [illegible] RO [illegible] [illegible] [illegible] [illegible] मंजुरी [illegible] आली.

[illegible] तदर्थ समितीचे अध्यक्ष तसेच सदस्य श्री [illegible] [illegible] संस्थानच्या RO प्लान्टद्वारा अशा पाण्याच्या बाटल्या पुरविणे शक्य आहे काय याचा अभ्यास करावा व अभ्यासपूर्वक प्रस्ताव आगामी सभेपुढे ठेवण्यात यावा.

[illegible] समिती सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना [illegible] RO प्लान्ट संस्थानकडे संस्थापित केलेला आहे. तो उत्तम चालतो आहे. [illegible] [illegible] अगोदर झालेली आहे. तसेच पाण्याच्या पॅकेज बाटल्या पुरवठा करण्याची सूचना [illegible] कारण त्यासाठी व याच औपचारिकता जसे विविध परवाने घ्याव लागतील. तसेच संस्थान असा व्यवसाय करत नाही.

तथापि तदर्थ समितीचे अध्यक्ष तसेच सदस्य श्री. स्वामी यांचे मत सदस्य सचिव यांचे [illegible] मताला अनुसरून कार्यालयीन टिप्पणी नाही. तसेच सदस्य सचिव यांना दिलेली माहिती व [illegible] सूचना [illegible] अव्यवहार्य आहे. याबाबत अभ्यास अभिलेखावर नाही. तसेच जर संस्थान व्यवसाय करत नाही तर सदर बाटल्या विकण्यासाठी का घ्यावयाच्या हे स्पष्ट नाही. करिता संस्थानच्या RO प्लान्टद्वारा अशा पाण्याच्या बाटल्या पुरविणे शक्य आहे काय याचा अभ्यास करावा व अभ्यासपूर्वक प्रस्ताव आगामी सभेसमोर ठेवण्यात यावा.

(कार्यवाही-कॅन्टीन विभाग)

---

विषय नं.३८ श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०२० साजरा करणेस व त्याकामी येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४४८ यावर सविस्तर चर्चा होऊन कोविड-१९ च्या पार्श्वभूमिवर या विषयाचा सखोल अभ्यास करुन प्रस्ताव समिती समोर ठेवण्यात यावा.

(कार्यवाही-शताब्दी कक्ष)

---

विषय नं.३९ श्री साईबाबा हॉस्पिटल तसेच श्री साईनाथ हॉस्पिटल येथील ए.सी. यंत्रणेचे एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकरीता ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

विषय नं.४० श्री साई प्रसादालयातील वायुविजन यंत्रणेचे एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकरीता ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

विषय नं.४१ श्री साई प्रसादालय व साई आश्रम भक्तनिवास येथील असणा-या साईटेक प्रोजेक्ट करीता बसविणेत आलेल्या ए.सी. यंत्रणेचे सन २०२०-२१ या एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकरीता ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

विषय नं.४२ श्री साईबाबा संस्थान परिसरात लावणेत आलेल्या सर्व वॉटर कुलर यंत्रणेचे एक वर्ष कालावधी करीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकरीता ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

विषय नं.४३ दि.०१ एप्रिल २०१९ ते दि.३१ मार्च २०२० अखेर कालावधीत अनुदान दिलेले रुग्ण संख्या व अनुदान रक्कम याची नोंद घेणेबाबत.

Scanned with CamScanner

उपरोक्त पत्र क्र. SSS/वशवि ०४/१६५४ दि. २८/१०/२०२० चे प्रमाणानुसार माहिती प्रत अभिलेखात कायम ठेवून दृढीकृत स्वाक्षरीत असे.

विषय नं.४४ सुधारीत वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावली [illegible] मान्यता मिळणेबाबत.

विषय नं.४५ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये जुन-२०२० महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.१०,४८,९५/- चा [illegible] घेवून त्यास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४४३ उपरोक्त विषय नं.४१ ते ४५ या विषयावरील चर्चा सायंकाळी ६.३० नंतर उशीर झाल्याने पुढे ढकलण्यात आली.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.४६ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे कामकाज करुन घेणेकामी मुदतवाढ देणेबाबत.

निर्णय क्र.४४४ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे कामासाठी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार मे.[illegible] व मे.[illegible] सर्व्हीसेस, मुंबई यांना निविदा, कार्यादेश व करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार दि.१०.०१.२०२० अखेर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.४७ Corona Virus (Covid-19) संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आवश्यक असणारे PPE Kit, N-95 Face Mask खरेदीस व याकामी येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.

विषय नं.४८ Corona Virus (Covid-19) संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव होणा-या रुग्णांकरीता तसेच इतर रुग्णालयातील दैनंदिन रुग्णांचे वापराकरीता औषधे, सर्जिकल साहित्य तथा इतर मटेरियल पुरेसा स्वरुपात उपलब्ध ठेवणेबाबत.

विषय नं.४९ मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्विय सहाय्यक सुनिल तांबे यांनी पदाचा गैरवापर करुन मोठ्या रकमेचे वैद्यकीय बील संस्थानकडून परतावा मिळणेसाठी सादर केलेबाबत राजु जाधव शिर्डी यांच्या विना दिनांकाचे पत्राबाबत.

निर्णय क्र.४४५ उपरोक्त विषय नं.४७ ते ४९ या विषयावरील चर्चा सायंकाळी ६.३० नंतर उशीर झाल्याने पुढे ढकलण्यात आली.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.५० श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे अधिकारी/कर्मचा-यांसाठी (प्रशासकीय/तांत्रिक) सेवाप्रवेश नियमास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४४६ सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली, सदस्य सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत मा.उच्च न्यायालयाचे निर्णयाप्रमाणे पदोन्नती देण्यासाठी सेवाप्रवेश नियम आवश्यक आहेत. श्री साईबाबा संस्थानकडे सेवा प्रवेश नियमच नाहीत, त्यामुळे संस्थान प्रशासनात कुंठीतावस्था असुन प्रशासकीय कार्यक्षमतेवर त्याचा परिणाम होत आहे. यासाठी सेवा प्रवेश नियम कमिटीने नियम तयार करुन दिलेले आहेत, त्याचे अवलोकन व्हावे.

सदरचा विषय सभेत मंजुर केल्यास अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती व प्रोत्साहन मिळुन कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल. यावर मा.अध्यक्ष यांनी सेवा प्रवेशाबाबत झालेले निर्णयाचे संदर्भात औरंगाबाद खंडपीठात कुठली याचिका, जनहित याचिका प्रलंबीत आहे का?, याबाबत श्री. बजाज, प्रभारी विभाग प्रमुख यांना विचारणा केली असता त्यांनी असे म्हटले की, एक याचिका होती पण त्याचे काय झाले हे मला माहीत नाही कारण मी तीन वर्षापूर्वीच या विभागात रुजु झालो त्यामुळे मला माहीत नाही, असे बेजबाबदारपणाचे उत्तर दिले. यावर अध्यक्षांनी सदस्य सचिवांना असे विषय मांडतांना संपूर्ण अभ्यास करणे गरजेचे आहे असे दाखवून दिले व याविषयी माहिती घेण्यास सांगितले व सदरचा विषय परीपुर्ण सादर करण्याचे निर्देश दिले.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

यानंतर आजचे तदर्थ (Ad-hoc) समिती सभेमध्ये आयत्या वेळी खालील विषयावर निर्णय घेण्यात आले.

(10) 27.06.2020 SHIRDI

Scanned with CamScanner

इकडील पत्र क्र. SSS/वशि-०४/३६०४ दि. २५/१०/२०२० चे प्रमाणुसार माझी मते [illegible] कायम ठेवून [illegible] स्वाक्षरी [illegible]

आयत्यावेळी विषय [illegible] अखेर [illegible] दि.३१.०३.२०२१ [illegible]
[illegible] विनियोग [illegible]

निर्णय क्र.४४[illegible] सदर विषयावरील चर्चा सायंकाळी ६.३० नंतर उशीर झाल्याने पुढे ढकलण्यात आली.
(कार्यवाही-लेखाशाखा)

---

आयत्यावेळी विषय [illegible] [illegible] बांधकामासाठी [illegible]
[illegible] कोटी [illegible] (G+2) इमारतीसाठी [illegible]
[illegible] कोटी [illegible]
[illegible]
[illegible] मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ [illegible]
[illegible] मान्यता [illegible]

निर्णय क्र.४४८ [illegible] सदस्य सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे मत मांडले की, [illegible] रोजीचा [illegible] 10,400 [illegible] क्षमता आहे. सद्य स्थितीत संस्थानच्या प्रसादालयामध्ये सुमारे 50,000 [illegible] प्रसाद घेत असतात. या गोष्टीचा विचार करता दिवसाला 60,000 भक्त [illegible] असे म्हणता येईल. म्हणून तिस-या मजल्याची आवश्यकता भविष्यात असल्याचे तत्कालीन समितीने म्हटलेले आहे. 28 दिवसात निर्णयात बदल झाल्याबाबत येथे प्रश्न उपस्थित करता येणार नाही. भविष्यातील निकड लक्षात घेता तत्कालीन समितीने तिस-या मजल्याच्या बांधकामाचा निर्णय घेतलेला आहे. एकूण बांधकाम खर्चात 10-12 टक्के घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे 10-12 टक्के वाढीव खर्चाचा विचार केला तर पुढील बांधकाम थांबणार आहे. महामारीच्या पार्श्वभूमीवर विचार करता अशीच परिस्थिती कायम टिकून राहील असे नक्कीच नाही. नजिकच्या काळात या परिस्थितीत सुधारणा होवू शकते. म्हणून तिस-या मजल्याच्या बांधकामाचे समर्थन करणेच योग्य राहील व त्यासाठी आग्रही भुमिका मांडली.

यावर चर्चा करीत असताना असे निदर्शनास आले की, तिस-या मजल्याच्या आवश्यकतेबाबत व त्यासाठीच्या मंजुरी मिळविण्याचे बाबत सविस्तर असा अभ्यास करण्यात आलेला नाही. तिस-या मजल्याचा दि. 06.06.2019 रोजीचा निर्णय क्र.311 अन्वये ठेवलेला प्रस्ताव केवळ 28 दिवसातच म्हणजे दि.4.07.2019 रोजी निर्णय क्र.345 अन्वये तत्कालीन समितीने बदललेला आहे व तिस-या मजल्याची आवश्यकता नसल्याचे मत व्यक्त केलेले आहे. आता तिस-या मजल्याचे बांधकामाची आवश्यकता असल्याचे दाखविण्यात आले आहे परंतु त्याला पुरक अशी स्थिती दिसत नाही. सध्याच्या कोविड-19 च्या पार्श्वभूमीवर एकंदर विचार करता भविष्यात साईभक्तांची साधारण आवक किती असेल याबाबत कुठलाही अभिलेख समिती समोर सादर करण्यात आलेला नाही असे मत तदर्थ समितीचे अध्यक्ष यांनी व्यक्त केले त्यावर सदस्य श्री. स्वामी साहेब यांनी सहमती दर्शविली व त्यांचे असेही मत पडले की, रु.40.34 कोटी व त्यामध्ये होणारी वाढ याचा विचार करता सद्यस्थितीत असा अधिकचा आर्थिक भार संस्थानवर टाकणे संस्थानचे हिताचे दिसत नाही. दर्शन रांगेच्या जी+2 इमारतीस राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. तिस-या मजल्याची तांत्रिक मंजुरी देण्यापूर्वी संस्थानने शासनास प्रथम प्रशासकीय मंजुरी दाखवावी असे म्हटलेले आहे.

[illegible] सबब, संस्थानने अभ्यासपूर्वक सविस्तर प्रस्ताव ठेवावा असा निर्णय 2:1 मताधिक्याने घेण्यात आला.
(कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

आयत्यावेळचा विषय नं.०३ :- श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग (स्वच्छता) व पेस्ट कंट्रोलचे काम, तसेच दररोज १०० वाढपी कामगार आऊट सोर्सिंग पध्दतीने पुरविणेकामी विविध वृत्तपत्रामध्ये जाहिरात देवून ई-निविदा मागविणेबाबत.

निर्णय क्र.४५१ सदर विषयावरील चर्चा सायंकाळी ६.३० नंतर उशीर झाल्याने पुढे ढकलण्यात आली.
(कार्यवाही- श्री साई प्रसादालय)

Scanned with CamScanner

इकडील पत्र क्र. ५५५/वशी-०४/१६०४ दि. २८/१०/२०२० चे पत्रानुसार माहिती मते अभिलेख्यात कायम ठेवून प्रमाणित स्वाक्षरी असे

आयत्यावेळेचा
विषय नं.०४ :- श्री पुण्यतिथी उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका छपाई कामी ग्राम ई निविदेतील न्यूनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.

निर्णय क्र.४५० :- सदर विषयावरील चर्चा सायंकाळी ६.३० नंतर झाल्याने पुढे ढकलण्यात आली.

(कार्यवाही- [illegible] कक्ष)

---

आयत्यावेळेचा
विषय नं.०५ :- संस्थान विरोधात शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्य गटातील विकासित एकूण २२ रस्त्यांपैकी भूसंपादनाचे ०९ रस्त्यांकरीता एलएक्यु/एसआर/०७/२००७ निवाडा घोषीत दि.३०.१२.२००७, एलएक्यु/एसआर/२१/२००७ निवाडा घोषीत दि.२५.११.२००७ व एलएक्यु/एसआर/०१/२००७ निवाडा घोषित दि.०४.११.२०१० चे भूसंपादन प्रकरणी संपादीत जमिन मालक यांनी भूसंपादन कायदा कलम १८ प्रमाणे दाखल केलेल्या भूसंदर्भ दाव्यामध्ये [illegible] मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी व [illegible] अधिकारी, शिर्डी [illegible] करणेबाबत.

निर्णय क्र.४५१ :- यावर सविस्तर चर्चा होवून, या विषयावर अभ्यासपूर्वक प्रस्ताव समितीसमोर आणावा असे [illegible] समितीचे अध्यक्ष व सदस्य श्री स्वामी साहेब यांचे मत पडले. त्यावर सदस्य सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे मत मांडले की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, शिर्डी नगरपंचायत व शिर्डी संस्थान यांच्या संयुक्त करारनाम्यानुसार रस्ते विकासासाठी भूसंपादन केलेल्या जमिनीची नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी शिर्डी संस्थानने स्वीकारलेली आहे व त्या अनुषंगाने पूर्वीचे निर्णय क्र.263 नुसार या कामाला तत्कालीन समितीने मंजुरी दिलेली आहे. याशिवाय नुकसान भरपाई देण्याचा दावा मान्य झालेला असल्याने व भूसंपादनाची मूळ रक्कम संस्थानने दिलेली असल्यामुळे आता वाढीव नुकसान भरपाई देण्याची जवाबदारी ही संस्थानवर येते. आता एक कोटी रुपये एवढी वाढीव नुकसान भरपाईची रक्कम देण्याचा निर्णय घेतला तर व्याजाची रक्कम देण्याचे टळेल व यामुळे संस्थानच्या पैशाची बचत होईल. सभेसमोर प्रस्तावामध्ये सर्व मुद्दे परिपूर्ण 100टक्के घेतलेले असे नाही. तथापी [illegible] अतिरिक्त माहिती आवश्यक असेल तर संबंधित अभिलेख पहाता येतील. केवळ या कारणास्तव प्रस्ताव प्रलंबीत ठेवून खर्चवाढ होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे, असे सदस्य सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रतिपादीत केले.

यावर तदर्थ समितीचे अध्यक्ष व सचिव श्री. स्वामी साहेब यांचे खालील प्रमाणे मत पडले.
While presenting this subject certain important documents were not referred to in the note prepared by the concerned department. Be that as it may, the important point for consideration before the Committee is the fact that though there is tripartite agreement between Sansthan, Shirdi Nagarpanchayat and Executive Engineer of MSRDC, Pune, the Sansthan was not made party in the Reference before Civil Court, Rahata.

The concerned department has not studied this aspect because while accepting the liability in further proceedings of Reference under the said tripartite agreement, the Sansthan has lost valuable right to challenge the very claim of the petitioners in the Land Reference proceedings. Concerned department to examine this angle and come up with proper proposal which shall be in the financial interest of the Sansthan.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

आयत्यावेळेचा
विषय नं.०६ :- प्रचलित पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.
संस्थानच्या भांडार विभागाकडे शिल्लक असलेले खाद्यतेल पुरवठाधारक मे.कैलास फुड अॅन्ड जनरल स्टोअर्स, सातारा यांना परत करणेबाबत.

Scanned with CamScanner

इकडील पत्र क्र. ६६५ / [illegible] दि. २८/१०/२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखावर कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे.

[illegible]

(श्री ... [illegible])

[illegible]

(श्री ... [illegible])

सदरील निर्णय क्र. ४२९ ते ४५३ घेण्यात आले.

त्यानंतर सायं. ०८.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

एकडील पत्र क्र. SSS/वशी ०४/९८०४ दि. २८/१०/२०२० चे पत्रानुसार माझी मते अभिलेखात कायम ठेवून इतिवृत्त स्वाक्षरीत असे

(दिलीप स्वामी)
अपर महसूल विभागीय आयुक्त नाशिक
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती

(कान्हूराज बगाटे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती

मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील PIL 120/2019 आणि केस नं. CCA – / ( ) अनुसार ~~[illegible]~~ आलेल्या आदेशाप्रमाणे सदर इतिवृत्त – [illegible] अधिप्रमाणे [illegible] स्वाक्षरीत [illegible]

Scanned with CamScanner